।। श्रीराम ।।

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ९१

ॐ

# श्रीगोविंदचरितमानस

लेखक

**श्री. नरहर दा. दिवेकर, सांगली**

प्रकाशक

**श्री. लक्ष्मण त्रिंबक परचुरे**

आवृत्ती तिसरी सांगली सन २०२१

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र.९१

# श्रीगोविंदचरितमानस

लेखक - श्री. नरहर दामोदर दिवेकर, सांगली

**प्रकाशक** श्री.लक्ष्मण त्रिंबक परचुरे
डी-२, रेऊ रेसिडेन्सी, चर्चजवळ,
वारजे, पुणे ४११०५८
मो.९४२११२७६१२

**प्रथम आवृत्ती इ.स.१९८४**
**द्वितीय आवृत्ती इ.स. २००५**
**तृतीय आवृत्ती इ.स. २०२१**
**प्रकाशन दिन :**

© **सर्व हक्क श्री. दीपक चंद्रशेखर केळकर यांचे स्वाधीन**

अक्षर जुळणी : **श्री.भालचंद्र विनायक सहस्रबुद्धे**

मुद्रक : **एस. बी. ऑफसेट प्रिंटर्स, सांगली**

**स्वागत मूल्य** : रु.१००/-

**प्रत मिळणेचे ठिकाण :**
श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकर वाडा,
सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.
दूरध्वनी :०२३३-२३३१७४७
भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८/९४२०५७४५७०
ईमेल - kelkarnana@gmail.com

## समर्पण

मेघकृपेचा वळता पावन सुक्षेत्र सांगली झाले ।
अर्धशतावरि स्त्रवती अमृतधारा किती नवल केले ।।१।।

कृष्णातीरी कीर्तनगंगा ही वाहते अखंड अशी ।
अघमर्षण सुखसाधन भवभंजन मूर्तिमंत ही काशी ।।२।।

सत्य श्रीहनुमंता सदया केला प्रसार भक्तिचा ।
गोविंद तव स्वरूपी मिळुनी गेले प्रभाव हा तुमचा ।।३।।

हनुमंतसंत करिती छाया ही चिरसुखार्थ भक्तांच्या ।
'श्रीगोविंदचरितमानस' सद्भावे अर्पितो पदी त्यांच्या ।।४।।

सन्मार्ग निजसुखाचा केला सुखकर सदैव दोघांनी ।
प्रणिपात गुरूपदी हा अर्पूनि आम्ही कृतार्थ या अवनी ।।५।।

श्रींचा नम्र,
**सखाराम विनायक जोगळेकर**
मुंबई

## ॐ प्रथम आवृत्ती प्रकाशकाचे चार शब्द ॐ

कै. परममपूज्य श्रीगोविंद अनंत ऊर्फ श्रीबापूरावजी केळकर यांनी देह ठेवून, एक वर्ष होत आहे. त्यांच्या संबंधाने जनतेत पूज्यभाव उत्पन्न होण्याचे मुख्य कारण म्हणजे - श्रीसद्गुरू श्रीहणमंतरावजी कोटणीस महाराज यांनी देह ठेविल्यानंतर साक्षात्कार रूपाने प्रगट होऊन दिलेल्या आज्ञेप्रमाणे, एकही दिवस खंड न होता अखंड आपले सांगली येथे श्रीबापुरावजींनी केलेले कीर्तन हेच होय. ही एकच गोष्ट अशी आहे की, त्यात गुरूकृपा, साधन, सिद्धता आणि श्रीबापुरावजींचा पारमार्थिक अधिकार स्पष्ट दिसून येत आहे. बीज हे भूमिगत असले तरी, त्याचे फळ हे दृश्य असते आणि तेथे शंकेला जागाच रहात नाही. प्रत्यक्ष आज्ञा होऊनही अशी उपासना घडणे दुरापास्त आहे. श्रीबापूरावजींना आम्ही सर्वजण प्रेमाने ''मामा'' म्हणतो. 'आपुले मरण पाहिले म्या डोळा । तो सुख सोहळा अनुपम' या श्रीतुकाराममहाराज यांच्या उक्तिप्रमाणे आमच्या मामांच्या मरणाचा एक सोहळाच झाला. एरवी नाड्या सुटलेल्या अवस्थेत नामघोष करावयास कोणास सुचेल? मामांच्या अंतकाळी शेकडो लोक दर्शनास आले होते. पण ते सर्व या नामघोषांत सामील होत होते. अन्नपाण्याची कोणासच शुद्ध नव्हती आणि या अंतकालचे दिवशी शरीरात सकाळपासून सामसूम झाली असता, सायंकाळी पाचचे ठोके पडताच श्रीमामांनी मान वर करून सर्वांना 'श्रीराम जयराम जयजयराम' म्हणा म्हणून सांगितले आणि आत्मचिंतनात निमग्न होऊन सोमवार माघ शुद्ध नवमी शके १८८३ दिनांक १२.०२.१९६२ इसवी रोजी रात्री ११ वाजून ५० मिनिटांनी आपला देह आत्मस्वरूपात विलीन केला. हे दृश्य ज्यांनी आपल्या दृष्टीने पाहिले त्यांचे अंतःकरणातून ते कधीच हालणार नाही. अनेक मुमुक्षुंना त्यांनी आपल्या कृतीने वेडेच करून टाकले. अर्थात या वियोगाने त्यांची काय अवस्था झाली हे सांगता येणारे नाही. अशास्थितीत आमचे परमप्रिय श्री.

नरहर दामोदर दिवेकर, बी.ए.बी.टी. यांनी मामांचे जीवन अगदी जवळून पाहिलेले असलेने, स्वयंस्फूर्तीने ओवीबद्ध चरित्र लिहून, निराकार मामांना पुन्हा साकार केले आहे. चरित्राची यथार्थता ज्याची त्याने आपल्या मनाशी ठरवायची आहे. अशा प्रकारचे चरित्र अंतःकरणाला उजाळा देत राहिल आणि जे कोणी अपरिचित असतील त्यांनाही एक संत समागम लाभेल या दृष्टीने हे चरित्र प्रकाशित करण्याबद्दल आमच्या मामांचे चिरंजीव श्री. राम गोविंद केळकर यांना विनंती केली आणि त्यास दुःखात सुख या दृष्टिने त्यांनी परवानगी दिली, म्हणून आम्हास हे चरित्र प्रसिद्ध करता आले. संतच संतांना जाणतात या न्यायाने परमपूज्य रामभाऊंनी विनंती केलेप्रमाणे गु.ह.भ.प. सोनोपंत दांडेकर एम.ए. यांनी या ग्रंथास आत्मीयतेने जे चार शब्द दिले त्याचे मोलच होणार नाही. अर्थात त्यांचे आभार मी कोणत्या शब्दाने मानावे? माझे मेहुणे श्री. केशव वामन आपटे एम.ए., प्रोफेसर बाँबे कॉलेज, बाँबे, यांनी माझ्या विनंतीप्रमाणे या ग्रंथास जे चार शब्द दिले आहेत, ते त्यांच्या अंतःकरणांत श्रीमामांचेबद्दल असणाऱ्या निष्ठेस शोभतील असेच आहेत. श्री. रामभाऊंनी श्रीमामांची कीर्तनाची परंपरा पुढे चालू ठेवली आहे, हेच मामांचे खरे स्मारक होय असे मला वाटते.

या चरित्राची प्रेस-कॉपी श्री.धुंडिराज लक्ष्मण जोशी व श्री. प्रकाश सदाशिव भावे यांनी तयार केली असून, प्रूफ करेक्शनचे काम श्री. पांडुरंग सिताराम गोखले, एस.टी.सी. यांनी पाहिले. या ग्रंथाचे कामी श्री. मधुसूदन परचुरे बी.एसस्सी. यांचेही सहकार्य झाले आहे. प्रेसचे चालक श्री. न. व्यं. पडसलगीकर यांनी पुस्तकाचे काम त्वरित व सुबक करून दिले आहे. या सर्वांचा मी मनःपूर्वक आभारी आहे. शेवटी श्रीमामांचे अनन्य भावाने स्मरण करून त्यांचे चरणी ही सेवा मी सादर समर्पण करतो.

दि.२.२.१९६३ नम्र सेवक,

सांगली सखाराम विनायक जोगळेकर, मुंबई.

## ❊ प्रथम आवृत्ती प्रास्ताविक चार शब्द ❊

प्रस्तुतचे ''श्रीगोविंदचरितमानस'' म्हणजे श्री. नरहर दामोदर दिवेकर यांनी लिहिलेले कै. ह.भ.प. बापूरावजी केळकर यांचे जीवन-चरित्र होय. श्री. दिवेकर यांना कै. बापूरावजी यांचे सान्निध्य लहानपणापासून अनेक वर्षे लाभल्याने कै. बापूरावजींच्या चरित्रातील लहानसहान गोष्टीपासून तो गुरूपदेशाचा लाभ या सारख्या पारमार्थिक क्षेत्रातील क्रांतिकारक मोठ्या गोष्टीपर्यंत सर्व गोष्टी ते या चरित्रात तपशीलवार देऊ शकले आहेत व चरित्राच्या मौलिकतेच्या दृष्टीने ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. कारण पुष्कळवेळा लेखकच चरित्रनायकाच्या परिवारात फार उशिरा येतो व यामुळे चरित्र लिहिताना अनेकवेळा लेखकास ऐकीव माहितीवर अवलंबून राहावे लागते. या चरित्रात तसा प्रकार नाही. शिवाय ह.भ.प. बापूरावजींना कैलासवासी होऊन उणेपुरे वर्षच होत आहे. साहजिकच त्यांना लहानपणापासून पाहिलेली मंडळी हयात आहेत.

श्री. दिवेकरांनी मोठ्या भाविकतेने व रसाळवाणीने हे चरित्र लिहिलेले आहे. पण ते लिहित असताना ते भाविकतेच्या पुरात वाहून गेलेले नाहीत; यामुळे जीवनचरित्रातील तपशिलांवर अविश्वास प्रगट करण्याचे कारण नाही.

कै. बापुरावजींचे हे चरित्र म्हणजे या सांगली-क्षेत्राच्या आध्यात्मिक इतिहासाचे एक पान होय. कै. हणमंतरावजींनी कीर्तन करण्यास प्रारंभ केला व ती प्रथा सतत पंचवीस वर्षे आपले देहावसान होईपर्यंत चालविली. या कीर्तनसेवावृक्षापासून दोन कोंब फुटले; एक कै. ह.भ.प. तात्यासाहेबांचे चिरंजीव ह.भ.प. रघुनाथ हणमंत ऊर्फ बाबूराव कोटणीस यांच्या कीर्तनसेवेचा व दुसरा त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन फुटलेला कोंब हा कै.

ह.भ.प. बापूरावजींच्या कीर्तनसेवेचा. दुर्दैवाने गेल्या वर्षी माघ शुद्ध नवमीस हा दुसरा वक्ष उन्मळून पडला. पण दुःखात आनंदाची गोष्ट म्हणजे केळीला जसे कों ब फुटतात तसे या कीर्तनसेवारूपी वृक्षालाहीकै. बापूरावजींच्या चिरंजीवांच्या म्हणजे ह.भ.प. रामभाऊंच्या कीर्तनसेवेचा कोंब फुटला. बापुरावजींच्या निधनाच्या दुसऱ्या दिवसापासूनच म्हणजे माघ शुद्ध दशमीपासूनच त्यांनी कीर्तनसेवेस सुरूवात केली. फार आनंदाची गोष्ट आहे !

मौज अशी की हे तिन्ही-चारी लहान-मोठे वृक्ष एकाच चिमड-क्षेत्राच्या अंगणातील आहेत, व गेल्या अर्धशतकापेक्षा अधिक वर्षे नामसंकीर्तनरूपी पुष्पांचा सडा ते रोज घालीत आहेत. सांगलीकर भाग्यवान श्रोते या पुष्पांचा अमृतस्वाद घेऊन आपले जीवन पुनीत करीत आहेत. हा कीर्तनवृक्ष हरळीपेक्षाही अधिकच अमर ठरणारा आहे.

कै. बापूरावजींनी नामसंकीर्तनावाचून दुसरे केलेच नाही; त्यासाठी त्यांनी नोकरीही सोडून दिली. 'नेणती काही टाणाटोणा । नामस्मरणावाचोनि ।।' या वर्गातील अथवा 'नामामृत गोडी' ज्यांना लाधली अशा वैष्णवांपैकी ते एक होते. त्यांना कै. तात्यासाहेब केळकर यांनी एकदा विचारले होते की रोज नामासंबंधी काय सांगता? त्यावर बापूजी म्हणाले, 'सांगण्यासारखे इतके अजून आहे की ते सांगून संपेलसे वाटत नाही.' कै. बापूराजींचे जीवन अंतर्मुख वृत्तीचे असल्याने समारंभ, गाजावाजा हे त्यांच्या चरित्रात नाहीत. काही समारंभ 'केले' म्हणण्यापेक्षा, 'परेच्छा-प्रारब्धाने घडून आले' असे म्हणण्यास हरकत नाही.

अशा नामधारक, नामनिष्ठ संतांचे चरित्र मराठी वाचकांसमोर सोप्या, रसाळ भाषेत मांडून या कीर्तीपराङगमुख संताची जगास माहिती करून दिली, याबद्दल श्री.दिवेकरांचे मी अभिनंदन करतो.

बापूराव एकनिष्ठ नामधारक असल्याने त्यांच्या या जीवन चरित्रांपासून नामनिष्ठेचे केवढे फळ असते, त्यायोगे संकटे कशी दूर होतात, ते नामच साधकाला अनुभवाच्या अधिकाधिक उन्नत पदवीला कसे नेते इत्यादि गोष्टी कळून येतील व त्यायोगे साधका वाचकांची परमार्थ पथांवरील श्रद्धा दृढ होण्यास मदत होईल अशी खात्री आहे. ह.भ.प. बापूरावजींनी जवळजवळ दोन हजार अभंगरचना केल्याचे कळते. जसे हे चरित्र लिहून प्रसिद्ध केले त्याप्रमाणे त्यांचे अभंग-वाङ्मयही छापून प्रसिद्ध होणे आव आहे. त्याच्या प्रकाशनाने परमार्थाची वाट चालू इच्छिणाऱ्या साधकांच्या साधनमार्गावर खात्रीने प्रकाश पडेल. श्रीभगवंताच्या शब्दात या भक्त-चरित्राची महती सांगून हे चार शब्द संपवितो.

**''तेहिं प्राणापरौते । आवडती हे निरूते ।**
**जे भक्तचरित्रांते । प्रशंसिती ।।'' (ज्ञा.-१२.२२७)**

पुणे-२
दि.१७.०१.९३ — शं.वा.दांडेकर

## ※ द्वितीय आवृत्ती प्रकाशकाचे मनोगत ※

प.पू.श्री. गोविंद अनंत ऊर्फ श्री. बापूरावजी केळकर तथा श्रीमामामहाराज यांचे ओवीबद्ध जीवन चरित्र श्री. नरहर दामोदर दिवेकर, सांगली यांनी उत्तम लिहिले आहे. ह्या चरित्राची प्रथम आवृत्ती संपून द्वितीय आवृत्ती छापावी लागत आहे. अर्थात प.पू. सद्गुरू श्रीमामांच्या चरित्राचाच हा महिमा आहे. प.पू.मामांच्या निगर्वी, निरलस, निरपेक्ष, निराभिमानी कीर्तन सेवेची ही पावतीच आहे. विनम्रता, सात्विक भक्ती, अखंड साधना आणि ३८ वर्षांची अखंड कीर्तन सेवा म्हणजेच प.पू. श्रीमामांचे चरित्र होय.

माझे वडील कै. पंडितराव परचुरे आणि आई कै. पमाताई परचुरे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ ही द्वितीय आवृत्ती प्रकाशित करताना मनास समाधान वाटत आहे. माझे आई वडील दोघेही प.पू.मामांचे नामधारक होते आणि निःसीम भक्तही होते. म्हणूनच प.पू.श्रीमामांच्या कृपेनेच ही द्वितीय आवृत्ती प्रकाशित होत आहे.

मला ही संधी दिल्याबद्दल श्री चंद्रशेखरजीअण्णांचे आभार मानून आनंद व्यक्त करतो. या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रुफ करेक्शनचे काम ज्यांनी केले, ते श्री. पांडुरंग सिताराम तथा बाळासाहेब गोखले यांनीच द्वितीय आवृत्तीच्या प्रुफ करेक्शनचे काम केले आहे. हा योग काही वेगळाच आहे. या कामी त्यांचे चिरंजीव श्री. प्रसन्न गोखले व श्री. मधुसूदन काटकर, अमित कदम यांचाही सहभाग लाभला आहे. या द्वितीय आवृत्तीच्या छपाईचे काम श्रीदासराम ऑफसेट, सांगलीचे श्री. बाळासाहेब लोखंडे व त्यांचे चिरंजीव यांनी त्वरीत, सुबक व अत्यंत आकर्षक करून दिले आहे. या ग्रंथाच्या कव्हरपेजची वरील बाजू श्री. बाळासाहेब लोखंडे यांचे चिरजीव व त्यांचे सहकारी यांनी सुशोभित केली आहे, तर कव्हर पेजच्या मागील बाजूस श्री हनुमान समाधि मंदिरा मागील औदुंबराचा वृक्ष आहे. जो श्रीतात्यासाहेबमहाराजांचा आहे. त्याखाली समाधी मंदिराचे धनी गु.भ.प. श्री.गंगाधरकाका दीक्षित यांनी प.पू.श्रीमामांच्या अस्थि ठेवल्या आणि भगवान श्रीसद्गुरू श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी म्हटल्याप्रमाणे **।। ये शरीराची माती । मेळविन तियेचे क्षिती । जेथ श्रीचरण ठाती । सद्गुरूंचे ।।** असे भाग्य श्रीमामांना प्राप्त झाले. त्या औदुंबर वृक्षाचे रेखाटण श्री. दा. ल. कुंटे, सांगली यांनी केले आहे. याबद्दल या सर्वांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

प.पू.सद्गुरू श्रीमामांचे व प.पू. सद्गुरू श्रीदादांचे श्रद्धा भक्तीयुक्त अंतःकरणपूर्वक स्मरण करून, ही सेवा त्यांचे चरणी सादर समर्पण करतो.

सांगली<br>११.०२.२००५

नम्र सेवक<br>गोपाळ परचुरे, सांगली.

## ❊ द्वितीय आवृत्ती प्रास्ताविक चार शब्द ❊

माझे आजोबा ती. प.पू. श्रीमामामहाराज केळकर यांचे चरित्र गु.भ.प. श्री. न.दा.तथा अण्णा दिवेकर यांनी अत्यंत रसाळ असे लिहिले आणि ते श्रीमामांच्यावर अतिशय निष्ठा असलेले श्री. सखाराम विनायक तथा नाना जोगळेकर, मुंबई यांनी इ.स. १९६३ मध्ये प्रकाशित केले. सध्या त्याच्या प्रती उपलब्ध नाहीत.

ती. प.पू.श्रीमामा असताना त्यांनी आपला अधिकार अत्यंत गुप्त राखला होता. श्रीमती शरयू उपळावीकर म्हणतात, **'गुप्त राखियला अधिकार । असोनी स्वरूपाकार'** हे अगदी बरोबर आहे. कारण खरा सिद्ध संत असताना तो प्रसिद्ध नसतो आणि निर्वाणानंतर जो प्रसिद्ध होतो खरा सिद्ध संत असतो. म्हणून तर जगद्गुरू श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'असो ऐसा कोठे आठवची नाही । देहीच विदेही भोगु दशा' या अवस्थेत श्रीमामा होते. यामुळे गुरुवर्य श्री. अण्णा दिवेकर यांनी **।। श्रीगोविंदचरितमानस ।।** या ग्रंथाने श्रीमामांना साकार केले. या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या सगळ्या प्रती संपल्या आणि आता ही दुसरी आवृत्ती आमचे श्री. गोपाळ परचुरे प्रकाशित करीत आहेत.

श्री. गोपाळ परचुरे, त्यांचे पितृदेव श्री. पंडितराव परचुरे व मातोश्री पमाताई परचुरे या सर्वांचीच आत्यंतिक श्रद्धा श्रीमामांचेवर होती. आमचे ती. प.पू.श्रीमामा हे कसे होते हे सांगत असताना पमाताई परचुरे श्रीसमर्थांच्या खालील श्लोकाद्वारे त्यांचे वर्णन करावयाच्या :-

**''हरिभक्त विरक्त विज्ञान राशी । जेणे मानसी स्थापिले निश्चयेसी।।**
**जया दर्शने स्पर्शने पुण्य जोडे । तया भाषणे नष्ट संदेह मोडे ।।''**

श्री. गोपाळ परचुरे हे खरे मातृ-पितृ भक्त आहेत. त्यांनीच त्यांची सेवा अत्यंत मनापासून केली. त्यामुळे ही 'श्रीगोविंदचरितमानस'ची द्वितीय आवृत्ती त्यांनी त्यांच्या आई-वडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ प्रकाशित केली आहे आणि ते योग्यच आहे.

श्री. गोपाळराव परचुरे यांनी ही द्वितीय आवृत्ती प्रकाशित केल्यामुळे, नवीन लोकांपुढे ती. प.पू.श्रीमामा वाङ्मयरूपाने पुनः प्रगट होणार आहेत. यादृष्टीने त्यांनी हे फार मोठे काम केले आहे.

शेवटी भगवान सद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, ती. प.पू. श्रीमामामहाराज केळकर व ती. प.पू. श्रीदादामहाराज केळकर या त्रैमूर्तींचे चरणी विनम्र अभिवादन करून व कृपेची याचना करून येथेच विरामतो!

सांगली
११.०२.२००५

श्रीदादांचा कृपाभिलाषी
चंद्रशेखर
(चंद्रशेखर रामराय केळकर)

## ✻ गौरव ✻

हरि–कीर्तनी रंगली वृत्ती ज्यांची ।
मनी मूर्ती जे ध्याती राम–प्रभूची ।।
गुरू डोलविला हनुमंत–राजा ।
नमस्कार गोविंदरायासी माझा ।।१।।
**श्रीदासराम**

संसारात राहून परमार्थ करावा व परमार्थातील परम पदवी प्राप्त करून घ्यावी असे साधुसंतांनी सांगून ठेवले आहे. हे कसे करावयाचे, हे स्वतःच्या उदाहरणांनी दाखवून देणाऱ्या अनेक संतांमध्ये श्रीगोविंद अनंत तथा श्रीबापूरावजी केळकर यांची गणना होते. संसारात असतानाच नित्य हरि-कीर्तन कसे करता येते आणि आत्मोन्नतीचा मार्ग कसा आक्रमिता येतो, हे श्रीबापूरावजींनी आपल्या उदाहरणाने इतर साधक मुमुक्षुंना दाखवून दिले. परमार्थाचे पुनरुज्जीवन करणे, परमार्थ जागता ठेऊन त्याकडे प्रवृत्ती फिरविणे, हे जर संतांचे कार्य असेल तर ते श्रीबापूरावजींनी यशस्वीपणे देहपातापर्यंत केले असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

श्रीबापूरावजींचे दर्शन ज्यांना झाले होते, त्यांना स्थूल व्यवहारिक दृष्टीने पाहतानासुद्धा पुढील गुण त्यांच्यामध्ये आढळून आले असते- अत्यंत साधी रहाणी व साधा वेश, आहारातील नियमितता, निर्व्यसनीपणा, नम्रता, पुढे पुढे न करण्याची प्रवृत्ती आणि प्रसिद्धी विन्मुखता. त्यांच्या अधिक सान्निध्यात राहणाऱ्यांना वा आलेल्यांना, श्रीबापूरावजींनी निद्रेवर कसा विजय मिळविलेला होता हे ज्ञातच आहे. त्यांचे पारमार्थिक कार्यक्रम - नित्याचे कीर्तन इत्यादी - हे कसे अगदी वेळेवर सुरू होत, हे तर उपस्थित होणाऱ्या सर्वच श्रोतृगणाला माहित आहे.

सूक्ष्मदृष्टीने अवलोकन करणाऱ्यांना परमार्थात आवश्यक असणारे गुण श्रीबापूरावांचे ठायी वास करून होते, हे कळण्यास अडचण पडली नसती. किंबहुना ज्ञानाची साधने अथवा आत्मज्ञानासाठी आवश्यक म्हणून जे वीस गुण भगवान् श्रीकृष्णांनी भगवद्गीतेत (अ.१३.७-११) सांगून ठेवले आहेत, ते सर्वच्या सर्व श्रीबापूरावजींचे ठिकाणी आढळून येतात. भगवंतानी सांगितलेले हे गुण असे आहेत :- **१) अमानित्व – गर्व नसणे, आत्मश्लाघा न करणे (शंकर), श्रेष्ठांची अवधीरणा न करणे (रामानुज). २) अदंभित्त्व – स्वधर्म – प्रकटीकरणाचा अभाव, दंभाचा अभाव. ३) अहिंसा – प्राण्यांना पीडा न देणे. ४) शांती–क्षमा, दुसऱ्यांनी अपराध केला तरी चित्तांचे निर्विकारत्त्व राखणे (नीलकंठ), दुष्टांचा अतिक्रम सहन करणे (पुरुषोत्तम). ५) आर्जव – ऋजुता, सरळपणा. ६) आचार्योपासना – सद्गुरूंची सेवा. ७) शौच – काया, वाचा, मन यांची शुद्धी (रामानुज). ८) स्थैर्य – अध्यात्मशास्त्रात सांगितलेल्या गोष्टींचे बाबतीत निश्चलता (रामानुज), मोक्षमार्गावर स्थिरपणे रहाणे (शंकर). ९) आत्म–विनिग्रह – देहेंद्रियाच्या प्रसारास अटकाव (नीलकंठ), आत्म–वस्तुखेरीज इतर वस्तूंपासून मनाचे परावर्तन (रामानुज). १०) इंद्रियार्थेषु वैराग्यं – शब्द इत्यादी इंद्रिये– विषयांच्या ठिकाणी वैराग्य. ११) अनहंकार – अहंकाराचा अभाव. १२) जन्ममृत्यु, जराव्याधी, दोषानुदर्शन – शरीर आहे तोपर्यंत जन्ममृत्यू, जराव्याधी**

यांचे दुःखरूपी दोष चुकत नाहीत, हे दृष्टीपुढे ठेवणे(रामानुज). १३) आसक्ती – इतर वस्तुंचे ठिकाणी अनासक्ती (पुरुषोत्तम), आत्म–व्यतिरिक्त पदार्थांचे ठायी अनासक्ती (रामानुज). १४) पुत्र–दार–गृहादिषु अनभिष्वंग, पुत्र इत्यादि सुखी–दुःखी झाले असता, आपण सुखी–दुःखी झालो असे न मानणे (वेंकटनाथ ब्रह्म), अति आसक्ती नसणे (रामानुज). १५) इष्टानिष्टोपपत्तिषु नित्यं सम–जित्रत्त्वम्– इष्ट किंवा अनिष्ट गोष्टी प्राप्त झाल्या असता चित्ताची समतोल वृत्ती न सोडणे. १६) मयि अनन्य योगेन अव्यभिचारिणी भक्ति :– परमेश्वराच्या ठिकाणी अनन्यपणे 'स्थिररूपा' अशी अव्यभिचारी भक्ति. १७) विविक्त – देश सेवित्त्व – जनरहित प्रदेशी असणे, विविक्त म्हणजे शुद्ध, म्हणजेच चित्ताला समाधानकारक अशा स्थानात (वेंकट ब्रह्म). १८) जनसंसदिअरतिः – विषयी–जनांच्या समुहात असण्याची आवड नसणे (वेंकट ब्रह्म). १९) अध्यात्म–ज्ञान–नित्यत्त्व–आत्म– ज्ञान– निष्ठा (रामानुज). २०) तत्त्वज्ञानार्थ – दर्शन – तत्त्वज्ञानांचे जे उद्दिष्ट – अविद्येची विवृत्ती व आनंदाची प्राप्ती – त्यांचा विचार (नीलकंठ) – श्रीबापूरावजी या सर्व गुणांनी युक्त होते. ते आत्मश्लाघा कधीच करीत नसत. दंभाचा लवलेशही त्यांच्यात नव्हता. अहिंसा, शांती, आर्जव, शौच, स्थैर्य, आत्मविनिग्रह, वैराग्य हे गुण त्यांच्यामध्ये होते, हे आवर्जुन सांगण्याची जरुरी नाही. केवळ सद्गुरूंची आज्ञा, त्यांची सेवा म्हणून त्यांनी अविरत ३८ वर्षे नित्य हरिकीर्तन केले, ही वस्तुस्थिती त्यांच्या आचार्योपासनेची साक्ष देते. सद्गुरूंनी सांगितलेले साधन करणे हीही सद्गुरूंची सेवाच होय, ते बापूरावजींनी केले हे निराळे सांगणे नकोच. ते अत्यंत निरहंकारी होते. क्र.१३ ते १५ गुणांच्या बाबतीत त्यांच्या चरित्रातील एका प्रसंगाचा उल्लेख केला म्हणजे पुरे आहे. हा प्रसंग असा :- साडेतीन कोटी रामनामाचे पुरःश्चरण चालू असता, स्थलांतर न करण्याचा नेम त्यांनी केला होता. यावेळी ते शिक्षक होते. त्यांची परगावी बदली झाली. त्यांनी लगेच नोकरीचे त्यागपत्र दिले. त्यांची भक्ती कशी अनन्य होती, याचे हृदयस्पशी उदाहरण त्यांच्या अंतकाळच्या प्रसंगात सापडते :- ''ज्या दिवशी त्यांनी देह ठेवला, त्या दिवशी सकाळी ६ वाजता त्यांच्या नाड्या सुटलेल्या होत्या. अशा स्थितीत संध्याकाळी ५ वाजता त्यांचे नित्याचे कीर्तनाची वेळ झाली मात्र, त्यांनी आपले डोके वर उचलले आणि 'श्रीराम जयराम जयजयराम म्हणा' हा उच्चार केला, हे त्यावेळी जमलेल्या अनेकांनी प्रत्यक्षच पाहिले आहे.'' स्वतःच्या घरातील समाधानकारक श्रीराममंदिरात त्यांचा बहुतेक वास असे. तसेच लोकात बसून गप्पा गोष्टीत वेळ दवडण्याची त्यांना आवड नव्हतीच. तेव्हा विविक्त - देव - सेवित्त्व त्यांचेजवळ होतेच. अध्यात्म-ज्ञान नित्यत्त्व आणि तत्त्वज्ञानार्थ - दर्शन हेही गुण पुरेपुर होते. या गुणांमुळे आत्मज्ञान होऊन साक्षात्कार झाल्यास, त्यात नवल कसले? श्रीबापूरावजींनी लिहिलेल्या श्रीरामपाठातील २६ ते २९ हे अभंग वाचणाऱ्याला व **'श्रीहनुमद्-गुरुचरित्रबोधसार'** यातील सातवा अध्याय व अध्याय ११-८-१५ वाचणाऱ्याला श्रीबापूरावजींच्या आत्मानुभवाची साक्ष येईल.

बहुतेक लोकांना सुपरिचित असणारे श्रीबापूरावजींचे महान कार्य म्हणजे त्यांचे नित्यनेमांचे ३८ वर्षांचे अखंड हरि-कीर्तन.

संतांचे कार्य त्यांच्या देहपातानंतरही प्रभावी रहाते. यादृष्टीने श्रीबापूरावजींचा नित्यकीर्तनाचा क्रम त्यांचे परमाधिकारसंपन्न चिरंजीव

श्रीरामराय गोविंद केळकर यांनीही नेमाने चालूच ठेवला आहे, हे मुद्दाम सांगणे आवश्यक आहे.

प्रायः परमार्थाची आवड कमी आढळते. त्यातही शिक्षितांना परमार्थाबद्दल फारशी आस्था बव्हंशी दिसून येत नाही. तरी श्री. न.दा. दिवेकर, बी.ए.बी.टी. यांनी मोठ्या श्रद्धेने व भाविकतेने हे चरित्र लिहून श्रीबापूरावजींची सेवा केली, हे त्यांना भूषणास्पद आहे.

संतांची चरित्रे साधक-मुमुक्षुंना मार्गदर्शक ठरतात. यादृष्टीने श्रीबापूरावजींचे हे चरित्र प्रसिद्ध होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे आणि हे चरित्र ओवीबद्ध असल्याने ते भाविकांना नित्य पठणाला उपयोगी पडेल यात शंका नाही.

मुंबई - केशव वामन आपटे
०९.०१.१९६३

## ✲ सुमन गुच्छ ✲

गोविंदचरितमानस लेखक जे धन्य सत्य नरहरि ।
साकार करी मामा निराकार जरी जसा नरात हरि ।।१।।
रामचि सखा जगाचा, सखाराम करी प्रकाश ग्रंथाला ।
म्हणुनि प्रकाशन ज्यांचे, प्रकाशकू एक योग्यचि गमला ।।२।।
शंकर गौरविती बहु गोविंदा जाणुनि सुसंतांते ।
संतचि संता जाणती या उपरी काय बोलू मी त्याते ।।३।।
आमुचे मामा भरले ग्रंथांतरी नी तसेच जगतात ।
सुविचार सुमनमाला मामा ते अर्पि राम हा येथ ।।४।।
तृतिया कथा गुरुंची कीर्तन-सरिता अखंड ओघवती ।
केशव स्तविती सुमने अखंडचि तीच सत्य गोड स्मृती ।।५।।
श्रीहनुमत्सद्गुरूंचे छत्र शिरावरी असेच मामांचे ।
स्मरूनी सदा तया ते समर्पितो सत्कृती मने वाचे ।।६।।

- राम गोविंद केळकर, सांगली

## ❊ श्रीमामांची गोड स्मृती ❊

**(आर्यावृत्त)**

धन्य सदन ते ठरले कीर्तनघोषे अखंड दुमदुमले ।
श्रवणे मनने विरले अद्वयभजने उदंड जन रमले ।।१।।
गुरुशिष्य उभयतांनी नामाचे गुपित प्रगट दाखविले ।
कृष्णातीरी कीर्तनी निजबोधे अढळ स्थान राखियेले ।।२।।
साधनमार्ग क्रमुनी भक्तांही श्रेष्ठ ज्ञान सांगितले ।
नरजन्म श्रेष्ठ जाणुनी भगवंता सर्वकाळ वाहियेले ।।३।।
भगवत्प्राप्ती देही साधुनिया शुद्ध अनुभवा देती ।
परि इष्टमार्ग सोडूनी प्रापंचिक व्यर्थ काळ दवडिती ।।४।।
मतभेद सांप्रदायी दाखविती किती अनेक मार्गांनी ।
ईश्वर एकचि जगती निरखिला इष्टसाधुसंतांनी ।।५।।
दिनचर्या मामांची दांभिकी लौकिकी कधी नसे गमली ।
स्वागत राखुनी सकळी परमार्थी वृत्ती साच रंगविली ।।६।।
संतचरित्रे गाऊनी घातली अडि मुक्तीपेठी मामांनी ।
कीर्तनपंथा राखुनी चालविली घडि तदीय सूतानी ।।७।।
अमुपचि लिहूनी काव्या देती हे संतश्रेष्ठ बोधाते ।
श्रीज्ञानेश्वर तुकया आदि करुनी संत सांगती जे ते ।।८।।

कीर्तननी समाधीमंदिरी षष्ठीचा पुण्यकाळ साधियला ।
श्रीदांडेकरगुरूंनी तदि कीर्तन महिमा अपार वर्णियेला ।।९।।
श्रीरामरामजप अंती साधुनिया घेत शुद्ध मोक्ष गती ।
जन्मभरी जे करिती, भक्ता तया मिळत तेच सिद्धस्थिती ।।१०।।
असता जवळी मोती जाणती किती संत म्हणुनि विरळाचि ।
हळहळती सगळे मग मामांना म्हणती आगळा हाची ।।११।।
सोज्वळ सुबोध प्रेमळ काव्ये लिहिले चरित्र मामांचे ।
वाचुनी ऐकुनी स्मरुनी फेडावे अल्पसे ऋण कवीचे ।।१२।।
स्मरणी मूर्ती येता द्रवती, नमती कितीक जन ज्याला ।
आर्या लिहुनी त्रयोदश विनम्र भावे स्तवीत चरणाला ।।१३।।

- मोरोपंत कुलकर्णी,
भजनगायक, सांगली.

## ❊ श्रीराम पुण्यस्मरण ❊

सगुण रुप श्रीराम । निर्गुणी तोचि नेतसे ।
प्रसन्न रूप हे त्याचे । मम चित्ती सदा वसे ।।१।।
पितृसेवा मातृसेवा । प्रेम सर्वांवरी करी ।
कर्तव्यदक्ष हा राजा । शोभे हृदयमंदिरी ।।२।।
सत्ता संपत्ती सौभाग्य । लोभ ज्यांच्या मनी नसे ।
सुखदुःखी समाधानी । स्वस्वरुपी सदा वसे ।।३।।
राज्यभार पित्यासाठी । घे राघव शिरावरी ।
अंगिकारी वनी वास । उदासीन नसे कधी ।।४।।
विमुक्त जरी संसारी । आवडी संतपूजनी ।
ऋषी मुनी साधु संत । पूर्ण लालसा दर्शनी ।।५।।
अचूक शरसंधान । नेम साधी अखंड हा ।
मर्दिले शत्रू, हा झाला । विजयी वीर नेटका ।।६।।
संत केले सुखी सारे । रामराज्य जगावरी ।
राम राम वदे वाणी । ज्याची त्याची घरोघरी ।।७।।
अंतरी राहिला राम । बाहेरी राम राहिला ।
नामसंकीर्तनी वृत्ती । करी अढळ हा गुणे ।।८।।
सुनिश्चय कधी याचा । न ढळे भोगलालसे ।
अथवा संकटे घोर । समर्थन अवकृपे ।।९।।
थोर सामर्थ्यसंपन्न । परि लपवी अंतरी ।
दिसे सामान्यसा लोका । अंतरी नरकेसरी ।।१०।।

श्रीराम प्रिय सर्वांसी । सौजन्य मूर्तीमंतसे ।
सद्भाव सकळासाठी । शत्रूलाही सुखास्पद ।।११।।
प्रिय पत्नी सती साध्वी । पतीसेवा परायणा ।
आड येता सुकर्तव्या । ठेविली तीसही दूरी ।।१२।।
अजरामर ही कीर्ती । जोडुनी स्वपराक्रम ।
सच्चरित्र तुम्हा आम्हा । नंदादीप सदा जळे ।।१३।।

❊❊❊

गोविंद आणि श्रीराम । एकचि भासती पहा ।
ओळ ओळ तपासुनी । अनुभवी सत्यदर्शन ।।१।।

- नरहरी

❊❊❊

बोला जयजयकार जयजयकार मामांचा ।
सद्गुरूनाथांचा जयजयकार जयजयकार ।
जयजयकार जयजयकार जयजयकार जयजयकार ।
बापूरावांचा जयजयकार जयजयकार ।।

- सखाराम

❊❊❊

## ※ तृतीय आवृत्ती प्रकाशकाचे मनोगत ※

प.पू.श्री. गोविंद अनंत ऊर्फ श्री. बापूरावजी केळकर तथा श्रीमामामहाराज यांचे ओवीबद्ध जीवन चरित्र श्री. नरहर दामोदर दिवेकर, सांगली यांनी अतिशय उत्तम लिहिले आहे. या चरित्राची प्रथम व द्वितीय आवृत्ती संपून तृतीय आवृत्ती प्रकाशीत करावी लागत आहे. प.पू. सद्गुरू श्रीमामांच्या निगर्वी, निरपेक्ष, निरलस, निराभिमानी कीर्तनसेवेची ही पावतीच आहे. त्यांच्या चरित्राचा हा एक महिमा आहे. विनम्रता, सात्विक भक्ती, अखंड खडतर अशी साधना आणि अखंड ३८ वर्षांची कीर्तन सेवा हेच प.पू. श्रीमामांचे जीवन चरित्र होय.

माझे वडील कै. पंडितराव परचुरे आणि आई कै. पमाताई परचुरे तसेच माझे बंधू कै. गोपाळ परचुरे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ ही तृतीय आवृत्ती प्रकाशित करताना माझ्या मनी अत्यंत समाधान आणि आनंद आहे. माझे मातोश्रींनी वडिलांना ती. प.पू. श्रीमामांचेकडून नाम घेणेविषयी एकदा सुचविले होते. त्यानंतर काही कालावधी गेला व वडील श्रीमामांना भेटून आले. त्यानंतर त्यांची प्रतिक्रिया मोठी बोलकी होती. ‘हे व्यक्तिमत्त्व काही वेगळेच आहे’ असे ते म्हणाले. यथावकाश वडिलांनी प.पू.मामांचे कडून नाम घेतले.

प.पू. श्रीमामांच्या चर्मी पादुका आमचेकडे येणे आणि त्यांची पाद्यपूजा आमचे घरी होणे हे दुर्मिळ प्रसंग जे घडले, त्याला आमचे आईवडीलांचे श्रीमामांच्याप्रती असलेले प्रेम, सेवा, निरंतर श्रद्धा आणि निष्ठा याचे ते फलित आहे. या दोन्ही बाबत प.पू. श्रीमामा इतके कठोर होते की त्यांना ते आवडत नसे. पण प.पू. श्रीमामांच्याप्रती पूर्ण समर्पित असलेल्या शरयू उपळावीकर यांचे सहाय्यामुळे हे शक्य झाले. याविषयी श्रीमामांचेशी बोलण्याचे कोणाचे धारिष्ट्यच होत नसे. पण आमच्या आईवडिलांचे नशीब थोर, एवढेच म्हणता येईल. आमच्या घराण्याची उत्तम प्रगती प.पू.श्रीमामांच्या आणि प.पू.श्रीदादांच्या आशीर्वादाचेच फलित आहे. प.पू.श्रीमामांच्या पाद्यपूजेचा सोहळा आमचे निवासी उत्तमप्रकारे एक उत्सवच झाला. ते क्षण आणि वैभव आम्हा भावंडांना आजही चांगले स्मरणात आहेत. साधारणपणे सन १९५९च्या दरम्यानचा हा कालावधी होता.

आम्हा सहा भावंडांपैकी श्रीमामांना सकाळी दुधाचा डबा पोचवणेची सेवा सर्वांचे हातून झाली. शरयूताईंचेकडे आम्ही तो देत असू. आम्हा सर्वांना प.पू. श्रीमामांची व प.पू. श्रीदादांची सेवा करण्याचा आणि त्यांची कीर्तने लहानपणापासून ऐकण्याचा जो लाभ मिळाला, त्याचे मूल्याची प्रचीती आजही आम्हा सर्वांना वेळोवेळी खचितच येत असते.

प.पू. श्रीमामांच्या मनी निंबरगी यात्रा करावी असा विचार आहे असे शरयूताईंचेमुळे माझे मातोश्रींना समजले. तशी सर्वांची तयारीही होती. पण कुणीतरी पुढाकार घेऊन नियोजन करावयास हवे होते. ही बाब माझे मातोश्रींनी वडिलांना सांगितली. लगेचच वडिलांनी प.पू.श्रीमामांची भेट घेऊन ही सर्व जबाबदारी ‘मी घेतो, नियोजन करतो, तुम्ही निःशंक

रहा’ असे सांगितले आणि लवकरच गाड्यांची सोय करून निंबरगी यात्रा उत्तमप्रकारे पार पाडली. प.पू.श्रीमामांची प्रकृती तशी बरी नसे. पण मानसिक ताकद फार मोठी होती. यात्रेमुळे ते काहीसे सुखावले होते. माझे आई-वडिलांनाही सेवेचे एक मानसिक समाधान लाभले होते. पुढे आणखीही दोन यात्रांचे नियोजन आमच्या वडिलांनी केले होते.

प.पू.सद्गुरू श्रीमामांच्या, श्री. दिवेकर यांनी लिहिलेल्या, ओवीबद्ध चरित्राची तिसरी आवृत्ती, प्रकाशित करण्याची संधी दिलेबद्दल श्री. दीपकजी यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो आणि आनंद व्यक्त करतो.


**श्रीगोविंदचरितमानसच्या** तिसऱ्या आवृत्तीच्या अक्षरजुळणीचे काम श्री. भालचंद्र विनायक सहस्रबुद्धे यांनी वेळेत व उत्कृष्ट केले आहे. तसेच या ग्रंथाची मुद्रिते तपासणीचे किचकट काम प.पू. श्रीअण्णांचे कृपांकित श्री. रमेश लाळे यांनी केले आहे आणि पुस्तक छपाईचे काम मे. एस.बी. प्रिंटिंग प्रेसचे श्री. अमोल कुलकर्णी यांनी उत्कृष्टपणे केले आहे व श्री. सागर मोहिते यांनी मुखपृष्ठ सजावटीचे काम अत्यंत सुंदर केले आहे. याबद्दल या सर्वांचे आभार. या सगळयांच्या सहकार्याने ही श्रीगोविंदचरितमानस ची तिसरी आवृत्ती साकार होत आहे.

सांगली — नम्र सेवक

१६.०१.२०२१ — लक्ष्मण त्रिंबक परचुरे, सांगली.

# अनुक्रमणिका


| अ.नं. | अध्याय क्रमांक | ओवी संख्या | पान क्र. |
|---|---|---|---|
| १. | प्रस्तावोद्याय | ... १८५ ... | १ |
| २. | श्रीज्ञानेश्वर दर्शन | ... १८३ ... | १३ |
| ३. | संसारस्थिती वर्णन | ... १९३ ... | २६ |
| ४. | साधन सिद्धता | ... १७१ ... | ३९ |
| ५. | कीर्तन बहिरंग परीक्षण | ... १७२ ... | ५० |
| ६. | कीर्तन अंतरंग परीक्षण | ... १६१ ... | ६२ |
| ७. | जीवन प्रसंग वर्णन | ... १७८ ... | ७३ |
| ८. | रौप्य महोत्सव वर्णन | ... १७६ ... | ८५ |
| ९. | त्रितप महोत्सव वर्णन | ... २४४ ... | ९६ |
| १०. | पुण्यधाम वर्णन | ... १९३ ... | ११२ |
| ११. | संत दर्शन | ... १९३ ... | १२५ |
| १२. | निर्याण प्रसंग | ... २१४ ... | १३८ |
| १३. | कळसाध्याय | ... १७८ ... | १५७ |
| १४. | पूर्णविराम | ... ०७६ ... | १७० |
| | **एकूण ओवी संख्या** | **... २५१७** | |






अध्याय पहिला

## प्रस्तावोध्याय

श्रीगणेशाय नमः ।। ॐ नमोजी अनंता । न कळे तुझी उदारता । न दिसोन तुझी सत्ता । ये प्रत्यया सहजेची ।।१।। तू आहेस करुणाघन । भक्त-जनांचे विश्रांतीस्थान । भावाचा भुकेला म्हणोन । संतजन वाखाणिती ।।२।। देवभक्त आपणचि व्हावे । द्वैती अद्वैत अनुभवावे । आत्मसुखासि भरते यावे । अनुपम ।।३।। म्हणोनि केला विश्वाचा पसारा । विश्वंभरे आवाढव्य सारा । मध्ये मायेसि देऊनि थारा । लीला विनोदे ।।४।। तो झाले एकाचे एक । मायेचेच वाढले कौतुक । देवा भक्तासी वेगळीक । निर्माण झाली ।।५।। प्रेय ते आवडू लागले । श्रेय डोळ्याआड झाले । मायेच्या जाळ्यात अडकले । जीव सारे ।।६।। भुरळ पडे बुद्धीला । आडमार्गी चालवी मनुष्याला । राजाचा रंक झाला । फिरे भ्रमांवर्ती ।।७।। वेड्या पुत्रासाठी । मातेची ममता मोठी । तैसा तू जगजेठी । पतितासी ।।८।। संत सगुणरूपधारी । तुझी वर्णावया थोरी । अवतारी भूवरी । किती म्हणोनि सांगो ।।९।। तूच त्याते पाठविसी । दीन अनाथा उद्धरावयासी । कळवळोनी तू होसी । बाप कृपाळू आमुचा ।।१०।। जे जे संत आले भूवरी । ते ते अमर झाले ग्रंथांतरी । देती सद्विचारांची शिदोरी । मुमुक्षू जना ।।११।। संसारयात्रा अति दुर्घट । काटे कुटे, खड्डे अचाट । ग्रंथ दीप उजळोनि नीट । ठायीठायी ठेविले ।।१२।। प्रासादिक ग्रंथ थोर । ग्रंथ नव्हे, संतचि साचार । त्यांचाच अमर अवतार । आत्मसुखासाठी ।।१३।। परि या मायेचा । प्रभाव अति

लाघवाचा । पडदा ओढून अज्ञानाचा । दीपप्रकाश मंद केला ।।१४।। कोणी असती अज्ञानी । कोणी पंडित महाज्ञानी । निंदक आळशी, अभिमानी । न पाहती ते ग्रंथ ।।१५।। म्हणती अति गहन । अतिरंजित म्हणति कोण । थोतांड म्हणती आणिक जन । विकल्प रण माजविती ।।१५।। महापंडितांचे शब्दजाल । माजवी अति कल्लोळ । नासोन सद्भाव सोज्वळ । जाय भाविकांचा ।।१७।। म्हणोन संतांची परंपरा । चालविसी उदारा । मायेसी न द्यावया थारा । करुणाकार शोभसी ।।१८।। तुझी लीला अगाध । अनेकी एकत्वाचा बोध । फोडोन मायेचा बांध । कार्य साधीसी ।।१९।। जे जे सत्वशील । सन्मार्गावरी निश्चल । परमार्थाची वाटचाल । करू इच्छिती ।।२०।। त्यांना कुमार्गापासूनि सोडविसी । मार्ग त्यांचे प्रक्षाळिसी। समजावोनि चालते करिसी । आत्मसुखाच्या मार्गावरी ।।२१।। या खटाटोपासाठी । करविसी संतांच्या भेटी । शेखी ठेवूनी करकटी । राहतोसी ।।२२।। धन्य तुझी अलिप्तता । करोन पुनः तू अकर्ता । निर्गुणी तुझी सगुणता । दयाघना पांडुरंगा ।।२३।। रामकृष्णादि अवतार । प्रगट पराक्रम केला थोर । की र्ती झाली अजरामर । दुर्जन अवघे संहारिले ।।२४।। चरित्र त्यांचे श्रवण करिता । अति उल्हास ये चित्ता । प्रेमभरे डोलता । ये तन्मयता मनासि ।।२५।। परी आपण त्यांच्यासारिखे व्हावे । हे तो दुर्घट स्वभावे । सद्भावे नमस्कारावे । हेचि उत्तम ।।२६।। आकाशीच्या तारका । लखलखती अनेका । मार्ग दाखविती निका । परि त्या दुष्प्राप्य ।।२७।। दीनदयाळा परेशा । हे दूरपण करी निराशा । जरी मनी दृढ आशा । तुझ्या सख्यत्त्वाची ।।२८।। म्हणोनी संतरूपे तू अवतरसी । अपार सामर्थ्य परि लपविसी । नराऐसी करणी करसी । नारायण असूनी ।।२९।। संसारी कैसे असावे । अलिप्तपण कैसे



राखावे । सुखदुःखाचे घाव झेलावे । कैसे ते दाखविसी ।।३०।। नराचा व्हावया नारायण । कैसे असावे आचरण । हे दाखविसी आचरून । सुगम आणि सोप्या रीती ।।३१।। म्हणोनि संतांचे चरणरज । लाभता सहज । सद्भावे वंदावे हे काज । निजसुखासाठी ।।३२।। संत अति उदारमूर्ति । आत्मज्ञानाचे चक्रवर्ती । ते योग्य तेचि साधीती । सुगम यत्ने ।।३३।। नारायण स्वरूपी नर । नरासी करिती परमेश्वर । म्हणोनि प्रमाण त्यांचा आचार । वाटे आम्हा ।।३४।। संत अति करुणाघन । अपकाऱ्यासी उपकार करून । भाविकांचा मार्ग सुधारून । करिती सर्वदा सरते ।।३५।। परि संत प्रसिद्धिपराङ्मुख । सदा असती अंतर्मुख । सेविती जे आत्मसुख। तेचि त्यांचे चरित्र ।।३६।। ते चरित्र अति गहन । जेथे शब्दा पडे मौन । तेथे न प्रवेशती इतरेजन । अगम्य दुर्बोध यास्तव ।।३७।। निकट सहवास लाभे ज्यासी । आणि रीघ संतवचनासी । मीनलिया सेवेसी । कृपालव प्राप्त होय ।।३८।। ऐसा कृपाप्रसाद होता । साहित्य किंचित येई हाता । प्रसंगे त्यांची वाणी वदता । मति प्रकाशे अंतरी ।।३९।। संत संगतीने तुझी भेटी। नातरी जन्मवरी तुटी । ही देवा तुझी रीत मोठी । सुगम आणि दुर्गम ।।४०।। लक्षांमध्ये एक । पावे संतांची जवळीक । महद्भाग्ये होतसे सेवक। कल्याण समर्थांचा ।।४१।। म्हणोनी वाटे हे दुर्गम । परी एका अर्थी सुगम । सद्ग्रंथी ठेविता प्रेम । सत्संग होय सुलभ ।।४२।। बालवय वेणाबाईंचे । परी वेड नाथभागवताचे । अर्थ न कळती तेथीचे । परि सद्भाव सोज्वळ ।।४३।। श्रीसमर्थ भेटले । ग्रंथगर्भीचे गूढ उकलिले । सद्ग्रंथांचे महत्व भले । ऐसे आहे ।।४४।। सद्भावे ग्रंथ धरिता हाती । संतची आपुली काळजी वाहती । सर्व संकटे दूर होती । संत दयावंत म्हणोनिया ।।४५।। जे ग्रंथी व्याख्यान । तैसेच संतांचे आचरण । म्हणोनी

संतांचे चरित्रश्रवण । थोर लाभ पडे पदरी ।।४६।। बाह्यात्कारे संत । वेगळाले भासत । वेगळाले मार्ग दावित । प्रकृति-भेदासाठी ।।४७।। कोणी असती संन्यासी । कोणी गृहस्थाश्रमवासी । कोणी संसारी वनवासी । दिसती सदैव ।।४८।। कोणी गृहस्थाश्रमी संन्यास घेती । कोणी संन्यासी गृहस्थाश्रम स्वीकारती । कोणी अंतरी विरक्त बाहेरी दिसती । रंगलेले संसारी ।।४९।। संत ओळखावे अंतरात । तेथे त्यांचे एक चरित्र । बाह्यात्कारी देहधर्म दिसत । वेगळाले ।।५०।। देहधर्म चालवी प्रकृती । प्रारब्धयोगे विचित्र परिस्थिती । ती असार जाणोनी चित्ती । अंतरी शिरावे ।।५१।। देहधर्म ज्याचे त्याने । ओळखून शोधावी आदर्श स्थाने । मग न लागेल पस्तावणे । कोणा एकासी ।।५२।। सच्चरित्र जागता वेदांत । भूतलीची प्रकाशज्योत । भक्तांचे मूर्तिमंत हित । चरित्र संतांचे ।।५३।। संत विवेकाचे सागर । संत सुखाचे माहेर । संत दुःखाचा विसर । सोहळा आनंदाचा ।।५४।। ऐशाच एका संताचे । साहचर्य लाभले भाग्याचे । तेच चरित्र वर्णन करण्याचे । योजिले मनी ।।५५।। झालो प्रवृत्त लिहिण्यास । जेणे हर्ष अत्यंत मनास । ते पुरे होवो ही आस । अंतरी राहे ।।५६।। अनंताचा सुत **गोविंद** नामे विख्यात । केळकर कुल शोभिवंत । ज्यांचेनि झाले ।।५७।। सहा तपावरी । भक्तीध्वजा फडकविली अंबरी । अपार प्रेमा ईश्वरावरी । ठेवोनिया ।।५८।। माझ्या बाळपणापासोन। तो गोविंदजींचे होय देहावसान । तोवरी त्यांचे भक्तीजीवन । मी जवळून पाहिले ।।५९।। ऐसे चरित्र विलोभनीय । ऐसे चरित्र कमनीय । म्हणोनि होय श्रवणीय । ऐसा विचार केला ।।६०।। काय मी होईन समर्थ । दाखविण्या पदोपदींचा अर्थ । कैसे मी यथार्थ । गाईन हे ।।६१।। मनी सद्गुरूंचे स्मरण ठेवावे । त्यांच्या कृपेवर विसंबावे । करवितील तैसे वर्णन करावे । म्हणोनी लेखणी धरलीसे ।।६२।। सांगली हे पुण्यक्षेत्र । पूर्वीपासुनी



अतिपवित्र । दंडकारण्य नामे विख्यात । भूप्रदेश हा ।।६३।। सांगली ही अध्यात्मप्रवण । इतर वैभव मानोन गौण । श्रीगजाननाचे अधिष्ठान । आणि कुलदैवत श्रीमंतांचे ।।६४।। श्रीगजाननाची भक्तीसेवा । पावोन वैभव आले या गावा । म्हणेनी अध्यात्माचा ठेवा । ही कृपा गणरायाची ।।६५।। हाचि मुळारंभ निर्गुणाचा । ऐसी समर्थांची वदली वाचा । तो श्रीगजानन सांगलीचा । पाठीराखा असे ।।६६।। श्रीमंत राजेसाहेब सांगलीकर । परमार्थी त्यांचाही भर । वैभव अर्पिले अपार । श्रीगजानन चरणी ।।६७।। वैभव वाढविले विघ्नहर्त्याचे । कृष्णातीरी गणेशमंदिराचे । पंचायतन देवाधिदेवांचे । स्वर्गचि वाटे भूवरचा ।।६८।। प्रसन्न ध्यान श्रीगजानन । करद्वय जुळती आनंदून । मस्तक लवे श्रद्धापूर्व । सहज भाव उपजे ।।६९।। रिद्धिसिद्धी चवऱ्या ढाळिती । विद्युतदीप माळा झळकती । सुगंध दरवळे सभोवती । धूप आणि मधुर फुलांचा ।।७०।। स्तुती स्तोत्रांचा गजर । कर्ण निवती ऐकताच सत्वर । महोत्सवाची शोभा फार । हरिगजर चालतसे ।।७१।। कृपा असता श्रीगजाननाची । मग उणीव कशाची । वसती संत सज्जनांची । झाली याच गावा ।।७२।। वेदशास्त्री पारंगत । कर्मानुष्ठानी सदा रत । संसारी असून विरक्त । ब्राह्मण दिसती ।।७३।। संत श्रीमळणगांवकर । ब्रह्म जाणोन झाले द्विजवर । त्यांचेही सांगलीकर । चाहते झाले ।।७४।। परस्थही साधुसज्जन । करिती येथे आगमन । म्हणोन पुण्यक्षेत्र हे नामाभिधान । सांगलीस योग्य वाटे ।।७५।। अध्यात्मविद्या मंदिर । जो श्रीमंतांचा प्रसाद थोर । प्रेम प्रजाजनांवरी फार । श्रीमंतांचे ।।७६।। विद्यापीठ अध्यात्माचे। ऐसे महात्म्य सांगलीचे । पुण्यस्मरण श्रीगजाननाचे । म्हणोनी होय वारंवार ।।७७।। बाळंभट टिळक विख्यात । होते ब्राह्मण सत्प्रवृत्त । अधिकार त्यांचा अद्भुत । ऐका श्रोते जी ।।७८।। एकदा कृष्णातीरी ।

स्नानसंध्या करीत बैसली स्वारी । वृत्ती रंगली अंतरी । बैसले ध्यानस्थ ।।७९।। तो एक मदोन्मत्त । हत्ती सुटला धावत । लोक पळाले अस्ताव्यस्त । हत्ती आला कृष्णातीरी ।।८०।। ध्यानस्थ देखोन ब्राह्मण । द्रवले पशूचेही अंतःकरण । प्रणाम सोंड फिरवून । करी मस्त हत्ती ।।८१।। श्रीदत्तात्रेयांची कृपा पूर्ण । दिली छाटी प्रसाद म्हणून । ऐसे बाळंभटांचे महिमान । भूषण सांगलीचे ।।८२।। तैसेच एक लक्ष्मण दीक्षित । कर्मानुष्ठानी महान संत । पार्थिव पूजा नेम व्रत । आचरोनी रहाती ।।८३।। एकदा निघाले यात्रेला । काशीक्षेत्रा जाण्याला । अनेकांचा मेळा निघाला । त्यात तेही होते ।।८४।। मार्गात नदीतीरी । स्नानसंध्या करावी बरी । म्हणोनी बैसले तो अंतरी । वृत्ती रंगली ।।८५।। यात्रेकरू पुढे गेले । हे मागे एकटेच राहिले । म्हणती आता शिवशंकर भले । रक्षण करतील ।।८६।। तव एक घोडेस्वार । येऊन म्हणे अहो जी द्विजवर । आम्ही काशी क्षेत्रासी जाणार । पहा येता का ? ।।८७।। चालिलो एकटा मी । कंटाळवाणा मार्ग क्रमी । सोबत तुमची येईल कामी । चला जी ।।८८।। दीक्षित आले यात्रा करून । बैसले ध्यानस्थ होऊन । तो पुढे देखिले ध्यान । घोडेस्वार उभा असे ।।८९।। अरे म्हणती हा शिवशंकर । भोलानाथ करुणाकर । दिला मज आधार । पाहोन असहाय्य ।।९०।। म्हणती हे शिवशंकर । कैसा मज पडला विसर । जवळी असोन हा प्रकार । आता धीर न धरवे ।।९१।। भक्तीभाव अंतरी । धरोनी राहिलो आजवरी । आता नका ठेऊ दूरी । तळमळे जीव माझा ।।९२।। तो साक्षात् शंकर । उभे राहिले समोर । भक्त सारथी करुणाकर । दूर करी दूरपण ।।९३।। एकदा त्यांचे घरी । झाली अवचित चोरी । ऐवज गेला सहस्रावरी । परी हे स्वस्थ ।।९४।। स्थिति ओळखून त्यांची । मति द्रवली श्रीमंतांची । थैली पाचशे रुपयांची । पाठविली घरी ।।९५।। द्रव्य घेतले ठेवून । लोटले काही दिन । तेव्हा



पाचशे एक रुपये खर्चून । अन्नदान केले ।।९६।। तैसेच एकदा महादान । करू इच्छी एक श्रीमान । ते घेण्यास तैलंगण ब्राह्मण । आला त्वरेने ।।९७।। लोक म्हणती लक्ष्मण दीक्षित । असता येथे सत्त्वस्थ संत । दान त्यांनीच घ्यावे हे उचित । आम्हासी वाटे ।।९८।। लोकांचे न मोडावे मन । म्हणोनि दीक्षित घेती दान । परि कनवठीचा रुपाया काढून । ठेवती ढिगावरी ।।९९।। म्हणती हा तैलंगण ब्राह्मण । आला दूर देशाहून । तोचि होवो सुप्रसन्न । या दाने ।।१००।। ऐसे एकाहूनी एक । आचरिती मार्ग अलौकिक । त्यागी विरक्त आणि पुण्यश्लोक । लोक सांगलीचे ।।१०१।। आता संसारी असोन परमार्थ । करोन झाले जे समर्थ । आणि जगदोद्धारार्थ। जे शिकस्त करिती ।।१०२।। ऐसे एक संत । सांगलीस राहिले आमरणान्त । त्यांचेही चरित्रगीत । गाजले येथे ।।१०३।। ते संत **श्रीहनुमंत** । रुक्मिणी पांडुरंगाचे सुत । कोटणीस नामे विख्यात । झाले भूमंडळी ।।१०४।। वास्तव्य करून सांगलीस । वसविली अध्यात्मपेठ सुरस । तपानुतपे कीर्तनाचा हव्यास । नित्य नवीन ज्यांनी केला ।।१०५।। मूर्ती भव्य आणि रेखीव । गौरवर्ण तेज अभिनव । परमार्थी वाहिला जीव । असोनी संसारी ।।१०६।। व्यवसाय केला वकीलीचा । परी ठाव न सोडिला सत्याचा । मेळविला द्रव्याचा । अमित साठा ।।१०७।। अपार द्रव्य मेळविले । ते उदार हस्ते वेचिले । वैभव **श्रीनारायणाचे** वाढविले । निर्लोभ वृत्तीने ।।१०८।। अनंत लोक येती जाती । किती जेवती याची न क्षिती । आश्रित तरी किती असती । गणती नसे ।।१०९।। गृहस्थामध्ये गृहस्थ थोर । शूरामध्ये दानशूर । संतामध्ये जनक नृपवर । ऐसे शोभती ।।११०।। अमोघ प्रसाद वाणीचा । वर्षाव जरी अमृताचा । अध्यात्म श्रवणाचा । लाभ सांगलीकरांना ।।१११।। रात्री ठोका नवाचा । कीर्तनारंभ सुचवी नित्याचा । ध्वनी टाळ मृदंगाचा । कर्णी भरे ।।११२।।

गॅसबत्तीच्या प्रकाशात । भक्त ठेचती असंख्यात । मध्ये शोभती हनुमंत । हाती चिपळ्या चिणचिणती ।।११३।। जैसे हे कीर्तनकार । तैसेच त्यांचे साथीदार । थोर त्यांचेही पाठांतर । साथ करिती समयोचित ।।११४।। ईश स्तवनाचा सूर सुरंग । त्रिपिटीधिंग वाजे मृदंग । पेटी वाजे सा रे ग । मागे झांज झिणझिणे ।।११५।। तररम आवाज तंबोऱ्याचा । खडा सूर साथीदारांचा । भर येई उत्साहाचा । प्रमुदित दिसती श्रोतेजन ।।११६।। अंताजीपंत केळकर । गुरूपदी ज्यांचा भाव थोर । अभंग मौजेचा सुमधुर । गाती खड्या सुरे ।।११७।। साधुदास प्रसन्न प्रतिभेचे । अनंतराव परमभक्तीचे । नानबांच्या गुरूसेवेचे । मोलची नसे ।।११८।। आणखी कितीएक असती । प्रेमभरे गाती डोलती । सारेची तन्मय होती । रंगदेवता रंगणी उतरे ।।११९।। एक एक गाढे वीर । व्यासंगी आणि तत्पर । तात्यांच्या भोवती फार । शोभा देती ।।१२०।। नाद घुमे अंबरी । तो वैकुंठची उतरे भूवरी । नाचे श्रीहरी । भक्तीसुखे ।।१२१।। हा प्रसाद नारदांचा । मेळावा जमला संतांचा । रंग चढला अध्यात्माचा । सुरस आणि सुंदर ।।१२२।। अध्यात्म हा बिकट विषय । निद्रादेवीचा जेथे जय । परि तो श्रुती मनोहर होय । जाय भवभय उडोनी ।।१२३।। सत्वमूर्ति हरिदास । करिती मायेचा निरास । समाधान चित्तास । होई श्रोत्यांच्या ।।१२४।। अचाट तात्यांचे पाठांतर । वक्तृत्त्वही श्रुती मनोहर । साक्षात्कारी संतवर । सव्यसाचि ।।१२५।। करोनी सर्वांगाचे कान । श्रवण करिती भक्तजन । ऐसे मधुर कीर्तन । आणि सोडवणूक जीवांची ।।१२६।। घरोघरी लोक समस्त । वाचू लागले गीता भागवत । तात्या नसते तर काय होत । हे सुगम लोका ।।१२७।। जे जे कीर्तनासी येती । त्यावरी तात्यांची प्रीती । शंका त्यांच्या निवारती । घडोघडी ।।१२८।। सांगलीचे रसिक । आणि गावोगावींचे अनेक । विद्वान आणि भाविक । रंगून जाती ।।१२९।।



अध्यात्मशास्त्री पारंगत । सांगलीचे लोक समस्त । ऐसे परस्थही वानित । कीर्तन प्रवचनकार ।।१३०।। रसिक श्रोते त्यांना मिळती । म्हणोनी ते आनंदती । सांगलीस वारंवार येती । आनंद परस्परा ।।१३१।। हे भाग्य नाही परप्रांती । ऐसे सहजस्फूर्त बोलती । ऐशी सांगलीची ख्याती । तात्यांच्यामुळे ।।१३२।। जय जय संत हनुमंत । ज्यांची कीर्ती दिगंत । त्यांचे सद्गुरू चिमडात । श्रीरामचंद्रप्रभू असती ।।१३३।। चिमडक्षेत्र अति पवित्र । ज्याची ख्याती सर्वत्र । जेथे चाले ज्ञानसत्र । अखंडित ।।१३४।। चुकवावया जन्ममरण । कैसे करावे ईशस्मरण । कैसे करावे साधन । सुखोपाये ।।१३५।। रघुनाथप्रिय साधुराज । साधन विस्तारांचे धरुनी काज । तापनाशी तीर्थराज । तेथे जागृत असती ।।१३६।। सांप्रदाय परंपरेची सूत्रे । चालवित राहती तेथे । भक्तीमान जन जाती एकचित्ते । त्यास देती आशीर्वाद ।।१३७।। त्यांचे गुरू श्रीनारायण । श्रीगुरुलिंगजंगम म्हणती सज्जन । निंबरगीक्षेत्री परमार्थ वृक्षारोपण । करिती सुनिश्चये ।।१३८।। त्यांची प्रिय शिष्या लक्ष्मीअक्का । त्याही चिमडास राहून लोका । मार्ग दाविती निका । परमार्थाचा ।।१३९।। श्रीरामेश्वर सोमेश्वर । रेवणसिद्ध मरुळसिद्ध प्रभूवर । श्रीकाडसिद्ध सद्गुरूवर । गुरूलिंगजंगमांचे ।।१४०।। ऐशी ही गुरूपरंपरा थोर । मूळ ज्याचे श्रीशिवशंकर । संक्षेपे केला विचार । महत्त्व कळावया ।।१४१।। श्रीनारायण गुरुलिंगजंगम । केला विस्तार अनुपम । असंख्यात संत उत्तम । आणिले सांप्रदायी ।।१४२।। शाखा आणि उपशाखा । जेथुनी अखंड फुटती देखा । परप्रांती ज्यांचे नाव मुखा । आजही येतसे ।।१४३।। श्रीभाऊराव उमदीकर । श्रीगुरुलिंगजंगमांचे शिष्यवर । अंबुराव गुरूदेव शिष्यवर । श्रीभाऊरावांचे ।।१४४।। विद्वद्वर्य श्रीरानडे गुरूदेव । विश्वविद्यालयी ज्यांचा गौरव । सांप्रदायाची कीर्ती आणि प्रभाव । पसरला देशांतरी ।।१४५।।

श्रीगुरुदेव रानडे । विद्वान अति गाढे । साता समुद्रापलीकडे । ज्यांचे चौघडे वाजती ।।१४६।। अगणित परप्रांतीयांनी । आणि परद्वीपस्थानी । दीक्षा गुरूदेवांकडून घेऊनी । परमार्थ मार्ग चोखाळला ।।१४७।। आणिक कितीएक असती । त्याची करता न ये गणती । यथानुक्रमे नावे पुढती । येतील किती एकांची ।।१४८।। ऐसे मूळपुरूष श्रीनारायण । निंबरगीस ज्यांचे सिंहासन। तेथे असती विराजमान । वंदन भक्तांचे घ्यावया ।।१४९।। संतश्रेष्ठ श्रीतुकाराम । ज्यावरी अखिल महाराष्ट्राचे प्रेम । त्यांचा अवतार श्रीगुरूलिंगजंगम । भक्तजन मानती ।।१५०।। श्रीसमर्थ रामदास । महाराष्ट्राचा करोनी विकास । दिला दासबोधाचा प्रकाश । ग्रंथराज स्वयंसिद्ध ।।१५१।। श्रीगुरुलिंगजंगमांनी । दिला प्रमाणग्रंथ नेमुनी । सांप्रदायिकासी सच्चिंतनी । लावण्यासाठी ।।१५२।। श्रीरामदास श्रीतुकाराम । दोन्हीकडे दिसे राम । साधकांचा विश्राम । कैवल्यमार्गीचा ।।१५३।। सदाशिवाने हलाहल । ज्या रामनामे केले हतबल । तेथे संसाराचे हलाहल । टिकेल कैसे? ।।१५४।। तो श्रीशंकर आणि श्रीराम । सद्गुरू आणि गुरूनाम । जवळ असता भवभ्रम । राहिल कसा? ।।१५५।। या संतसभेमाजी । **गोविंद अनंत** दिसती जी । ज्यांच्या लेखनकाजी । आजी मी प्रवर्तीलो ।।१५६।। जन्मापासोनि आमरणांत । ज्यांनी घेतले भक्तीव्रत । झिजविला देह सतत । देवकाजी ।।१५७।। अखंड साधनी राहती । कीर्तनसेवेवरी अति प्रीती । जेणे सद्गुरूही वाखाणती । थोर गुरूभक्त म्हणोनी ।।१५८।। प्रसन्न झाले सद्गुरू । त्यांची थोरवी मी काय वर्णन करू? । तरी ही अंतरीची ओढ निवारू । मी न शके ।।१५९।। मृदुवचन सुहास्य वदन । कधी न बोलती रागेजून । वृत्ती गेली अंतरी रंगून । नामस्मरणी ।।१६०।। नाव पाण्यावरी तरे । जोवरी पाणी आत न शिरे । तैसा संसारी विचरे । हा महायोगी ।।१६१।। करावया



पितृवचनपूर्ती । निमित्तमात्र संसाराची संगती । अंगी बाणली खडतर विरक्ती । लाजविले संसारासी ।।१६२।। निमित्तमात्र संसार । तरी आघातांचा भडिमार । सोशिती मन ठेवून स्थिर । सद्गुरू वचनांवरी ।।१६३।। अष्टौप्रहर नित्यनेम । शरीर मन यासी लगाम । अर्पिले प्रेमकुसुम । श्रीरामावरी ।।१६४।। **अखंड ध्यान श्रीरामाचे । अखंड पूजन श्रीरामाचे । अखंड कीर्तन श्रीरामाचे । हेचि गोविंद चरित्र ।।१६५।।** तीन तपावरी कीर्तनप्रसार । अखंड आला भक्तीस बहर । नामस्मरणाचा गजर । श्रीराम जयराम जयजयराम ।।१६६।। तोषविले श्रीहनुमंतरायासी । आणि श्रीनारायणासी। आणि संतसज्जनांसी । आपुल्या तपोबले ।।१६७।। कोठे हे श्रीरामाचे उपासक । आणि कोठे मी सामान्य लेखक । तरीही हट्ट धरी मी बालक । सद्गुरूमातेपुढे ।।१६८।।

**मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् ।**
**यत्कृपा तमहं वंदे परमानन्दमाधवम् ।।**

थोर विचार मनी केला । परि मतिमंद या लेखकाला । कैसा हा भार झेपेल भला । म्हणोनी होई सचिंत ।।१६९।। संत होवोनी संतचरित्र गावे । तरी हे कार्य हातीचे टाकावे । आणि सच्चरित्रासी अंतरावे । शिव शिव ऐसे न होवो ।।१७०।। जोवरी अवधी लेखनासी । तोवरी वसावे मम मानसी । हाती धरोनी बालकासी । 'ऐसे लिही' म्हणावे ।।१७१।। माता न पाही बालकाचे गुण । तो तिजसाठी सदा संपूर्ण । तिचा आशीर्वादची कारण । बालक नाचे अत्यानंदे ।।१७२।। मामा, आपुली पाऊले गोजिरी । उमटली या भूमीवरी । तीच आम्हा जन्मवरी । उपकारक ।।१७३।। पदांपदांतुनी अर्थ । जो भरला तो दाखववावा यथार्थ । तोच आमुचा निजस्वार्थ । वाटे आम्हा ।।१७४।। तुम्ही आपुले जीवन । आजवरी ठेविले दडवून । कधी न मिळू दिले प्रकाश किरण । आम्ही प्रयत्न करूनही ।।१७५।। सद्गुरूंनी

प्रसन्न व्हावे । आता ऐसे न करावे । आमुच्या मनी भरावे । तुमचे आचरण ।।१७६।। सहा तपावरी आयुष्य वेचून । दिली भक्तीध्वजा फडकवून । आणि आता गेला निघोन । हळहळ वाटे ।।१७७।। जाणार ते निघोन गेले । परि तुमचे चरण आचरण राहिले । वेचू रजःकण तेथील भले । अधीरपणे ।।१७८।। काळाची सत्ता देहावरी । ते त्याने नेले जरी । तरी तुम्ही रुजविले प्रेम अंतरी । ते तो हिरावू शकेना ।।१७९।। पाहू तुमचे चित्र । आठवू तुमचे चरित्र । आणि अर्पू तुलसीपत्र । तुमच्या चरणांवरी ।।१८०।। दोन्ही हात जोडून । करू प्रेमभावे वंदन । तुमच्या चरित्राचे मनन । घडो आम्हासी ।।१८१।। म्हणोनि हा व्याप केला । तो पाहिजे सिद्धीस गेला । म्हणोन विनंती चरणाला । वारंवार करितसे ।।१८२।। कृपालव येईल हाता । तरी रंग उसळेल गगनावरूता । तेचि व्हावे हे वाटे आता । तुमच्या चरित्र गायनी ।।१८३।। जय जय **श्रीगोविंद** । तोडावया भवबंध । ध्यातो तुमचे पदारविंद । भक्तीभावे ।।१८४।। मस्तक ठेवून चरणावर । विनंती करितो वारंवार । द्यावा मज आधार । चरित्र गायनी ।।१८५।।

इति श्रीगोविंदचरितमानस । जे स्वभावेचि अतिसुरस । जेथे अखंड उसळेल भक्तिरस । प्रस्तावोध्याय गोड हा ।।१।।

***



## अध्याय दुसरा

# श्रीज्ञानेश्वर दर्शन

राजाधिराजा अनंत-तनया । परमप्रिय सद्गुरूराया । वंदून तव पदकमलद्वया । तव सच्चरित्र वर्णितसे ।।१।। धन्य धन्य महाराष्ट्रदेश । संत पदरजे पुनीत अशेष । दंडकारण्य म्हणती ज्यास । वास्तव्य श्रीरामाचे ।।२।। श्रीरामाची पाऊले । उमटोनी दंडकारण्य पुनीत झाले । म्हणोन अनंत संत अवतरले । ते पावित्र्य टिकविण्या ।।३।। श्रीज्ञानेश्वरादि संत थोर । कलीचे बंड मोडावया सत्वर । भागवत धर्माची ध्वजा सुंदर । घेऊन आले ।।४।। मराठी भाषेस आला बहर । अध्यात्माचा झाला मराठी अवतार । झाले सुगम आणि मनोहर । रहस्य अध्यात्माचे ।।५।। नामस्मरणाचे तारू । आणि संत कर्णधारू । कली म्हणे काय करू । बोटे मोडी ।।६।। रामकृष्णहरिचा गजर । तारु चालले दर्यापार । निघाले वीर झुंजार । भक्तीमार्गे ।।७।। त्या महाराष्ट्री कृष्णातीर । जेथे श्रीदत्तात्रयांची येरझार । नृसिंहवाडी औदुंबर । श्रीगुरूमूर्ती राहती ।।८।। समर्थ श्रीरामदास । निर्भय करिती महाराष्ट्रास । निवारून संकटास । श्रीरामसेवेस लावती ।।९।। गावोगावी मारुतीरायाची । उपासना बुद्धिबलवंताची । एकनिष्ठ श्रीरामभक्ताची । करिती लोक ।।१०।। त्या पवित्र कृष्णातीरी । वसली सांगली उभयतीरी । पुण्यनदीच्या पूर्वतीरी । विशेषतः ।।११।। जी तपोवन नामे विख्यात । येत असंख्य झाले संत । पदरजे त्यांच्या गाव पुनीत । म्हणोनी सांगली पुण्यक्षेत्र ।।१२।। राजाधिराज सांगलीचे । आणि प्रजाजन त्यांचे । स्मरण अखंड ठेविती देवाचे । म्हणोनी सांगली

पुण्यक्षेत्र ।।१३।। संतांची परंपरा चाले । ऐसे भाग्य सांगलीस आले । परमार्थी लोक भरले । म्हणोनि सांगली पुण्यक्षेत्र ।।१४।। महिमा सांगलीचा वर्णू जाता । भुरळ पडे माझ्या चित्ता । ऐशी आहे अपूर्वता । या सांगलीची ।।१५।। थोर महात्मे येती जाती । अज्ञानतिमिरध्वंस करिती । या परिस भाग्याची महती । कोठे आढळेल सांगा ना? ।।१६।। काही संतांनी घर केले । येथेच आमरणांत राहिले । घडोघडी मार्गदर्शन मिळे । मुमुक्षूंना ।।१७।। असेच येथे एक **केळकरकुल** । जेथे श्रीरामेश्वर उपासना बहुसाल । अनंत गंगाधर प्रेमळ । करिती शिव उपासना ।।१८।। लक्ष्मण दीक्षित त्यांचे गुरू । कर्ममार्गी विरक्त थोरू । थोर ज्यांचा अधिकारु । श्रीशंकर प्रसन्न ज्यासी ।।१९।। अनंत गंगाधर यांना । सर्वजण म्हणती नाना । करिती कठोर उपासना । पार्थिवपूजा नित्यनेम ।।२०।। षडक्षरी मंत्राचा । जप वाचे नित्याचा । हव्यास कीर्तन ऐकण्याचा । हनुमंत तात्यांचे ।।२१।। साथीसाठी उभे रहावे । एकाग्रचित्ते श्रवण करावे । भक्तीभावे अभंग गावे । संतांचे ।।२२।। *वडिलार्जित कर्जभार । स्वकष्टे उतरोन सत्वर । घर केले ते झाले मंदिर । श्रीरामाचे ।।२३।। राम करी शिवउपासना । शिव करी रामउपासना । रामेश्वर या नामी पहा ना । ऐक्य कैसे साधले? ।।२४।। श्रीराम आणि महेश्वर । एकत्वी आणिती हे केळकर । ऐसा हा मनोहर । संगम येथे ।।२५।। आचरे गावी श्रीरामेश्वर । मंदिरी श्रीरामनामाचा गजर । श्रीरामजन्मोत्सव थोर । चाले या शिवालयी ।।२६।। असो, राधा नामे पतिव्रता । पत्नी शोभे या **अनंता** । शुद्धाचरणी उभयता । रत असती शिवचरणी ।।२७।। असोनी संसारी । विरक्ती बाणली अंतरी । भार ठेवोनी देवावरी । सदाचरणी निमग्न ।।२८।।

टीप :– श्री.अंताजीपंत केळकर हे सांगली स्टेटमध्ये एज्यु. ऑफिसमध्ये हेडक्लार्क होते.



शुद्ध बीजापोटी । फळे असती गोमटी । तपश्चर्येच्या शेवटी । कृपा भगवंताची ।।२९।। तो आला शुभ दिवस । फाल्गुन शुद्ध दशमीस । शके १८१०स । पुत्र जन्मोत्सव जाहला ।।३०।।

**जो जो जो जो श्रीगोविंद । तव नामी आनंद ।।ध्रु।।**
**प्रेम पालख हलविता । कृपा करा गुरूनाथा ।।१।।**
**हृदय पाळणा भक्तीचा । तो हा गुरूनामाचा ।।२।।**
**उन्मनी प्रगटले गोविंद । निजसुख परमानंद ।।३।।**
**कीर्तन भक्तीसी अवतार । नाम हे जगदोद्धार ।।४।।**
**गुप्त राखियला अधिकार । असोनी स्वरूपाकार ।।५।।**
**राधा सुपुत्र अविनाशी । शरयू हृदयनिवासी ।।६।।**

**- शरयू उपळावीकर**

अनंताचे उदरी । गोविंद अवतरला भूवरी । घ्यावया टाळकरी । कीर्तनाचा ।।३१।। हा अंताजीपंतांचा लाल । शोभे जैसा नंदगोपाळ । प्रेमे करिती प्रतिपाळ । मायबाप ।।३२।। शोभे मूर्ती बाल गोजिरी । हास्य निरागस मुखावरी । सत्त्वाची घडविली खरी । वाटे मातापित्यासी ।।३३।। मुलाचे पाय पाळण्यात । हरिभक्तीची आवड त्यात । कधी न हट्ट करीत । संतुष्ट मातापित्यावरी ।।३४।। हळू हळू बाळ वाढे । तव अधिकाधिक चित्त ओढे । देवाच्या मूर्ती ठेऊन पुढे । रमे त्यातची गोविंद ।।३५।। बालवयापासून । गोविंद इतराहून भिन्न । खेळ करमणूक मनरंजन । एक देव त्यासी ।।३६।। सदा गावे देवाचे गुण । मुखी नामसंकीर्तन । नाना म्हणती हे निधान । अपूर्व लाभले आम्हासी ।।३७।। अरे हा काय योगी आला । महत्‌भाग्ये आमुच्या घराला । माप न देवाच्या कृपेला । दाता एक शिवशंकर ।।३८।। भक्ती आमुची थोडी । तरी देव सुख दे घडोघडी ।

तोचि नेणार पैलथडी । धरू चरण सदाशिवाचे ।।३९।। या बाळाला भक्तीचा हरिख । देवपूजेचे सदासुख । लडिवाळ तरी शोभे मुख । गोविंदाचे ।।४०।। श्रवण करी प्रभूचे गुण । हाती देवाची मूर्ती सगुण । शिर लवे जेथे श्रीचरण । रामप्रभूंचे ।।४१।। **'बापू'** हे टोपणनाव । सर्वांचे मुखी राहे सदैव । गोजिरे अवयव । वर्ण गौर ।।४२।। कधी न वचनाबाहेर । मातापित्यांच्या जाणार । त्यांच्या सेवेचे वेड फार । घेतले मनामध्ये ।।४३।। अनंत जन्मीचे पुण्य पदरी । म्हणोन हा बालक आमुच्या घरी । आनंदाने उभयता उरी । धरिती बालकासी ।।४४।। अनंताचा सुपुत्र । स्वानंद पसरवी सर्वत्र । आमचा बापू हाचि मंत्र । ऐकू येई सर्वामुखी ।।४५।। प्रेमाश्रुंचा अभिषेक । भिजे बापूचे मस्तक । प्रेमाशीर्वाद मिळोन अनेक । वाढे बापू शुक्लेंदुवत ।।४६।। संसाराचे रहाटगाडगे । दुःख येई सुखामागे । भोगणे लागे प्रसंगे । दोन्हीही ।।४७।। बापूची प्रेमळ माता । संपविली इहलोकीची यात्रा । गोविंदास जन्म देण्यापुरता । संबंध होता मातेचा ।।४८।। नाना म्हणती बापूचा । दोरा तुटला मातृसुखाचा । कोण सांभाळ करील याचा । पोटी प्रेम ठेवूनी ।।४९।। जो नेतो तोचि देतो । उगीच आपुले धारिष्ट्य पहातो । त्याच्या कृपेवर विश्वासील तो । धन्य धन्य या जगी ।।५०।। आई गेली, माई आली। करी त्याच प्रेमाची साऊली । सावत्र माता गेली । सावत्रपणा विसरूनी ।।५१।। स्वर्गस्थ माता संतोषली । म्हणे बाळाची चिंता मिटली । शुभाशीर्वादांची लाखोली । वाहे बालकावरी ।।५२।। सातवे वर्षी थाटाने । व्रतबंध झाला उत्साहाने । आणि विद्याभ्यास बापूने । सुरू केला कृतनिश्चये ।।५३।। श्री गणेशास स्मरून । सुरू केले अध्ययन । श्रवण आणि मनन । अट्टाहासे बापू करी ।।५४।। बुद्धिस नव्हती मलिनता । तशीच लवमात्र नसे चित्ता ।



तेथे अभ्यासाची अपूर्वता । कोठवरी वर्णावी ।।५५।। प्रातःकाळी उठावे । भगवंतासी स्मरावे । आणि मुखी उच्चारावे । रामःरामौ रामाः ।।५६।। कधी कोणावरी न कोपावे । कधी कोणाचे व्यंग न उच्चारावे । वादावाद न करावे । कधी कोणासी ।।५७।। मोह न शरीर सौख्याचा । लोभ न नाटकाचा । ताठर शब्द न वदे वाचा । न मत्सर कधीही ।।५८।। ऐसा समंजस विद्यार्थी । शिक्षक म्हणती हा निस्वार्थी । रत सदा पुरूषार्थी । हा एक ।।५९।। बापू सर्वांचा आवडता । शिक्षकांचाही आवडता । त्यांचा विश्वास पुरता । बापूवरी ।।६०।। उद्धवराव यरगट्टीकर । ज्यांनी साधनची केले जन्मवर । ते बापूचे सहाध्यायी थोर । शाळेमध्ये ।।६१।। स्नेही मित्र सहाध्यायी । शिक्षक, पिता, आणि आई । सोयरी धायरी सर्वही । ममता करिती बापूवरी ।।६२।। एकदा वर्गात गोंधळ । करिती बाळगोपाळ । झाली मुले अवखळ । तो शिक्षक पातले ।।६३।। तो काळ होता शिस्तीचा । पालक शिक्षक यांचे ऐकण्याचा । नाहीतरी देहदंड शिक्षेचा । अनिवार बसे ।।६४।। पारा चढला शिक्षकांचा । म्हणती बंदोबस्त करू याचा । क्षणार्धात मुलांचा । गोंधळ बंद करू ।।६५।। नेत्री चढे लालिमा । तेव्हा शिक्षक लाजविती यमा । एक छडीच येईल कामा । बोला कोण अवखळ ते ।।६६।। कोणी माजविला गोंधळ । कोणी केली गडबड सकळ । ऐका शांत झाले गोपाळ । चुपचाप बैसले ।।६७।। आतल्या आत चूर सर्वजण । कोणी उघडीना वदन । लटपटती छडी पाहून । शिक्षक म्हणती बापूला ।।६८।। ''आता माझी भिस्त तुझ्यावरी । सांग कोणी खोडी केली खरी । छडी त्याच्या पाठीवरी । उठेल माझी'' ।।६९।। तव गोविंद बोले अधोवदन, । ''गुरूजी, पुस्तकी गुंतले माझे मन । न जाणे कोण यास कारण । क्षमा मजला

करावी''।।७०।। हतप्रभ झाले शिक्षक । म्हणती दंडीन एकूण एक । घ्या छडी प्रत्येक । उभे रहा ओळीने ।।७१।। येता येता येता । गोविंदाकडे दृष्टि जाता । कळवळा येवोन चित्ता । काय बोलती ।।७२।। तुझा लवमात्र अपराध नसता । शिक्षा भोगावी लागे आता । नियम सर्वास लागता । जळे ओले वाळल्यासवे ।।७३।। छडी बसली गोविंद करी । घाव गुरूजींच्या *हृदयांवरी । विधीच्या न्यायाची थोरी । यापरीस काय वर्णावी ।।७४।। बापू न गजबजला मनी । कर्ता देव हे अंतःकरणी । चित्त अभ्यासी घालूनी । राही मनी निश्चिंत ।।७५।। गुरूजनांचा आदर । हा गोविंदाचा स्वभाव थोर । निर्मळ राखी अंतर । अभ्यासासाठी ।।७६।। मान आणि अपमान । ओढी जीवासी बेगुमान । तेथून काढूनिया मन । प्रसन्न बापू सर्वदा ।।७७।। मनुष्य फुगे मानाने । आणि रंजीस ये अपमानाने । परी हे जोखड मनाने । का घ्यावे वायाची ।।७८।। गोविंद झाला चित्रकला प्रवीण । तीन परीक्षा उत्तीर्ण । अभ्यासीही ठेवून मन । चढे चढण उत्कर्षाची ।।७९।। वाढ होई बुद्धीची । तशीच शरीरबलाची । उपासना मारुतीची । बापू करी उत्साहे ।।८०।। नमस्कार, जोर बैठका । यांचा सुरू असे ठेका । यांच्या बाहुबलापुढे फिका । मित्रगण दिसे ।।८१।। दोन पुरूष उंच उडी । ही गोविंदाची नित्य धडाडी । अचाट कामांची आवडी । हा स्वभाव गोविंदाचा ।।८२।। *अकरा मारुती कोरले । ते अकरा ठिकाणी स्थापिले । हनुमंत चरित्र वर्णनी डोले । गोविंद सद्गद ।।८३।। परमार्थासाठी संसार । हा गोविंदाचा निर्धार । म्हणून उपासनेसही बहार । आला बाल

टीप :- १. ही आठवण बापूरावजी केळकर यांचे सहाध्यायी श्रीयुत बाबूरावजी करमरकर, यांनी सांगितली आहे.

२. या अकरा मारूतींपैकी ३ मूर्ती घरीच स्थापिलेल्या आहेत. एक श्रीबापूरावजींचे शाळेतील विद्यार्थी श्री. वसंतराव देशपांडे, वाटेगावकर,सांगली



वयापासूनि ।।८४।। शरीर धारणेसाठी । करणे संसार उठाउठी । स्तोम न संसाराचे यासाठी । उभारल्या भिंती नित्य नेमाच्या ।।८५।। शरीर सुखास ठेवून दूर । चित्ती स्मरावा विश्वंभर । पुरश्चरणे प्रहरानु प्रहर । करी गोविंद उत्साहे ।।८६।। दर्शन संतांचे घ्यावे । आशीर्वाद संतांचे मागावे । सद्ग्रंथांचे चिंतन करावे । अहर्निश ।।८७।। हा छंद या बालकाचा । जसा ध्रुवाचा नि प्रल्हादाचा । भक्ती भाव अंतरीचा । दिसे उज्वल ।।८८।। एकदा श्रीब्रह्मचैतन्य सद्गुरूवर । आले मिरजेस गोंदवलेकर । बापूसवे अंताजीपंत सत्वर । गेले संतदर्शना ।।८९।। संत दर्शनासाठी अधीर । नाना असती वारंवार । मस्तक ठेविले चरणावर । घेतले आशीर्वाद ।।९०।। तो बापू कोठे दिसेना । म्हणून म्हणती सद्गुरूंना । कोठे गेला कळेना । बापू माझा ।।९१।। तव ते म्हणती दयार्णव । आता आपण करू उपाव । उद्या स्टेशनवरी सुखेनैव । या घेऊन बापूला ।।९२।। आज्ञा प्रमाण संतांची । मानून त्वरा केली जाण्याची । दुसरे दिवशी भेट घेण्याची । उत्सुकता मोठी ।।९३।। गुरू-गोविंदांची दृष्टादृष्ट होता । आनंद उसळला अनावरता । प्रेमाश्रु आले नेत्रा । ते न सांवरती ।।९४।। मिठी घालून कमरेला । बापू मनी आनंदला । बालक भेटे मातेला । तैसा सोहळा ।।९५।। हात फिरवून पाठीवर । बोलती सद्गुरूवर । करीत जा गजर । श्रीराम जयराम जयजयराम ।।९६।। होता गोविंद चैतन्य भेटी । प्रेम उचंबळे उभयता पोटी । नयनी अश्रूंची दाटी । ते सुख अनिवार ।।९७।। पूर्ण पावोन समाधान । बापू आला परतोन । पुनः सुरू केले अध्ययन । ऋषीतुल्य दिनक्रम ।।९८।। प्रातःकाळी उठावे । कृष्णास्नानास जावे । गायत्री पुरश्चरण करावे । प्रवाहात उभे

टीप पुढे चालू :- यांचे घरी स्थापिलेला आहे. बाकीचे कोठे स्थापन केले आहेत याची माहिती कोणास असल्यास कळविण्याची कृपा करावी.

राहुनी ||९९|| निद्रेस न विकोन प्राण | देह केला मोक्षसाधन | मोहांचे सर्वथैव बंधन | टाकिले तोडोनी ||१००|| गोमूत्राची भाकरी खाणे | लक्षालक्षांची पुरश्चरणे | एकामागून एक आचरणे | देहसुख त्याज्य मानोनी ||१०१|| जो विरक्त जन्मापासोनी | सदा रत ईश चिंतनी | कोणी पूर्व जन्मीचा मुनी | योगीही वाटे ||१०२|| हा काय आपणहून आला | की विश्वंभरे पाठविला | का ईश्वर भक्तीचा ध्यास धरिला | मनामध्ये ||१०३|| अचाट कृत्ये करणे | पुरश्चरणे आणि पारायणे | क्षण एक न दवडणे | वृथा कधी ||१०४|| वज्रासारखे शरीर | अभ्यासीही तत्पर | आणि उपासना कठोर | ऐसे व्रत गोविंदाचे ||१०५|| स्कूल फायनलचा अभ्यास | आला आता शेवटास | यशही भरघोस | आले हाता ||१०६|| वय वरूषे असेल सोळा | तव वधुपिता आले शोधीता बाळा | म्हणती चला आता उजळा | मुख आपुल्या कन्येचे ||१०७|| रुढी बालविवाहाची | होती त्या काळची | सुदृढ शरीरयष्टि पाहून याची | आणि विद्या अभ्यास ||१०८|| विष्णुसारखा वर | सत्वशील कुलवंत थोर | नाही पुनः मिळणार | प्रयत्नांतीही ||१०९|| मुलीचे पालक म्हणती | हा वर असो द्यावा चित्ती | त्वरा करा पुरती | नाहीतर जाईल हातचा ||११०|| करावया कन्यादान | उत्सुक झाले बहुतजण | अंताजीपंत हे पाहून | रचिती मनोरथ ||१११|| हा एवढाच पुत्र आपणासी | मिळणी करावी वधुवरासी | आपुल्या वंशवेलीसी | येईल बहर ||११२|| प्रेमे पुत्रासी बोलाविले | आपले मनोगत निवेदिले | तो आकाशची कोसळले | वाटले बापूला ||११३|| दूर सारोन संसार चिंता | परमार्थ करावा पुरता | गाठ पडेल देवाभक्ता | तेचि खरे शुभमंगल ||११४|| पितृआज्ञा मोडावयाचे | ब्रीद नव्हते गोविंदाचे | म्हणून हितगुज मनीचे | निवेदिले नानांना ||११५|| नाना म्हणती



बापूला | तूच एक भाग्यपुत्र आम्हाला | तुझ्या ठायी जीव गुंतला | संसारसोहळे तुझ्यामुळे ||११६|| परमार्थाची तुला आवड | तेच आमुच्याही मनीचे कोड | संसारास परमार्थाची जोड | देऊन हो एकनाथ ||११७|| परी हे बापूला मानेना | तो विनवून म्हणे नानांना | अति अवघड वाटे मना | सांगा काय करू ||११८|| पोटी परमार्थाची आवड | वाटे संसारासी न द्यावी सवड | मग सारेचि होईल अवघड | ना अरत्र ना परत्र ||११९|| मन नाही म्हणून संसार गेला | संसार मोहाने परमार्थ बुडाला | इकडे आड तिकडे विहीर मला | मी मध्ये उभा दिसतसे ||१२०|| कान्ता कीर्ती आणि कांचन | हे परमार्थासी मोठे विघ्न | वाटे मार्ग करावा निर्विघ्न | तीन्ही सारून अतिदूर ||१२१|| माई गोविंदाची माता | पुत्रावरी अति ममता | ती म्हणे बापू आता | विचार माझा ऐक ||१२२|| तू आमुचे आशास्थान | तू आमुचे सुखनिधान | तुझ्यामुळे ऐश्वर्यपूर्ण | संसार आपुला ||१२३|| तो तू आचरसी संन्यासधर्म | तव ओढवले पुरते कर्म | अरे संसारी परमार्थाचे वर्म | काढ शोधोनी ||१२४|| अश्रु मातेच्या नयनी | पाहून बापू गजबजला मनी | म्हणे देवाधिदेवा मार्ग दाखवुनि | सोडीव आता ||१२५|| मातापित्यास कष्टी ठेवणे | हे मज जीणे लाजीरवाणे | देवा तुझे पाय सोडणे | हेहि प्राणसंकट ||१२६|| तव एक विचार आला | बापू म्हणे मातेला | मी जातो आळंदीला | कौल मागण्या ||१२७|| आता आळंदीचा जगदीश | जो देईल आदेश | तेथे ठेवू विश्वास | आपण सर्वजण ||१२८|| नाना समजाविती मनाला | आता विनवू ज्ञानेश्वर माऊलीला | दाखविल तोचि मार्ग मला | मानू आपण ||१२९|| विचार मानला सर्वासी | बापू आला आळंदीसी | परी आता म्हणे ज्ञानेशासी | आठवू प्रेमभावे ||१३०|| श्री ज्ञानराज दयार्णव | पुरवितील मनीची हाव | भक्तकाजास्तव सदैव | म्हणोन

ज्ञानराज माऊली ।।१३१।। नको आता अनुमान । देतील प्रत्यक्ष दर्शन । जरी माझे भजन । असेल श्रद्धापूर्ण ।।१३२।। शब्द त्यांच्या मुखातला । घेऊ आता या वेळेला । म्हणोन ज्ञानेश्वरी पारायणाला । सुरवात केली ।।१३३।। आज्ञा मिळेल जेव्हा । सोडीन आळंदी तेव्हा । आता श्रीज्ञानेशा व्हा । पाठीराखे या संकटी ।।१३४।। करूणाकर निवृत्तीदास । कधी न करिती भक्ता उदास । ऐकोन आर्त हाकेस । साक्षात् प्रगटले ।।१३५।। बाल गोविंद विनटला । ज्ञानदेव चरणी लीन झाला । विचारिती भक्ताला । काय इच्छा मनी वसे ।।१३६।। देवकार्यी देह झिजावा । देवाची व्हावी सेवा । भक्तिभाव मनी असावा । हेचि मनी असे ।।१३७।। परि विवाहाची अडचण । झाली मध्ये निर्माण । आता तुमची इच्छा प्रमाण । मानून चालीन मी ।।१३८।। तव ज्ञानदेव प्रसन्नवदन । म्हणती विवाह करून । परमार्थीही अनुसंधान । सोडू नये ।।१३९।। साधिशील प्रपंच परमार्थ । भेटतील सद्गुरू समर्थ । आयुष्य वेचून जगदोद्धारार्थ । होशील कृतार्थ जीवनी ।।१४०।। लाभता ऐसा शुभाशीर्वाद । आनंदला मनी गोविंद । धरीले चरण झाला सद्‌गद । म्हणे येतो जी ।।१४१।। ते दिवस इंग्रजांच्या राजवटीचे । नित्याच्या लष्कर भरतीचे । सेवक सरकारचे । सुदृढ तरूण शोधिती ।।१४२।। गोविंद लागला वाटेला । तो कोणी विचारती त्याला । म्हणती चल हो शिपाई बाळा । भाग्य तुझे उगवेल ।।१४३।। अधिकार येईल हाताशी । संपत्ती लोळेल पायापाशी । लोक बैसवितील गादीशी । करतील मुजरा ।।१४४।। शौर्य दाखविशील रणी । तरी कॅप्टन मेजर होशील झणी । मग तुझ्या वैभवाची गाणी । सर्वजण गातील ।।१४५।। शरीर सौष्ठव तुझे चांगले । म्हणोन भाग्य चालून आले । ते तुवा लाथाडले । मग वेळ पुनः न येईल ।।१४६।। त्यांनाही एकवेळ । समजावी हा बाळ । पाहोन त्याचा



निश्चय अढळ । स्तब्ध राहती ।।१४७।। मनी म्हणे हे काय झाले । परमार्थकार्यी विघ्न आले । ऐहिक सौख्य नव्हते चिंतिले । मनामध्ये ।।१४८।। म्हणे धावाजी ज्ञानदेवा । हा कैसा पेटला वणवा । सत्ता संपत्तीचा लोभ नसावा । माझे मनी ।।१४९।। करावे भजन पूजना । सद्‌ग्रंथांचे वाचन । नामस्मरण अनुदिन । ही आस मनीची ।।१५०।। पैसा थोडा कनवठीला । तो आला एक टांगेवाला । म्हणे मी निघालो पुण्याला । मोकळाच ।।१५१।। चल बैस मागे । म्हणोन टांगा हाकला वेगे । गोविंद ज्ञानदेवास मनी सांगे । गोष्ट आनंदुनी ।।१५२।। पुनः धावलाती देवा । हा जीव तुमचाच ठेवा । आता ईश्वर उपासना करवा । तुम्हीच माझ्याकडुनी ।।१५३।। श्रीज्ञानेश्वर माऊली । करी कृपेची साऊली । गोविंदास पावली । पुनः पुनः ।।१५४।। तव टांगा पुण्यनगरीत । लोकमान्यांचे घर शोधीत । गोविंद म्हणे हेच अपेक्षित । घर माझे ।।१५५।। लोकमान्य टिळक । भारताचे हितचिंतक । मीही भारतीय एक । आलो भेटीसी ।।१५६।। लोकमान्य केवळ ईश्वर । उतरला तेथे हा बालवीर । समोर पाहून घर । राष्ट्रपित्याचे ।।१५७।। मागे पाहे परतोन । त्याचे भाडे द्यावे म्हणोन । तो टांगेवाला गेला निघोन । क्षण न लागता ।।१५८।। लोकमान्य म्हणती भिऊ नको । आता काळजी करू नको । संकटाचा ध्यास नको । धरु मनामध्ये ।।१५९।। त्यास धीर देऊन । परतविला घरी समजावून । देव पाठीशी असता विघ्न । येईल कैसे? । घरी येता चित्र श्रीज्ञानेशांचे । रेखांकित केले साचे । जैसे दर्शन संतरायाचे । झाले त्यासी ।।१६१।। माता पितयास वृत्तांत । निवेदिला साद्यंत । दाखविता श्रीज्ञानेशांचे चित्र । नाना सद्‌गद जाहले ।।१६२।। गोविंदाचे मन वळले । श्रीज्ञानेश प्रसन्न झाले । मज दीनाचे कोड पुरविले । दयार्द्र होऊनी ।।१६३।। जयजयजयश्रीशंकरा । हट्ट पुरवीतसा

खरा । हे भोलानाथ हे गिरिजावरा । आसरा तूचि आम्हा ।।१६४।। तुझी भक्ति सदा घडो । तुझ्या सेवेत देह पडो । तुझ्या भक्तीची झडो । नौबत येथे ।।१६५।। आम्ही तरी संसारी । परि तुझे प्रेम अंतरी । फार नाही जरी । तरी थोडी आशा असे ।।१६६।। संसार सुफल राहावा । तो तुझ्यासाठी देवा । देह सुखासाठी न राहावा । जीव आमुचा ।।१६७।। ऐश्वर्य इहलोकींचे । नको आम्हास भक्तीवाचूनचे । जे घेऊ ते तुझ्या कामाचे । होवो सदा ।।१६८।। संत होवोन अनुकूल । भाग्य झाले सुफल । संत कृपेची वंशवेल । वाढेल आता येथे ।।१६९।। * **इंदिरा गोविंद** विवाह । हौसेचा झाला समारोह । दोन पुण्यात्म्यांचे देह । एकत्र आले ।।१७०।। अल्पवयी पतिपत्नी । इंदिरा-गोविंद शोभती दोन्ही । पतिसेवा व्रत मानुनी । आली लक्ष्मी घरामध्ये ।।१७१।। गोविंदाचे असिधाराव्रत । पेटले होमकुंड धगधगीत । आहुती वरी आहुती पडत । गृह सौख्याच्या ।।१७२।। अति बिकट हा गृहस्थाश्रम । संन्यासही यापरिस सुगम । गोविंदाचे वैराग्य अनुपम । धगधगीत ।।१७३।। कंठी शोभे नाममाळा । भाळी वैराग्याचा टिळा । भक्तिप्रेमाचा उमाळा । हीच दिवाळी हाच दसरा ।।१७४।। म्हणे इंदिरासून मनात । हे संसाराचे वेगळेच चित्र । हरिहर येथे दिसत । सदा वस्तीसी ।।१७५।। संत श्रीहनुमंत । झाले तिच्यावरी कृपावंत । अनुग्रह आणि वरदहस्त । आला शिरावरी ।।१७६।। म्हणोन संसाराची हळहळ । शांत झाली सकळ । परमार्थ सुख सोज्वळ । उमगू लागले ।।१७७।। श्रीहनुमंत कृपाप्रसाद । सुखद त्यांचा आशीर्वाद । म्हणोनी पत्नी दे प्रतिसाद । पतिकार्यासाठी ।।१७८।। संतश्रेष्ठ श्रीहनुमंत तात्यांचे । निधान पूर्ण कृपेचे । लाभले म्हणून केळकरांचे । अखिल कुल

टीप :– कै. नागेशपंत फाटक वकील व कै. येसूबाई फाटक, कागवाड यांची कन्या



धन्य झाले ।।१७९।। नातरी हे असिधाराव्रत । संतकृपेची जोड सतत । म्हणोनी संसारताप शांत । होय सद्भक्तांचा ।।१८०।। खडतर व्रत गोविंदजींचे । अखंडव्रत ईशसेवेचे । दिन प्रतिदिन उपासनेचे । घमंड चाले ।।१८१।। आता पुढील अध्यायी । दिसेल संसाराची नवलाई । असोन नसणे म्हणजे कायी । येईल कळो ।।१८२।। आता सत्त्वपरीक्षेची । वेळ येईल कसोटीची । उजळेल चरित्राची । ज्योत मोठी ।।१८३।।

इति श्रीगोविंदचरितमानस । जे स्वभावेची अति सुरस । जेथे अखंड उसळेल भक्तिरस । श्रीज्ञानेश्वरदर्शननाम द्वितीय अध्याय ।।२।।

***

## अध्याय तिसरा

# संसारस्थिती वर्णन

मन जडो गोविंद चरणी । ही एक आस मनी । त्यांच्या दिव्य जीवनी । रति असो ।।१।। जय जय श्रीअनंततनया । सन्मार्गदीप उजळाया । धरोनी अवतारकार्या । कष्टविले देहासी ।।२।। देहधारणेसाठी जेवणे । वस्त्र प्रावरण घेणे । आसरा शोधणे । संसाराचा ।।३।। परी कमी करोनिया व्याप । भरणे परमार्थाचे माप । त्यासाठी प्रयत्न उमाप । हे धोरण गोविंदजींचे ।।४।। न दुखवावे कोणासी । सेवाभाव माता-पितयासी । नम्रता सर्वांसी । हे धोरण गोविंदजींचे ।।५।। एकदा अनंतराव म्हैसकर । गोविंदजींचे मित्रवर । जमखिंडीहून सत्वर । पत्र पाठविले सांगलीसी ।।६।। तुमची श्रीराम उपासना । म्हणोनी आले माझ्या मना । गोविंदजी येथे एक घटना । घडली असे ।।७।। येथे एका उपेक्षित जागी । श्रीराम सीतेच्या सुंदर सर्वांगी । मूर्ती सापडल्या योगायोगी । अवचित ।।८।। जरी मानेल तुम्हासी । तरी त्या सत्वर न्याव्या सांगलीसी । काय विचार मानसी। तो सत्वर कळवावा ।।९।। धनार्थियासी धन । तृषार्थियासी जीवन । तैशा या मूर्ती सगुण । गोविंदजींसी ।।१०।। आनंद पोटी मावेना । वाटे श्रीरामची येती सदना । आनंदाश्रु नयना । ओघळती ।।११।। म्हणती डोईवरूनी कोणी । आणील या मूर्ती दोन्ही । चालत येथवर तेथूनी । तरी विशेष होईल ।।१२।। खाडिलकर नामे एक । होते बलवंताचे उपासक । म्हणती मूर्ती टाकोटाक । आणतो पदयात्रेने ।।१३।। डोईवर सीतारामांच्या मूर्ती । ठेवोनी खाडिलकर



आनंदमूर्ती । निघाले करावया वचनपूर्ती । आले चालत ।।१४।। आनंद झाला गोविंदजींना । म्हणती ही दैवी घटना । कसे योग जुळती पहा ना । सत्कार्यी ।।१५।। श्रीराम जयराम जयजयराम । स्मरण करोनी सप्रेम । मूर्ती स्थापिल्या मनोरम । श्रीरामाश्रमी ।।१६।। विनविती हात जोडोनी । पोटी प्रेम आसू नयनी । हे **सीताराम** जनक जननी । भक्तजनांची ।।१७।। आलाती आमुच्या सदना । आनंद झाला मना । आता एकची विवंचना । मनी असे ।।१८।। आता अखंड उपासना । घ्या करवून हे जगज्जीवना । आपुल्या आशीर्वादाविना । आम्ही दीन रंक ।।१९।। भक्त कैवारी आपण । म्हणती संत सज्जन । आपण आमुचे आशास्थान । हे गुणनिधान श्रीरामा ।।२०।। ऐसे विनवून प्रभूला । मुहूर्त झाला सेवेला । भजन पूजन श्रवणाला । बहर चढे ।।२१।। श्रीरामाश्रम श्रीआनंदाश्रम ऐशा । दोन खोल्या नजीकच्या । देवपूजा जप जाप्य या विशेषा । अनुक्रम उपयोजिती ।।२२।। करावी देवपूजा उत्तम । जन्मोत्सव पुण्यतिथ्यादि निष्काम । पुरश्चरणेही कठीणतम । आचरिली ।।२३।। अभ्यासही चाले निरलस । स्कूल फायनलचे यश येता हातास । मॅट्रिकच्या परीक्षेचा ध्यास । लागला चित्ता ।।२४।। तो आली प्लेगची धाड । काळाची लांडगेतोड । काळजाची धडधड । वाढो लागली ।।२५।। नानांनी कुटुंबियासह । मिरजेस केले वसतिगृह । तो काळही आला त्यांचेसह । गोविंदास झडपाया ।।२६।। उठल्या प्लेगच्या तीन गाठी । आनंद मावळला उठाउठी । धावपाव गा जगजेठी । विनविती नाना ।।२७।। मनी होवोनी चिंताक्रांत । पाहोनी घरी आकांत । म्हणती शंकरा अंत । पाहो नका आता ।।२८।। ज्याच्यासाठी तन मन धन । आणि वेचावा तोही प्राण । असा माझा गुणनिधान । पुत्र गोविंद ।।२९।। नाही मागत धन । नाही मागत जगी मान । एवढ्या माझ्या पुण्यवान । बापूला वाचवी ।।३०।।

शिवशंकरा सदाशिवा । आता बापूला वाचवा । माझा हा प्राण ठेवा । हिरावू नका ।।३१।। जय जय श्रीशिवहरहर । तुज म्हणती करुणाकर । हे शिवशंभो गौरीहर । एवढे कृपादान मज द्यावे ।।३२।। तव बापू घामेजला । दीर्घस्वरे बोलू लागला । नाना तुमचा 'बापू' निघाला । दूर अतिदूर ।।३३।। शरीर झाले थंड । सुरू झाली रडारड । हृदयाची धडधड । आकांत झाला ।।३४।। रीघ चालली यमपुरीला । बापू लागला त्या मार्गाला । कोण पुसे कोणाला । ज्याचा तो चिंताक्रांत ।।३५।। माई गोविंदाची प्रिय माता । देवापुढे नवमी माथा । प्रार्थना करी पुत्राकरिता । जो तिज प्रिय प्राणाहून ।।३६।। हे करुणाकरा श्रीहरी । माझ्या बाळावरी कृपा करी । माझे उरले आयुष्य सत्वरी । दे माझ्या बापूला ।।३७।। पसरिते पदर । भीक घालावी सत्वर । जीव झाला बेजार । माझा आता ।।३८।। बापूवीण जीणे । ते अवघे उदासवाणे । अमृत गमावणे । करटीसाठी ।।३९।। बापू माझा देवगुणाचा । होईल आधार जगाचा । वर्षाव करील अमृताचा । जगावरी ।।४०।। माझ्या जीवाच्या काय गोष्टी । बापू माझ्या भाग्याची पेटी । देवा माझा कंठ घोटी । बापूसाठी ।।४१।। नको होऊ निष्ठुर । हे देवाधिदेव जगदीश्वर । काय करू अधीर । जीव झाला ।।४२।। हाक जाता भक्तीभावाची । कृपा झाली देवाधिदेवाची । बापूरायाच्या हालचालीची । चाहूल लागली ।।४३।। मंडळी झाली गोळा । आणि बापू उठून बसला । हर्षनिर्भरे बोलू लागला । जो झाला वृत्तांत ।।४४।। एक योगीराज । सूर्या ऐसा सतेज । म्हणे तुझे काय काज । येथे असे? ।।४५।। जा माघारी भूवरी । सोज्वळ भक्तीध्वजा उभारी । साकीबाकी चुकती करी । मग यावे कैवल्यधामी ।।४६।। योगीराज परम दयार्णव । माझा करोनी गौरव । मज दिला वाव । भक्तीसाठी ।।४७।। ऐकून पुत्राचे उत्तर । मातापित्यास आला गहिवर । म्हणती हे रमावर । कृपा तुझी ।।४८।। अल्पावधीत सावत्र माता । आपुले आयुष्य बापूकरिता । अर्पून केली वचनपूर्तता । आणि गेली देवाघरी ।।४९।।



जन्मदाती गेली बालवयी । सावत्रमाता छात्रवयी । सरली बापूची पुण्याई । मातृसुखाची ।।५०।। नानांचा बापू लडिवाळ । माता पिता आणि सकळ । होवोनी अनुकूल सर्वकाळ । जपती पुत्रासी ।।५१।। मातेची येता आठवण । गोविंद होई सार्द्र नयन । प्रसंगी अश्रुंचे अभिषेक सिंचन । मातेसाठी ।।५२।। बापूचे झाले बापूराव । गोविंदाचे गोविंदराव । थोर संत म्हणे गाव । परी मातेपुढे बालक ।।५३।। निर्व्याज आणखी निष्पाप । जरी वय वाढे आपोआप । निष्कपट बालभावाची छाप । दिसे मुखावरी गोविंदजींच्या ।।५४।। रोग करी जर्जर काया । पुढील अभ्यास गेला वाया । नाना म्हणती पुरे करा या । शालेय शिक्षणा ।।५५।। अशक्तपणा करी उपेक्षा । आता कसली पुढे परीक्षा । उच्च शिक्षणाच्या आकांक्षा । विरल्या जागच्या जागी ।।५६।। ही मनी राहिली तळमळ । म्हणूनी विद्याविभूषितांची त्यांना कळकळ । पदवीधरांनी एक वेळ । म्हणती यावे परमार्थी ।।५७।। त्यांनीही पिटावा भक्तीचा डांगोरा । तरीच उघडतील सुशिक्षितांच्या नजरा । करू लागतील एकसरा । भक्ती सर्वजण ।।५८।। हाच गोविंदजींचा आनंद । हाचि त्यांचा सुखसंवाद । वाढवावया रामराज्य सुखद । या भूमंडळी ।।५९।। सुखी होतील सर्वजण । हेचि गोविंदजीस भूषण । गीता भागवत पठण । होईल घरोघरी ।।६०।। असो नाना म्हणती बापूला । आता लागू नोकरीच्या शोधाला । हातभार संसाराला । लागेल जरा ।।६१।। दिन काही सरता । ये नोकरीचा योग हाता । मिळे न्यायालयी आता । जीविकावृत्ती गोविंदजींना ।।६२।। आली नोकरी सुखाची । टिकली असती कायमची । या सुजाण नोकरास गुणांची । वाणच नव्हती ।।६३।। होता सहवास

तात्यांचा । तेथेच त्यांचा व्यवसाय वकिलीचा । हा योगच भाग्याचा । जमला होता ।।६४।। गोविंदजींनी हेरले । की संतश्रेष्ठ असती भले । मार्गदर्शक याहून भले । कोठे शोधावे? ।।६५।। बर्कसाहेब आयरिश । प्रशासक सांगलीचे खास । दरारा लोकास । लौकिक तसाच ।।६६।। एकदा एक जासूद आला । गोविंदजींच्या घराला । म्हणे आत्ताच्या आत्ता साहेबाला । एक दस्तऐवज पाहिजे ।।६७।। धुंडिता धुंडिता । इष्ट कागद न ये हाता । लागली चिंता । म्हणती आले अवघड ।।६८।। विसरभोळा नोकर । हे न मला सोसवणार । अपकीर्तीची काचणी अनिवार । लागे मना ।।६९।। हनुमंत सद्गुरूंचे । स्मरण करून सद्गद्वाचे । विनविती या संकटाचे । दाढेतूनी सोडवा ।।७०।। काळ हा कठीण आला । अपकीर्ती हा घाला । चुकलो जरी या वेळेला । क्षमा करावी ।।७१।। तव सुचविती सद्गुरूवर । शोध निकामी कागदांचा भार । दस्तऐवज सत्वर । सापडला ।।७२।। काही वर्षे लोटली । तो राष्ट्रप्रेमाची लाट उसळली । परदास्यश्रृंखला तोडण्याची झाली । घाई सर्वांना ।।७३।। नवे मार्ग दिसू लागले । नवे वारे वाहू लागले । नव्या कल्पनांना बहर आले । सगळीकडे ।।७४।। तरूणपिढी हाती घ्यावी । विचारांना योग्य दिशा लाभावी । सामर्थ्यसंपन्न करावी । तरूण मंडळी ।।७५।। शिक्षण प्रसारक मंडळी । करिती स्वार्थाची होळी । ज्ञानज्योती उजळली । ठायी ठायी ।।७६।। सुबुद्ध जन सांगलीचे । कार्य उचलती शिक्षण प्रसाराचे । लक्ष गोविंदजींचे । वेधले या कार्या ।।७७।। हाक येता संस्थापकांची । सांगली शिक्षण मंडळींची । नोकरी सोडून सुखाची । धावले देशकार्या ।।७८।। त्यागासाठी जीवन । ही गोविंदजींच्या मनाची ठेवण । त्यांना मोह न पाडी सुवर्ण । सत्ता आणि ऐश्वर्य ।।७९।। सुखाचा त्याग केला । कष्टाचा मार्ग पत्करिला । अभ्यासू विद्यार्थ्यांचा झाला ।



भाग्योदय ।।८०।। जेथे शिक्षक सच्छिल । प्रज्ञावंत आणि कुशल । द्रष्टे आणि प्रेमळ । सव्यसाची ।।८१।। त्यागी आणि निरलस । बहुश्रुत आणि सालस । तेथे आनंद क्षात्रगणास । अंतरी दीप उजळती ।।८२।। ऐसे गोविंदजी शोभती । नीतीशास्त्र शिकविती । क्षात्रगण प्रमुदित होती । सत्वमूर्ति पाहता ।।८३।। वादविवाद सभा घेती । आठवड्याचा विषय नेमून देती । एकदा झाली फजिती । विषय राहिला देण्याचा ।।८४।। तव मुले लिहिती फळ्यावर । आज बोला या विषयावर । कोण कोण बोलणार? । विषय ''काही नाही'' ।।८५।। गोविंदजी वर्गात शिरले । फळ्यावरचे वाक्य वाचले । तो त्यांच्या प्रतिभेस चढले । भलतेच स्फुरण ।।८६।। पाचारिती क्षात्रगणांना । म्हणती आता बोला ना । तव सर्वांच्या ना ना । माना डोलल्या ।।८७।। तो गोविंदजी बोलू लागले । मुलांनो तुमचे भाग्य भले । म्हणोनी या विषयाचे झाले । स्फुरण तुम्हा ।।८८।। ''काही नाही'' हा विषय गहन । परि तुम्ही घ्या तो समजून । चित्ती ठेवा साठवून । उजळेल पूर्ण भाग्य ।।८९।। ते भाषण गोविंदजींचे । तासभर भोजन आनंदाचे । शांत स्तब्ध क्षात्रगणांचे । लक्ष वेधले भाषणाकडे ।।९०।। ही पहा शाळा तुमची । आज गर्दी बाळगोपाळांची । पूर्वी जागा पालापाचोळ्याची । म्हणजे ''काही नाही'' ।।९१।। दिनमणी जाता अस्ताला । पहा तुम्ही निरभ्र आकाशाला । काय दिसते सांगा मला । ''काही नाही'' ।।९२।। उगवती नक्षत्रमाला । रजनीनाथ दिसे डोळा । पुन्हा सूर्य येता उदयाचला । नभी ''काही नाही'' ।।९३।। आकाशापासोन वायू झाला । तो ''काही नाही'' तून जन्मला । विश्वाचा विस्तार वाढला । त्यातून पुढे ।।९४।। विश्वरचना झाली मावळली । पुन्हा ''काही नाही''त लीन झाली । आदिअंत कथा

राहिली । ''काही नाही''ची ।।९५।। एक कंगाल चालला रस्त्यातूनि । तो हत्ती माळ घाली नेऊनी । गळा पडता बसला राजा होऊनी । परि पूर्वी ''काही नाही'' ।।९६।। हा आपला वर्गनायक । याचे वय सोळा आणि एक । सतरा वर्षापूर्वीचे त्याचे कौतुक । सांगा ''काही नाही''।।९७।। शंभर वर्षे आयुष्य यासी । सरता जाईल कोण्या देशी । ठाऊक आहे का कोणासी । सांगा ''काही नाही'' ।।९८।। या ''काही नाही''तून विश्व झाले । ते ''काही नाही''त मावळले । मावळताही राहिले । काहीतरी ।।९९।। ते ''काही तरी'' संत जाणती । त्यास इतरजन ''काही नाही'' म्हणती । नाही म्हणती त्यांचे तोंडून वदविती । होय म्हणूनी ।।१००।। काही नसोन डोळा दिसते । काही असोन काही नाहीसे भासते । मग तुमच्या डोळ्यांचे काम काय ते । सांगा ''काही नाही'' ।।१०१।। जो डोळा खरे दाखवितो । तो डोळा कोणास दिसतो । का तो नयनाविण दाखवितो । कळते का सांगा ''काही नाही'' ।।१०२।। म्हणोनी जे संत सज्जन । त्यासीच पुसावे याचे लक्षण । हे संत काही नसोन । असती काही तरी ।।१०३।। ''काही नाही'' हा विषय गहन । तेथे द्वैताचे उडे भान । आणि मनचि जाय मावळून । एकसरे ।।१०४।। नंदगोपाळ धावू लागला । यशोदा धरू गेली त्याला । तव तो दिसेनासा झाला । ती म्हणे माझी शक्ती ''काही नाही'' ।।१०५।। बैसली निराश होऊन । तव तो भेटे कडकडून । पाही मातेचे वदन । लडिवाळपणे ।।१०६।। जव जव ''काही नाही''चे जाणपण । तव तव अंगी वाजो लागे देवपण । ऐसे ''काही नाही'' चे महिमान । बालमित्रहो, सांगावे तितुके अपुरेच ।।१०७।। चुपचाप बैसली मुले । एकेकाचे चेहरे फुलू लागले । ''काही नाही'' चे झाले काही महत्त्वाचे ।।१०८।। ऐसे गोविंदजी शिक्षक । प्रत्युत्पन्नमती आणि नेमक । प्रेमळ आणि सात्त्विक । म्हणोनी आवडते विद्यार्थ्यांना ।।१०९।।



एकदा एक विद्यार्थी आला । उशीराने शाळेला । वर्ग होता सुरू झाला । म्हणून गोंधळे मनात ।।११०।। 'आत येऊ का' म्हणण्याऐवजी । म्हणे 'ॐ भवती भिक्षांदेही' जी । हशा पिकला वर्गामाजी । तो अधिकच गोंधळला ।।१११।। तव शिक्षक समजाविती मुलांना । हसू नये गोंधळलेल्यांना । अजाणता नाना । चुका होती ।।११२।। ऐसे लोटले काही दिवस । तो गोविंदजीस अवघड जागेस । करट झाले, उपाय बहुवस। परी काही चालेना ।।११३।। देह यातना अपार । गोविंदजी न सोडिती धीर । तो झाला चमत्कार । आली जन्मदात्री भेटण्याला ।।११४।। जात होते आकाशमार्गी । तुझी कणकण ऐकून आले वेगी । तो तू या जागी । कष्टी दिसतोसी ।।११५।। तव बाळ म्हणे माते । सोसवेना देह दुःखाते । करट अति ठणकते । जीव होतसे घायाळ ।।११६।। परी मज आनंद जाहला । तुज पाहोन जीव निवाला । मज दुःखाचा विसर पडला । आता जाऊ नको ।।११७।। तुझी सेवा नाही घडली । म्हणोन हुरहुर लागली । आता बरी संधी आली । करीन सेवा मनोभावे ।।११८।। आली तुला माझी करूणा । म्हणोन आलीस या क्षणा । देहदुःखाची गणना । मी न करी ।।११९।। तव माता झाली सद्गद । म्हणे अरे बाळ गोविंद । नको मानू तू खेद । दैवाधीन जीव असे ।।१२०।। फार वेळ राहण्याची । आज्ञा न मला विधीची । झाली ही भेट सुखाची । घे मानुनी ।।१२१।। तुझ्यासारखे पुत्ररत्न । लाभले मज विना प्रयत्न । मी आहे सुखसंपन्न । तुझ्या पुण्याईने ।।१२२।। तुझ्या मनीची प्रेमळ आठवण । ही सेवा न म्हणेल कोण । तूच केलेस सेवेचे व्याख्यान । आठवण उत्तम म्हणोनी ।।१२३।। तुझी माता झाले । हे भाग्य देवांनी पाहिले । मन माझे संपूर्ण धाले । तुझ्या सत्कीर्तीने ।।१२४।। थांब तुझ्या करटावरून । जाते हात फिरवून । यमयातना निघून । जातील क्षणार्धात ।।१२५।। मातेचा हात लागता ।

दुःख निमाले हा हा म्हणता । कळली वार्ता समस्ता । आनंदी आनंद ।।१२६।। तुटक संवाद सर्वांनी । ऐकला हे जाणोनी । गोविंदजी सांगती विस्तारूनी । जो घडला वृत्तांत ।।१२७।। माता अदृश्य जहाली । मातृसेवेची आशा विरली । करटाची आग निमाली । क्षणामध्ये ।।१२८।। दुःखामागोन सुखाचें । फेरे येती कौतुकाचे । तैसे नवल वर्तले साचे । आता एक ।।१२९।। कन्यारत्न गोविंदजींना । झाले तेव्हा म्हणती नाना । हिची पत्रिका पहाना । साक्षात् लक्ष्मी असे ।।१३०।। भाकीत होते ज्योतिषांचे । नवल असे या कन्येचे । हे घर करील केळकरांचे । रत्नखचित ।।१३१।। परी धगधगीत वैराग्य पाहून । म्हणे काय काम येथे राहून । जेथे संपत्तीची मनापासून । चाड नाही ।।१३२।। जेथे इच्छा नाही वैभवाची । तेथे वस्ती काय कामाची । म्हणोनी त्वरा केली जाण्याची । गेली निघोनी ।।१३३।। खडतर व्रत विष्णुभक्ताचे । पाहोनी पारणे फेडले नेत्रांचे । ठरविले निजगृही जाण्याचे । कन्यारत्न हरपले ।।१३४।। लक्ष्मी गेली विष्णु आला । ऐसा सोहळा पुनः झाला । राम आला जन्माला । इंदिरा गोविंद तनय ।।१३५।। इंदिरा गोविंदास भले । पुत्र निधान लाभले । जेणे अखंडित राहिले । भाग्य सांगलीचे ।।१३६।। कुरुंदवाडी पुत्रजन्मोत्सव झाला । "तात्या" तेथे होते त्यावेळेला । हनुमंताचा वरदहस्त आला । रामाच्या शिरावरी ।।१३७।। बाळ घेऊन मांडीवर । म्हणती हा होईल मान्यवर । करील भक्तीचा प्रसार । कीर्तनरंग ।।१३८।। श्रीहनुमंत तात्यांचा कृपाप्रसाद । सांगलीस झाला सुखद । नित्यकीर्तनाचा आनंद । लुटिती जन सांगलीचे ।।१३९।। परंपरा टिकणे । हे संतसज्जनांचे देणे । म्हणोनी परमार्थाचे पेणे* । सांगली नगर ।।१४०।। परमार्थाने संसार । झाला सुखमय निरंतर । उघडिले नवे द्वार । पूर सुखाचा आत



यावया ।।१४१।। राम झाला पुत्र ऐसा । की जो परमार्थाचा पिसा । दशरथाचा राम जसा । प्रिय सर्वासी ।।१४२।। गोकुळ अष्टमीच्या आदले दिवशी । शके अठराशे बेचाळीसाशी । राम जन्मला शुभ वेळेसी । साथ परमार्थाची करावया ।।१४३।। माता पितयास एकुलता एक । वाढवी परमार्थ अलौकिक । दोन देह प्राण एक । ऐसे पिता-पुत्र ।।१४४।। पितयाचे कोठे पडेल उणे । म्हणोन डोळ्यात तेल घालून जपणे । आपल्या देहाची सावली धरणे । पित्याचे शिरी ।।१४५।। ऐसा छंद परमार्थाचा । ऐसा कळवळा वडिलांच्या कार्याचा । लोभ न धरी लक्ष्मीचा । तीळमात्र ।।१४६।। गोविंदजींची एक बहीण । लक्ष्मणराव पटवर्धनांची पत्नी सुजाण । हरि आणि नारायण । दोन पुत्र त्यांचे ।।१४७।। ते म्हणती गोविंदजीस मामा । लोकांचा याच नामी प्रेमा । तेही म्हणती मामा मामा । तेच नाव रूढ झाले ।।१४८।। येथून पुढे याच नावे । संबोधू गोविंदजीस प्रेमभावे । सुखवू आपणास गुणगौरवे । मामांच्या ।।१४९।। मामांच्यावरी प्रेमवर्षाव । होत राहिला सदैव । मामांचाही प्रेमळ स्वभाव । तैसाची ।।१५०।। वात्सल्य मातेचे । प्रेम भक्तांचे । आणि कठोरपण साधकाचे । ऐसे मामा ।।१५१।। नाना पिता म्हणोन जपती । दोन मातांचे कृपाछत्र शिरावरती । प्रिय पत्नी इंदिरासती । करी सेवा मनोभावे ।।१५२।। इष्टमित्र सखे सोयरे । प्रेमळ मामांच्यासाठी खरे । संतसज्जनांचेही फिरे । सुदर्शन सभोवती ।।१५३।। ऐसे मामांचे वैभव । भाव भक्तीस भरती सदैव । शुद्धाचरण मूळ स्वभाव । हेचि कारण याचे ।।१५४।। स्फटिकासम शुद्ध मन । भोवती वैराग्याचे कुंपण । कैवल्याचे वृक्षारोपण । धरी मूळ सखोल ।।१५५।। मामांचे संसारी जीवन । विरक्ती आणि सौजन्य । सद्भाव मृदुवचन । हे सूत्र जीवनाचे ।।१५६।। प्लेगाचे

टीप :– वसतीस्थान.

विघ्न टळले । परी वाचा बंद करून गेले । मामा मनी म्हणाले । चला शरण ज्ञानेशासी ।।१५७।। ज्ञानेश्वरीची पारायणे । अष्टोत्तरशत आचरणे । संत करतील तेची मानणे । हित आपुले ।।१५८।। पूर्ण केला पण । श्रीज्ञानदेवे दिले आशीर्वचन । आली वाचा गेले मौन । जो पाश होता काळाचा ।।१५९।। कळीकाळावरी सत्ता । गाजविती त्या साधुसंता । शरण जाता भवव्यथा । उरेल कैशी ।।१६०।। असेच एकदा आळंदीला । मामा असता काळाचा घाला । त्याने जीव जर्जर केला । सुरू झाले जुलाब ।।१६१।। एकामागोन एक । लाविती जीवासी धाक । म्हणती काळ मारितो हाक । चला आता ।।१६२।। श्रीज्ञानदेवांच्या समाधीला । साष्टांग प्रणिपात घातला । आणि बोलती बोलाला । अंतरीच्या ।।१६३।। आहे तुमच्या पायाशी । हा आधार मनाशी । जरी काळाची झाली सरशी । मी आहे स्वस्थ ।।१६४।। करावी भक्ती देवाची । ही आशा आहे मनाची । करणे वा न करणे ही तुमची । सत्ता आहे ।।१६५।। श्रीज्ञानेशाचे तीर्थ घेता । काळ पळाला क्षण न लागता । श्रीज्ञानदेव म्हणती आता । करी भक्ती सुखनैव ।।१६६।। परत येता दिगवड्यासी । आले पोचवाया मावशीसी । जी आली होती आळंदीसी । मामांच्यासह ।।१६७।। ती म्हणे गोविंदास । राहा आता आठ पंधरा दिवस । गुरुचरित्र ऐकावे ही आस । आहे मनामध्ये ।।१६८।। मामा म्हणती नाही सवड । तरी पुरवीन तुझ्या मनीचे कोड । हे नाही मज अवघड । उद्या वाचतो ।।१६९।। सूर्यादयापासून। केले सुरू वाचन । सायंकाळी संपवून । मग उठले ।।१७०।। उत्कट भव्य तेचि करावे । हे मामांच्या घेतले स्वभावे । फुकट मरावे । हे त्यांना बरे वाटेना ।।१७१।। संतकृपेने मिळाले जीवन । ते ईशसेवेसाठी वेचून । प्रसन्न केले संतसज्जन । ऐसे मामा ।।१७२।। हाक येता राष्ट्राची । ममता सोडली चहा कॉफीची । आणि परदेशी साखरेची । आनंद



त्यागाचा ।।१७३।। जे जे त्यागी आणि विरागी । मामांची निष्ठा सर्वांगी । महात्मा गांधी अंतरंगी । शिरले मामांच्या ।।१७४।। एकदा राष्ट्रीय सभेत । पक्षोपपक्ष झुंजले एकमेकात । उडाला गोंधळ आकांत । समुदाय आवरेना ।।१७५।। व्यासपीठावर टेबल । त्यावरी खुर्ची ठेऊन समतोल । त्यावरी बैसले महात्माजी तो कुतुहल । निर्माण झाले ।।१७६।। एक हात उभारून । पाचारिती संतसज्जन । म्हणती सुहास्य वदन । भाईयो और बहिनो ।।१७७।। कृश मूर्ती महात्माजींची । जोड नव्हती खड्या आवाजाची । तरीही लाट पसरली शांततेची । क्षणार्धात ।।१७८।। हे फळ त्यागाचे । हे फळ सेवेचे । हे फळ रामनामाचे । महात्माजींच्या ।।१७९।। मामा होते स्वयंसेवक । पाहताचि हे कौतुक । मनी म्हणती हेचि एक । राष्ट्रपिता शोभती ।।१८०।। ही गोष्ट अनेकदा । कीर्तनी श्रवण करिती श्रवण सदा । महात्माजींच्या शब्दावरी संपदा । लोळे त्यांच्या चरणावरी ।।१८१।। स्वतः जरी अकिंचन । अर्धनग्न फकीर पूर्ण । पाहोन अद्‌भूत महिमान । मामा थक्क झाले ।।१८२।। तोचि ठेवा त्यागाचा । तोच घोष रामनामाचा । तोच भाव भजनाचा । उचलला मामांनी ।।१८३।। मामा तुमचे तेजस्वी जीवन । यथार्थ वर्णू शकेल ऐसा विद्वान । सापडणे कठीण । हेही मी जाणतो ।।१८४।। मी जाणे माझे अज्ञान । वाग्विलासी मंदपण । कैसे सच्चरित्रांचे अवगाहन । होईल माझ्या हाते ।।१८५।। तरीही ओढ लेखनाची । ही धाव अजाण प्रेमाची । घुंगुरट्यास नभी चढण्याची । हाव जैसी ।।१८६।। म्हणुनी हे धारिष्ट्य करिता । धीर खचे अवचिता । परि स्वस्थ बसो जाता । मन घेई ओढ पुनः।।१८७।। मामा तुमचे चरित्र । जे स्वभावेचि अतिपवित्र । गंगा भागिरथीचे पात्र । जेथे स्नान उत्तम ।।१८८।। लवमात्र कृपा तुमची । मिळता येईल वेळ भाग्याची । अक्षरे अमृताची । होतील माझी ।।१८९।। होईल तैसे वर्णन ।

करीन मनापासून । मज सारिखे तुमचे अन्य । भक्तगण आनंदतील ।।१९०।। मामा, तुम्ही निघोन गेला । हे साहवेना मनाला । म्हणोनी या वाङ्मयमूर्तीला । सजीव करा ।।१९१।। आठवू तुमचे गुण । आठवू तुमचे आचरण । तुमचेच लागो ध्यान । तुमच्या भक्तांना ।।१९२।। घडो निर्मळ भक्ती । सच्चरित्री अतिप्रिती । ठाव मिळो तुमच्या चरणाप्रती । ही विनंती ।।१९३।।

इति श्रीगोविंदचरितमानस । जे स्वभावेची अति सुरस । जेथे अखंड उसळेल भक्तिरस । संसारस्थिती वर्णननाम तृतीय अध्याय ।।३।।

***



### अध्याय चौथा

## साधन सिद्धता

जय जय श्रीरामेश्वरा । केळकर कुलदीपका सोमेश्वरा । सांप्रदायाच्या ईश्वरा । साष्टांग नमन तव चरणी ।।१।। रेवणसिद्ध मरुळसिद्ध । समर्थ श्री काडसिद्ध । ज्यांच्या अनुग्रहे श्रीनारायणसिद्ध । गुरुलिंगजंगम झाले ।।२।। गुप्तपणे साधन करून । संपादिले आत्मज्ञान । पुरुषार्थाचाही पुरूषार्थ साधून । जगदोद्धार केला ।।३।। सांप्रदायाच्या सिंहासनी । श्रीनारायण दिसती शोभूनी । ध्वज डोले गगनी । परमार्थाचा ।।४।। पाया भक्कम भरला । इमारतीला डौल आला । आणि कारभार पसरला । दिगंतरी ।।५।। ते निंबरगी मूळपीठ । जेथून फुटले मार्ग नीट । सूत्रधार श्रीनारायण सुस्पष्ट । म्हणोनी वरिष्ठ सर्वासी ।।६।। थोर पुरूष आपणा ऐसे । निर्माण केले योग्य जसे । म्हणोनी भाग्य आपैसे । आले सामान्य जनांसी ।।७।। गुरुलिंग जंगमांचा साधनक्रम । नेहमी दिसे अनुपम । नित्यक्रमी विक्रम । साधिती सुखोपाये ।।८।। मेंढरे राखण्या दूर जावे । एकांत स्थळ शोधावे । स्वात्मानुभवी रमावे । हा त्यांचा दिनक्रम ।।९।। ऐशा साधनी स्वानंद भोगता । अद्‌भुत घडले ऐका आता । रघुनाथप्रियसाधु सहजता । आले सोनगी गावी ।।१०।। निंबरगीपासून न अति दूर । रघुनाथप्रिय करिती चमत्कार । तपोबल त्यांचे थोर । चकित होती जन बहू ।।११।। पुढील कार्य ओळखून । श्रीनारायणांनी आगमन । सोनगी गावास करून । रघुनाथप्रियासी भेटले ।।१२।। ''पुण्यमार्ग हा तुमचा । वाटतो जरी भाग्याचा । फेरा न चुकवील जन्ममरणाचा । आहे हे सर्व

मायिक''।।१३।। येता श्रेष्ठांचा सुशब्द कानी । दचकले रघुनाथप्रिय अंतःकरणी । अधिकार ओळखुनी । घातले लोटांगण पायावर ।।१४।। वरदहस्त मस्तकी आला । जीव सार्थकी लागला । श्रीनारायणांचाही झाला । भक्तिप्रसार सोपा ।।१५।। पापपुण्य ओलांडुनी । जाणे आहे निरंजनी । ऐसे रघुनाथप्रियासी सांगुनी । म्हणती त्यांना ।।१६।। ''जगदोद्धारासाठी । पडल्या तुमच्या आमच्या गाठी । आता हे कार्य उठाउठी । पडले तुमच्या शिरी ।।१७।। वैभव तुमचे वाढेल । थोर कीर्ती होईल । परमार्थही पसरेल । दशदिशा''।।१८।। ऐसे आशीर्वचन । मिळाले भाग्याचे पूर्ण । चिमड क्षेत्र दिले नेमून । भक्तिप्रसारासाठी ।।१९।। श्रीरामभाऊ महाराज यरगट्टीकर । श्री नारायणांचे दुसरे शिष्यवर । साक्षात्कारी द्विजवर । चिमडासी पाठविले ।।२०।। श्रीलक्ष्मीआक्का नामे एक । श्रीगुरुलिंगजंगमांची शिष्या अलौकिक । तपस्विनी अन्वर्थक । शोभे ज्यांना ।।२१।। त्याही आल्या चिमडाला । भक्ति प्रसार करण्याला । ऐसे महत्त्व या क्षेत्राला । अनन्य साधारण ।।२२।। श्रीरामभाऊमहाराजांचे पुत्रवर । श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर । अधिकार ज्यांचा थोर । परमार्थ कार्य चालविती ।।२३।। याची एक शाखा । सांगलीस आली ती ऐका । भर सांगलीच्या लौकिका । जेणे आला ।।२४।। हनुमंतराव कोटणीस । परमार्थाचा हव्यास । सांगलीच्या रसिकांस । गोडी परमार्थाची लाविली ।।२५।। साक्षात्कारी संत हनुमंत । ऐशी कीर्ती झाली दिगंत । तो मामाही विचारात । पडले एके दिवशी ।।२६।। जपजाप्य पुरश्चरणे । जरी केली जागरणे । तरी सद्गुरूवीण उणे । सर्व काही ।।२७।। मनी एक निश्चय केला । गेले तात्यांच्या घराला । डोई ठेविली चरणाला । तो तात्यांनी जाणले ।।२८।। तरी म्हणती अहो, बापूराव,। आज वेगळाच दिसे भाव । काय मनीची हाव । करा निवेदन निःसंकोच ।।२९।। मामा सद्गद होवोनी



म्हणति । आलो ऐकून तुमची कीर्ती । जीवास मिळेल परम शांती । तो मार्ग दाखवा ।।३०।। आलो धरून विश्वास । निश्चयाची बळकट कास । जीव लागे झुरणीस । आता अंतर न द्यावे ।।३१।। चरणी जीव जडला । आता अनुग्रह व्हावा आपुला । धरोनी या आशेला । आलो द्वारी ।।३२।। प्रेमळ सत्पात्र शिष्य पाहोनी । तात्या गहिवरले मनी । बोलले विचार करूनी । अमृत वचन ।।३३।। तुमचा विश्वास माझेवरी । हे मज समाधान अंतरी । मी जे सांगेन खरोखरी । ते सावधान ऐकावे ।।३४।। नाही तुम्हास म्हणू कैसे?। परी ईश्वरी योजना वेगळीच असे । मम बोलावरी विश्वासे । राहावेजी ।।३५।। तुमचे सद्गुरू पूर्वनियोजित । असती चिमड क्षेत्रात । श्रीनारायण संतश्रेष्ठ । थोर अधिकारी ।।३६।। विलंब आता न करावा । सत्कार्यास उशीर न व्हावा । मार्ग आपुला सुधारावा । विघ्ने येथे असती बहु ।।३७।। तुमची इच्छा होईल सफळ । मन करावे निर्मळ । विकल्पाचा कोलाहल । करू नये ।।३८।। ज्या पुढे अडचणी येतील । त्या येथे दूर होतील । ऐकता हे मधुर बोल । मामा संतोषले ।।३९।। शिरसावंद्य शब्द मानोन । आणि चरण वंदून । मामा गेले चिमडास निघोन । साधुरायापाशी ।।४०।। तापनाशी तीर्थात । श्रीसाधुरायाची समाधी शोभत । श्री गुरुलिंगजंगमांचे लक्ष जेथ । सदा असे ।।४१।। घातले साष्टांग दंडवत । जोडिले दोन्ही हात । मस्तक करोनी नत । राहिले उभे ।।४२।। तो आले श्रीनारायण । पुसती आदरे आपण ''कोण?''। का केले आगमन । शुभवर्तमान सांगा जी ।।४३।। पाहोनी घट्ट धरीले चरण । केले अश्रुंचे सिंचन । पुढे शुभ दर्शन । झाले आजी ।।४४।। कृतार्थ व्हावया जीवन । कैसे असावे आचरण । आपुला अनुग्रह व्हावा पूर्ण । हा मानस ।।४५।। शके अठराशे अठ्ठावीस । माघ वद्य द्वितीयेस । गुरूवार हा शुभ दिवस । श्रीनारायण प्रसन्न झाले ।।४६।। स्वतःअनुग्रह देऊन । शांत

केले मामांचे मन । साधन मार्ग विस्तारून सांगते झाले ।।४७।। संसार 'सोडू' म्हणून सुटेना । करावी लागे पोटाची विवंचना । परी तेथे मनाने गुंतावे ना । हे आपुल्या हाती असे ।।४८।। संसार न संपवी येरझार । म्हणोनी आसक्ति सोडावी सत्वर । अलिप्तपणे करी संसार । तोची धन्य ।।४९।। वृथा शरीर न दंडावे । न सुखसाधनी गुंतवावे । नेटके लावावे । ठेवूनी अनुसंधानी ।।५०।। वर्म जाणेल तोची संत । सुगम मार्ग असे जेथ । वाऊगे कष्टताप्राप्त । कष्टची होती ।।५१।। एकाग्र करोनिया मन । जे केले भजन पूजन । तेचि होय देवासी अर्पण । इतर कष्ट वाऊगे ।।५२।। मन परतेल संसारातून । तेव्हा ते करील ईशचिंतन । म्हणोन तोडावे बंधन । निश्चयाने ।।५३।। क्षणभंगुर सुखासाठी । त्यागाव्या शाश्वत सुख गोष्टी । ही तरी अविवेकी दृष्टि । करी अधःपात ।।५४।। निजसुखाची सोडोनी कास । जन उगाच होती उदास । जेथे सुख नाही तेथे खसखस । त्यांची उगाच चाले ।।५५।। तेथून व्हावया निवृत्ती । आजी निजसुखाची प्राप्ति । विवेक आणि विरक्ती । ही जोडी पाहिजे ।।५६।। विवेके करावी ईश्वरभक्ति । संसारा सोडावी विरक्ती । हीच परमार्थाची युक्ति । मार्ग सुखाचा ।।५७।। दृढभाव गुरूचरणांवरी । ठेवून वृत्ती अंतर्मुख करी । मोडी द्वैताची वाटच पुरी । साधनमार्गे ।।५८।। विचारोत्पत्ति विचारलय । हाचि भवसागराचा प्रलय । तो थांबता देवालय । हे शरीरची होईल ।।५९।। राम तोचि आत्माराम । साधक तोचि उद्यांचा सिद्ध परम । चिद् चिद् ग्रंथी भेदन उत्तम । साधी साधनमार्गे ।।६०।। मन धरी देहाभिमान । तो गळता ते मनच होय उन्मन । मंगलाचि मंगल खूण । साधनमार्गे ।।६१।। खंडसुख मायेचे । अखंड सुख आत्मारामाचे । दिवस येतील भाग्याचे । साधनमार्गे ।।६२।। ऐसा असावा भाव । सद्गुरुवचनावीण सर्व वाव । सत्पदी मिळवावा ठाव । साधनमार्गे ।।६३।। सहा जिंकोनी



निर्विकार व्हावे । सावध त्यासचि म्हणावे । अलक्षी लक्ष साधावे । साधनमार्गे ।।६४।। रामनाम छंद मनोमार्ग गती । संकल्प विकल्पी रामचि चित्ती । याची देहातचि प्रचिती । साधनमार्गे ।।६५।। इडा आणि पिंगला । सुषुम्नेत सरल्या । रामनाम लेणे ल्याल्या । साधनमार्गे ।।६६।। जैसा जैसा साधेल पवन । निश्चित करवील देवदर्शन । मग अष्टौप्रहर ईशचिंतन । आपोआप होईल ।।६७।। सावधानता आणि नित्यनेम । साधील साध्य परम । अंतरी सद्गुरूंचे प्रेम । मग काय उणे ।।६८।। होता देवाची भेटी । मग आत्मसुखाच्याच गोष्टी । मग वृथा संसार संकटी । कोण येतो ।।६९।। ऐकता ऐसे सद्गुरूवचन । मामा झाले सुखसंपन्न । विसरले देहाभिमान । एकसरे ।।७०।। आधीच मामांचे आचरण । निर्मळ आणि सद्गुणसंपन्न । वरी सद्गुरूंचे कृपादान । कळस सोन्याचा ।।७१।। कधी न इच्छिती मोठेपण । नम्रभाव अनन्यसाधारण । आपुली सत्कृत्ये लपवून । हरप्रयत्ने करुनी ।।७२।। कधी न कोणाचे मन दुखविती । अन्याय साहून मृदुवचन बोलती । त्रिविध तापांचे आघात सोशिती । मने कष्टी न होऊनी ।।७३।। साधा सरळ स्वभाव । गुरूपदी अनन्यभाव । शुद्धाचरण सदैव । सप्रेम उपासना ।।७४।। सदा मनावरी अंकुश । कार्य साधिती सावकाश । नित्यनेमाचा हव्यास । मनापासूनि ।।७५।। आसक्ति न देहाची । अथवा धन मान स्वजनांची । अनन्यभक्ति परमेश्वराची । वृत्ति रंगली अहर्निश ।।७६।। रात्र रात्र साधनी घालविती । श्रवण मनन अभ्यास चित्ती । परमार्थी निश्चल वृत्ती । सदोदित ।।७७।। सद्गुरू अधिकार संपन्न । आणि शिष्य साधनी निमग्न । संसार मानोनी गौण । सुखविती सद्गुरूंना ।।७८।। मामांनी धरले सद्गुरूचरण । जे स्वात्मसुखाचे परमनिधान । मिळता आशीर्वचन । आले समाधीपाशी ।।७९।। रघुनाथप्रिय गुरुवर । सदा जागृत सूत्रधार । वाढविती परिवार । संतजनांचा ।।८०।।

दीपे दीप उजळले । प्रांतो प्रांती गेले । अखंडरूपे झळकू लागले । भक्तजनास्तव ।।८१।। श्रीगुरुलिंगजंगमांची । कृपा जेथ सदाची । प्रभा साधुरायाची । उजळोनी दिसे ।।८२।। पंचप्राणपंचारती । मामा सद्‌गद हृदये ओवाळिती । आणि एकदाच होती । सुखसहित दुःखरहित ।।८३।। निरोप घेऊन सद्गुरूचा । मार्ग आक्रमिला स्वगृहाचा । येथून मामांच्या साधनक्रमाचा । मार्ग बदलला ।।८४।। साधन झाले संप्रदायानुकूल । वाचन पंचपदी भाव भक्ती सोज्वळ । श्रीराम उपासनोत्सव, पुण्यतिथी, सकळ । नित्य सुरू झाले ।।८५।। उग्र तपाचरण केले । तेथे सहज साधन आले । श्रीनारायणसांप्रदायाचे कळले । महत्त्व आगळे ।।८६।। संसारियासी परमार्थ । येथे कळे यथार्थ । साधावया खरा स्वार्थ । करावा संसार परमार्थानुकूल ।।८७।। संसार करावा परमार्थासाठी । केवळ शरीर रक्षणासाठी । नेटके करून ईश्वरगाठी । करण्या सुगम ।।८८।। जे आकंठ बुडाले संसारी । त्यांना श्रीनारायणपंथी सोय खरी । चिमड निंबाळ उमदी यापरी । नावे जरी दिसती विविध ।।८९।। श्रीगुरुलिंगजंगम श्रीनारायण कर्णधार । सर्वांचा जेथे विश्वास थोर । म्हणोनी दिगंतरी गजर । झाला प्रसार सांप्रदायाचा ।।९०।। मामा आले तात्यांच्या घरी । निवेदिली कथा सारी । तात्या म्हणती तुमच्या भाग्याची थोरी । काय आता वर्णावी ?।।९१।। श्रीरघुनाथप्रिय समाधी परिसर । चिमड हे पुण्यक्षेत्र थोर । तेथे जो जो रमेल नर । तो होईल नारायण ।।९२।। धरोनी तात्यांचे चरण । मामा बोलती सद्‌गद वचन । आपणची मार्ग दाखवून । केले मज कृतार्थ ।।९३।। मामा श्रीरामाचे सेवक । श्रीराम मनी धरती एक । तेणे श्रीहनुमंत त्यांचा रक्षक । सदा पाठीशी ।।९४।। श्रीराम शिरला हृदयात । सखा झाला श्रीहनुमंत । मग काय उणे तेथ । सदा पूर्ण ।।९५।। तात्या तरी अति प्रेमळ । श्रद्धावंतासाठी अति सरळ । मार्ग दाखवून सोज्वळ ।



भाग्यविधाते शोभती ।।९६।। मामांची साधन सरिता । अखंड वाहू लागली आता । दिन प्रतिदिन सुगमता उमगू लागली ।।९७।। हा साधनमार्ग नव्हे आजचा । तो चालत आला युगायुगांचा । शुक सनकादिकांचा । हाच मार्ग ।।९८।। सुख जेथ सुखासी आले । म्हणोनी आनंदाश्रम नाम शोभले । मामांनी अखंड साधन सुरू केले । या आश्रमी ।।९९।। कधी न दार बंद यांचे । दर्शन साधनी रत मामांचे । जे जे घेती त्यांच्या मनांचे । विकल्प मावळती ।।१००।। ऐसा महिमा आनंदाश्रमाचा । सोहळा मामांच्या आत्मसुखाचा । रात्र रात्र चाले तरी हव्यास मनाचा । पुरा न होई ।।१०१।। या दिव्य सुखाच्या साधनी । मामा जीवभाव टाकिती ओवाळूनी । शांत प्रसन्न दिसती मौनी । जसे मुनी पूर्वीचे ।।१०२।। शिक्षकाचा पेशा सोडला । तो जेव्हा साधनाच्या आड आला । द्रव्यार्जनाचा मार्ग सोडला । आत्मसुखासाठी ।।१०३।। एक नाम मनी धरिले । परम प्रितीने कवटाळिले। तेणे संसारासी दिले । तिलोदक ।।१०४।। एक साधन उत्तम मानून । झिजविले देहाचे चंदन । सुगंध राहिला दरवळून । दशदिशा ।।१०५।। संसार आणि धन । यांचे सदाचे लग्न । ते प्रारब्धावरी सोपवून । केले मोठे धाडस ।।१०६।। अखंड जोड साधनाची । लाज सोडिली जनांची । होळी केली संसाराची । यापरिस वैराग्य कोणते? ।।१०७।। जवळी असोन कांता । जो तीस शिवे संततीपुरता । या निष्कामतेची अपूर्वता । आगळीच असे ।।१०८।। कोसळले संकटांचे गिरीवर । तरी यांचा न सुटे धीर । सागरासम गंभीर । हे शांतपण अवर्णनीय ।।१०९।। लोकनिंदेचे तीव्र वारे । सुटता यांचे चित्त न थरारे । उलट निंदकांचेच चिंतीती बरे । ऐसे संतपण मामांचे ।।११०।। कठोर नेमधर्माचे पाश । आवळोनी अति कर्कश । मामा राहिले स्थिर पुरूष । हे श्रेष्ठपण असाधारण ।।१११।। आपुल्या सामर्थ्यबळे । निमटिले कामक्रोधांचे गळे । म्हणोनी त्यांच्या शौर्याचे

सोहळे । चकित करिती ।।११२।। तन मन आणि धन । वेचून झाले सेवापरायण । जीवन केले श्रीरामार्पण । हा त्याग अवर्णनीय ।।११३।। तिळमात्र न अभिमान । नामी रंगले ज्यांचे मन । विसरले देहाभिमान । हे विदेहपण अलौकिक ।।११४।। घरी येता संतसज्जन । ज्यांचे हृदय ये उचंबळोन । करिती प्रेमभावे पूजन । ही सेवा अनुपम ।।११५।। शुद्ध ठेवून आचरण । अखंड ठेविले अनुसंधान । तीच त्यांची शिकवण । हे दिव्यत्त्व अमोघ ।।११६।। अखंड वाचन सद्ग्रंथांचे । धडे गिरविले सद्विचारांचे । जे जे अनुकरणीय । त्याचे आचरण झाले ।।११७।। वृथा न बहर भावनांचा । कधी न दुराग्रह स्वमताचा । निकटवर्तीयास ताप यांचा । कणमात्र नसे ।।११८।। अतिनेमक बोलणे । सूत्रमय उत्तर देणे । प्रतिपक्षांचे साहणे । कठोर वचना ।।११९।। उलट त्याचाच करून गौरव । वादावादास न देती वाव । लीनपणाचा स्वभाव । कदा न सोडती ।।१२०।। दाटून उपदेश न करणे । योग्य ते पुनःपुनः वदणे । भक्तिमार्गावरी आणणे । हर एकासी ।।१२१।। शंका त्यांच्या दूर कराव्या । परमार्थीवृत्ती भराव्या । सद्वर्तनी आणाव्या । चित्तवृत्ती ।।१२२।। जो स्वतः सन्मार्गी लागला । त्याने त्याच मार्गे न्यावे दुसऱ्याला । जो भक्तिभावे येईल त्याला । समजावोनी ।।१२३।। म्हणोनी कीर्तन आरंभिले । ते उत्साहे तडीस नेले । निरूत्साहाचे प्रसंग आले । तरी अखंड कीर्तन ।।१२४।। अत्यंत निरपेक्ष बुद्धि । दूर सारी करी उपाधी । करी साधन समृद्धी । सुखोपाये ।।१२५।। सदा विवेक जागृत । घेती लोकमत विचारात । परि मनीचा निर्णय निश्चित । उत्स्फूर्त असे ।।१२६।। जे जे संत अवतरले । प्रकृतीपरत्वे वेगळे भासले । परी ज्याने अंतर ओळखले । तोचि धन्य ।।१२७।। तात्या आणि मामा । गाती ईश्वर महिमा । परि एकाची एकास उपमा । न साहे ।।१२८।। दोघे करिती कीर्तन । परी त्यांचे स्वरूप भिन्न । भक्तिभावे अनन्य । तरीही



वेगळे ।।१२९।। कीर्तन एक परी रंग वेगळा । भक्तिभाव एक परी खाक्या निराळा । निष्ठा नियमितपणा एक परी आगळा । वाण याचा नि त्याचा ।।१३०।। परिस्थितीचा किंकर । असे प्रत्येक नर । म्हणोनि फरक फार । कालपरत्वे ।।१३१।। तात्यांचे साथीदार । सुदैवे होते अपार । त्यांचे पाठांतर फार । आणि समय स्फूर्ती ।।१३२।। रंजवून मन श्रोत्यांचे । तात्या काम करिती अध्यात्म प्रसाराचे । तेच अंतरी जिरविण्याचे । काम होते मामांना ।।१३३।। तेथे करमणुकीस नव्हता वाव । साथीदारांचाही अभाव । सुबुद्ध साक्षेपी श्रोते सदैव । ठाव शोधिती कीर्तनाचा ।।१३४।। अखंड नामस्मरण । हेचि उत्तम कीर्तन । म्हणोनी तेच अधिक करून । मामा करवून घेती ।।१३५।। मामा आणि तात्या । एकमेकांना पूरक उभयता । निवड मामांची करिती तात्या । पूर्ण विचारे ।।१३६।। येणेपरी मामांनी । श्रवण केले अर्थांतर साधुनी । ते भिनविले साधन करुनी । सद्गुरू प्रसादे ।।१३७।। सारग्राही मामांचे वचन । तपशिलासह तात्यांचे प्रवचन । करविणे विवरणे हे दोन । मार्ग होते दोघांचे ।।१३८।। हाती घेऊन कीर्तनमाला । दोघे आले शारदा मंदिराला । दोघांनी कंठी हार घातला । परी शोभती वेगळेपणे ।।१३९।। देहधर्म आपआपुले । नियोजित कार्य आपआपले । शोधून मार्ग पाहिजे सुधारले । केवळ अनुकरण ते नाटक ।।१४०।। म्हणोनी वैराग्य आणि विवेक । दोन पंथ धरी साधक । ते बळकट तितका तो तडक । पोचे पैलतीराला ।।१४१।। उपाधी लागती शरीराला । त्यांचा बेताल पडे घाला । परी त्यांची झळ अंतराला । न लागू देती संत ।।१४२।। यापरी जीवन । संसारी असोन भिन्न । जैसे वर्णिती संतजन । तैसे आखिले रेखीव ।।१४३।। "काही करणे ?" नव्हे! काही होणे । हा साधन प्रभाव दाखविणे । सामान्यासारिखे राहणे । तरी

असामान्य ।।१४४।। निर्भय समाधानी वृत्ती । नेत्र बाह्यसृष्टी न देखती । सदा रमले चित्ती । श्रीरामचरणी ।।१४५।। जरी अंतरी विषयांची खळबळ । ती चेहऱ्यावरी उमटे तत्काळ । परी येथे चेहरा शांत निर्मळ । प्रसन्न दिसे मामांचा ।।१४६।। जो संसारतापे तापला । तो डोई ठेवी चरणाला । पाहोनी मुखकमळाला । क्षणैक होई सुप्रसन्न ।।१४७।। विसरोनी संसार । जरी एक क्षणभर । तो म्हणे हेचि देवद्वार । वारंवार सापडावे ।।१४८।। तोचि आचार घडावा । तोचि सुविचार सुचावा । तोचि निश्चय व्हावा । जो मामांचा ।।१४९।। माघ महिना मामांचा । श्रीसमर्थांचे स्मरण करण्याचा । दासबोध वाचनाचा । नेम होता ।।१५०।। एकदा रात्री वाचत बैसले । तो सापाचे पोर हाताशी बिलगले । आणि तेथेचि स्थिरावले । का देव जाणे? ।।१५१।। स्पर्श लागता गार । मामा राहिले खबरदार । निश्चल राखोनी शरीर । अर्पिले श्रीसमर्थचरणी ।।१५२।। सुरू ठेविले दासबोध वाचन । साप गेला काही वेळाने निघोन । ही वृत्ती असामान्य । सूचक आणि उद्‌बोधक ।।१५३।। तैसेच एकदा विंचवाने । दंश केला अति त्वेषाने । एकाग्र नामस्मरणाने । मामांनी विंचू उतरविला ।।१५४।। एकदा एका कोनाड्यात । एक होती वस्तु सुरक्षित । गांधिलमाशांचे पोळे लोंबत । राहिले काही काळाने ।।१५५।। मामा निवांतपणे गेले । आपली वस्तु घेऊन आले । गांधिलमाशांचे मन न झाले । डंख करावया सिद्ध मामांना ।।१५६।। मामांच्या कीर्तनाची निर्भत्सना । लोक करिती नाना । न शिवे तो मळ मामांच्या मना । यत्किंचित ।।१५७।। ही समूळ बदललेली वृत्ती । किती एक प्रसंग दाखविती । विचक्षण निरिक्षक चित्ती । म्हणती हे संतपण ।।१५८।। रेखिले जीवन ऐसे । जेथे विषयवृत्तीस वावच नसे । सदा परमार्थाचे पिसे ।। अष्टौप्रहर ।।१५९।। जावे हनुमत् समाधी दर्शना । चित्त लावावे वाचना मनना । अथवा



अनुसंधाना । निरंतर ।।१६०।। वाचावे रामायण भागवत । अध्यात्म चर्चावे साद्यंत । किंवा रमावे कीर्तनात । हा छंद मामांचा ।।१६१।। कधी न करिती गप्पा गोष्टी । वाऊग्या चर्चा करमणुकीसाठी । कधी न खेळाची आवड मोठी । सदा रत नामस्मरणी ।।१६२।। घ्याव्या संतांच्या भेटी । सांगाव्या त्यांच्याच गोष्टी । यातच मामांना आवड मोठी । जी कधी न विटे ।।१६३।। सद्‌ग्रंथांचा हव्यास । वाचनाचा भारी सोस । हंस क्षीर न्याय विशेष । त्यात दिसे ।।१६४।। वाचणे ते स्वतःसाठी । उच्चार आचार शुद्धतेसाठी । हीच मनास शिकवण मोठी । शोधज्योत तत्त्वी पडे ।।१६५।। सामान्यासारिखे दिसावे । परी असामान्य असावे । कैसे यासाठी शोधावे । मामांचे चरित्र ।।१६६।। लक्षावधी सामान्यजन । म्हणतील हे स्फूर्तीस्थान । करू लागतील भगवद्‌भजन । ऐसे चरित्र मामांचे ।।१६७।। प्रहरो प्रहर साधन करिती । दुसऱ्याकरवी करविती । शंका अडचणी निवारिती । मुमुक्षूंच्या ।।१६८।। घर ही करून पाठशाळा । शिकविती अध्यात्माला । घर हीच प्रयोगशाळा । साधकांची ।।१६९।। कष्टविती देहासी । निरिच्छवृत्ती अहर्निशी । समवृत्ती लहानथोरांशी । सदोदित ।।१७०।। ऐसा साधनक्रम मामांचा । अखंड वर्षानुवर्षांचा । नव्हे तपानुतपाचा । अव्याहत अचूक ।।१७१।।

इति श्रीगोविंदचरित्मानस । जे स्वभावेचि अति सुरस । जेथे अखंड उसळेल भक्तिरस । साधनसिद्धता नाम । चतुर्थोध्यायः ।।४।।

***

अध्याय पाचवा

## कीर्तन बहिरंग परीक्षण

यम नियमांच्या उभारोनी भिंती । ज्यांनी मायेसी ठेविली परती । त्या सद्गुरूंचे चरण चित्ती । मी सद्भावे नमितो ।।१।। अविरत साधोनी साधना । ज्यांनी ईश्वर आणिला सदना । त्या सद्गुरूंच्या चरणवंदना । आजि करू सद्भावे ।।२।। मामांनी घराची दुरुस्ती केली । श्रीराम मंदिराची उभारणी झाली । संसारग्रस्तांना निश्चितीची साऊली । मिळू लागली ।।३।। त्रयोदशाक्षरी मंत्राचे संपूर्ण । साडेतीन कोटींचे पुरश्चरण । झाले तो दिन । सुवर्णाक्षरी लिहिण्याजोगा ।।४।। श्रीराममंदिरी प्रभूंचे । वास्तव्य झाले कायमचे । हे जाणोन मारुतीरायांचे । मन झाले सुप्रसन्न ।।५।। तो इतिहास मौजेचा । ठाव घेईल अंतःकरणाचा । विषय सर्वांच्या कौतुकाचा । झाला मनोरम ।।६।। श्रीसमर्थांच्या वेणाबाईंचा । मठ आहे मिरजेत पुरातनाचा । तेथे समर्थांच्या हातचा । मारुती असे कोरलेला ।।७।। जो वेणाबाईंच्या रक्षणाला । श्रीसमर्थांनी प्रेमे दिला । तो देवची म्हणे आता चला । मामांच्या घरी ।।८।। म्हणोनि मठाधिपतींना । मिळाली अंतस्थ सूचना । की हा मारुती द्या मामांना । सांगलीस नेऊनी ।।९।। ही प्रसादमूर्ती घेऊनी । मठाधिपती सांगलीस येऊनी । मामांच्या स्वाधीन मूर्ती करूनी । आनंदी आनंद केला ।।१०।। मामांच्या पुरश्चरणाचे । लौकिक फळ हे भाग्याचे । प्रसादचिन्ह साक्षात्काराचे । वाटले विचारवंतांना ।।११।। आत्मज्ञानाचा सुखविलास । मुखाविण चवी ज्यास । ती कशी कळे इतरास । म्हणोन ही योजना विधात्याची ।।१२।।



श्री दासबोधाचे निष्ठावंत वाचक । मामा, वर्षे कित्येक । म्हणोन हा प्रसाद वेचक । श्रीसमर्थ देती ।।१३।। जेथे राम तेथे हनुमान । ऐसे हे प्रसिद्ध वचन । येथे हे परिपूर्ण । उमगून आले ।।१४।। जेथे मानवी बुद्धि न चाले । तेथे ईश्वराचे राज्य कळे । विवेकी जन भले । ओळखती त्या खुणा ।।१५।। श्री शंकर श्रीकृष्ण देव । जे श्रीसमर्थभक्त आजीव । करण्यास श्री मूर्तींचा गौरव । आले मामांचे घरी ।।१६।। संत श्री हनुमंत । श्रीरामाचे परम भक्त । आले कृपाप्रसादार्थ । मामांच्या घरी ।।१७।। तो ही इतिहास मौजेचा । सांगेन अति आनंदाचा । समारंभ थाटाचा । झाला त्या दिवशी ।।१८।। नाना आणि मामा । गेले तात्यांच्या पुण्यधामा । विनविती पुरुषोत्तमा । यावे भोजना म्हणोनी ।।१९।। भाविकांचा भाव देखोन । तात्या सदैव देती अनुमोदन । देती संमती आनंदून । मामांना ।।२०।। संत येती घरा । हा आनंद पिता-पुत्रा । म्हणती आता तयारी करा । उणे नको काही आता ।।२१।। मामीही मनी आनंदली । बारीक लक्ष घालू लागली । दही विरजू घाली । श्रीहनुमंतस्मरणे ।।२२।। तो त्यास अमृताची चव आली । ती तात्यांनी अनुभविली । मधुरवाणी बोलू लागली । तात्यांची ।।२३।। आहे काय मथुरेच्या गवळणी । आणिती येथे दही लोणी । ज्या रंगल्या कृष्ण स्मरणी । म्हणोनी रस मधुर ।।२४।। अहो अंताजीपंतनाना । असे दही घरी आणाना । मंडळी डोलवितील माना । सुखस्वादे ।।२५।। भक्तीचा वाहे वारा । तेथे स्रवती अमृत धारा । मामीच्या संसारा । आले हे महद्भाग्य ।।२६।। मंडळी बसली भोजनाला । मुखी ग्रास जाता ब्रह्मरस झाला । सुगंध दरवळला । सभोवार ।।२७।। मामा उभे जोडोनी हात । स्वस्थ असा ऐसे विनवित । श्रीहनुमंताते अर्पित । भावांजली ।।२८।। योग सर्वदा असावा । तव सेवेत देह पडावा । आशीर्वाद असावा सदा । भक्तावरी ।।२९।। ऐसे मामा विनविती । हात जोडोनी

पुढत पुढती । अंगी रोमांच प्रेम चित्ती । नयनी नीर ।।३०।। श्रीहनुमंतांची प्रसादगिरा । वर्षली जैसी अमृतधारा । जी चित्तात घेई थारा । भक्तजनांच्या ।।३१।। कडकडोनी वीज पडो । की धरणी जलामाजी बुडो । देह वणव्यामाजी पडो । परी नाम न सोडी ।।३२।। ऐसा भाव जडेल जेव्हा । क्षण न लागता तेव्हा । कृपाशीर्वाद हा हा म्हणता होई ।।३३।। ऐसा संवाद गुरूभक्तांचा । मध्ये स्वाद षड्रस अन्नांचा । सुखविलास भोजनाचा । मुखी आणि कर्णी ।।३४।। तृप्त झाली मंडळी । सण दसरा आणि दिवाळी । मन दे आता टाळी । आनंदाची ।।३५।। वेळ गेला किती ते कळेना । संत भेटीची इच्छा पुरेना । तात्या म्हणती नाना । ''आता येतो''।।३६।। तव भक्तमंडळी चरण धरिती । तात्या कृपाशीर्वाद देती । या अपूर्व प्रेमाची स्थिती । कोण वर्णू शकेल ।।३७।। क्षण एक पर्यंत । तात्या झाले संचित । मनी योजून पुढला बेत । म्हणती अहो बापूराव ।।३८।। वेळ सायंकाळी पाचची । तुम्हा असे सोईची । फलश्रुती या वचनाची । उमगली पुढे ।।३९।। तात्या म्हणती मनात । आणखी येणे आहे येथ । एवढेच पुरे तूर्त । म्हणोनि गप्प राहिले ।।४०।। तात्या घरी गेले । उमटली त्यांची पाऊले । त्यांनी मनोरथ पूर्ण केले । मामांचे ।।४१।। तात्या विचारिती मनात । आला आता देहाचा अंत । परी आपले भक्त असंख्यात । अंतरतील कीर्तना ।।४२।। हरिकीर्तनाचा गजर । हेचि सांगलीचे वैभव थोर । ते रहावे हा विचार । त्यांनी केला ।।४३।। देह यातनांनी गांजला । सर्वस्वी पराधीन झाला । खूण गाठ मनाला । तात्यांनी बांधली ।।४४।। शके अठराशे पंचेचाळीस । पौष वद्य षष्ठीस । रविवार हा दिवस । तात्या अमर झाले ।।४५।। संत देह सोडोनी जाती । तरीही भक्तांचे हित पाहती । म्हणोन ते आम्हास वाटती । प्रिय सर्वस्वेसी ।।४६।। पुनः आली माघ वद्य तृतीया । आठवण आली हनुमंत



राया । म्हणती चला जाऊया । बापूरावजींकडे ।।४७।। वेळ रात्रीच्या बाराची । मामांच्या दासबोध वाचनाची । संयमी जनांच्या जागरणाची । निजसुखासाठी ।।४८।। अध्यात्माची चर्चा । श्रीसमर्थांची रंगली वाचा । निर्गुण ब्रह्म शब्दाचा । विषय झाला समर्थांच्या ।।४९।। नेति नेति वेद म्हणती । तरिही वर्णनाची शिकसत करिती । संत तरी विडा उचलती । निर्गुण वर्णनाचा ।।५०।। कळता कळता कळेनासे । न कळता कळलेसे । अंधारामागून प्रकाश दिसे । ग्रंथराज दासबोधी ।।५१।। अवर्णनीयाचे वर्णन । हेचि संतांचे अद्भुत महिमान । मामा गेले वेडावून । ब्रह्मवर्णनी ।।५२।। अध्यात्म आले रंगात । ब्रह्म आले मायातीत । तो संत श्री हनुमंत । साक्षात प्रगटले*।।५३।। भास असेल काही तरी । म्हणोन मन घातले ग्रंथांतरी । तो पानांपानांवरी । श्री हनुमंत दिसो लागले ।।५४।। मग मन हडबडले । प्रसन्न वदन पुनः देखिले । उठोन उभे राहिले । शाल घातली बैसावया ।।५५।। घ्यावे जी आसन । बोलिले चरण वंदून । तव ते प्रसन्न वदन । काय खुणावती ।।५६।। खंड नको वाचना । आम्हीही करू

टीप :– रा. गोविंद अनंत केळकर या नावाचे हणमंतरावजींचे एक प्रेमळ शिष्य सांगली येथे राहतात. एका रात्री ते दासबोध वाचत बसले असता, आपल्यापुढे हणमंतरावजी एकदम प्रगट झाल्याचा त्यांना भास झाला. त्यांना आसन देण्याकरिता केळकर यांनी इकडे तिकडे नजर टाकली, तो खुंटीवर शालजोडी असलेली त्यांना दिसली. तीच त्यांनी हणमंतरावजींना बसावयास दिली. हणमंतरावजी त्या आसनावर बसले आणि केळकर पोथी वाचू लागले. वाचन पुरे झाल्यावर केळकरांनी हणमंतरावजींच्या पायावर मस्तक ठेवताच हणमंतरावजींनी केळकरांच्या डोक्यावर दोन्ही हात ठेवले. केळकर उठून उभे राहिले. हणमंतरावजींनी त्यांना कीर्तन करण्याची अनुज्ञा दिली व ते तात्काळ अदृश्य झाले.

कै. हणमंतरावजी कोटणीस यांचे चरित्र - लेखक श्रीसाधुदास, प्रकाशक श्री. र. ह. कोटणीस इ.स. १९३७ पृष्ठ ३४५ ते ३४६.

श्रवणा । मान देऊन वचना । मामा वाचती ।।५७।। संपले दासबोध वाचन । तो मामा बोलती कर जोडून । आनंद झाला दिले दर्शन । भाग्य माझे उदेले ।।५८।। माघ वद्य प्रतिपदेपासून । दासनवमीपर्यंत संपूर्ण । वाचावा दासबोध हे मनी धरून । आजपर्यंत वागलो ।।५९।। कीर्तनसेवा ही करावीशी वाटले । म्हणून कीर्तन सुरू केले । आज तीन दिवस झाले । प्रतिपदेपासून ।।६०।। तेच अखंड चालावे । अनुदिन नामसंकीर्तन व्हावे । हे मनी घेतले स्वभावे । तो आज झाले शुभ दर्शन ।।६१।। वाटे शकुन हा भाग्याचा । दिवस अत्यानंदाचा । निश्चय मनाचा । आज होई ।।६२।। जरी आज्ञा होईल आपुली । कराल कृपेची साऊली । तरीच जी इच्छा मनी धरली । ती पूर्ण होईल ।।६३।। तव ते संत दयावंत । खुणेने अनुमती देत। तो मामा झाले निवांत । चरण धरीले ।।६४।। वरदहस्त आला शिरावरी । आनंद उसळे हृदयांतरी । स्वेद रोमांच शरीरी । मामा झाले सुखसंपन्न ।।६५।। मज कळले कर्णोपकर्णी । की तात्या गेले पूर्वीच बोलुनी । चालवितील कीर्तन तरंगिणी । श्रीबापुराव ।।६६।। शके अठराशे पंचेचाळीस । माघ वद्य प्रतिपदेस । केली सुरूवात कीर्तनास । तेच पुढे चालले ।।६७।। कीर्तनसेवा भारतात । प्राचीनकाळापासून विख्यात । श्रीनारदांची गादी चालत । आली कलियुगी ।।६८।। मधुर वाद्यांचा झंकार । भक्तीगीतांचा मधुर स्वर । मध्ये अध्यात्मचर्चेचा विस्तार । पदोपदी ।।६९।। ज्यांना भगवंताची आवडी । त्यांची तेथेच पडेल उडी । आनंद सरिता दुथडी । भरोन वाहे ।।७०।। ताल उत्तम सूर उत्तम । संगीताची साथ मनोरम । हरिदासाचे वाक्पटुत्त्व अनुपम । सखोल ज्ञान तैसेचि ।।७१।। वरी गोड भक्तिरसाची । आवडी सुरस वर्णनाची । आणि जोड काव्यगुणांची । अधिकस्याधिकं फलम् ।।७२।। ऐशी कीर्तन संस्था



भली । नावारुपास आली । लोकप्रियता पावली । अतोनात ।।७३।। तो आली अवकळा । कीर्तनाचा झाला रंग निराळा । इतर जन झाले गोळा । झाली कीर्तनाची नासाडी ।।७४।। ज्याने त्याने उठावे । कीर्तन संस्थेस राबवावे । समाजकार्य राष्ट्रकार्य साधावे । इच्छा परत्वे ।।७५।। हा पोटाचाही झाला व्यवसाय । लोक शोधिती नाना उपाय । लोकरंजन हे कार्य । त्यांनी आरंभिले ।।७६।। कीर्तनसंस्थेस पूर्वपदी । नेऊन जमवावी संत मांदी । अध्यात्माच्या सुखसंवादी । आणावे भाविकासी ।।७७।। म्हणोनी तात्यांनी अट्टाहास केला । कीर्तनास त्यागाचा रंग दिला । परमार्थाच्या कूट प्रश्नास आला । बहर पुनः ।।७८।। तेथे चाले भक्ती गुणगान । जेथे देव नाचे आनंदून । जे कीर्तन मोक्ष साधन । जडजीवासी ।।७९।। जे कीर्तन साधुसंत । करीत आले आजवर सतत । श्रीनामदेव तुकाराम एकनाथ अविरत । झटले ज्यासाठी ।।८०।। अशा कीर्तनास वैभवाचे स्थान । देऊन श्रीनारद केले प्रसन्न । म्हणोन तात्यांचे गुणगान । सांगलीत होतसे ।।८१।। ते कीर्तन खरे कीर्तन । जे माया मोहाचे तोडी बंधन । तेथे हा रुक्मिणीपांडुरंग नंदन । उभा रंगणी नाचाया ।।८२।। तात्यांनी कीर्तनपरंपरा । चालविली या नगरा । केला परमार्थाचा पसारा । अपरंपार ।।८३।। अगाध विद्वत्ता । कुशल वाक्पटुता । अध्यात्मावरी सत्ता । अढळ तात्यांची ।।८४।। प्रांतोप्रांतीचे संतजन । त्यांनी केले जे जे कवन । ते तात्यांनी मुखोद्गत करून । उदार हस्ते प्रसारिले ।।८५।। झाला सर्वतोमुखी वेदान्त । परग्रामस्थ आश्चर्यचकित । ऐशी समृद्धि तात्यांनी येथ । सांगलीत केली ।।८६।। उत्तम बीज जमा केले । उत्तम शेत नांगरले । अविश्रांत मेहनतीने पेरले । अफाट क्षेत्र ।।८७।। आपुल्यापुरता परमार्थ । करून सुखे झाले असते कृतार्थ । परंतु साधावया परमार्थ । कण

कण आयुष्य वेचले ।।८८।। तव देहाचा आसरा सुटला । तात्यांचा आत्मा जगदांतरी राहिला । त्यांनी पुनः सोस धरिला । भक्तजनांच्या हिताचा ।।८९।। जेथवरी कार्य झाले । ते त्यापुढे पाहिजे चालविले । म्हणोन मामांच्या कीर्तनाचे झाले । वेगळेच रूप ।।९०।। बालबालिकांचे शिक्षण । तेथवरी भरपूर मनरंजन । प्रतिदिन नित्य नवीन साधन करमणुकीचे ।।९१।। पुढे येता जाणपण । सायास करणे लागे कठीण । सारपूर्ण तत्त्वशोधन । करणे लागे ।।९२।। वधुवर उतरता बोहल्यावरून । मिरविती चौघडे वाजवून । संसाराची आंच लागता दारूण । जीव होय कासावीस ।।९३।। कार्यारंभी नाटक । नाच गाणे आकर्षक । पुढे व्याप वाढता । धकधका हृदय होय ।।९४।। आदि मध्य आणि अंती । कार्याची एकची नसे गति । जैसे महत्त्व तैशी मति । वळली पाहिजे ।।९५।। काय आहे ते समजले । काय पाहिजे ते कळले । पुढे करणे तेचि पाहिजे केले । आणि तेच अवघड ।।९६।। अधःपात झाला कैसा । जीव सोडवावा कैसा । त्याचा मार्ग नीटसा । समजोन आला ।।९७।। आता आहे मार्ग क्रमणे । नकाशा बरहुकूम चालणे । सोडोनी वाऊगी आकर्षणे । नित्यनेम साधण्या ।।९८।। यासाठी आणोनी मना । करून पूर्ण योजना । तात्यांनी निवडिले मामांना । या कार्यासाठी ।।९९।। सांडोनी व्याप सगळा । जो गळा घालील नाममाळा । ऐसा पुरूष केला गोळा । तात्यांनी ।।१००।। सांडोनी लौकिकाची आस । जो धरील नामाची कास । सिद्धपणी साधकत्वाचा अट्टाहास । करील जो ।।१०१।। वृथा तीर्थक्षेत्री भटकणे । हे ज्यास वाटेल कंटाळवाणे । देह काशीत आत्मलिंग पहाणे । शिकवील जो ।।१०२।। वृथा न करोनि वाचेचा गोंधळ । मतामतांची वृथा भेसळ । नामस्मरणी निर्मळ । राहील जो ।।१०३।। कोणी येवो अथवा जावो ।



ज्याचा न ढळे सद्‌भावो । अखंड साधनाचा उपावो । शोधील जो ।।१०४।। निष्ठावंत साधकांचे । संदेह निवारिल मनीचे । समाधान त्यांच्या जीवाचे । करील जो ।।१०५।। ऐसा पुरूषोत्तम निवडणे । त्यासी सर्वभावे जपणे । आपुल्या भक्तांचे करणे । अक्षय हित ।।१०६।। ऐसे प्रेमळ दयावंत । ऐश्वर्यवंत गुणवंत । प्रतापवंत हनुमंत । संत तात्या ।।१०७।। छत्रपती श्रीगुरुलिंगजंगम । सूत्रचालक अनुपम । म्हणोन एकामागोन एक उत्तम । संत पाठविती ।।१०८।। कार्यपरत्वे संत । एकत्वी अनेक भासत । चरित्र त्यांचे चकित । करी सामान्य जना ।।१०९।। असो, मामांचे कीर्तन । तात्यांच्या कीर्तनाहून भिन्न । का त्यांचे विवरण । एथवरी झाले ।।११०।। आता मामांचे कीर्तन । आणि त्याचे वेगळेपण । हे स्पष्ट करून । दाखविणे असे ।।१११।। तबला, पेटी आणि वीणा । तालसूर आणि ताना । साथीदार मंडळी नाना । ही उपाधी कीर्तनाची ।।११२।। वक्तृत्त्व आणि समयसूचकता । पाठांतर आणि विद्वत्ता । मधुर भाषण विनोद प्रचुरता । ही रंजकता वक्त्याची ।।११३।। रस आणि अलंकार । सुरस गोष्टी आख्याने सुंदर । हावभाव कोट्या प्रचुर । ही आकर्षणे श्रोत्यांची ।।११४।। रसाळ वक्ता रसिक श्रोता । मिळता आनंद भरे क्षण न लागता । रंग जमे हा हा म्हणता । हा योगचि अपूर्व ।।११५।। असामान्य गुणांचे वेड। क्षणभरी काळ करी गोड । परी त्या गुणांची जोड । सामान्यास मिळेना ।।११६।। गुणसंपन्न वक्ता । क्षणभरी मोह पाडी चित्ता । तेणे होय गुणसंपन्न श्रोता । हे तो घडेना ।।११७।। ज्या गुणांची जोड मिळता । श्रोत्यांची होय सार्थकता । त्यास मिळेल वक्त्याची योग्यता । हा मार्ग उत्तम ।।११८।।पराकाष्ठा करून साधनाची । ज्यांनी जोड केली देवाची । मनरंजनाच्या क्षुद्र सिद्धींची । नव्हतीच मातब्बरी त्यांना ।।११९।। इच्छा

तसे प्रयत्न । प्रयत्न तैसे साध्यसाधन । साध्य साधता निर्विघ्न । मार्ग वाटे ।।१२०।। इच्छा तेथे मार्ग सुलभ । मामांनाही झाला असता लाभ । प्रयत्नाअंती काय दुर्लभ । या जगामध्ये ।।१२१।। क्षणभर करमणुकीसाठी। पडाव्या बहुजनांच्या गाठी । या कधीच नव्हत्या गोष्टी । मनामध्ये मामांच्या ।।१२२।। साधक करावे प्रयत्नशील । आपणा ऐसे सत्त्वशील । म्हणोनी प्रयत्न विपुल । मामांनी केला ।।१२३।। सामान्य जनामध्ये रहावे । सामान्यासारिखे वागावे । अलौकिक ते राखावे । आतील आत ।।१२४।। देव भावाचा भुकेला । न पाही अलौकिक गुणाला । तो भुले भक्तीला । तेथे असा निष्ठावंत ।।१२५।। ताल चुकला गाताना । तरीही देव डोलवतील माना । चाचरती शब्द बोलताना । तरीही देव मंत्रमुग्ध ।।१२६।। यासाठी आगांतुकांची भेसळ । टाळावी समूळ । म्हणोनी करमणुकीचा खेळ । मामांनी नाही केला ।।१२७।। कोणी आला कोणी गेला । जरी कोणी केला गलबला । हर्ष विषाद न शिवे मनाला । मामांच्या कधी ।।१२८।। कधी न येती रागासी । प्रेमे बुझाविती सर्वासी । लहान तरी बालकांसी । अत्यादरे वागविती ।।१२९।। कधी श्रोत्यांची खेचाखेच । कधी त्यांची वानवाच । परी कीर्तनाचा रंग तसाच । राही मामांच्या ।।१३०।। देवभक्तांची दृष्टादृष्ट होता । कीर्तनासी रंग भरे अवचिता । रंगले त्यांना श्रोत्यांची वार्ता । कधीच नसे ।।१३१।। माझे कीर्तन माझ्या देवासाठी । आत्मसुखाच्या उल्हासासाठी । ही मामांची दृष्टि मोठी । म्हणून कीर्तन अखंड झाले ।।१३२।। सप्रेम मिळे जेव्हा श्रोता । तेव्हा आनंद मामांच्या चित्ता । अखंड त्याच्या हिता । मामा जपती ।।१३३।। जेव्हा श्रोत्यांचे दुर्लक्ष । तेव्हा मामा अंतरी दक्ष । कीर्तन



रंगी त्याची साक्ष । साक्षेपी श्रोते घेती ।।१३४।। कोणी काही विचारी । तरीच उघडावी वैखरी । नातरी आपुल्या नेमावरी । लक्ष अढळ ।।१३५।। कोणी निंदा कोणी वंदा । मामा म्हणती स्वहित साधा । होईल तैसा करा धंदा । स्वहिताचा ।।१३६।। जी सुदैवे मिळाली शिदोरी । ईश्वरी इच्छेने बरी । तीच मानोनी पुरी । रहावे संतुष्ट ।।१३७।। जो घाली नरजन्मासी । तो जन्म योग्य देव भेटीसी । तेथे उणे कैसे सामग्रीसी । ठेवील श्रीहरि ।।१३८।। ईश्वराची भक्ती करणे । हेचि सर्वांनी साधणे । आणि यासाठी मानणे । संसार गौण ।।१३९।। प्रत्येकाने करावे । आपुल्या जीवी धरावे । संसार उतरून जावे । पैलपार ।।१४०।। नित्यनियमाने नियमित भजन । मामा कीर्तनी करविती आपण । जरी श्रोते जाती कंटाळून । तरी मामा न सोडिती ।।१४१।।एकदा श्रीतुकाराम महाराजांना । श्रोते विनविती उत्तम कीर्तन कराना । महाराजांनी सुरू केले भजना । रात्र संपेपर्यंत ।।१४२।। याचे नाव उत्तम कीर्तन । मामा म्हणती आनंदून । करा टाळ्या वाजवून । भजन देवाचे ।।१४३।। लोक म्हणती हे भजन । जाते मन कंटाळून । तरी मामा ठेका धरून । अष्टोत्तरशत ।।१४४।। सार तेचि जीवी धरणे । पुनः पुन्हा तेचि वदणे । कंटाळा न करिता उच्चारणे । रामनामावळी ।।१४५।। हितकर आणि पथ्यकर । तेथे कडू गोडाचा न करणे विचार । ऐसे मामा धन्वंतरी थोर । भवरोगावरी ।।१४६।। अचूक तेचि साधिती । जेणे भवरोगाची होय शांती । याचसाठी अवतारस्थिती मामांची होती ।।१४७।। मामांची कीर्तनधारा । अव्याहत चालली या नगरा । लौकिकाचा पसारा । आवरोन पूर्ण ।।१४८।। लोक म्हणती अहो मामा । का घालविता वेळ रिकामा । काय लोकांना या । अमृतनामामध्ये गोडी ।।१४९।। तव बोलती संतदेव । आहो हा माझा स्वभाव । लोक

रिकामी उठाठेव । काय थोडी करिती ।।१५०।। चहा पिती वणवण फिरती । गप्पा तरी किती मारिती । तशीच ही माझी रीती । समजा तुम्ही ।।१५१।। प्रश्न तसे उत्तर । परी अंतरी फेरफार । एक उरवी येरझार । एक सरवी ।।१५२।। बाळपणापासूनचा । छंद कीर्तनाचा । तोचि एक जीवनाचा । हव्यास मामांचा ।।१५३।। मामा करिती कीर्तन । हाती वीणा आणि चिपळ्या घेऊन । नाना झांज धरून । साथ करिती पुत्राची ।।१५४।। छोट्या चिपळ्या हाती । आणि छोटा वीणा गळ्या भोवती । बालराम मामांच्या भोवती । नाचे कीर्तनात ।।१५५।। ऐसे मनोरम वैभव । पुरवी मनीची हाव । नाना म्हणती सदैव । हेचि भाग्य लाभो ।।१५६।। आमरणान्त नाना । साथ करिती मामांना । डोलविती माना । अत्यादरे ।।१५७।। तव राम झाला मोठा । करी पाठांतराचा साठा । संत वाङ्मय । ओठावरी त्याच्या ।।१५८।। नानांच्या मागे । राम साथ करी वेगे । सुदैवाचे धागे । कसे विणले पहाना ।।१५९।। पुढे योग सीता-राम विवाहाचा । आला मौजेचा । तेणे केळकर कुलाच्या भाग्याचा । नवा अध्याय उघडला ।।१६०।। कर्ता करविता देव । पुरवी कोड सदैव । मामांचा कीर्तनरव । अखंड चालण्या ।।१६१।। बळवंतराव मराठे श्रीमंत । आले घरात । वर संशोधन करणे हा मनात । हेतु धरोनी ।।१६२।। हा केळकर गोवंडे संबंध । उभय कुलांची एक सांध । साधण्या आलो निर्वेध म्हणती *बळवंतरावजी ।।१६३।। तव मामा म्हणती बळवंतरावांना । तेथे ना अधिकार, ना संपत्ति कोणा । ना मान, ना प्रतिष्ठा जीवना । जी अपेक्षा बहुतेकांची ।।१६४।। आम्ही तरी सामान्यजन । आपण आहात श्रीमान । संबंध कैसे येतील जुळुन । मज आश्चर्य वाटते ।।१६५।। तेव्हा बळवंतरावजी म्हणती । तुम्ही आणू नका चित्ती ।



आम्ही सर्व चौकशी अंती । आलो आहो येथे ।।१६६।। जेथे सच्छील आणि सुविचारी जन । तेथे कशाची न पडे वाण । ही आमची श्रद्धा पूर्ण । म्हणोन आलो ।।१६७।। चारित्र्य संपन्न घराण्याशी । संबंध जुळावे हे मनाशी । धरोन आलो पायाशी । नाही म्हणू नका ।।१६८।। मामा देती रुकार । तो मंगलवाद्यांचा झाला गजर । नृसिंहवाडी येथे सत्वर झाला *सीता-राम विवाह ।।१६९।। ऐशापरी दिवस जाता । वाढो लागे कीर्तन सरिता । कीर्ती पसरली न सांगता । दिगंतरी ।।१७०।। पश्चिमेस ढळता सूर्यनारायण । ऐके मामांचे कीर्तन । त्यात खंड न एक दिन । अडतीस वर्षे ।।१७१।। येणे परी कीर्तन बहिरंग । यथामती वर्णिले सांग । आता कीर्तनाचे अंतरंग । पुढील अध्यायी ।।१७२।।

इति श्रीगोविंदचरितमानस । स्वभावेचि जे अतिसुरस । तेथे अखंड उसळेल भक्तिरस । कीर्तन बहिरंग परिक्षण नाम पंचमोध्याय ।।५।।

***

टीप :– १) संस्थापक, मराठे मिल्स, इचलकरंजी
२) कै. दत्तोपंत गोवंडे व कै. गिरीजाबाई गोवंडे, इचलकरंजी यांची कन्या.

## अध्याय सहावा

# कीर्तन अंतरंग परीक्षण

राम-नाम संकीर्तन । जे चुकवी जन्ममरण । जेथे मामांचे जडले मन । अहर्निश ।।१।। देव भक्त आणि नाम । ऐसा हा त्रिवेणी संगम । जेथे स्नान उत्तम । अनुदिन ।।२।। जय जयश्री कीर्तन गंगे । अखंड वरदायिनी शुभगे । सुखविसी अंतरंगे । पावन करी सर्वांसी ।।३।। जेथे जाशी तेथे काशी । आळशी खरे तुझे प्रवाशी । म्हणोन तूच प्रवास करिसी । आळशावरी गंगा आणाया ।।४।। धन्य तुझे अपत्यप्रेम । जीवा घडविसी नित्य नेम । मार्ग दाखवोनी सुगम । सुखमय करिसी जीवन ।।५।। ज्ञानगंगेचा अभिषेक । भक्तावरी करिसी निःशंक । विसरविसी तहानभूक । कीर्तनरंगी रंगता ।।६।। तूच आमुची खरी माता । चुकविसी जन्ममृत्यूच्या वार्ता । देसी देख तुझ्या भक्ता । जे दुर्लभ अमरासी ।।७।। धरोनी आसरा संतांचा । मार्ग आक्रमिसी भूवरचा । उबगल्या जीवांचा । मार्ग शोधत ।।८।। किती एक आजवरी । पावन झाले तुझ्या तीरी । संपली त्यांची येरझारी । गेले स्वानंद भुवनी ।।९।। तू जीवनावीण जगविसी । अमृताविण अमर करिसी । साधन ऐसे हाती देशी । जेणे अखंडसुख ।।१०।। ज्यांनी एकदा अंतरंग भिजविले । ते कधी न कोरडे झाले । सदा सुखवीत राहिले । जडजीवासी ।।११।। संतवचन धारा । शीतल करितील अंतरा । विषयांचा ढिगारा । जाय वाहात प्रवाहात ।।१२।। मामांचे कीर्तन । चालले सुखवीत सुजन । नाम महात्म्य समजावून । नित्यनेमे सांगती ।।१३।। त्या कीर्तनाचा ठसा । हृदयावरी



उमटो ऐसा । जो काळ म्हणेल पुसा । तरीही अशक्य होवो ।।१४।। एक एक भक्त मामांचे । ज्यांनी पाश तोडले भवाचे । ज्यांनी महत्व ओळखले कीर्तनाचे । मामांच्या ।।१५।। कंठी धरिली नाम माळा । ज्यांनी धरिला काळाचा गळा । पोटी भक्तीचा उमाळा । धरुनिया ।।१६।। त्यात एक अप्पाजी पवार । ज्यांची नामी निष्ठा थोर । नाम जप करोनी अपार । स्वात्मानुभव मिळविला ।।१७।। स्वये अंध असती । परी कीर्तन न चुकविती । नामस्मरणी रंगली वृत्ति । धन्य झाले ।।१८।। नाही लौकिक अनुग्रह दिला । नाही वरदहस्त ठेविला । तरीही रामराम म्हणत गेला । प्राण अप्पाजींचा ।।१९।। आले सद्गुरूंच्या मना । तेथे लौकिकाची कसली विवंचना । अज्ञानांच्या नुसत्या वल्गना । संत समर्थ हे खरे ।।२०।। संत जे जे मनी योजिति । ते ते करून मोकळे होती । अज्ञानी लोक बडबडती । वाऊगेच ।।२१।। 'गोविंद कीर्तन गुणगान ।' अप्पाजींचे अभंग निरूपण । ग्रंथ प्रसिद्ध अति लहान । गुण थोर अभंगाचे ।।२२।। अभंग गेले होते वाऱ्यावरती । गणपतरावांना आली स्फूर्ती । जीर्ण पर्ण घेऊनी हाती । अक्षरे जुळविती ।।२३।। अप्पाजींचे स्वानुभवोद्गार । श्रोत्यास देतील समाधान थोर । म्हणोन केला विचार । काही चरण देण्याचा ।।२४।।

बापूराव धन्य मज स्मरणासी लाविले ।
अनुभवा दिले सर्व काही ।।
ऐकतो कीर्तन गोविंदरायाचे ।
आले माझे वाचे नाम तेणे ।।

*******

अप्पा पोवार म्हणे किती करू गौरव ।
मजला अनुभव दाखविला ।।

ऐसे थोर मार्गदर्शन । ऐसे प्रेमळ गोड वचन । ऐसे अतुट स्नेह बंधन । मामांचे ।।२५।। तैशीच एक विठाई पवार । भक्ती मामांच्यावरी थोर । वेड लागले अनिवार । झाली बावरी ।।२६।। स्वप्नांमध्ये संत हनुमंत । तिला तिचे हित सुचवित । हो मामांच्या सेवेसी रत । जाईल वेड ।।२७।। सेवा करावी मनोभावे । मुखी रामनाम गावे । हे तिने घेतले स्वभावे । आली शुद्धीवरी ।।२८।। पडेल ते काम करावे । कधी वाऊगे न बोलावे । नामस्मरण जीवी धरावे । हा छंद तिचा ।।२९।। पुढे खिळली अंथरूणाला । मरणाचा वेध लागला । डोई ठेवी तुळशीकट्ट्याला । म्हणे "मामा येते आता" ।।३०।। जो दीप मामांनी उजळला । तो घरोघरी गेला । ज्योत मिळे ज्योतीला । झाले अनेक दिवे ।।३१।। संत हे स्फूर्तीस्थान । संत भक्तांचे अधिष्ठान । म्हणोन नामानुसंधान । असंख्य जडजीवांना ।।३२।। ऐसे मामांचे कीर्तन । त्याच्या अंतरंगाचे वर्णन । करीन रहावया अनुसंधान । पुढिलांचे ।।३३।। मामा, तुमच्या कीर्तनाचे । सार शोधीन अंतरीचे । परी तुमच्या कृपेचे । बळ मागे पाहिजे ।।३४।। बोलावे तरी तुमच्या कृपेने । चालावे तरी तुमच्या आशीर्वादाने । नातरी फुकट अनुमाने । वाक्‌जाल ।।३५।। रामभक्त गोविंदजी । खडतर कीर्तनव्रत जगामाजी । आडतीस वर्षे आचरून आजी । जगदांतरी राहिला ।।३६।। विषयांचे नाही जंजाळ । नाही मतामतांची खळखळ । एक नामस्मरणचि केवळ । विषय कीर्तनाचा ।।३७।। तेचि केले आणि करविले । गायीले आणि गौरविले । साधनाभ्यासी चित्त नेले । अभागियांचे ।।३८।। अखंड प्रेम आम्हावरी । करुनी राहिला आता दूरी । म्हणोनी अश्रु नेत्रांतरी । सावरता न सावरती ।।३९।। भाग्य आले ते भोगता येईना । गेले ते साहवेना । ऐसा हा करंटेपणा । उभयपक्षी ।।४०।। संत येती आणि जाती । ही झाली किवदंती । ते संत अखंडित असती ।



भक्ताकारणे ।।४१।। हा तुम्हीच दिलासा । दिला श्रीहनुमंत गुरुचरित्री स्पष्टसा । आता त्याचा अल्पसा । अनुभव येवो आम्हासी ।।४२।। तुम्ही आपुले महत्त्व लपविले । आम्ही तुम्हासी नाही ओळखिले । आता चित्त हळुहळु लागले । पश्चातबुद्धि ।।४३।। आम्ही जड आणि अज्ञानी । तरीही तुम्ही प्रेमवर्षाव करुनी । ठेविले आम्हासी ऋणी करुनी । जन्म-जन्मांतरीचे ।।४४।। तेच प्रेम आमुच्या हृदयी वसो । तुमच्या सच्चरित्राची जोड असो । विस्मरण मरणान्तीही नसो । एवढा आशीर्वाद असो द्या ।।४५।। देव न भेटे तपावाचूनी । घेतो माप काठोकाठ भरूनी । उणे पडता कर कटिवरी ठेवुनी । राहतो वाट पहात ।।४६।। आम्ही तप नाही केले । नाही पुण्यकर्म आचरिले । तरीही तुम्ही जवळ केले । आम्हासी सदा ।।४७।। संत श्रेष्ठ देवाहुनी । हे पटले अंतःकरणी । म्हणोनी तुमच्या चरणी । एक भावे विनटलो ।।४८।। कीर्तनानंद गोविंदजी । रमावया कीर्तन रंगामाजी । बुद्धि द्या आजी । ऐसे विनवितसे ।।४९।। जयजयाजी समर्था । दाखवा पदोपदींच्या अर्था । जेणे आपुल्या निजस्वार्था उजळू आम्ही ।।५०।। दुःखाची आत्यंतिक निवृत्ती । आणि आत्यंतिक सुखाची प्राप्ती । हा हेतु धरोनी चित्ती । अखिल मानव वर्तती ।।५१।। व्यक्ति तितक्या प्रकृती । तितके मार्गही भिन्न वाटती । ज्याची जैशी मती । तैसा तो धावे ।।५२।। एक द्वैतात अडकले । एकांनी द्वैतात फरक केले । एकांनी सुख मानले । संसारात ।।५३।। एक म्हणती देहदंड सोसा । एक म्हणती भजन करीत बैसा । एक म्हणती कर्मानुष्ठानाचा ठसा । असो आचरणावरी ।।५४।। मतामतांच्या भ्रमावर्ती । सामान्य जनांची होय फजिती । नरजन्माची माती । सरतेशेवटी ।।५५। बहुता जन्माचे शेवटी । नर जन्माची होय भेटी । तोही जाय उठाउठी । अज्ञानाने ।।५६।। म्हणोनि श्रीज्ञादेवांनी । भागवत धर्माचा पाया भरूनी । मार्ग दिला सोपा करुनी ।

सामान्य जनांसाठी ।।५७।। संत वचनावरी विश्वास । न ठेविता गळा पडे फास । मार्ग दाखवी भिन्न । संतवचनी दुर्लक्ष करून । काढिती मार्ग आपुले ।।५९।। जे ज्यास खडक सापडले । ते तेथेच फोडू लागले । सुखाचे झरे रचिले । दुसरीकडे ।।६०।। कलियुगी काळाचा फास । करी जीव कासावीस । बहुमतांच्या भरीस । पडती लोक ।।६१।। तेणे ते वाचतचि गेले । दुःखाचे पडती घाले । मेले ते पुनः आले । दुःख भोगण्या ।।६२।। श्रीनारद गेले वकुंठाला । विचारती श्रीहरिला । सुटका कैशी आता बोला । या कराल कलियुगी ।।६३।।

**हरे राम हरे राम, राम राम हरे हरे ।**

**हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ।।**

तव म्हणती देवाधिदेव । जो जो धरोनी भक्तिभाव । रामकृष्ण सदैव । जपत राहिला ।।६४।। तो तरेल भवार्णवी । वृथा नको गाथा गोवी । या सुगम मार्गाची नवी । नवलाई नित्य असे ।।६५।। परी हा मंत्र कैसा म्हणावा । कोठे जाऊन जपावा । रामकृष्णहरीचा लावावा । अर्थ कैसा?।।६६।। हे सुखाचे साधन कैसे? । हाती येईल विनाप्रयासे । हे ज्यास लागले पिसे । तो बैसे मामांच्या कीर्तनी ।।६७।। जवळी असोन चिंतामणी । लोक फिरती दैन्यवाणी । चित्त नसे सद्गुरूचरणी । म्हणोनिया ।।६८।। खंड सुख गुरू देती । अखंड सुख सद्गुरूंच्या हाती । त्याची व्हावया प्राप्ती । करावे लागती प्रयत्न ।।६९।। मोह मायेला भुलून । जीवाचे झाले अधोगमन । मृगजळास जीवन कल्पोन । धावो लागे ।।७०।। जीव शिव परम मित्र । हृदयांतरी राहती स्वतंत्र । शिव सांगे सुखाचा मूलमंत्र । परी जीव ऐकेना ।।७१।। विसरला आपआपणा । झाला सदाचा दैन्यवाणा । फिरे वणवणा । सुखासाठी ।।७२।। अधोमुखे चालला संसार । जीव तेथे गुंतला अनिवार । युगानुयुगे करी येरझार । तरी आशा



सुटेना ।।७३।। रडे पडे आक्रंदे । म्हणे देवा हे दे ते दे । न मिळता बहु खेदे । होय कष्टी ।।७४।। होती एक राजकन्या । दैवयोगे झाली तिची दैना । भिकाऱ्यासवे वणवणा । फिरे दारोदारी ।।७५।। भ्रमली बुद्धि फिरला काळ । पोटासाठी करी हळहळ । उष्ट्यासाठी जीवाची तळमळ । दारोदारी तिष्ठतसे ।।७६।। तव चिपळ्या आणि वीणा । घेऊन फिरे एक संतराणा । अरे म्हणे ही कोणा । राजाची कन्या असे ।।७७।। समजावूनी तिसी । नेले राजगृहासि । निवारिले तिच्या दैन्यासी । झाली सुखसंपन्न ।।७८।। तैशी अवस्था जीवाची । भूल पडोन पूर्वस्थितीची । भ्रांती जडली मीपणाची । आले वेगळेपण ।।७९।। अडतीसवर्षे सतत । कीर्तन करिती गोविंदसंत । जीवाची सोडवणूक निश्चित । साधण्यासाठी ।।८०।। कीर्तनपाठ नाम मामांचा । त्रयोदश अक्षरांचा । अष्टोरशतसाचा । म्हणविती श्रीराम जयराम जयजयराम ।।८१।। नित्यनेमे हाचि जप । संचिताचे भस्म आपोआप । वरी संतवचनाचा लेप । विकल्प तण जाळण्यासाठी ।।८२।। जीवा संतशाळेमाजी आणती । सत्यज्ञान हाती देती । अज्ञान तिमीराची शांती । एकसरे होई ।।८३।। म्हणती अरे अवघ्या संसारी । एक देवाची सत्ता खरी । सूत्रे हालविती तुझी सारी । मी मी उगाच म्हणतोसी ।।८४।। वृथा धरोनी अहंकार । का होसी असा बेजार । जो भक्तिचा भुकेला फार । धरी चरण त्याचे ।।८५।। ती चरणगती अंतरात । समजोनी घेई तू त्वरित । जोवरी देह आहे हातात । जा शरण सद्गुरूला ।।८६।। संजीवनीमंत्र त्यांचा । मार्ग दाखवील समत्वधारणेचा। शीण सरेल संसाराचा । होशील पूर्ण काम ।।८७।। विश्रांतीची स्थिती । होईल आपोआप हाती । जीवभाव नुरेल चित्ती । रामनाम कळ साधता ।।८८।। अरे हे निर्गुणपुरीचे संत । हाती ऐसे देतील नामामृत । जेणे क्षुधेतृषेची मात । काहीच नुरे ।।८९।। नरदेह हीच बाग सोज्वळ । तेथे

नाम हेच मधुर फळ । अमर घोटिती लाळ । यासाठी ।।९०।। म्हणोनि नरदेहीचे वय । अमोलिक धरी सोय । शोधी अखंड जपाचा उपाय । सद्गुरूकृपे ।।९१।। देह जावो अथवा राहो । गुरुपदी न ढळावा भावो । करोनी विकल्पाचा अभावो । स्थिर राही नाम स्मरणी ।।९२।। भावबळे देव पाही । आपुलासा करून घेई । भाव बळाहून श्रेष्ठ नाही । आणिक ।।९३।। भाव असावा सद्गुरूचरणी । तैसाच ईश्वराचे ठिकाणी । तरी त्या भावाचीच आळणी । ईश्वररूपे होईल ।।९४।। भावेवीण भक्ती । काहीच नसे त्याची शक्ती । नाही कळवळा चित्ती । म्हणोनिया ।।९५।। भाव असेल निर्मळ । तरी देव भेटीस नलगे वेळ । विदुरपत्नी खाई केळ । साल देई कृष्णाला ।।९६।। देव भावाचा भुकेला । कोण विचारी उपचाराला । रामकृष्ण परमहंस स्वतःला । अर्पिती फुले ।।९७।। विदुरपत्नी आणि रामकृष्ण परमहंस । देवाचे भक्त झाले खास । तोचि धरूनी हव्यास । जीव आपुला सोडवावा ।।९८।। करिता देवपूजन । ज्याचे विसरे देहभान । तेथे देवभक्त हे दुजेपण । उरेल कैसे?।।९९।। हे कळे सत्संगतीने । मुरे साधुबोधाने । परी सत्संगती दैवयोगाने । लाभते जगी ।।१००।। म्हणोन श्रोती न व्हावे उदास । यासाठी मामा विस्तारिती अर्थास । जेणे प्रसन्नता मनास । ये तात्काळ ।।१०१।। सत्संगती म्हणजे समगती जाणे । जैसे संतांचे विचारणे वागणे । तेचि आपुले होणे । या नाव सत्संगती ।।१०२।। जेथ विवेक आणि वैराग्य वसे । जेथ चाणाक्ष दृष्टी असे । तेथे सत्संगतीस नसे । वाण काही ।।१०३।। संत संगती राहणे । त्याचेसह जेवणेखाणे । त्यांची देहसेवा करणे । हा झाला लौकिक ।।१०४।। याचा लाभ पडे पदरी । जरी तत्त्व शोधाल अंतरी । सेवामिषे बोध हृदयांतरी । प्रकाशेल तेव्हा ।।१०५।। व्याख्या सेवा



शब्दाची । मामा करिती तत्त्वशोधाची । जेणे शंका मनाची । जाय फिरोन ।।१०६।। ‘से’ म्हणजे आठवण ‘वा’ म्हणजे उत्तम । सेवा म्हणजे स्मरण । सद्गुरूवचनाचे ।।१०७।। बाह्यसेवा न मानोनी गौण । या अर्थी मन करावे सज्ञान । म्हणजे कृपा पूर्ण । होय सद्गुरूंची ।।१०८।। ‘कृ’ म्हणजे ते करणे । पा म्हणजे पालन करणे । अलक्षी लक्ष ठेवणे निरंतर ।।१०९।। सांगितले ते पूर्ण करणे। तरीच सद्गुरूकृपेचे ल्यावे लेणे । कृपादृष्टी होणे । तरीच शब्द समर्थक ।।११०।। ऐशी कृपादृष्टी लाभेल । तरीच जन्माचे सार्थक होईल । ज्याचे न करता ये मोल । या जगती ।।१११।। वर्म आहे आपणाचपाशी । वृथा का फिरावे दिगंतरासी । अंतर्मुख होऊन स्वतःशी । विचारावे ।।११२।। एक राजा विचारी ऋषीला । देव कैसा भेटेल मला । तो म्हणे जा गंगातीराला । एक मासा सांगेल ।।११३।। तो तुला समजावील । संदेह तुझा निवारील । तुज मार्ग सापडेल । निश्चितसा ।।११४।। राजा आला गंगातीराला । तो मासा तोंड बाहेर काढून त्याला । मासा म्हणू लागला । तहान मला लागली ।।११५।। राजा म्हणे हो उलटा । पाणी पी गटागटा । अरे हा पहा मासा करंटा । पाण्यामध्ये पाण्यावीण ।।११६।। तव मासा वदे राजाशी । अरे हेच उत्तर तुजशी । देव खाशी देव पिशी । हो उलटा म्हणजे कळेल ।।११७।। तव राजा विरमला । म्हणे ठीक उत्तर आले मला । माझेच शब्द परतून झाला । मजवर साक्षात्कार ।।११८।। बाह्यांतरी परमार्थ करणे । अंतरी उठेना विषयाचे ठाणे । हे जीणेचि लाजिरवाणे । ना संसार ना परमार्थ ।।११९।। प्रपंचाचे पडता मौन । सत्संगति समाधान । जे मामांनी मिळविले पूर्ण । आपुल्या रामाश्रमामध्ये ।।१२०।। भंडाराच्या डोंगरात । श्रीतुकाराम एकांतात । सत्संगाते साधत । तीच श्रीसमर्थ

गुहेमध्ये ।।१२१।। म्हणोनि साधणे ते साधी पाही । जे अखंडित या देही । सत् म्हणजे शाश्वत राही । जे देहांतीत ।।१२२।। संग त्या शाश्वताचा असावा । जेणे साधेल तो मार्ग शोधावा । ना तरी संतास पुसावा । म्हणजे बरे ।।१२३।। विवेक हरि जागृत ठेवून । साध्यासाठी शोधावे साधन । जेणे साधन जाय विरोन । साध्यामध्ये ।।१२४।। अखंडित वाचे रामनाम वदती । अष्टसात्विक भाव जमा होती । संसाराची होय विस्मृती । मग नाम कोण देव कोण ।।१२५।। नाम हाचि देव । तोचि नामदेव । अखंडानंद सदैव । ब्रह्मरस ।।१२६।। ऐशी संतसेवा घडता निष्ठेची । जोड मिळे त्यांच्या आशीर्वादाची । जोडी असे सदाची । सच्छिष्य आणि शुभाशीर्वाद ।।१२७।। सत्संग तोचि सदाचार । जेथे नामाविण नाही विचार । देह देवाचे मंदिर । आत राम उभा सदा ।।१२८।। सत्याचा होता संकल्प । पळे क्षण न लागता विकल्प । संकल्प विकल्प नुरता अल्प । निर्विकल्प मन ।।१२९।। संकल्प विकल्प हेचि मन । ते नुरता मन होय उन्मन । अहंकार सोडी ठाण । मग राज्य रामाचे ।।१३०।। यासाठी नित्यनेमे । रामचि गावा सप्रेमे । इतर करीत असताही कामे । राम अखंड स्मरावा ।।१३१।। राम कृष्ण हरि । उघडा मंत्र भूतलावरी । धोके शून्य लाभाची थोरी । वर्णिता नये ।।१३२।। परि सद्गुरूमुखे समजोनि घ्यावे । सबीज मंत्र उच्चारावे । तरीच सुखोपाये पावावे । अखंड सौभाग्य ।।१३३।। नाम आहे श्वासोच्छ्वासी । ते सापडे गुरूच्या चेल्यासी । ज्यांचे चित्त रमे अभ्यासी । तो भोगी परमानंद ।।१३४।। घडीने घडी साधावी । हळुहळु प्राप्ती मिळवावी । अधीरतेस नसावी । वाट तेथे ।।१३५।। गुरूवचनांचे अभ्यासात । साधेल तेचि हित । ऐसा विश्वास ज्यांचे मनात । तो श्रीगुरूचा अंकिला ।।१३६।। सर्व प्रायश्चित्तांचे प्रायश्चित्त । सर्व नेमांचा नेम नित्य ।



एक रामनाम उचीत । सर्वभावे सर्वार्थे ।।१३७।। रामनामी चित्त जडता । आत्मारामी होय अभिन्नता । दैवभाव उडोन पुरता । उरे एक गोविंद ।।१३८।। हीच देहाची सार्थकता । रामनामी देह झिजता । मन पावेल स्थिरता । होशील स्थिरपद ।।१३९।। गोविंद म्हणे नाम नेम । करील तुज पूर्णकाम । जीवा अखंड आराम । तेथेचि असे ।।१४०।। यापरी संक्षेपरिती । वर्णिली मी कीर्तन अंतरंग स्थिती । प्रयत्न केला यथामती । मामांच्या कृपे ।।१४१।। यात किती एक चरण । घेतले मामांच्या अभंगातून । गावया मामांचे महिमान । मामांच्याच शब्दे ।।१४२।। एक एक ओवी । अभंगाचे सार दावी । मामांच्या कीर्तनाचे करवी । विहंगम दर्शन ।।१४३।। विस्तार भयास्तव । दिला थोड्या अभंगास वाव । नातरी मामांच्या अभंगाचे पर्व । असे भारताएवढे ।।१४४।। एकापरिस एक । अभंग असती मनोवेधक । एक नाममहात्म्य सम्यक । वर्णिले असे तेथे ।।१४५।। रामपाठात अधिकांश । मामांच्या वचनांचा सारांश । रामपाठ अमृताचा कलश । सुखवील सर्वासी ।।१४६।। ''नामयोग रहस्य'' । हा ज्या ग्रंथाचा विषय । त्याच्या सामग्रीची सोय । मिळे मामांच्या अभंगात ।।१४७।। हजारोंनी अभंग लिहिले । ''नामयोग रहस्य'' वर्णिले । दुसऱ्या विषयास न शिवले । जन्मवरी ।।१४८।। जरी विषय दिसती वेगळाले । तरी असती नामसूत्रात गोविलेले । मामांनी एक ध्येय ठेविले । नामस्मरण ।।१४९।। श्रीहनुमत्चरित्र सार । मामांचा ग्रंथ थोर । आहे लहान आकार । परि महत्त्व मोठे ।।१५०।। साधनाभ्यास हेचि सूत्र । तेथेही सापडेल सर्वत्र । मामांचा एक मंत्र । नामस्मरण योगराज ।।१५१।। नामयोग रहस्यवर्णन । साधिले चरित्रांचे मिष करून । नामसाधन केंद्रबिंदू धरून । मामा राहिले जन्मवरी ।।१५२।। ऐशी नामनिष्ठा थोर । मामांचा

आचारधर्म कठोर । तोचि त्यांच्या कीर्तनाचा विस्तार । जन्मवरी ।।१५३।। म्हणोनी मामांचे कीर्तन । नव्हते सामान्य । निष्ठावंतास थोरपण । लाभले निश्चितीचे ।।१५४।। एक नामाचा विचार । विचार तैसा उच्चार । उच्चार तसा आचार । होता मामांचा ।।१५५।। शंभर कोटी रामायण । दिले तिन्ही लोकात वाटून । उरली दोन अक्षरे तोचि प्राण । झाला महादेवाचा ।।१५६।। तैसे अध्यात्मशास्त्र अमित । ते शोधून घेतले बहुत । त्यात रामनाम सार फक्त । ठेविले जतन करोनी ।।१५७।। एक तेचि गावे । तेचि ते वर्णावे । तेचि पुनः खुलवावे । एकनिष्ठेने ।।१५८।। हा मामांचा ध्यास । त्यासाठी केला अट्टाहास । धरोनी साधनाचा सोस । कीर्तन साधन बनविले ।।१५९।। कीर्तनी निवारून शंका । म्हणती आता रामनाम ऐका । तोचि एक साधका । होय विसावा ।।१६०।। ऐसे एकनिष्ठ एकतंत्र । लोकाचाराहून स्वतंत्र । थोर गुरूकृपेस पात्र । कीर्तन ज्ञानसत्र मामांचे ।।१६१।।

इति श्रीगोविंदचरितमानस । जे स्वभावेचि अतिसुरस । तेथे अखंड उसळेल भक्तिरस । कीर्तन अंतरंग वर्णन नाम अध्याय सहावा ।।६।।

***



### अध्याय सातवा

## जीवन प्रसंग वर्णन

महद्भाग्ये लाभ झाला । मामांच्या कीर्तनाचा ज्याला । त्याचे शिर मामांच्या चरणाला । लवे आपोआप ।।१।। पाहता प्रसन्नरूप मामांचे । सात्विक भाव जागे होती श्रोत्यांचे । म्हणती नवल या सुखाचे । संत दर्शन आनंदमय ।।२।। शांत आणि उदात्त । अबोल आणि प्रसन्न चित्त । अंतर्मुख सतत । ऐसे मामा ।।३।। अखंड घोष कीर्तनाचा । झेंडा फडकला कीर्तीचा । लोकांच्या वाणीचा । झाला एकचि विषय ।।४।। कीर्ती हा सुगंध सत्कृत्यांचा । तो लपून न राहायचा । वास जसा कस्तुरीचा । कोंडता न ये ।।५।। प्रांतोप्रांतीचे जन । करू लागले कीर्तन गुणगान । म्हणती सांगलीस जाऊन । सुखवू कर्ण आणि नेत्र ।।६।। नरसिंह चिंतामण केळकर । महाराष्ट्राचे साहित्याचार्य थोर । कीर्ती गेली त्यांच्याही कानांवर । मामांच्या कीर्तनाची ।।७।। सहज मामा एकदा गेले । साहित्याचार्यांना भेटले । केळकर उपनांव सांगितले । आपुलेही ।।८।। साहित्याचार्य तव म्हणती । सहज आठवले चित्ती । सांगलीस केळकर नामे कोणी करिती । हरिभक्ती आणि नित्यकीर्तन ।।९।। जरी त्यांची तुम्हासी माहिती असेल काहीशी । तरी ती ऐकण्यासी । मी आहे उत्सुक ।।१०।। मामा म्हणती मीच तो । हौस म्हणूनि कीर्तन करितो । होईल तैशी भक्ती करितो । ईश्वराची ।।११।। तव ते कौतुके विचारती । रोज नवे विषय कैसे निघती । हेच गूढ माझ्या चित्ती । उकलेना ।।१२।। एक देवाचे नामस्मरण । याच विषयावर माझे कीर्तन ।

चालले आहे अनुदिन । आजवरी ।।१३।। साहित्याचार्य चकित झाले । म्हणती हे नवल ऐकिले । जे एका विषयात रमले । अपवादात्मक ।।१४।। नित्यनवे आणि वेगळेपण । हे आजच्या युगाचे महिमान । तेथे तुमचे कीर्तन । अजब वाटे ।।१५।। तव बोलती गोविंद । जों ज्याचा असे छंद । त्यास नित्य नवा आनंद । तेथेच असे ।।१६।। अखंड वाचे नामजप । अंतर्माळ फिरे आपोआप । सारे पाप नुरे ताप । ऐसे नाम संकीर्तन ।।१७।। असेच एकदा पंढरीत । *मामा गेले विठूरायाच्या नगरात । तेथेही एक नवल वर्तत । ऐकाजी श्रोते ।।१८।। तेथे एका मंदिरात । मामा बैसले होते निवांत । कीर्तनाची वेळ होता मागत । परवानगी विश्वस्ताकडे ।।१९।। तव ते म्हणती माळधारी । तोचि येथे कीर्तनाधिकारी ।सोय कीर्तनाची तरी । पहा दुसरीकडे ।।२०।। तव मामा म्हणती विनवून । करीन ईश गुणगान । एखादे होईल जरी प्रवचन । तरी नेम साधेल ।।२१।। तव ते विश्वस्त द्रवले । म्हणती हे गृहस्थ दिसती भले । करा एखादे चांगले । प्रवचन ।।२२।। रघुनाथप्रिय गुरूवर । मनी नमन करोन सविस्तर । केले प्रवचन सुंदर । डोलती श्रोते ।।२३।। मामा म्हणती करा विचार । माळेचे असती दोन प्रकार । एक आत एक बाहेर । निष्ठा फिरवी दोन्हीही ।।४।। त्यात एक गौण एक प्रधान । ऐसे न करावे अनुमान । अंतर्माळेचेही दर्शन । प्रसंगे होतसे ।।२५।। ऐसे बोलूनी मामा । गेले विठूरायाच्या पुण्यधामा । उफाळुनि अंतरी प्रेमा । चरणी मस्तक ठेविती ।।२६।। म्हणती हे घनःश्यामा पूर्णकामा । लोकाभिरामा पूर्णविरामा । धन्य झालो येऊनी जन्मा । तव दर्शने ।।२७।। युगानुयुगे अवतार । घेऊन मर्दिले असूर । आता कटिवरी कर । ठेवोनी उभे ।।२८।। प्रेमळ भक्तासाठी

टीप :– श्रीमामांचे बरोबर श्री. पांडुरंगराव पतंगे, महादेवराव दाणेकरी, बंडोपंत गोडबोले, वासुदेवराव अभ्यंकर व गणपतराव कानिटकर ही मंडळी होती.



आतुर । सदा उभा येथे निरंतर । भक्त लोटती अपार । वैकुंठ नगर भूवर ।।२९।। मूर्ती सावळी सुकुमार । ठेविले कटिवरी कर । राधा रुक्मिणीचा वर । करूणाकर शोभसी ।।३०।। युगानुयुगे भक्तासाठी । द्यावया आलिंगन भेटी । दोन्ही कर मोकळे त्यासाठी । ठेवोनी जगजेठी उभा तू ।।३१।। ज्ञानेश्वरादि संत । येथेचि मस्तक नमवीत । किती येवोन गेले असंख्यात । गणित नसे ।।३२।। श्रीराम तू समर्थांचा । भोळा शंकर नरहरी सोनाराचा । गोपालकृष्ण केशवस्वामींचा । सर्वांसाठी विठ्ठल ।।३३।। कधी कोणासी न विन्मुख । सदा देसी भक्तासी सुख । एकत्वी अनेकत्वाचा हरिख । पुन्हा दाविसी ।।३४।। तूचि देव तूचि संत । रूपे तुझी अगणित । भक्तिप्रेमाचा वर्षाव जगात । तुझ्यामुळे ।।३५।। तुझे प्रेम हृदयांतरी । हीच तुझी कृपा खरी । तेचि वाढो उत्तरोत्तरी । देवाधिदेवा विठ्ठला ।।३६।। तू नामे अनंत । परि निश्चल राहिलासी येथ । जयजय श्रीपंढरीनाथ । काय महिमा वर्णु तुझा ।।३७।। वेद शिणले वर्णिता । तेथे माझी काय कथा । परी प्रेम करी विकल चित्ता । करावे वाटे स्तवन ।।३८।। राधा आणि रुक्मिणी । भक्ति शक्ति दोन्ही । तुझ्या सेवेस अनुदिनी । तिष्ठत राहती ।।३९।। नामगंगा भागीरथी । तीच येथे भीमरथी । असंख्य भक्त स्नानार्थी । नित्य येथे जमती ।।४०।। जो नामगंगेत न्हाला । अंतर्बाह्य शुद्ध झाला । तोच एक अधिकारी भला । तुझ्या दर्शना ।।४१।। शिव करी तुझे ध्यान । तुझ्या मनी शिव पूर्ण । हीच दाखवावया खूण । शिरी शिवलिंग धरिले ।।४२।। भक्त करिती तुझे ध्यान । तुज अंतरी त्याचे स्मरण । ऐसे अनेकत्वी एकपण । पंढरीराया ।।४३।। ऐसे करोनी पुण्यस्मरण । मामा पाहती प्रसन्नवदन । पांडुरंग आनंदघन । चिरंतन सुखदायी ।।४४।। पुंडलिकाचे शब्दासाठी । अखंड उभा तू जगजेठी । भक्ता तारिसी संकटी । थोर उपकार तुझे

देवा ।।४५।। ऐसे स्तवून निघाले दूरी । एक कृष्ण हृदय पुण्यात्मा आपुले करी । माला घेवोनि त्वरा करी । मामांना घालण्याची ।।४६।। मामा नको जरी म्हणती । परि त्याने येवोनी पुढती । कौशल्ये माळ घालोनी तृप्ती । केली स्वनयनांची ।।४७।। मामांनी माळ काढिली । प्रसाद म्हणोन सांभाळली । पुष्पे वाळता राहिली । एक तुळसी माळ ।।४८।। अंतरीची माळ । बाहेर दाखवी गोपाळ । भक्तवचनांचा प्रतिपाळ । तोचि एक करू जाणे ।।४९।। ऐसा प्रसाद पंढरीरायाचा । मामा म्हणती भाग्याचा । म्हणोनी दर द्वादशीस निरूपणाचा । मामांनी नियम केला ।।५०।। मामा करिती कीर्तन । पुढे राम चालवी निरूपण । ऐसे विठ्ठलाचे महिमान । मराठीचिये नगरी ।।५१।। तसेच एकदा आळंदीसी । मामा आणि मामी गेले यात्रेसी । खेचाखेच पाहूनि गर्दीसी । विरमले ।।५२।। स्त्री पुरुषांची वेगळी ओळ । परी मामा मामी निघाले सरळ । कोठे न व्हावा गोंधळ । म्हणोन रक्षक ठायी ठायी ।।५३।। कोणी न केला प्रतिकार । मामा मामींनी गाठले देवद्वार । ज्ञानदेव चरणी नमस्कार । उभयता करिती ।।५४।। जयजयाजी ज्ञानदेवा । आम्हास तुमचा विसावा । ज्ञानेश्वरी हा प्रसादमेवा । असंख्य भक्तांना ।।५५।। शोभता तुम्ही प्रेमसागर । झेलिले दुःखाचे गिरीवर । तरीही अपरंपार । प्रेम आम्हावरी ।।५६।। वर्षे किती लोटली । तरी भक्तावरी प्रेमाची साऊली । दर्शनाने शांत केली । मने किती एकांची ।।५७।। तुमच्यामुळे हा संसार । भक्तिसुखे विनटला फार । नातरी दुःखास पारावार । मुळीच नसे ।।५८।। त्या भक्तिसुखाचा ठेवा । सदैव अंतरी असावा । एवढा वर द्यावा । इतर काही मागणे नसे ।।५९। मन ठेवून चरणावर । अंतरी स्मरण वारंवार । आता स्वामी करूणाकर । निरोप घेतो ।।६०।। आले देवाजीच्या मना । म्हणोनी प्रतिबंध चालती ना । आलो आपुल्या दर्शना । विनायासे ।।६१।। नातरी आगांतुक । विघ्ने येती



अनेक । आम्ही निर्विघ्न हे कौतुक । फळ आपुल्या कृपाप्रसादाने ।।६२।। देव मामांचा सहाकारी । म्हणोनि त्यांचे तो लाड करी । कौतुकाच्या परीवरी परी । करून दावी ।।६३।। कोणी आणि संकट । तरी गुरूकृपे त्याचा शेवट । मार्ग दाविती नीट । परम दयाळू सद्गुरू ।।६४।। मामा करिती नित्य कीर्तन । हे कोणा एकास न आवडून । आत शेंदूर भरून । करंज्या आणी मामांना ।।६५।। विकल्परहित मन मामांचे । कौतुक करिती आणणाऱ्यांचे । मुखी घास करंज्यांचे । सुखे घालती ।।६६।। उरली करंजी एक । ती सहज फोडती घरचे लोक । शेंदूर पाहून थक्क । चकित भयभीत होती ।।६७।। झाला शेंदराचा परिणाम । बसला आवाज न दे काम । कैसा चाले कीर्तन नेम । म्हणती लोक ।।६८।। आला प्रारब्धाचा घाला । मामांचा आवाज पुरा बसला । एक शब्द न ये तोंडाला । कीर्तन चाले मनात ।।६९।। खंड पडे प्रगट कीर्तनाला । ऐसा आजार नको मला । मी भीत नाही देह यातनेला । परी खंड कीर्तना न साहवे ।।७०।। संत महंत देवाधिदेव । परी प्रारब्ध आडवे सदैव । त्यास न टाळून देव । माया करी भक्तावरी ।।७१।। देव पावला प्रार्थनेला । मामांचा आवाज आला । परी इतर कष्ट जीवाला । सुरू झाले ।।७२।। एकदा मामा बसले देव पूजेला । तो अकस्मात झटका आला । देह अचेन झाला । राम होता मुंबईला ।।७३।। श्रीगुरुलिंगजंगम सद्गुरूवर । सुचविती कानडी चरण सत्वर । परी रामास अर्थ न कळे परी कागदावर । शब्द उतरवी राम ।।७४।। जाणत्यास दाखविता उमगले । की घरी रथाचे चाक अडले । म्हणे आता पाहिजे गेले । तातडीने सांगलीला ।।७५।। सत्वर उपचार मामांना झाले । गुरूकृपे यश आले । परी शरीर विकल झाले । साथ देण्या नित्यकर्मा ।।७६।। मामांचे अध्यात्मिक बळ । तेथे दैवाचा न चले खेळ । गुरूकृपा सोज्वळ । साक्ष देई क्षण क्षणा ।।७७।। रोगांनी धरिलें शरीर । निंदकांचे ही

सुरू झाले थेर । त्याही यातना अपार । मामा सोशिती शांतपणे ।।७८।। एक अबला झाली सबल । करू लागली शिवीगाळ । तोंडाची अति फटकळ । बोले अद्वातद्वा ।।७९।। हा जिवंत ग्रह आला । एक वर्ष मामांच्या घराला । करी कीर्तनात गलबला । सत्वपरीक्षा मामांची ।।८०।। कीर्तनात व्यत्यय । परी कर्णविष निर्दय । भलतेच घेई संशय । जे नावडती सज्जनासी ।।८१।। मामा राहिले धीर गंभीर । म्हणती देव आपुली बाजू राखणार । अल्प धारिष्ट ईश्वर । पाहतो आपुले ।।८२।। वर्ष संपल्यावरी । शांत झाली ती नारी । मामा म्हणती श्रीहरी । पाठीराखा ।।८३।। दुसरे गृहस्थ आणिक एक । बसती कथेस निःशंक । लक्ष गोष्टीकडे हरएक । धावत असे ।।८४।। कोण कोण कीर्तनास येती । कैसे दिसती कैसे चालती । कोण कोण श्रीमंत किती? । हे सदा पाहती ।।८५।। स्नानसंध्या टिळे माळा । पोटी मत्सराचा उमाळा । परी त्यांचा रंग वेगळा । आणि आचरण ।।८६।। करिती कवने अचाट । भाषा अचकट विचकट । संतनिंदेची हौस अफाट । ऐसे कवि ।।८७।। संत निंदेचा अभंग रचून । मामांच्या कर्तनी आवर्जुन । नित्यनेमे म्हणून । अंत पाहती मामांचा ।।८८।। प्रिय सद्गुरूंची निंदा । ही न सोसवे ऐशी आपदा । कैशी खीळ घालावी या अपछंदा । मामा मनी विचारती ।।८९।। पाचारोनि कविवर्यांना । मामा बोलती मधुर वचना । अपशब्दे संतसज्जना । नका छेडू ।।९०।। माझी निंदा खुशाल करा । मला न त्यांचे भय जरा । परी माझ्या समोर माझ्या सद्गुरूवरा । उणे मी न आणू देई ।।९१।। क्रोध आला कविवर्यांना । परि त्यांचे काही चालेना । करोनी जरा तणाणा । गेले निघूनी ।।९२।। दिवा तेथे काजळी । चंदन तेथे सर्पांची वेटोळी । तैशीच निंदकांची टवाळी । संतांच्या भोवती ।।९३।। ऐसे कितीएक निंदक । बुद्धिमान आणि कल्पक । भ्रमे त्यांचे मस्तक । कीर्तनरंग ऐकता ।।९४।। नानापरी प्रयत्न



करिती । कीर्तनास विघ्ने आणिती । श्रोत्यांना फितविती । परी अखंड चाले कीर्तन ।।९५।। प्रचंड लाटेचा ओघ येता । न आवरे निंदकांच्या हाता । अपयशापुरता । वाटा होता त्यांचा ।।९६।। संत कीर्तीमंत होती । निंदकाची होते फजिती । तरीही निंदकांची मान वरती । पुनः चढे ।।९७।। निंदक देवाहून थोर । करिती संतावरी उपकार । संतांच्या कीर्तीचा टणत्कार । निंदकांच्यामुळे ।।९८।। प्रसिद्धि पराङ्मुख संत । निंदक आणिती उजेडात । यश देती सत्वपरीक्षेत । आणि लौकिक ।।९९।। निंदक निंदून कीर्ती वाढविती । भक्त अपार गुण गाती । तेही मनोभावे इच्छिती । संतांची कीर्ती ।।१००।। त्रिकाल ज्ञानी संत । जाणोन मनीचे हेत । पुरविती हट्ट करिती शांत । मन भक्तांचे ।।१०१।। ऐशा कितीतरी घटना । वर्णिता वाढेल ग्रंथरचना । परी काही सांगितल्याविना । न राहवे मला ।।१०२।। कुलकर्णी एक भाविक । भक्ती मामांच्यावरी अलौकिक । पांडुरंगाचे उपासक । नित्य ऐकती कीर्तन ।।१०३।। संत मुखे नाम ऐकावे । हे घेतले त्यांच्या स्वभावे । म्हणोनि त्यांनी सद्भावे । पाय धरिले मामांचे ।।१०४।। जे आपल्या येईल मुखातून । तेच करीन मी नामस्मरण । इच्छा करावी परिपूर्ण । माझी ही ।।१०५।। परी मनी दचकले । म्हणती हे श्रीरामभक्त भले । आणि श्रीपांडुरंग दैवत आपुले । आता प्रभुइच्छा ।।१०६।। क्षण एक मामा अडखळले । म्हणती विठ्ठल विठ्ठल म्हणा एक मेळे । जो भक्तांचे पुरवितो लळे । राहोन पंढरपुरी ।।१०७।। आनंद झाला भक्ताला । म्हणती पांडुरंग मज पावला । अगाध दिसे संतलीला । संत देव एक गमती ।।१०८।। तैसेच एक प्रेमळ सज्जन । ऐकती मामांचे कीर्तन । पत्ते खेळता रमले मन । त्यांचे एके दिवशी ।।१०९।। वेळ झाली कीर्तनाची । परी बुद्धि न झाली उठण्याची । डाव संपता मामांच्या घरची । वाट धरिली ।।११०।। नमस्कार करून

बैसले । तो मामा अवचित बोलले । पत्याचे खेळापुढे केले । कीर्तन गौण ।।१११।। हा नव्हे परमार्थ । कैसा साधेल निजस्वार्थ । मोहासाठी हा अनर्थ । बरा नव्हे ।।११२।। ऐशा अंतरीच्या खुणा । जागविती सज्जना । लाविती परमार्थ चिंतना । अनेकांना ।।११३।। संसारी खडतर आपत्ती । हैराण दीन दुबळ्याला करिती । आधार संतपदाचा घेती । ते होती सुखसंपन्न ।।११४।। तैसेच पटवर्धन एक निष्ठावंत । गेली नोकरी झाले दुश्चित्त । मामांच्या चरणी नत । भक्तिभावे झाले ।।११५।। मामा म्हणती त्यांना । खिन्न न करावे मना । ज्यांचा भाव प्रभुचरणा । त्यांना रक्षिता ईश्वर ।।११६।। गेली नोकरी मिळाली । विवंचना दूर झाली । संतचरणी श्रद्धा बळावली । दुःखितांची ।।११७।। एकदा एक खेडवळ । होता अतिप्रेमळ । येऊन धरिले चरण कमळ । मामांचे ।।११८।। भोळा भाव पाहून त्याचा । ग्रंथ श्रीहनुमंतगुरूचरित्रसाराचा । बरोबरी प्रसाद प्रेमाचा । दिला त्याच्या हाती ।।११९।। तव तो बोले सद्गदवचन । हा प्रसाद थोर आशीर्वचन । परी माझे अज्ञान । मज वाचता न ये ।।१२०।। मामा म्हणती पूजन करावे श्रद्धा ठेवून । तुम्ही वाचाल ऐसा दिन । उगवेल ।।१२१।। अमोघ आशीर्वाद मामांचा । दिवस उगवला आनंदाचा । श्रीहनुमत्गुरुचरित्र वाचनाचा । आनंद मिळाला भाविकाला ।।१२२।। जेथे श्रद्धा तेथे ज्ञान । ज्ञान तेथे समाधान । समाधानी जो सुखसंपन्न । या भूतली ।।१२३।। चमत्कार जाण । नव्हे संतांचे मोठेपण । नव्हे त्यांच्या चारित्र्याची खूण । अंतःचरित्र सच्चरित्र ।।१२४।। जो आम्हास चमत्कार । तो त्यांना सहज प्रकार । म्हणोनि याचा विचार । योग्य तो घ्यावा ।।१२५।। जादूगाराचे खेळणे । क्षणभरी होय कौतुकाचे बोलणे । म्हणोनि तुच्छ लेखणे । केवळ चमत्कारासी ।।१२६।। तैसे नव्हती संतांचे चमत्कार । परी निजभक्तास आणावया ताळ्यावर । जेव्हा सौम्य उपायाचा न चले जोर । तेव्हा चमत्कार होती ।।१२७।। नातरी निष्ठा वाढवावया । किंवा भक्ति रूजवावया । संसारातून परावृत्त करावया । चमत्कार होती ।।१२८।। सद्हेतूविणे संत । कधी न होती कार्या प्रवृत्त । त्यांचे लक्ष असे सतत । आपुल्या भक्तावरी ।।१२९।। नातरी त्यांचे वागणे । कठोरव्रत आचरणे । विषयसुख तुच्छ लेखणे । हे काय चमत्कारास उणे असे ।।१३०।। अडतीस वर्षे सतत । सोसून जनांचे आघात । प्रसन्न चित्ते कीर्तनास उभे राहात । हा एक चमत्कार ।।१३१।। एकही दिवस खंड न पडता । अखंड आचरती व्रता । सर्व चमत्कार होती वृथा । हे ऐकता ।।१३२।। लोकापवाद सोशीती । संसारसुखाच्या नकारघंटा वाजती । देहदुःख अनिवार किती । सांगता न ये ।।१३३।। तरीही नियम चालविणे । शांतपणे कीर्तनास उभे राहणे । श्रवण मनन निदिध्यास ठेवणे । अखंडित ।।१३४।। कीर्तनाची टिपणे ठेवती । कीर्तनासाठी अभंग रचिती । साधन पूजा प्रवचन करिती । न चुकता न कंटाळता ।।१३५।। हे अव्याहत करणे । तपानुतपे आचरणे । प्रपंच निर्वाह प्रारब्धावरी टाकणे । हाचि मोठा चमत्कार ।।१३६।। जो अनन्य झाला देवासी । त्याचे साकडे भगवंतासी । याचा अनुभव सर्वासी । मामांनी दिला ।।१३७।। इतर चमत्कार यापुढे । काय शोभतील बापुडे । त्यांचे महत्त्व केवढे । सांगा मज ।।१३८।। लक्षामध्ये एक । ऐसा निवडे भजक । सोपे म्हणती किती एक । परी आचरणारा दिसेना ।।१३९।। यासी पाहिजे आत्मबळ । गुरूभक्ती सोज्वळ । आणि गुरूकृपाही उजळ । पाठीमागे ।।१४०।। एकदा कीर्तन करता करता । मामा बेशुद्ध पडले अवचिता । सर्वासी लागली चिंता । धावू लागले ।।१४१।। निजविती अंथरूणावरी । तो त्यांची चालली दिसे वैखरी । कीर्तन चालू होते अंतरी । तेच शब्द उमटती ।।१४२।। बेशुद्धावस्थेत कीर्तन । हे कीर्तनप्रेमाचे उदाहरण । अनुपमेय अवर्णनीय कठीण । येरा

गबाळाचे काम नोहे ।।१४३।। याला म्हणावे निष्ठा । जेथे प्राणाचीही ना प्रतिष्ठा । नामाविण देहाच्या चेष्टा । चालू न देती ।।१४४।। एकांती नेम चालविणे । हे आत्महितापुरते वागणे । जगदोद्धारार्थ आचरून दाखविणे । हे संतांचे कार्य ।।१४५।। संत हे दीपस्तंभ । जळोनी जगा देती लाभ । दाखविती मार्ग सुलभ । इतरांसी ।।१४६।। कधी द्वेष न कोणाचा । कधी न लोभ द्रव्याचा । माया आणि ममतेचा । ठावचि नसे ।।१४७।। सदा बोलावे मधुर उत्तर । साहोनी कठोर वचन दुस्तर । कधी न कोणावरी भार । स्वसुखासाठी ।।१४८।। दयाभाव सर्वावरी । हित दुसऱ्याचे सदा अंतरी । अनन्य भजती त्यास तरी । सर्वस्व देती ।।१४९।। काय देती ते कोणा न कळे । दुःखितासाठी हृदय कळवळे । किती एकांचे मन वळे । परमार्थी ।।१५०।। हे समग्र चरित्र वर्णावे । तरी मति कुंठित होई स्वभावे । वेचिले कण त्यावरून घ्यावे । समजून वाचकांनी ।।१५१।। जो जो येई दर्शनाला । चिमुटभर साखर मिळे त्याला । या पुण्यप्रसादाला। भक्त होती भुकेले ।।१५२।। कोणी आणून देती । आपल्यासाठी मामांची सोय करती । संसारी परमार्थ साधती । आणि अलभ्य लाभ ।।१५३।। एकदा कीर्तन चालू असता । एक वृद्ध स्त्री अवचिता । चरणावरी ठेवोनी माथा । हात पसरी ।।१५४।। कीर्तनात येईल व्यत्यय । म्हणोन मामा म्हणती हे माय । नंतर करीन सोय । तुमच्या प्रसादाची ।।१५५।। तव ती मनी विचारी । ऐसेच घडो श्रीहरी । माझी घाई ही न बरी । झाली आज ।।१५६।। इतक्यात आली तीन मुले । त्यांनी मामांचे चरण वंदिले । वंदोन प्रसादासाठी थांबले क्षणभर ।।१५७।। एक चिमुट साखर । पडे प्रत्येकाच्या हातावर । मुले होऊन हर्षनिर्भर । गेली निघून ।।१५८।। मामा विचारिती मनाला । त्या वृद्ध स्त्रीने अपराध काय केला ?। ती मुकली प्रसादाला । क्षणापूर्वी ।।१५९।। एक वागणे सर्वासी । हे धरिले मी



मनासी । मग प्रतारणा एकासी । अरेरे हे अनुचित झाले ।।१६०।। क्षणभर कीर्तन थांबवून । फिरविले चौफेर नयन । वृद्ध मातेस बोलावून । प्रसाद दिला ।।१६१।। कुसुमाहून कोमल । मामांचे मन निर्मल । समभावे पाहती सकळ । चुकता होती बहुकष्टी ।।१६२।। ऐशी कोवळीक मनाची । आकर्षी मने इतरांची । म्हणोनी निष्ठा लोकांची । जडे मामांच्या चरणी ।।१६३।। श्रीराम अयोध्येचा । जो भाव दाखवि मनाचा । तोच या श्रीराम उपासकाचा । दिसे सर्वांना ।।१६४।। मृदुवचन सुहास्यवदन । पोटी प्रेम हाती कृपादान । उसळे आनंद समाधान । सुखसंपन्न भक्तगण ।। १६५।। जीवांचा कळवळा । म्हणोन कीर्तनाचा लळा । आळविती गोपाळा । मनोभावे ।।१६६।। श्रीराम जयराम जयजयराम । ऐसा घोष करून सप्रेम । पचविले संसारविष परम । जराजर्जर जीवांसाठी ।।१६७।। मामा आमुचे भाग्य थोर । म्हणोन पावलो प्रसाद मधुर । वाटे देवही ज्याचा अनिवार । करितील हेवा ।।१६८।। जे प्रेम आम्हासी लाभले । ते आताही पाहिजे टिकले । हृदयमंदिरी पाहिजे राहिले । सदैव आमुच्या ।।१६९।। सन्मार्ग निष्कंटक केला । ज्ञानदीप उजळोन ठेविला । आचरणाचा कित्ता दिला । आमच्या हाती ।।१७०।। याहून दया कोणती ? । श्रेष्ठ असेल या जगती । याहून सत्संगती । श्रेष्ठ कोठे असेल ?।।१७१।। आम्ही हळहळतो अंतरी । इच्छा जरी हृदयांतरी । अल्प सामर्थ्य आमुचे परी । थोर आदर्श तुमचा ।।१७२।। देह ममता सुटेना । निश्चय अंतरी शिरेना । घर पोखरती कुकल्पना । वारंवार ।।१७३।। दुर्बुद्धीचा वीट आला । परी सद्बुद्धी येईना घराला । निराशा घेरी मनाला । वारंवार ।।१७४।। स्फूर्तीस्थान आमुचे । मामा चरण तुमचे । सुकाणू आमच्या नौकेचे । तुमच्या हाती ।।१७५।। गोविंद गोविंद गोविंद । मना हाचि लागो छंद । हृदयी तुमचे पदारविंद । पूजू आम्ही ।।१७६।। मस्तक ठेवू चरणावरी । साठवू तुमची सगुणमूर्ती

अंतरी । अभंग कीर्तन वाचेवरी । ठेवू आमुच्या ।।१७७।। संत अजरामर असती । ही आहे तुमची उक्ती । त्याची आम्हा प्रचिती । येवो ही प्रार्थना ।।१७८।।

इति श्रीगोविंदचरितमानस । जे स्वभावेचि अति सुरस । जेथे अखंड उसळेल भक्तिरस । जीवन प्रसंगवर्णन नाम सप्तमोध्याय ।।७।।

***



अध्याय आठवा

## रौप्य महोत्सव वर्णन

जय जय श्री कीर्तन सरिते । जे पावले तुझ्या तीराते । ते झाले सरते । भवार्णवी ।।१।। जे एकदाही आले तुझ्या तीरी । त्यांना गोडी लागली भारी । म्हणोनि कीर्तनगंगेची सरी । आणिकासी न ये ।।२।। एक विद्यार्थी भाविक । आला कीर्तनासी दिन एक । त्याच्या श्रद्धेचे कौतुक । अपूर्वची असे ।।३।। दुसरे दिवशी अंथरूणाला । विषमज्वराने तो खिळला । शुद्ध उडाली । झाला अधीर मनी ।।४।। पाणी प्यावे मामांच्या हाते । औषध प्यावे मामांच्या दृष्टी पुढते । मामा, मामा, म्हणावे मागुते । हाचि ध्यास ।।५।। घाला आला काळाचा । जीव आधार सोडी देहाचा । प्राणज्योती आसरा मामांचा । शोधीत आली ।।६।। पहाटेच्या प्रशांत काळी । मामांची दासबोध सेवा सुरू झाली । तो तेथेच प्राणज्योती फिरू लागली । इकडे तिकडे ।।७।। सुख संत तो सानिध्याचे । भोगून अति मोलाचे । तो तेथेच शिवपिंडीचे । आत लुप्त झाली ।।८।। दर्शन मामांचे घेऊन । मामांचे कीर्तन ऐकून । भक्ति प्रेमाचे दृढबंधन । पडे अंतरी ।।९।। मामांच्या कीर्तनाचे । आणि त्यांच्या शुद्ध आचरणाचे । त्यांच्या प्रेमळ स्वभावाचे । खोल परिणाम रुजले ।।१०।। किती एकांना आसरा । मामांचा सुखद झाला खरा । सुख शांती आणि निवारा । मामांच्या घरी ।।११।। जानकीबाई दांडेकर । निवासस्थान पालघर । आप्पासाहेब, बाळासाहेब थोर । पुत्र त्यांचे असती ।।१२।। हेही मोठे भक्तिमान । मामांचे चरणी अनन्य । जानकीबाईंचे वर्णन । ऐका आता ।।१३।। मृत्येशय्येवरी असता । मामांच्या भेटीची आतुरता । भेटीसाठी बोलावणे येता । मामा

गेले ॥१४॥ भेटीसाठी जीव अडकला । तो दर्शने शांत झाला । समाधाने प्राण सोडिला । जानकीबाईंनी ॥१५॥ कोणाची भूतबाधा गेली । कोणाची विघ्ने दूर झाली । कोणाची भ्रमली बुद्धि आली । ताळ्यावर ॥१६॥ ऐशी कीर्तनसेवा मोलाची । चिरंतन लोकसंग्रहाची । सुटका निश्चयाची । संसार दुःखातून ॥१७॥ ऐशी कीर्तनगंगा पुण्यपावन । अभागिया भाग्यवंत करून । अखंड सुखाचे साधन । दे हाती ॥१८॥ कोठे सांगलीचा गावभाग । जेथे एकांती चाले कीर्तनरंग । परी परप्रांतीयांचे अंतरंग । गेले वेधुनी ॥१९॥ सांगलीत एक मामा । गाती अखंड हरिनामा । कीर्ती पसरली वाढला महिमा । न वाढविता ॥२०॥ नातरी नित्य कीर्तन । ऐसे कोठे ऐकिले वर्तमान । अखंड भारतात पहा शोधून । किती स्थळे? ॥२१॥ तात्यांनी पाया भरला । आता इमारतीला डौल आला । आणि क्रम अव्याहत चालला । हा संतांचा प्रसाद मोठा ॥२२॥ हे भाग्य सांगलीस लाभले । मुमुक्षूंचे थवे तेथ लोटले । आणि समाधान पावले । जे दुर्लभ या कलियुगी ॥२३॥ नाही नगारा वाजविला । नाही वर्तमानपत्री बोलबाला । तरीही घंटा वाजल्या । सत्कीर्तीच्या ॥२४॥ नाद गेला दिगंतरा । हेलावली हृदये एकसरा । लोक म्हणती आता मनी धरा । सांगली क्षेत्र ॥२५॥ जेथे संतांची वस्ती । तेथे करू एकदा आरती । सद्भावेचरण चित्ती । साठवू त्यांचे ॥२६॥ हळुहळु कीर्ती ज्योत । शिरे सुजनांच्या अंतरात । सर्वकाळ स्थिरावत । तेथेच मग ॥२७॥ मामांची कीर्तन सरिता । वाहू लागली अनवरता । सुखवीत सुजनांच्या चित्ता । अखंड चालली ॥२८॥ नाही गंधर्वसंगीत । नाहीत साथीदार बहुत । बाह्याकर्षणे येथ । काहीच नसती ॥२९॥ नुसते नामसंकीर्तन । श्रीरामाचे प्रेमळ भजन । आणि अखंड साधन । सद्गुरूनिष्ठे ॥३०॥ साधनमार्ग समजाविती । सुगम करोनि सांगती । साधनाभ्यासी आणिती ।



मुमुक्षूंना ॥३१॥ श्रीराम जयराम जयजयराम । या महामंत्राचा घडविती नेम । प्रतिदिनी अष्टोत्तरशत जप उत्तम । करविती ॥३२॥ प्रसंगे भजन इतर देवांचे । तितुक्याच प्रेमे म्हणावयाचे । स्मरण सगळ्या संतांचे । यथोचित ॥३३॥ सांप्रदायाचा दूराभिमान । येथे दिसे शून्य । जो सद्भावे करी नमन । त्यास म्हणती आपुला ॥३४॥ श्रीराम तोचि पांडुरंग । तोचि द्वारकेचा श्रीरंग । भावभक्ति अभंग । दुजाभाव कधी न दिसे ॥३५॥ म्हणोनि येथे परकेपणा । कधी न दिसे कोणा । सद्भावे चरणा । सर्व लागती ॥३६॥ सदा गोड बोलावे । मतांतरी न पडावे । समन्वयाचे सूत्र धरावे । अखंड मनी ॥३७॥ दिन आला दिन गेला । परी क्रम अखंड चालला । खंड न नियमाला । जसा निसर्गाच्या ॥३८॥ तृषार्थी तो धावे । म्हणे कीर्तनगंगेचे अमृतजळ प्यावे । आणि अंतरी व्हावे । सदा तृप्त ॥३९॥ मामांचे श्रीराम मंदिर । भक्ता झाले सुखाचे माहेर । प्रहर दोन प्रहर । येती जीवा शांतवाया ॥४०॥ श्रीनारायण महाराजांची माता । श्रीमाईसाहेब यांची योग्यता । जाणे चिमडची जनता । खरोखर ॥४१॥ झाली माता सर्व गावाची । कधी न भेदभाव पहावयाची । म्हणोन चिमडमठ विश्रांतीची । जागा सर्वांना ॥४२॥ ना जातीभेद ना पंथभेद । येथे सर्वत्र अभेद । भक्तजनांना सुखद । चिमडमठ ॥४३॥ सेवाधर्म थोर । श्रीमाईसाहेबांचा सदाचार । पतिवचनाबाहेर । कदा न जाती ॥४४॥ अलिप्त राहून संसारी । नामसंकीर्तन अंतरी । समाधानी वृत्ती बाणली खरी । अंतर्बाह्य ॥४५॥ श्रीरामचंद्र महाराज यरगट्टीकर । श्रीहनुमंत तात्यांचे सद्गुरूवर । श्रीनारायण महाराजांचे पितृवर । आणि पति श्रीमाईसाहेबांचे ॥४६॥ श्रीरामचंद्र पिता । श्रीमाईसाहेब माता । अधिकारी परमार्थी उभयता । कार्य चालविती जगदोद्धाराचे ॥४७॥ एके दिनी माईसाहेब येऊन । त्यांनी सांगली केली पावन । मामांना देऊन दर्शन ।

सुखसंपन्न केले ।।४८।। येथे सांगलीस । मुक्काम केला काही दिवस । नित्य येती कीर्तनास । मामांच्या ।।४९।। भक्तिभावे कीर्तन ऐकून । डोलती आनंदून । समाधानाने अंतःकरण भरून । मामांना म्हणती ।।५०।। ''बापूराव तुमचे कीर्तन । दे माझ्या मनास समाधान । थोर साधन करून । सद्‌गुरू प्रसन्न केले ।।५१।। जो स्वतः तरला । त्याने बुडू न द्यावे दुसऱ्याला । तरीच या संसाराला । सुखरूपत्त्व ।।५२।। आता जडजीवास हाती धरावे । त्यास मार्गदर्शन करावे । चुका सुधारून सांगावे । योग्य मार्ग ।।५३।। ही युगायुगाची नामनौका । कौशल्ये तुम्ही हाका । असाहय्य जन मारितील हाका । त्यांना साह्य करा ।।५४।। तुम्ही आम्हात जाणते । म्हणून तुम्हास सांगते । अभागियास सरते । करा भवार्णवी ।।५५।। सुदैवे तुमच्या शिरी । हे कार्य पडले भारी । परी ज्यास देव तारी । तो सदाचा निर्भय ।।५६।।'' ऐसा सुखसंवाद दोघांचा । जो शुभलाभ सुजनांचा । महोत्सव आनंदाचा । आणि चारित्र्याचा कळस ।।५७।। मामा म्हणती काय झाले ? । जे कधी नव्हते मी चिंतीले । सद्‌गुरूंचे हाती आपुले । भवितव्य असे ।।५८।। होय, नाही कैसे म्हणू ?। कर्ते करविते सद्‌गुरू । तेचि आपुले कर्णधारू । आपण निमित्तमात्र।।५९।। वज्रदेही मामा । चालविती आपुल्या नियमा । श्रीरामी वाढता प्रेमा । ठेवोनिया ।।६०।। परी काळाचा अधिकार शरीरावरी । प्रारब्धाचा जोर भरी । तो काया विकल करी । मामांची ।।६१।। उत्साहे कीर्तन । मामा करिता होई अस्तमान । परी दिवसेंदिवस क्षीण । शरीर होऊ लागले ।।६२।। मोजके अन्न घ्यावे । सदा पथ्याने राहावे । आळसाचे नरडे दाबावे । ठेवोनि दूर विषयसुख ।।६३।। काळाचे आधीन शरीर । ते झाले आता परमार्थपर । शरीर झाले आता बेजार । या काचणीने ।।६४।। तव स्फूर्ती आली रोगांना । म्हणती जाऊ संतदर्शना । देऊ आलिंगना । होऊ



सुखमय ।।६५।। लाभ सत्संगतीचा । आम्हीही घेऊ नित्याचा । पाहू त्यांच्या आचरणाचा । कित्ता कसा तो ।।६६।। रक्तदाब वाढू लागला । तेव्हा कीर्तनास व्यत्यय आला । मग प्रपंच व्यवसाय टाकला । परमार्थासाठी ।।६७।। ठेवून विश्वास ईश्वरावर । संसार टाकला प्रारब्धावर । आता झाले निर्भर । कीर्तनासाठी ।।६८।। एकदा महाशिवरात्रीला । एक विक्रम झाला । मामा उभे राहिले निरूपणाला । सकाळी कीर्तनामागून ।।६९।। अखंड नऊ तास निरूपण । मामा करिती आनंदून । श्रोतेही नेट धरून । कौतुकाने बैसती ।।७०।। तैशीच एक आली पर्वणी । श्रीतुकाराममहाराजांची आठवण म्हणुनी । त्रिशत सांवत्सरिक उत्सव गर्जुनी । लोक करिती ।।७१।। मामांच्याही मनात आले । त्यांनी अखंड साधन ठरविले । आणि ते नऊ तास चालले । निष्ठावंत साधकांसह ।।७२।। परी रोग धरिती शरीराला । तेव्हा या विक्रमाला खंड पडला । मामा म्हणती कीर्तन नेमाला । आता घट्ट धरू ।।७३।। रोग करिती घायाळ । तेव्हा शरीराचे न चले बळ । तरी कीर्तनासी खळ । कधी न पडला ।।७४।। एक वर्ष दोन तपावर । अखंड कीर्तनास आला बहर । भक्तांच्याही उत्साहास भर । आला यावेळी ।।७५।। तव राम म्हणे मामा । आम्ही रौप्य महोत्सवाचा महिमा । प्रेमादरे गाऊ आम्हा । आशीर्वाद द्यावा ।।७६।। मामा म्हणती कशाला । सेवेचा नको बोलबाला । परी भक्तांच्या मनाला । ही गोष्ट न रुचे ।।७७।। खिन्न होता भाविक जन । द्रवले मामांचे अंतःकरण । अनुमती देती मनी नसून । राम आनंदला ।।७८।। झाला अपूर्व सोहळा । असंख्य भक्त झाले गोळा । नामसंकीर्तनाच्या करटाळा । झणझणू लागल्या ।।७९।। उभारिली पताका तोरणे । लखलखाट विद्युद्दीपाने । मंडप शोभे वैभवाने । चित्रविचित्र झालरी ।।८०।। देशोदेशीचे विद्ववर । कळला त्यांना हा प्रकार । सवड

काढून आले सत्वर । संदेश आले इतरांचे ।।८१।। लक्ष्मणबुवा निजामपूरकर। मामांची कीर्ती ऐकून थोर । आले पाहण्या कीर्तन मंदिर । अतिशये संतोषले ।।८२।। लक्ष्मणबुवा थोर कीर्तीचे । कीर्तनकार पहिल्या प्रतीचे । नाव ऐकता लोकांचे । थवे लोटती ।।८३।। ते म्हणती आनंदून । मीही कीर्तनसेवा करीन । रंग भरला तो पाहून । श्रोते होती तटस्थ ।।८४।। करिती गौरव मामांचा । आणि त्यांच्या कीर्तनसेवेचा । तसाच त्यांच्या उज्वल चारित्र्याचा । हर्षभरे ।।८५।। तैसेच दादासाहेब कोटणीस । तात्यासाहेबांच्या गादीचे वारस । आशीर्वाद देण्यास । आले मामांच्या घरी ।।८६।। आल्या संत मंडळींचा । सत्कार झाला प्रेमाचा । थाट त्या शोभेचा । काय वर्णावा ?।।८७।। प्रसादाची खैरात किती । पंक्तीवरी पंक्ती उठती । भक्त हर्षभरे म्हणती । श्रीराम जयराम जयजयराम ।।८८।। सत्कार्याचा महिमा । तेथे उत्साह गाठी सीमा । ओसंडे प्रेमा । तो अवर्णनीय ।।८९।। विद्वद्वर्य आणि प्राचार्य । असूनही करिती देवकार्य । ऐसे श्रीदांडेकर गुरूवर्य । पत्र पाठविती या समयी ।।९०।। कराल या कलिकाली । कीर्तनसेवा मामांची टिकली । रौप्यमहोत्सव पर्वणी आली । हे अभूतपूर्व ।।९१।। टाकी महाराज मुंबईचे । उद्गार ऐसेच प्रेमाचे । काढती जेणे अंतःकरणाचे । बांध फुटती ।।९२।। मामांचे सद्गुरू । श्रीनारायण करूणाकरू । आले जी सत्वरू । चिमडाहून ।।९३।। शिष्य सद्गुरूंचा अंकित । मनोभावे साधनरत । अखंड ज्या प्रिय एकांत । स्वरूपानंदासाठी ।।९४।। जैसा गुरू तैसा चेला । म्हणोन प्रेमसागर उसळला । धावती हाकेला । सच्छिष्याच्या ।।९५।। प्रसिद्धिविन्मुख श्रीनारायण । कोण वेळी येती हे न प्रमाण । पाहोन सर्वजण । तत्पर राहती ।।९६।। तव ते आले प्रातःकाळी । जेव्हा नव्हती विशेष मंडळी । परी सुरू झाली दिवाळी । आगमनक्षणी ।।९७।। शिष्य अधिकारी । गुरू



पूर्णावतारी । खूण पटली अंतरी । प्रसन्न सद्गुरू ।।९८।। थाट पाहून परमार्थाचा । शब्द बोलती कौतुकाचा । आशीर्वाद प्रेमाचा । मिळे सच्छिष्याला ।९९।। हाचि रौप्यमहोत्सवाचा कळस । झाला सोन्याचा दिवस । समाधान शिष्यास । आणि सद्गुरूंना ।।१००।। महोत्सवाचा आनंद उसळला । तो गगनावरून गेला । परी देहयात्रेला । आली उतरती कळा ।।१०१।। काया झाली विकल । तो वैद्य देती निकाल । आता कीर्तन थांबवाल । तरीच औषध योजना ।।१०२।। मामा म्हणती नेमाला । धरून होतील ते उपचार बोला । ना तरी नामस्मरणाला । केला आहेच वैद्यराज ।।१०३।। अखंड व्हावया कीर्तन । या देहाचे कारण । ना तरी विचारतो कोण? । या देहाला ।।१०४।। ध्येयासाठी जीवन । ध्येयासाठी शरीर धारण । ध्येय मानून प्रधान । सदा वर्तणे ।।१०५।। कवडीच्या लाभासाठी ध्येयाची सोडावी लागे मिठी । मग लाभ उठाउठी । काय पदरी पडला ।।१०६।। देह नव्हे साध्य आपुले । ते एक परमार्थाचे साधन भले । परमार्थासाठी कौतुक चाले । देहाचे या ।।१०७।। नामस्मरणावरी भर । ठेवून मामा राहती निर्भर । इतरांच्या समाधानासाठी येरझार । चाले वैद्यांची ।।१०८।। काळ चाल करी देहावरी । तव मामा दिसती देहाबाहेरी । तव काळ चित्ती थरारी । अपयशामुळे ।।१०९।। एकामागून एक । आता रोग पाठवू अलौकिक । कोपे काळ लावी धकधक । मामांच्या मागे ।।११०।। रक्तदाब होता पहिला । तेथे मधुमेह आला वसतीला । रोगराज क्षय घुसला । पाठीच्या मणक्यात ।।१११।। मूत्रपिंडात एक शिरले । कॅन्सर नाव त्याचे भले । ऐसे सुरू झाले हल्ले । एकामागोन एक ।।११२।। एक एक रोग ऐसा । जो चूर करी माणसा । तेथे या चौघांपुढे कसा । निभाव लागावा? ।।११३।। वैद्य आणि डॉक्टर । घरी येती वारंवार । तो मामा सुखसागर । दिसती त्यांना ।।११४।। रोग्याच्या

तक्रारीला । अनुसरून वैद्य शोधी रोगाला । जेथे वावचि नाही तक्रारीला । तेथे कैची परीक्षा ।।११५।। सगे सोयरे हितचिंतक । येती मामांच्या नजीक । म्हणती आता प्रकृती ठीक । आहे की कसे ।।११६।। तव मामा सुहास्यवदन । म्हणती ठीक आहे प्रकृतीमान । रोज करितो कीर्तन । ही साक्ष त्याची ।।११७।। तव काही साक्षेपी लोक । म्हणती चेहऱ्यावरी न दिसे ठीक । रोगाचे न मोडले बीक । वाटे तुमच्या ।।११८।। तो मामा देती प्रत्युतर । जव वृद्धपण गाठी घर । तव हे असेच चालणार । मी आहे सुखरूप ।।११९।। मामांचे चाले कीर्तन । तव हे रोग दीन वदन । राममंदिराबाहेर उभे राहून । वाट पाहाती ।।१२०।। रोगांची वस्ती शरीरी । फिकीर त्याची न दिसे चेहऱ्यावरी । जेथे ब्रह्मानंदाच्या लहरीवरी । लहरी उठती ।।१२१।। परदुःखाची जाणीव । मामांच्या अंतःकरणाचा घेई ठाव । दुःख विमोचनार्थ सर्व । प्रयत्न मामा करिती ।।१२२।। शरयू नामे एक कन्या । मामांच्या चरणी झाली अनन्या । तो इतिहास आता न्या । श्रोते हो आपुल्या कर्णी ।।१२३।। बालवय शरयूचे । परी वेड मामांच्या कीर्तनाचे । नित्य नेमे वदे वाचे । नाम ईश्वराचे ।।१२४।। ऐकता ऐकता तल्लीन । विसरे देहभान । धरी मामांचे चरण । कीर्तनरंगी ।।१२५।। लोक म्हणती हे काय?। याला शोधा काही उपाय । हा कीर्तनात व्यत्यय । येतो रिकामा ।।१२६।। कोणी म्हणती बंद करा । नको हिला मामांचा वारा । कठोर शब्दांचा मारा । झाला तिच्यावरती ।।१२७।। शरयू भोळी बालिका । मारी मामा, मामा हाका । म्हणे देवराया आता ऐका । हाक माझी ।।१२८।। माता आणि पिता । समजाविती आपुली सुता । परी ती दुःखिता । रडे आणि आक्रंदे ।।१२९।। म्हणती ऐक बाळ । सांगलीत कीर्तनाचा सुकाळ । दाखवू रोज एक देऊळ । तुजसाठी ।।१३०।। नको करू हळहळ । जीवाची तळमळ । ऐकून तुझा कल्लोळ । काळीज करपे



आमुचे ।।१३१।। तव ती म्हणे देवाधिदेवा । आस मामांची लागली जीवा । माझ्या निजसौख्याचा ठेवा । एक मामांचे कीर्तन ।।१३२।। शब्द नको दुसरा । मजवरी देवा दया करा । मामांच्या चरणांचा आसरा । एकचि मला असो द्या ।।१३३।। अश्रु ढाळी नयनी । कळी गेली कोमेजूनी । पिता म्हणे जाईन सदनी । आता मामांच्या ।।१३४।। आले मामांच्या घरी । तो मामा उघडेच होते गादीवरी । म्हणती शरयु आकांत करी । मामा तुमच्यासाठी ।।१३५।। तुमचे कीर्तन ऐकावे । हेचि तिने घेतले जीवे भावे । तिजसाठी दार उघडे व्हावे । हेच मी प्रार्थितो ।।१३६।। ऐसे म्हणून प्रेमळ वडील । धरिती मामांचे चरण कमळ । मामांचे अंतःकरण कोमल । हेलावले ।।१३७।। लगबगीने उठले । आणि घराबाहेर पडले । कपडे घरी राहिले । मामांची लगबग रस्त्यावरी ।।१३८।। मागे वडील पुढे मामा । दुःखितासाठी इतुका प्रेमा । आले घरी सांडून गृहकामा । शरयूच्या सांत्वनासाठी ।।१३९।। श्रीराम थांबले शबरीसाठी । श्रीकृष्ण द्रौपदीसाठी । तैशीच ही कथा मोठी । वाटे मज ।।१४०।। शरयू मनी आनंदली । मामांचे चरणी विनटली । अश्रुंचा अभिषेक घाली । चरणांवरी ।।१४१।। शरयू तू दुःख आवरी । नित्यनेमे कीर्तन श्रवण करी । कोणी न तुज निवारी । येथून पुढे ।।१४२।। करोनी संसाराची होळी । झाली नामरूपा निराळी । मामांची सेवा सर्वकाळी । करी मनोभावे ।।१४३।। जे उमज पडेल ते काम । करी सर्वभावे उत्तम । हे गौण हे प्रधान हा तरतम । भाव तिच्या जवळी नसे ।।१४४।। ऐसा देह कष्टविणे । हे तपासी काय उणे । हे अखंड भाग्याचे लेणे । भाग्यवंतासचि मिळे ।।१४५।। ही सेवा पाहता । उल्हास ये माझ्या चित्ता । जिथे आमची कर्तृत्त्वता । फिकी पडे ।।१४६।। तिची माता आणि पिता । भाविक

तैशीच उभयता । तिच्या सेवेने संतुष्टता । ये त्यांच्याही चित्तासी ।।१४७।। कन्या संसार पराङ्मुख । आणि माता पित्यासी हरिख । ऐसे अपवादात्मक देख । संसारी असती ।।१४८।। मामांची करावी सेवा । चित्ती साठवावा नामठेवा । संसार सुखाची कधी न पर्वा । हे कथन शरयूचे ।।१४९।। सेवेत मानून आनंद । ती प्रसन्न करी श्रीगोविंद । करी मामांच्याशी सुखसंवाद । परमार्थाचा ।।१५०।। सदा रत साधनी । कधी न दिसे अभिमानी । कार्यमग्न अनुदिनी । दिसे सदा ।।१५१।। नित्य नेम मामांचा । श्रीहनुमंत समाधीमंदिरी जाण्याचा । प्रातःकाळी आवडीचा । ऐसे प्रेम तात्यांचे ।।१५२।। हळू हळू उठती । कोणाचा तरी आधार घेती । शरयूची भक्ति । मामांच्यावरी मोठी ।।१५३।। ती नेई मामांना । जीवे भावे जपे त्यांना । अति आनंद तिच्या मना । सेवेत मामांच्या ।।१५४।। ती म्हणे मामा । मज नेती पुण्यधामा । या सुखास उपमा । शोधू कोठे ।।१५५।। संत भेटती संतांना । ते सुख माझ्या नेत्रांना । नित्य नवे वाटते मना । आनंदी आनंद ।।१५६।। यमुना मिळाली गंगेला । तैसे मामा भेटती श्रीहनुमंतांना । कीर्तन सरितांच्या संगमाला । स्नान घडते नित्य मज ।।१५७।। सद्‌गुरूवचनाची खूण आत । तीच सरस्वती गुप्त । हा त्रिवेणी संगम सतत । साधे कोणा?।।१५८।। भजन कीर्तन साधन । राम करी ज्ञानेश्वरी प्रवचन । भक्तांचे शंकानिरसन । हा क्रम अव्याहत ।।१५९।। लोक येती राममंदिरी । संसारदुःख ठेवूनी घरी । मामांच्या चरणांवरी । मस्तक ठेविती ।।१६०।। क्षणभर पाहोन प्रसन्न वदन । जाती मग आनंदून । हृदयी सद्‌विचारजल साठवून । ओतिती संसार दुःखावरी ।।१६१।। काशी प्रयाग रामेश्वर । गोकर्ण आणि बद्रीकेदार । अयोध्या द्वारका पंढरपूर । या राममंदिरी असे ।।१६२।। येणे परी काल क्रमिता । वर्षे लोटली बहुता । साठी उलटून गेली न कळता । कार्यमग्न



मामा असती ।।१६३।। माईसाहेब दांडेकर । म्हणती आणखी न करावा उशीर । साठीशांतीसाठी बोलवा सत्वर । शुद्ध आचारशील ब्राह्मण ।।१६४।। माईसाहेबांनी हट्ट धरिला । म्हणती जरी उशीर झाला । तरी समारंभ पाहिजे केला । यथासांग ।।१६५।। मनी आणिती ते करिती । ऐसी माईसाहेबांची ख्याती । त्यांनी केली पूर्ती । आपुल्या वचनाची ।।१६६।। ऐसे असंख्य भक्त मामांचे । अकृत्रिम प्रेम त्यांचे । तन मन धन वेचून स्वतःचे । आनंद मानती ।।१६७।। धर्मकृत्य यथासांग । झाले परिपूर्ण सर्वांग । जेणे धाले अंतरंग । भक्तजनांचे ।।१६८।। रसाळ चरित्र मामांचे । भाग्य खरे वाचकांचे । कारंजे ब्रह्मरसाचे । उडती येथे ।।१६९।। क्षणोक्षणी मज वाटते । माझे सामर्थ्य कमी पडते । वर्णन करण्या चरित्र पुरते । मामांचे ।।१७०।। फिर फिरून मिटून लोचन । करितो सद्गुरूस्तवन । मागतो करा न्यून पूर्ण । या ग्रंथी ।।१७१।। तुमच्या कृपेचा मेघ वळता । आनंद उसळेल गगनावरूता । माझे शब्द तेथे न्हाता । पावतील मोल रत्नांचे ।।१७२।। म्हणोनिया वारंवार । मस्तक ठेवितो चरणांवर । विनवितो जी सद्गुरूवर । करा कृपा मजवरी ।।१७३।। जैसे तुमचे आचरण । तैसेच व्हावे माझे वर्णन । तेथे नसावे अधिक न्यून । ही माझ्या मनी भावना ।।१७४।। चरित्र तुमचे कामधेनू । निववील तनु आणि मनु । करील मार्ग सुगमु । कैवल्याचा ।।१७५।। आता पुढील अध्यायी । पाहू त्रितप महोत्सवाची नवलाई । भक्तिरसाची पाणपोई । रस चाखू तेथील ।।१७६।।

इति श्रीगोविंदचरितमानस । जे स्वभावेची अति सुरस । जेथे अखंड उसळेल भक्तिरस । रौप्यमहोत्सव वर्णन नाम अष्टमोध्याय ।।८।।

***

अध्याय नववा

## त्रितप महोत्सव वर्णन

यज्ञ दान तप उत्तम । त्याहून श्रेष्ठ गुरुनाम । ते जपता ठेऊन प्रेम । अंतरात ।।१।। थोर प्राप्ती तेणे मिळे । हे ज्या सद्गुरूंचेनि कळे । त्यांची चरण कमळे । सद्भावे वंदितसे ।।२।। प्रयत्नेवीण जो प्रयत्न । तेथे साधकाचे लक्ष वेधून । ज्यांनी दिले समाधान । त्यांचे चरण वंदू आता ।।३।। कुलकर्णी नामदेव एक । वय लहान परी थोर भजक । म्हणे जन्मा येईन आणिक । मामांच्या घरी ।।४।। आला काळाचा घाला । गेला देवाच्या घराला । परी ध्यास त्याला लागला । मामांचा ।।५।। म्हणे अखंड मिळेल सेवा । तोच लाभ मोठा जीवा । मामा दादा आळविती देवा । मीही नाचेन रंगणी ।।६।। मामांचे चाले कीर्तन । तोही नाचे आनंदून । भावभक्ति समाधान । भोगिले त्याने ।।७।। मामांचे शुद्ध आचरण । दे सर्वास समाधान । कोणी काही उपाय योजून । संबंध जोडी मामांच्याशी ।।८।। कोणी करी देवाची स्थापना । कोणी करी उद्घाटना । मामांच्या अध्यक्षस्थाना । पाचारोनी ।।९।। सेनामंदिर पायाभरणी । झाली मामांचेकडोनी । तेथे त्यंचे कीर्तनी । प्रेमभरे ।।१०।। ढवळे तालमीत । शिवरायाचा उत्सव होत । मामा तेथ कीर्तना जात । प्रतिवर्षी ।।११।। मंगलधामाचे उद्घाटन । झाले मामांचेकडोन । महादेवराव करविती आपण। अत्यादरे ।।१२।। कैवल्यधामी भीमराय स्थापना । लाळगे विठ्ठल रुक्मिणी स्थापना ।*कुलकर्णी सीताराम स्थापना । झाली मामांच्या हस्ते ।।१३।। मुजुमदार विष्णुमंदिरी । दत्तोपंत बापट दत्तमंदिरी । दादा कुलकर्णी यांचे



घरी । मामा कीर्तनी तल्लीन होती ।।१४।। विद्युद्दीप प्रगळीकरण । नृसिंहवाडीचे जे भूषण । मामांच्या हस्ते उद्घाटन । नातू शेठ करिती ।।१५।। तेथेही कीर्तन । दत्तगुरूंनी करविले आपण । त्याचे करिता कौतुक वर्णन । शब्दही थिटे पडती ।।१६।। कुरुंदवाडी घाटावर कीर्तन । झाले तेव्हा दत्तगुरू आपण । आले होते आनंदून । दर्शन देण्या ।।१७।। संगमावरी उमटली । पाण्यावरी श्रींची पाऊले भली । अनेकांनी पाहिली साक्ष त्याची ।।१८।। गणपती मंदिरात कीर्तन । झाल्यावर करिती देवदर्शन । प्रसादपुष्पे मस्तकावर गळून । पडली वारा नसताही ।।१९।। औदुंबरी दत्तगुरूंची । दुपारी वेळ विश्रांतीची । मामांना कीर्तन सेवा करण्याची । इच्छा झाली ।।२०।। सुरू झाले कीर्तन । तो पुजाऱ्यास दृष्टांत देऊन । श्रीदत्तगुरूंनी त्यांचेकडून । दारे उघडून घेतली ।।२१।। ब्रह्मनाळी आम्रफळ । प्रसाद घेऊन प्रेमळ । सिद्ध प्रगटोनी तात्काळ । देती कीर्तनाचे शेवटी ।।२२।। आळंदी क्षेत्री मामा असता । काय वर्तले ऐका आता । कीर्तनाची परवानगी मागता । पंच देती नकार ।।२३।। श्रीज्ञानदेवांनी काय केले । पंचांचे अंतर पालटविले । पंच स्वतः कीर्तनास बसले । प्रसाद नारळ दिला मागुती ।।२४।। तैसेच देहूत भंडाऱ्यावरी । श्रीतुकाराममहाराज सेवा घेती खरी । मामांचे कीर्तन झाल्यावरी । प्रसाद शेंगा दिल्या कोणी ।।२५।। कीर्तन मंदिर उद्घाटन । वासुदेवराम करिती आनंदून । मामांच्या हस्ते पुण्यपावन । कीर्तन मंदिर झाले ।।२६।। तुंगालाही एकदा कीर्तन झाले । श्रीमारुतीराय प्रगट झाले । निजस्वरूप प्रकाशले । मामांच्या

टीप :– कै.सखुबाई कुलकर्णी यांची मामांच्यावर श्रद्धा असून श्रीराममंदिर बांधणेची व प.पू.मामांच्या हस्ते स्थापना करणेची त्यांची उत्कट इच्छा होती. पण चौथऱ्याचे काम झाल्यावर त्या कैलासवासी झाल्या. श्रीमती दुर्गाताई पंडे यांनी त्याची पूर्तता केली. त्या श्रीसीतारामाची स्थापना श्रीमामांच्या हस्ते झाली.

कीर्तनी ।।२७।। कीर्तन सेवा मनोभावे । झाली हे जना झाले ठावे । आता मामांच्या स्वभावे । घेतले आणिक ।।२८।। कीर्तनसंस्था टिकावी । जिज्ञासूंची सोय व्हावी । म्हणोन तयार करावी । आणीक मंडळी ।।२९।। ऐसे मनी योजून । ठेविले अनुसंधान । आले त्यांच्या इच्छामात्रेकरून । पुढे काहीजण ।।३०।। घरी राम करी कीर्तन । मामांचे कृपाछत्र पूर्ण । त्याच्यावरी म्हणोन । रामरंगे कीर्तनी ।।३१।। नाही शोधिले विद्यालय । मग कोठे विश्वविद्यालय । परी सद्गुरूंचे पाय । त्याने दृढ धरिले ।।३२।। वय होते लहान । तेव्हाच गुरूकृपापूर्ण । नवल त्या कृपेचे महिमान । सामान्यास नुमगे ।।३३।। बालपणी शुभाशिर्वाद । श्रीहनुमंत तात्यांचा सुखप्रद । मिळता महाप्रसाद । उमटती अंगी ।।३४।। सद्गुरूंची कृपादृष्टी । करी आशीर्वादाची वृष्टी । हा बोलू लागे गोष्टी । अध्यात्माच्या ।।३५।। घरी वेदांताचे पीक आले । त्यातच या बाळाने बाळसे धरिले । नाचू बागडू लागले । अध्यात्मांत ।।३६।। शब्द येता मुखीचे । ते बोल वाटती उपनिषदांचे । आता श्रीगुरूलिंगजंगमांचे । लक्ष वेधले रामाकडे ।।३७।। प्रसाद गीता कानडीतून । कानडीचा गंधही नसून । श्रीनारायण प्रसादवचन । स्फुरे अंतरी ।।३८।। जे स्फुरे अंतरी । ते राम साठवी हृदयांतरी । त्याचा पूर्ण ठसा कागदावरी । उमटे मागुती ।।३९।। कितीतरी कानडी काव्य आले । हे एक नवल वर्तले । त्याचा त्यासीही अर्थ नुकले । ग्रंथ गर्भीचा ।।४०।। केले मग सद्गुरूस्तवन । होता आले कृपादान । अर्थ मिळे संपूर्ण । मराठी भाषेमध्ये ।।४१।। जेथे सद्भक्त आणि संत । तेथे काळावरी झाली मात । ऐसे आकर्षण जबरदस्त । गुरूशिष्यांचे ।।४२।। शिष्य झाला अधिकारी । मग गुरू त्याचा शोध करी । येती देहही ठेविल्यावरी । धुंडीत त्यासी ।।४३।। ऐशा अनंत घटना । सच्चरित्री पहाना । विकल्प मुरडतील माना । अभाविकांचेही ।।४४।। संत सत्स्वरूपी



मिळाले । त्यांचे भूत भविष्य सरले । ते सदा वर्तमानी राहिले । भक्ताकारणे ।।४५।। तीव्र स्मरण होता धावती । हेत मनीचे पुरविती । आणि सदा जागते ठेविती । परमार्थ विषयी ।।४६।। राम झाला घरचा । वारसदार मामांचा । आणिकही इतरांचा । उल्लेख करू ।।४७।। सूर्य रामपुत्र चतुर । राही कीर्तना विषयी तत्पर । वय लहान परी विचार परमार्थाचा ।।४८।। पिता प्रपिता पाठीशी । मग काय चिंता त्यासी । अखंड साखळी जोडण्यासी । मामा योजिती मनात ।।४९।। गणपतराव कानिटकर । निष्ठा मामांच्यावरी थोर । गौण मानोन संसार । कीर्तन करिती ।।५०।। विनायकराव बंधू त्यांचे । वेड त्यांनाही कीर्तनाचे । गावोगावी भक्तिप्रसाराचे । काम करिती ।।५१।। वासुदेवराव जोशी । माधवनगरचे रहिवासी । मिळाले या कीर्तन गंगेसी । एकसरे ।।५२।। बापुराव बंधू त्यांचे । कीर्तनात लक्ष ज्यांचे । पदवीधर विश्वविद्यालयाचे । परी लक्ष अध्यात्मात ।।५३।। उमाबाई भक्तीने । रंगविती कीर्तने । गावोगावी जनमने । बोधिती भक्तिसाठी ।।५४।। कुणी एक नरहरी । हाती कीर्तनाची झांज धरी । मामांच्या कौतुकावरी । तुष्ट सदा ।।५५।। प्रतापसूर्य मामांचा । प्रकाश पसरे किरणांचा । विळखा त्यांच्या प्रेमकरांचा । असे सर्वांसी ।।५६।। पार्वतीबाई बोडस । उभ्या राहती कीर्तनास । मामांच्या गुणगौरवास । मनोभावे करिती ।।५७।। तैशाच अक्कूताई मणेराजुरीकर । करिती हरिकीर्तन गजर । मामांच्यावरी भक्ति फार । कीर्तनी वर्णिती ।।५८।। ऐसे हे ओघ गंगेचे । पसरले कीर्तनाचे । घरोघरी त्याचे । कौतुकची होई ।।५९।। सत्ता सद्गुरूंची वरती । देशपांडे अक्कूताई ज्ञानेश्वरी सांगती । असो नमस्कार चरणाप्रती । सद्गुरूंच्या ।।६०।। निमित्तमात्र इतर जन । सद्गुरू करविती कार्य आपण । ही अंतरी राहता खूण । अखिल जीवन कृतार्थ होय ।।६१।। त्यांच्या कृपेवीण काय बोलावे । हे न कळेचि

स्वभावे । आणि कळ फिरता व्हावे । वक्ता दशसहस्रेषु ।।६२।। नामामृत कर्णोपकर्णी । शिरावे सर्वांच्या म्हणुनी । व्याप केला सद्‌गुरूंनी । तो झाला सफळ ।।६३।। माई दांडेकर पालघरी । करिती कीर्तन विठ्ठल मंदिरी । आशीर्वाद मामांचा त्यांच्यावरी । म्हणोनिया ।।६४।। ऐसा कीर्तनाचा महिमा । वाढला त्या नाही सीमा । म्हणोनी सर्वांना मामा । प्रिय झाले ।।६५।। मामा करिती कीर्तन गजर । आणि सगळे श्रोते साथीदार । ऐसा कोठे प्रकार । ऐकिला का हो कोणी ।।६६।। परी येथे दृश्य ऐसे । मामांना नाठवे ऐसे जेव्हा दिसे । तेव्हा श्रोते सुचविती पद योग्यसे । जे मामांच्या मनी ।।६७।। संतोष मामांना । आणि प्रिय श्रोत्यांना । प्रेमभरे डोलती माना । सर्वांच्या ।।६८।। प्रतिवर्षी हनुमंतषष्ठीला । मामा समाधीत जाती कीर्तनाला । सेवा सद्‌गुरू चरणाला । अर्पावया ।।६९।। तोही नेम अखंड चाले । जरी शरीर विकल झाले । आणि प्रारब्धाचे घाले आले । शरीरावरी ।।७०।। सहा दिवस कीर्तन । दिले समाधीत नेमून । जणू मामांचे सिंहासन । मानाचे ते ।।७१।। ऐसे गंगाधरराव सिंग । बोलले वाणी अभंग । ज्यांनी समाधीसेवेस अंग । झिजविले आपुले ।।७२।। मामा कीर्तन करिती । आणि श्रीहनुमंत डोलती । सेवेचे मोल चित्ती । धरोनिया ।।७३।। मामा सशरीरी अशरीर । देही विदेहीपण भोगणार । म्हणोनि नेम खडतर । चाले मामांचा ।।७४।। ऐसे दिवस चालले । तो काळाचे माप भरले । लोक म्हणो लागले । मामा दिसती अशक्त ।।७५।। सीता रामाची प्रियपत्नी । करी सेवा मामांची आवर्जुनी । प्रेमभाव मनी ठेऊनी । जपे मामांना ।।७६।। मामा अति नेमस्त । मोजकेच घास घेत । तव सून म्हणे मनात । शक्ति टिकेल कैसी ।।७७।। अन्नमय हे शरीर अन्नाशिवाय । कैसा आधार । आणि मामा अंथरूणावर । आता काय उपाय ।।७८।। मग ती काय करी । एक एक घास मोठा भरी । आता शक्ती



टिकेल बरी । म्हणे मनाशी आपुल्या ।।७९।। तिचा सद्‌भाव ओळखून । मामा होती प्रसन्न वदन । म्हणती सून युक्तिवान । असे मोठी ।।८०।। चार नातू मामांचे लडिवाळ । चंद्र सूर्य अनल अनिल । खेळ सोडून कीर्तनात ताल । धरिती मामांच्या ।।८१।। अनंतातून गोविंद आला । आत्माराम पुत्र शोभला । इडा पिंगला सुषुम्नांचा संगम झाला । तो चौथा नातू अनिल ।।८२।। सूर्य एके दिवशी म्हणे मामांना । मज काही सांगा उपासना । करावे नामस्मरण हे मना । येई माझ्या ।।८३।। तुम्हीच करावे मार्गदर्शन । ऐसे सांगे माझे मन । त्याची इच्छा परिपूर्ण । केली मामांनी ।।८४।। बालक म्हणोन उपेक्षिले । ऐसे मामांनी कधी न केले । लहान थोरांचे सदा केले । परम कल्याण ।।८५।। जो जो भक्तिभावे आला । आणि मामांच्या चरणी लागला । त्याला सरता केला । परमार्थ पंथी ।।८६।। कोणी संसार दुःखासाठी । कोणी परमार्थ लाभासाठी । कोणी संकट विमोचनासाठी । घे भेटी मामांची ।।८७।। नामस्मरण औषधराज । पुरवी मनीचे सर्व काज । मार्ग दाखवी सहज । कैवल्याचा ।।८८।। श्रीतुकारामांचे बारा । प्रसाद अभंग पाठ करा । नित्यनेमे उच्चारा । तोही लाभ मोठा ।।८९।। जो अर्थ तेथीचा । तो जरी ठसेल कायमचा । तरी शेवट संसार दुःखाचा । सहजचि आहे ।।९०।। ऐसे मार्गदर्शन मोलाचे । होते मामांचे । म्हणोनि लक्ष लोकांचे । वेधले मामांच्याकडे ।।९१।। मामा एक थोर अधिकारी । लोक उठले जयजयकारी । कोणी सत्कारासाठी त्वरा करी । परी मामा अढळ ।।९२।। ध्वजा तोरणे उभारावी । थोर मंडळी बोलवावी । सभा सत्काराची करावी । धमाल मोठी ।।९३।। भास्कर दत्तात्रय लिमये । यांच्या मनास ऐसेच ये । म्हणोनी आदरे करती जा ये । मामांच्या घरी ।।९४।। प्रसंग साधून गीता जयंतीचा । लिमये ठाव घेती मामांच्या मनाचा । म्हणती हट्ट

पुरवावयाचा । तुम्ही हा ।।९५।। आम्ही तुमचा गौरव करावा । हा विचार आमुचा बरवा । गीता जयंतीचा व्हावा । दिवस निमित्त मात्र ।।९६। मामा म्हणती ऐका म्हणणे । जरी समारंभ असेल करणे । तरी नामस्मरणास बसू एकत्रपणे । करू आरती शेवटी ।।९७।। दिवस गीताजयंतीचा । हाच थोर समारंभ । जो भगवत्प्रसादाचा । सर्वजण ।।९८।। हाच थोर समारंभ । जो जीवन्मुक्तीच्या कार्याचा आरंभ । सोडोनि दर्प आणि दंभ । स्थिर रहावे साधनी ।।९९।। मी देवाची सेवा करितो । सेवेचा गौरव काय तो । म्हणोन म्हणतो । हे विघ्न कशासाठी ।।१००।। करणे आहे गीताजयंती । तरी वाढवावी गीतेची महती । मज सामान्याची कशास कीर्ती । त्या ठिकाणी ।।१०१।। सत्काराचा बेत रद्द करून । दिले मामांना अध्यक्षस्थान । त्यांच्या गुणगौरवपर भाषण । एकेकांनी केले ।।१०२।। समारंभ झाला कीर्तनमंदिरी । वासुदेवराव जोशी यांचे घरी । दुधाची तहान ताकावरी । भागविली भक्तांनी ।।१०३।। समारंभ ग्रंथ प्रकाशनाचे । झाले मामांच्या घरी महत्त्वाचे । वैभव त्या समयाचे अवर्णनीय ।।१०४।। श्रीहनुमत्गुरूचरित्र सार । हा मामांचा ग्रंथ थोर । लहान त्याचा आकार । परी साधन मार्ग विशद केला ।।१०५।। श्रीदादासाहेबांचे हस्ते झाला । प्रकाशन समारंभ भला । वंदनीय पूजनीय झाला । म्हणती ग्रंथ ।।१०६।। श्रीज्ञानदेव तेहत्तिसी । त्याची महती वर्णू कैशी । जो झोंबेल अर्थाशी । ऐसा श्रोता दुर्लभ ।।१०७।। राम त्यावरी टीका करी । ग्रंथ गर्भीचा अर्थ स्पष्ट करी । प्रकाशन समारंभाची सरी । वर्णिता नये ।।१०८।। श्रीगुरूसिद्धाप्पा अध्यक्षस्थानी । आनंदे ग्रंथ प्रकाशन करूनी । लाभ भाविक श्रोत्यांनी । घेतला त्याचा ।।१०९।। श्रीकाकासाहेब तुळपुळे म्हणती । ग्रंथ मूळ अवघड किती । त्याचा अर्थ यावया चित्ती । ही टीका उद्‌बोधक ।।११०।। वासुदेवआण्णा कामत । अपरोक्ष ज्ञान साक्षात्कार



ग्रंथ लिहित । ग्रंथ त्यांचा सर्व संमत । प्रसादवाणी कामतांची ।।१११।। मामांच्या आशीर्वादे प्रकाशन । व्हावे ही इच्छा धरून । मामांच्या घरी समारंभ करून । हेतू त्यांनी साधिला ।।११२।। संत सज्जनांचे अंतःकरणी । मामा राहिले वास करूनी । सुख मिळे सुखालागूनी । लाटा गगनी उसळती ।।११३।। कीर्तीध्वज फडके डौलाने । सुखवित राहिला सज्जनांची मने । या परते भाग्य इच्छिणे काय आहे ।।११४।। परी रोग करिती विकल काया । चिंता सर्वांच्या हृदया । लोक म्हणती रघुराया । तूचि एक आधार आता ।।११५।। आधाराशिवाय बसणे । आधाराशिवाय उठणे । खाणे पिणे जेवणे । सारेचि झाले अवघड ।।११६।। आधी एक वृद्धावस्था । त्यावरी रोग चालविती सत्ता । चौफेर हल्ला होता । काय चालेल शरीराचे ।।११७।। मामा मोठ्या धीराचे । अति थोर आत्मबल त्यांचे । घाव सोशिती प्रारब्धाचे । सुहास्य वदने ।।११८।। शरीराची अधोगती । तरीही नित्यनेम नेटे चालती । समाधान चेहऱ्यावरती । लोक होती विस्मित ।।११९।। दिवस आला राम नवमी । म्हणती उठून कीर्तन करीन मी । कोण ही उत्साहाची उर्मी । कोण विसर हा शरीराचा ।।१२०।। अंगी ताप सणाणे । तरीही कीर्तनास उठून बसणे । उत्साहे रंगणे । नामसंकीर्तनी ।।१२१।। हे प्रेम रघुरायाचे । हे आकर्षण नित्यनेमाचे । हे आकर्षण भजनाचे । कोठे दिसेल सांगा ।।१२२।। अंतरीची जागरूकता । दाखवावया जगता । ही बाह्य नेमांची कठोरता अंगिकारिली मामांनी ।।१२३।। ते जरी आत्मस्वरूपी राहते । तरी शरीर काय त्यांना कष्ट देते । परी जडजीवांचे उद्धारकर्ते । न लेखिती शरीर कष्ट ।।१२४।। प्रारब्धाचा घाला शरीरावरी । परी मामा दिसती सदैव बाहेरी । सत्ता चालविती काळावरी । सस्मित वदने ।।१२५।। आता त्रितप महोत्सवाच्या। नौबती झडू लागल्या भाग्याच्या । पताका धवल यशाच्या । फडकल्या

डौलाने ।।१२६।। गावोगावीचे संत सज्जन । प्रांतोप्रांतीचे श्रेष्ठ जन । आतुर घेण्या शुभदर्शन मामांचे ।।१२७।। त्यांना त्रितप महोत्सव ही पर्वणी । म्हणती आता चुकवू नका कोणी । चला जाऊ झणी । सांगलीला ।।१२८।। निमंत्रणे त्रितप महोत्सवाची । लिहून धाडिली प्रेमाची । ती झाली अनंत पटीची । कल्पना न करवे ।।१२९।। निमंत्रण पोचले एकाला । तो ते पाठवी दुसऱ्याला । तो तिसराही म्हणे चला । सांगलीस जाऊ ।।१३०।। अहो या संत दर्शनाला । कोण विचारतो निमंत्रणाला । चला जाऊ सुक्षेत्राला । शांतवाया मन ।।१३१।। कोण जाणे कोण वेळ । चला हेच शुभमंगल । कान डोळे निवतील । संत दर्शने ।।१३२।। जातीभेद मावळले । पक्षोपपक्ष थंडावले । ज्यांच्या त्यांच्या हृदयात शिरले । मामा त्यांचे ।।१३३।। श्रीराम जयराम जयजयराम । हाचि जीवासी आराम । उत्सवाचा अनुपम । आनंद लुटू ।।१३४।। अशी प्रेरणा किती एकांना । अनोळखीही माणसांना । कैशी झाली पहाना । याच वेळी ।।१३५।। श्रीराम सुचवी अंतरात । ज्याच्या त्याच्या मनात । दिवस होतसे अस्तंगत । आता सुवेळ दवडू नका ।।१३६।। नातरी कष्टी व्हाल । संत दर्शनी अंतराल । भाग्य हातचे जाईल । काळ मोठा खडतर ।।१३७।। उभारिली पताका तोरणे । लोक जमले आनंदाने । ऐकती कीर्तन प्रवचने । करिती घोष नामाचा ।।१३८।। कैसे ईश्वराचे सूत्र फिरे । तो कोणाच्या बुद्धित कसा शिरे । झाले अघटितचि सारे । यावेळी ।।१३९।। काडसिद्धपीठ मूळ । या सांप्रदायाचे प्रबळ । तेथेही फिरली कळ । अलौकिक झाले ।।१४०।। त्यांना कळले कोणाकडुनी । की सांगलीस एक नाम संकीर्तनी । नित्यनेमे रमले प्रतिदिनी । झाली वर्षे छत्तीस ।।१४१।। आनंदे फुलले अंतःकरण । आले कामे बाजूस सारून । संत तेथेच संतजन । हे सूत्र ईश्वराचे ।।१४२।। प्रेरणा झाली ईश्वरासी । तेथे मात्र न चले



लौकिकाची । लाट उसळली आनंदाची । आले काडसिद्ध महाराज ।।१४३।। प्रसाद ईश्वराचा । आशीर्वाद पीठाचा । घेऊन सांगलीचा । मार्ग श्रींनी धरिला ।।१४४।। उफाळला महासागर । मग वेग कैसा आवरणार । आनंदी आनंद थोर । प्रसन्नता साकारली ।।१४५।। महाराजांची आणि मामांची । दृष्टादृष्ट होता उभयतांची । दाटी झाली प्रेमाश्रूंची । सुख भेटले सुखाला ।।१४६।। मूळपीठ सद्गुरूचरण । मामा घालीती लोटांगण । प्रेमभरे आलिंगन । अवर्णनीय सुखसोहळा ।।१४७।। श्रीराम सिंहासनी । आणि संत भेटती संतालागुनी । हे दृष्या पाहिले मी नयनी । सुखावलो सुखावलो ।।१४८।। आनंद झाला महाराजांना । तो त्यांना शब्दाने बोलवेना । परी कळले लोकांना । हे अबोल बोल ।।१४९।। शब्दांची धाव किती । हे सौख्यचि अनुपमेय जगती । शब्दा आधी शिरे चित्ती । चाकाटे मन एकसरे ।।१५०।। सद्गदित् अंतःकरण । महाराज बोलती प्रसादवचन। जेणे संतोषले मन । श्रोत्यांचे ।।१५१।। ''अनेक गावे आलो फिरून । परी कोठे न रमले माझे मन । या कीर्तन गंगेत स्नान । करिता धाले चित्त माझे''।।१५५।। अखंड ध्यास परमार्थाचा । वीट मानोन संसाराचा । रंग उसळे जो ईशप्रसादाचा । पाहोन संतोषलो ।।१५३।। संसार करावा नेटका । परी तो कुचका आणि मोडका । तो झाला येथे फिका । दिसतो मज ।।१५४।। सात्विक भाव मनी उठती । आदरे मस्तक लवती । थोर पुण्याची महती । ऐसे मामांचे दर्शन ।।१५५।। धन्य भाग्य सांगलीचे । म्हणोन वास्तव्य संतांचे । आणि स्थान विश्रांतीचे । आल्या गेल्या ।।१५६।। महाराजांची मधुर वाणी । पडली ज्यांच्या ज्यांच्या कर्णी । हृदय उचंबळे आनंदुनी । त्यांचे त्यांचे ।।१५७।। प्रेम संतांचे । असे निःस्वार्थ बुद्धिचे । म्हणोनि भरते ये आनंदाचे । त्या मोलचि नसे ।।१५८।। निर्व्याज प्रेम संत करिती । म्हणोनि तेथे देवही डोलती । त्या भक्तिप्रेमांत आनंद किती कोण

सांगू शकेल ।।१५९।।

**मच्चित्ता मद्गतःप्राणाः बोधयन्तः परस्परम् ।**
**कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्तिच रमन्तिच ।।भ.गी.।।**

ज्यांनी अंतःकरण आपुले । ईश्वरास अर्पण केले । बोधमय जीवन झाले । त्यांचे सर्वांसी ।।१६०।। सांडून विषयाची चिंता । ज्यांनी देवचि आणिला चित्ता । सदासर्वदा देवाचीच वार्ता । मनोभावे करिती ।।१६१।। ज्यांच्या अंतरी भगवंत । जागा असे सतत । ऐसे सज्जन भाग्यवंत । परस्परे भेटती ।।१६२।। महोत्सवी जमती । अध्यात्माची देवाण घेवाण करिती । देवचि देती देवचि घेती । सौख्यभरे ।।१६३।। नाहीत देवावीण गोष्टी । म्हणोन तेथे स्वानंदाची पुष्टी । यासाठी हे समारंभ दृष्टी । सदा पहावे ।।१६४।। मामा होवोन अधिष्ठान । करिती संतांचे संमेलन । आम्ही उपकृत जन । सदा मामांचे ।।१६५।। श्री हरेराम बोडस । ज्यांची वस्ती मिरजेस । प्रेमे येवोन सांगलीस । या महोत्सवी ।।१६६।। बोल बोलती सर्वांच्या मनीचे । उपर्युक्त श्लोकाधारे साचे । ज्या गीता वचनी मामांचे । जीवनसार असे ।।१६७।। सोडोन मामांनी प्रेमाचे पाश । आकर्षिले संत सज्जन सावकाश । म्हणोनि मतिप्रकाश । आम्हा सामान्यासी ।।१६८।। कोठवर मानू उपकार । काही न चले विचार । म्हणोनि मौनेचि नमस्कार । असो मामांच्या चरणी ।।१६९।। गुरूतृतिया कथा संकलित । केशवराव आपटे त्वरीत । करिती तो समग्र वृत्तांत । नाना जोगळेकर प्रकाशती ।।१७०।। हेचि सखारामपंत जोगळेकर । उत्सवासाठी सदा तत्पर । तनमनधन समग्र । सेवेसाठी अर्पिती ।।१७१।। केशवराव नानांच्या नात्याचे । आणि सेवाव्रत तसेच त्यांचे । विद्याविभूषित परी अहंतेचे । नाव नसे ।।१७२।। अध्यात्माची तळमळ । गुरूसेवेस अर्पिले मन सकळ । तेचि परम मंगल । जीवाचे मानिती ।।१७३।। गणपतराव कानिटकर । हेहि सेवेस अतितत्पर । राबती प्रहरो प्रहर । उत्सवासाठी ।।१७४।। प्रेमळ त्यांचा स्वभाव । आपुला मानोन उत्सव । मामांच्यासाठी जीवभाव । ओवाळती ।।१७५।। व्यवस्था समारंभाची । निर्भर त्यांच्यावरी सदाची । 'दमलो' या शब्दाची । जेथे सदा वाण ।।१७६।। आणिक किती एकजण । वेचती उत्सवासाठी जीवप्राण । त्यांचे करू जाता वर्णन । ग्रंथ अति विस्तारेल ।।१७७।। बर्वे बुक्का लाविती । लाखेबुवा तबल्यावरती । बलगवडेकर सुरेल गाती । अभंग श्रीतुकारामांचे ।।१७८।। अढळ निष्ठा मामांच्यावरी । ही खूण सर्वांच्या अंतरी । प्रेमबंधने बळकट सारी । या निष्ठेपायी ।।१७९।। श्रम बुद्धि इच्छा आणि पैसा । लागे येथे सत्कार्यी कसा । पहा, म्हणोनि भरवसा । सुखाचा मिळे सर्वांसी ।।१८०।। वाटे सद्भावना मूर्तिमंत । वावरे येथे सतत । म्हणोनि उबग न मानी येथ । कोणी कामाचा ।।१८१।। उत्साहाचे भरते । आणि उत्सव गौरवाते । म्हणोनि लहान थोराते । हे स्थान प्रिय झाले ।।१८२।।

**सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः ।**
**नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ।।भ.गी.।।**

सदा रत नामस्मरणी । अविश्रम व्रत आचरणी । सर्वाभूती नम्र होवोनी । वागती जे ।।१८३।। ते माझे खरे उपासक । मज त्यांची सदा जवळीक । भाव भक्तीचे पीक । अलौकिक येई येथे ।।१८४।। हा मामांच्या जीवनाचा आलेख । भगवद्गीतेत सुरेख । सापडे त्यांचा हरिख । होवोनी फार ।।१८५।। संतश्री फुटाणे महाराज । साधिती मामांच्या गुणगौरवाचे काज । त्यांच्या प्रवचनाची मौज । लुटती भाविक ।।१८६।। वाटे ईश्वरासी झाला आनंद । तो झाला मनी सद्गद । म्हणोनि उमलले मुखारविंद । हर

एकाचे ।।१८७।। पाचामुखी परमेश्वर । करी भक्त स्तवनाचा गजर । दुमदुमले नगर । मामांच्या कीर्तीने ।।१८८।। वहावया भावफुलांची ओंजळ एक । आले त्यांचे शिष्य अनेक । मामा होते शाळेत शिक्षक । म्हणोनिया ।।१८९।। त्यात एक देशमुख वकील । बोलती अंतरीच्या तळमळीचे बोल । ते शब्द रूजती खोल । हृदयी श्रोत्यांच्या ।।१९०।। ''आस सोडून संसाराची । ज्यांनी नोकरी घालविली सुखाची । संसाराच्या अडीअडचणींची । तमा न केली ।।१९१।। भाव ठेवून ईश्वरावर । केला कीर्तनाचा गजर । निंदा स्तुतीचे थेर चालू न दिले ।।१९२।। ज्या मार्गांनी संत गेले । तेच त्यांनी चोखाळले । विषय सुखास मुरडले । एकदाच मागे ।।१९६।। ऐसे संत श्रेष्ठ शिक्षक । लाभले आम्हास वेचक । अतुलनीय भाग्य एक । आमचे असे''।।१९४।। थोर चारित्र्याचा प्रभाव । विद्यार्थ्यांचा बदले स्वभाव । जरी बंडखोर तरीही सदैव । नम्र राहती ।।१९५।। एकदा एका वर्गात । मुले होती दंगा करीत । टोप्या घेऊन हातात । गडबड करिती ।।१९६।। कोणी शिक्षक त्यांना । बाहेरूनच करिती सूचना । अरे टोप्या डोक्याला घालाना । थांबवा गडबड ।।१९७।। तोच मामा शिरले वर्गात । तव मुले झाली चकित । टोप्या डोक्यावर चढल्या त्वरित । न सांगता ।।१९८।। ऐसा सद्भाव विद्यार्थ्यांचा । जो परिणाम मामांच्या चारित्र्याचा । म्हणोन आदरभाव विद्यार्थ्यांचा । सतत असे ।।१९९।। *रामभाऊ रानडे म्हणती ही परमार्थी शाळा । हा भावचि दिसे आगळा । ऐसा सद्भाव झाला गोळा । मामांच्या भोवती ।।२००।। त्यांचे विद्यार्थी चढले मान्यतेला । तरीही मामांच्यावरी आदर भला । विद्यार्थ्यांच्या चित्ती

टीप :- हे कोल्हापुरास न्यायाधीश आहेत. यांना काही लोक संत न्यायाधीश असे म्हणतात. अशी त्यांची योग्यता आहे.



राहिला । प्रभाव चारित्र्याचा ।।२०१।। देवधर वकिल । जरंडीकरही अभ्यासू सखोल । राजाभाऊ ओंजळ । अर्पिती भावफुलांची ।।२०२।। सोडली शिक्षकाची नोकरी । परी शिक्षक जिवंत राहिला अंतरी । परमार्थाची पाठशाळा घरी । सुरू केली ।।२०३।। अध्यात्माचे कोठार उघडले । ज्ञानसत्र खुले केले । परतली लक्ष्मी परी उमटली पाऊले । श्रीविष्णूची द्वारी ।।२०४।। घर हीच पाठशाळा । साधनाची प्रयोगशाळा । ज्याचा बाजारी न बोलबाला । ऐकू येई ।।२०५।। येथील मामा प्रमुख शिक्षक । अभ्यासू साधक जमती अनेक । मन करोनि निःशंक । रमती साधनी ।।२०६।। श्रवण मनन कीर्तन । अखंड चालले साधन । मामांचे एकांत चिंतन । सदा चाले ।।२०७।। चिंतनाचा परिपाक । अभंग जहाले अनेक । प्रबुद्ध होण्या साधक । मामा रचिती ।।२०८।। द्विसहस्र रचना झाली । जेणे साधकांची सोय झाली । अपरिमित प्रमेये उलगडली । जी कूट आणि अवघड ।।२०९।। एका नामस्मरणावाचून । अन्य न वेचिती विचार धन । साधकांच्या अडचणी दूर सारून । सुखसंपन्न त्यांना करिती ।।२१०।। अभंगसागर मामांचा । तो ठेवा अति मोलाचा । आरसा मामांच्या अध्यात्म जीवनाचा । जणू आत्मचरित्र त्यांचे ।।२११।। अचूक व्हावया मार्गदर्शन । अचूक रहावया अनुसंधान। अचूक घडावया साधन । अभंगवाणी श्रवण करा ।।२१२।। अखंड मामांचे कीर्तन । साधकांनी ऐकावे अनुदिन । त्यांच्या अभंगाचे श्रवण । हे कीर्तनासी उणे नसे ।।२१३।। प्रासादिक मेवा मामांचा । हा ठेवा अभंगाचा । तरणोपाय उद्धाराचा । भवसागरातुनी ।।२१४।। अखंड मामांचे कीर्तन चाले । या अभंगातून भले । ऐसे प्रासादिक काव्य आगळे । मामांचे ।।२१५।। असो येणे परी त्रितप महोत्सव । गाजला गावोगाव । संदेशही आले अभिनव । किती

एकांचे ।।२१६।। मामांची अमोल ईश्वर सेवा । संतजन करिती वाहवा । ऐसा हा बहुमोल ठेवा । भक्तांसाठी ।।२१७।। खडतर तप आचरिले । सुगंधे अंतरंग दरवळले । भक्तांनी हात जोडले । मामांच्या पुढे ।।२१८।। मामा तुम्ही मार्ग सांगता । परी या न दिसती येरा गबाळांच्या गप्पा । दृढ निश्चयीच अपापा । स्थिर राहिल मार्गावरी ।।२१९।। आमुचा एक पाय संसारी । आणि दुसरा तुमच्या दारी । याचेनि आमुची परी । कैसी होईल ।।२२०।। संसाराचे अनेक चटके । सोसून तुमचे पाय देखिले कौतुके । जेणे संसार यात्रा कैशी चुके । हे कळले ।।२२१।। जरी आम्हा आहे संसारी परतणे । जिणे येथील लाजिरवाणे । हे जीवन दैन्यवाणे । सुटेल केव्हा ।।२२२।। सद्गुरूंचे निवासस्थान । सदा असावे अंतःकरण । एवढे द्यावे वरदान । आम्हासी आता ।।२२३।। स्मरण सद्गुरूंचे राहिल । तरीच तरणोपाय दिसेल । भव सागरातून निघेल । नाव आमुची ।।२२४।। ठेऊ मस्तक चरणावर । करू गोविंद नाम गजर । मति वळवावी सत्वर । आमुची परमार्थी ।।२२५।। प्रेमे आशीर्वाद द्यावा । तोचि आम्हास विसावा । निज सौख्याचा ठेवा । आमुचा तो ।।२२६।। संपला त्रितप महोत्सव । सुखस्मृतींची घेऊन ठेव । सुजन परतले गावोगाव । प्रसन्न हृदये ।।२२७।। मामा म्हणती प्रिय पुत्राला । आपुल्या रामाला । ऐक माझ्या बोलाला । तू एकचित्ते ।।२२८।। जन्मापासोनि आजवरी । जी जी इच्छा केली बरी । ती सद्गुरूकृपेने खरी । पूर्ण झाली ।।२२९।। पावलो पूर्ण समाधान । धाले माझे मन । काही न घडले न्यून । या संसारी ।।२३०।। श्रीज्ञानेश्वर माऊली । केली मज कृपेची साऊली । हौस माझी पुरविली । परमार्थाची ।।२३१।। आता तू एक करी । चालीव कीर्तन परंपरा खरी । हीच एक आस ऊरी । माझ्या असे ।।२३२।। विकल झाली माझी काया । स्वस्थचित्ते आळवीन रघुराया । तू चालीव नियमा या । मी



पाहीन कौतुक तुझे ।।२३३।। वर्ष दोन वर्ष पाहू दे । तुझे कीर्तन मज ऐकूदे । ऐसे माझे वदे । मन मला ।।२३४।। मधुर शब्द मामांचे । परी काळीज भेदीत गेले रामाचे । शब्द न फुटती वाचे । झाला मनी सद्गद ।।२३५।। चित्त त्याचे हेलावले । म्हणे हे काय मामा बोलले । म्हणोनि विनीतभावे बोले । उत्तर मामांना ।।२३६।। ''मामा तुमचे कीर्तन ऐकता । अजुन तृप्ती न माझ्या चित्ता । म्हणोन व्याकुळता । ये माझ्या मनासी ।।२३७।। माझ्या सारखे कितीतरी । भुकेले असतील अंतरी । त्यांना संधी मिळाली बरी । कीर्तन श्रवणाची ।।२३८।। म्हणोन ऐसे न करावे । कीर्तन ऐसेच चालवावे । थोडेफार हे न घ्यावे । मनामध्ये ।।२३९।। जेवढी शक्ती तुम्हासी । तेवढे चालवावे नेमासी । मी आहे मदतीसी सर्वकाळ ।।२४०।। जरी न मानेल प्रकृतीसी । तरी चालवीन नेमासी । परी अंतरू तुमचा मधुर वचनासी । ऐसे करू नका'' ।।२४१।। पुन्हा कृतनिश्चय मामांचा । आमरण कीर्तन चालविण्याचा । हा प्रसाद राम सूचनेचा । लाभला सर्वांना ।।२४२।। आता सांप्रदाय महेश्वर । आणि संत मंडळी थोर थोर । जीवनाचा अस्त जाणोन सत्वर । पाचारितील भेटीसाठी ।।२४३।। आणि सुरम्य ते वर्णन । निवतील नयन आणि कान । महापुण्यपीठाचे दर्शन । मनोमार्गे ।।२४४।।

इति श्रीगोविंदचरितमानस । जे स्वभावेचि अतिसुरस । जेथे अखंड उसळेल भक्तिरस । त्रितप महोत्सव वर्णन नाम नवम अध्याय ।।९।।

***

अध्याय दहावा

## पुण्यधाम वर्णन

जय जय श्री रामेश्वर पावन । नमन करीन अनन्य होवोन । ज्याचे पावता आशीर्वचन । पूर्ण लाभ पडे पदरी ।।१।। आता करू यात्रावर्णन । या एकचि अध्यायी परिपूर्ण । ज्या यात्रा बालपणापासून । मामांनी केल्या ।।२।। त्यांच्या सवे येऊ भेटी । हरिहरांच्या भक्तिसाठी । करू देवाच्या गोष्टी । मामांच्याशी ।।३।। आचरे गावी कोकणात । मामांचे कुलदैवत । स्वयंभू आणि जागृत । शिवलिंग ।।४।। आहे मंदिर शिवाचे । परी कौतुक तेथे श्रीरामजन्मोत्सवाचे । अनिवार प्रेम रामभेटीचे । शिव शंकरासी ।।५।। राम आणि महेश्वर । म्हणोनि शोभे रामेश्वर । ऐसा अभिनव प्रकार । शिवराघवाचा ।।६।। श्रीराम करी शिवस्मरण । आणि शिवाचे अभ्यंतरी राम पूर्ण । ऐसे दोन असोनि एकपण । दोघांचे ।।७।। दोनही प्रेमसागर । भरती सदाची अपरंपार । ''सुखसहिता दुःखरहिता'' ही आरती सुंदर । चाले या देवालयी ।।८।। भोलानाथ शिवशंकर । अखिल विश्वाचे सद्गुरूवर । श्रीसमर्थही सादर । आरती रूपे ।।९।। असो, रामाचे लग्न झाल्यावर एकदा । गोविंद भेटती शिवपदा । जाती देव दर्शनाच्या आनंदासाठी कुटुंबियासह ।।१०।। चालले निश्चय करूनी । मार्ग कठीण आक्रमुनी । मजल दरमजल करूनी । गाठिती टप्पे ।।११।। आला कणकवली गाव । जो प्लेगाने धुतला सर्व । तेथे न दिसे एकही मानव । मार्ग खुंटला ।।१२।। ना बैलगाडी ना टांगा । मग कैशी मोटार सांगा । आता मामा म्हणती । गा नाम श्रीरामेश्वराचे ।।१३।। तोच आधार सकळासी ।



त्यापुढे संकटे कायसी । जो तेथे विश्वासी त्याचा मार्ग सुलभ ।।१४।। एक इसम अज्ञात । आला विचारपूस करीत । कोण कोठील काय हेत । प्रवासाचा ।।१५।। श्रीरामेश्वर दर्शनाला । जावे ही आस मनाला । म्हणोनि हा व्याप केला । म्हणती मामा ।।१६।। तव तो इसम वदला । नका करू खिन्न मनाला । मी जोडतो गाडीला आलो इतक्यात ।।१७।। जी योजना ईश्वराची । तीच तडीस जायाची । संकटे येती जाती त्याची । काळजी देवाला ।।१८।। गाडी चालली घाटातून । अति अवघड चढण । तो अकस्मात जोखड सुटून । बैल झाले मोकळे ।।१९।। गाडी लागली उताराला। अतिवेगाने घसरगुंडीला । सर्वांचा धीर सुटला । काही सुचेना ।।२०।। गाडी उलटी धडधडा । फोडीत चालली कडा । गाडीवान मामा धडाडा । उड्या टाकिती ।।२१।। अधोगती गाडीची । थांबविली एकदाची । करुणा रामेश्वराची । भाकिती सर्व ।।२२।। पुन्हा दोर आवळून । गाडी निघे घाटातून । अंतरी देवाचे स्मरण । प्रत्येकाच्या ।।२३।। संकटे जीवावरची। ती देवाची हाक प्रेमाची । परीक्षा पाहून भक्ताची । नेतो निजपदी ।।२४।। देव ज्यांचा साहाकारी । तेथे काळाची कैशी येईल फेरी । काळाची नजर चुकवून करी । फजित काळाला ।।२५।। आले रामेश्वर मंदिर । मुखी प्रत्येकाच्या नामगजर । हर्ष झाला सर्वांस थोर । प्रवेशले मंदिरी ।।२६।। श्रीरामेश्वराच्या मंदिरात । मामा आले गाभाऱ्यात । मन झाले शांत । शिवलिंग पाहोनी ।।२७।। हृदय आले उचंबळून । आनंदाने भरले अंतःकरण । आपल्या कुलदैवताचे दर्शन । प्रिय वाटले मामांना ।।२८।। ती पहा मामांच्या नेत्रात । शिव जटेतील गंगा वहात । चालली अविरत पुन्हा करीत । अभिषेक शिवासी ।।२९।। जोडोनी उभयकरा । म्हणती जयजय रामेश्वरा । आहे तुमचा आसरा । म्हणोनि आम्ही सुखरूप ।।३०।। तुमच्या कृपा प्रसादावीण । आम्ही करू तो तो शीण । म्हणोन तुमचे

स्मरण । असो आम्हासी सर्वदा ।।३१।। राहतो दूर देशाला । म्हणोन भेटीचा योग न आला । बहुत दिवसांनी जमला । हा योगायोग ।।३२।। हे सर्वव्यापी परमेश्वरा । वास तुमचा अंतरा । माजी असो द्या हा खरा । आशीर्वाद द्यावा आम्हासी ।।३३।। ऐसे विनवून देवासी । मामा आले सागर दर्शनासी । होती मंडळी बरीचशी । त्यांच्या समवेत ।।३४।। ओहोटीची वेळ होती । तरीही एक लाट आली पुढती । मामांचे चरण धुवून पुरती । परतली ।।३५।। तटस्थ झाले सर्वजण । म्हणती हा आनंदाश्चर्याचा क्षण । सागराने ओळखेले कोण । आले आपल्या किनारी ।।३६।। मामा परतले मंदिरासी । तो भेटले तेथील रहिवासी । म्हणती आता ऐकू कीर्तनासी । ही आस पुरी करा ।।३७।। रंग भरे कीर्तनाचा । तो ठाव घेई अंतःकरणाचा । लोक म्हणती या सत्पुरुषाचा । वास येथेच असावा ।।३८।। नित्य ऐकता कीर्तन । होईल आमुचे समाधान । म्हणोनि मामांना विनवून । रहा म्हणती ।।३९।। मामा म्हणती लोकांना । तुम्ही विचार करून पहाना । आम्ही परस्थ अडचणी नाना । सोसून आलो यात्रेसाठी ।।४०।। आता आम्हासी आहे परतणे । प्रेमे तुम्ही निरोप देणे । अखंड देवाचे नामस्मरण करणे । हा बोध असो दे अंतरी ।।४१।। प्रेमभाव मनी उमटला । तो पाहिजे टिकवला । आता प्रेमभरे आम्हाला । निरोप द्यावा ।।४२।। तपावरी वर्षे लोटली । आता ही दुसरी संधी आली । तुम्ही माझी सेवा गोड मानली । यात मज समाधान ।।४३।। गांठी भेटी दैवयोगे । यात न मानावे वाऊगे । ईश्वरी सूत्र आहे मागे । आपण त्यांचे पायिक ।।४४।। लोक म्हणती येथील एक । रिवाज असे वर्षे अनेक । कौल देवाचा आम्ही लोक । मानतो सदा ।।४५।। विचारिती श्रीरामेश्वराला । तो त्याने दिला हवाला । म्हणे जा उद्याला । नको आज ।।४६।। आनंदे अंतःकरण भरून । टाळ्या पीटीती सर्वजण ।



म्हणती आजही कीर्तन । आम्ही ऐकू तुमचे ।।४७।। बहुत सोपे करून सांगता । तेणे प्रसन्नता ये चित्ता । आम्हीही परमार्थाच्या वार्ता । आता मनी आणू ।।४८।। कडू संसार मानोनी गोड । आम्ही त्याचेच घेतले वेड । नित्य सुखाचा मार्ग उघड । तुम्हीच दाखविला ।।४९।। दृष्टीत पडले अंजन । तेणे सत्य देखती नयन । जे जे गेले होते झाकोळून । संसार मदे ।।५०।। नामस्मरणी रमवू मना होईल तेवढे करू प्रयत्ना । आम्ही लागलो तुमच्या चरणा । आशीर्वाद द्यावा जी ।।५१।। ऐसा हा प्रेमाचा सोहळा । भक्त झाले गोळा । नामसंकीर्तनी उमाळा । धरोनिया ।।५२।। दुसरे दिवशी आनंदाने । आणि वियोग दुःखाने । भारावली अंतःकरणे । निरोप देता ।।५३।। सत्संगाची महती ऐशी । मिळता लाभती सौख्याच्या राशी। वियोग घडता कंठाशी । प्राण येती ।।५४।। मामा परतले सांगलीला। वेशीपर्यंत लोक झाले गोळा । गाडीवान म्हणे बैलाला । चल आता ।।५५।। वाटेत लोक बोलले । की काल वाघाने झडपिले । लोकांच्या तोंडचे पाणी पळाले । क्षणार्धात ।।५६।। मामा म्हणती मनात । रामेश्वर दयावंत । तोचि पाठीराखा सतत । आम्हासी ।।५७।। म्हणोनि हे विघ्न टळले । सुख समाधान घरास आले । म्हणोन वंदू पाऊले । श्रीरामेश्वराची ।।५८।। स्मरण देण्या संकटे येती । हीच त्यांची असे महती । म्हणोनी स्वस्थ चित्ती । आपण असावे ।।५९।। सहज स्वभाव मामांचा । तीर्थयात्रा न करण्याचा । परी मोह कुलदैवताचा । न आवरे त्यांना ।।६०।। सर्व तीर्थे घरा येती । ऐशी जोडावी साधन संपत्ती । म्हणोनि मामा राहिले स्वस्थचित्ती । आपुल्या राममंदिरी ।।६१।। श्रवण मनन निदिध्यास । प्रवचन कीर्तनाचा सोस । अखंड ठेविती अनुसंधानास । हा नित्यक्रम मामांचा ।।६२।। तपानुतपावरी । अव्याहत क्रम चालला घरी । आता झाली पुरी । छत्तीस वर्षे ।।६३।। दिन ढळला

पश्चिमेला । जीवनाचा अस्त आला । संदेह भेटीचा योग साधला । पाहिजे आता ।।६४।। ऐसे देव आणि संत । श्रीसाधुमहाराजासहित । ठरविती मनात । फिरली सूत्रे ।।६५।। मामा आपण होऊन । कधी न करितील तीर्थाटन । त्यातून देह झाला क्षीण । ईश्वरेच्छा बलीयसी ।।६६।। श्री. पंडितराव परचुरे यासी । प्रेरणा झाली एकसरसी । आले मामांच्या घरासी । तो चर्चा सुररू होती ।।६७।। उमदीहून प्रेमांचे । आले निमंत्रण तातडीचे । श्रीभाऊसाहेबांच्या पादुकांचे । दर्शन घ्यावया ।।६८।। दिवस पादुकांच्या स्थापनेचा । संतसज्जना महत्त्वाचा । परी मामांच्या प्रकृतीचा । विश्वास लागेना ।।६९।। तव परचुरे बोलती विश्वासाने । चला आता स्वतंत्र मोटारीने । सर्व व्यवस्था जातीने । माझ्याकडे लागली ।।७०।। सोडोनि सर्व चिंता । करू आता वारीच्याच वार्ता । उमदी निंबाळ निंबरगी आता । झालेच पाहिजे ।।७१।। परचुरे पतिपत्नी । मामांच्यावरी भक्ति प्रेम म्हणुनी । हे कार्य आपुलेच मानुनी । तन मन धन वेचिती ।।७२।। पुत्र जपे पित्याला । तैसा पंडितरावांचा भाव भला । उचलती फुलाला । तैसे मामांना जपती ।।७३।। भक्तांचा सुशब्दाला । मामांनी नकार दिला । ऐसा दिवस न उगवला । मामांच्या आयुष्यात ।।७४।। हा हा म्हणता तयारी झाली । इतरांचीही धांदल झाली । चाळीस एक माणसे तयार झाली । सहप्रवास कराया ।।७५।। आले कोल्हापूरहून । विजयसिंह सुर्वे आपणहून । स्वतःची स्टेशन वॅगन घेऊन । खडे प्रवासी ।।७६।। तव एक बातमी आली । की ही वेळ नसे चांगली । ओढ्यांनी मर्यादा उल्लंघिली । पावसामुळे ।।७७।। रस्ता न नीट कोणाला । माहित होता चांगला । त्यातच हा निसर्गाचा घाला । डळमळे निश्चये ।।७८।। मामा म्हणती जो ध्यास । एकदा घेतला त्याचीच कास । श्रीनारायणपदी विश्वास । धरोनिया ।।७९।। सद्गुरूंचा करून गजर ।



निघाली मंडळी सत्वर । जैसे वीर धुरंधर । रणासी जाती ।।८०।। कोणी न पाही पैशाकडे । प्राणाचीही न पर्वा ध्येयापुढे । ऐसे एक एक गाढे । वीर होते ।।८१।। मामांच्यासह प्रवास । हीच प्रत्येकाची आस । नेती शेवटास । संकटास न लेखता ।।८२।। मोटरी मागून मोटारी । करती पुण्यधामांची वारी । पाऊस चिखल यांचा न करी । कोणी विचार ।।८३।। मार्ग नीट सापडेना । लटपटती मोटारी जाताना । खाचखळगे नाना । वाटेत लागती ।।८४।। जो रस्ता मिळाला । तो अडचणीचाच ठरला । घसरगुंडी आणि चढाला । जीव होई बेजार ।।८५।। मोटार ओढ्यातून चालेना । तेव्हा बैल ओढती मोटारींना । परी परतावे ऐसे मना । येईना कोणाच्या ।।८६।। जेथे वाट धोक्याची । तेथे संधी पराक्रमाची । सुर्वे यांनी धैर्याची । कमाल केली ।।८७।। आपण पुढे जाती । कौशल्याने मार्ग शोधिती । किंवा तात्पुरता बनविती । नाना उपाय शोधुनी ।।८८।। इतक्या अडचणीतून मामांना । सुखरूप नेती त्या भक्तांना । कशा सुचती कल्पना । एक देवचि जाणे ।।८९।। अनंत संकटे परी सुखरूप । हीच देवाची दया अमूप । त्याच्या लीलेची साक्ष आपोआप । कळे अशावेळी ।।९०।। आले निंबरगी गावाजवळ । तेथे ओढ्यास अति चिखल । निंबरगीचा मार्ग सरळ । दिसेना कोणा ।।९१। परतले चडचाण गावात । तळ दिला श्रीमारुतीच्या देवालयात । उतरताच मामा सुरू करिती । कीर्तन आपुले ।।९२।। ना श्रम ना दम । ऐसे कीर्तनाचे प्रेम । आहे की नाही जाजम । याचीही वार्ता नसे ।।९३।। नेमाची गाठ प्राणाशी । हेचि मनोमन अहर्निशी । हे कळावया लोकासी । कीर्तन नेम मामांचा ।।९४।। अंतरी अखंड नेम चालविला । तरी तो कळेना लोकांना । म्हणोन त्यांच्या मार्गदर्शनाला । प्रगट नियम कीर्तनाचा ।।९५।। करताल धरून केले । ईश स्तवन पहिले । श्रीरघुनाथप्रिय उभे केले ।

मारुतीरायापुढे ।।९६।। श्रीमारुतीरायांचे मस्तकावर । येथे शिवलिंग असे सुंदर । इकडे मामांच्या कपाळावर । भस्माचे पट्टे दिसती ।।९७।। हे अनेकांनी पाहिले । श्रीशिवशंकराचे प्रसाद चिन्ह भले । साक्षात्काराचे बाह्य चिन्ह मानले जाणत्यांनी ।।९८।। दुसरे दिवशी मंडळी । निघाली प्रातःकाळी । आली ओढ्याजवळी । तो गाळ दिसे अपार ।।९९।। विजयसिंहांनी पुन्हा केली । पराक्रमाची शिकस्त यावेळी । उत्तम वाट तयार केली । प्राप्त साधनोपाये ।।१००।। आपण स्वतः उत्तम । मार्ग शोधिला प्रथम । करोनी अपार श्रम । जीवाची पर्वा न करता ।।१०१।। एकचि मोटार येरझाऱ्या करी । पोचविली मंडळी परतीरी । ज्याची त्याची वदे वैखरी । हे अद्‌भुत अचाट ।।१०२।। म्हणती आता निंबरगीस । जाऊ श्रीनारायण दर्शनासी । तेथून करू निश्चयासी । पुढील मग ।।१०३।। निंबरगीजवळ पुन्हा ओढा । उतरून जाणे लागेल पुढा । कमरे इतक्या पाण्यातून तेवढा । मार्ग होता ।।१०४।। सगळे गेले मामा राहिले । ते एका मुसलमानाने पाहिले । तो म्हणे हे माझे काम पहिले । मी नेतो यांना ।।१०५।। विष्णु जसा गरुडावरी । तैसे मामा त्याच्या पाठीवरी । तो निघाला परतीरी । लीला विनोदे ।।१०६।। येता परतीरावर । मोल ठेविती त्याच्या हातावर । तव तो चतुर । ते घेईना ।।१०७।। संत सेवा घडली । आणि मी ती मोले विकली । म्हणजे माझी बुद्धीच चकली । हे बरे नव्हे ।।१०८।। कवडीसाठी विकावा परीस । तैसे हे वाटे माझ्या मतीस । नका करू आग्रहास । मोलासाठी ।।१०९।। हा ठेवा माझ्या भाग्याचा । मला न विकावयाचा । मानू नका भार याचा । तुम्ही काही ।।११०।। चकित झाली मंडळी । ही भक्तीभावाची ज्योत आगळी । परधर्माची तुटली साखळी । संत राज्यात ।।१११।। एक ईश्वर सर्वाठायी । हे कळले या समयी । शुद्ध सत्त्वाची तेवता समई । ईश्वर दिसे सगळीकडे ।।११२।।



देव मानिती निराळे । परी एकभाव सगळीकडे खेळे । भावाचे बळचि आगळे । अनेकी दाखवी एकत्त्व ।।११३।। मामा आले निंबरगीसी । भेटले पीठाधिपतीसी । मग आले समाधीमंदिरापाशी । श्रीगुरुलिंगजंगमांच्या ।।११४।। जे सांप्रदायाचे मूळपीठ । शाखोपशाखांना आधार श्रेष्ठ । ज्यांनी वरिष्ठाहून वरिष्ठ । संत आणले या सांप्रदायी ।।११५।। महावृक्ष गेला गगना । सुख समाधान लक्षावधींना । प्रणाम त्या श्रीगुरुलिंगजंगमांना । सप्रेम असो ।।११६।। जोवरी शाखा आणि उपशाखा । तोवरी आधार पशुपक्षा । म्हणोनि या कैवल्यवृक्षा । साष्टांग नमन ।।११७।। जय जय जय श्रीमहेश्वर । श्रीरेवणसिद्धादि सद्‌गुरूवर । त्यांनी केला हा चमत्कार । वंदन त्या प्रभुपदी ।।११८।। जय जय जय श्रीनारायणा । येऊनी आमुची करुणा । तुम्ही पाठविले या संतांना । । म्हणुनि आम्ही सुखरूप ।।११९।। जववरी अज्ञान । या भूतली घाली थैमान । तववरी तुमचे आशीर्वचन । असोद्या या सांप्रदायावरी ।।१२०।। तोचि आम्हास आसरा । तोचि आम्हास निवारा । म्हणोनि हे करुणाकरा । कृपादृष्टी पहावे ।।१२१।। देखिले न तुमचे चरण । परी जाणतसो महिमान । अनंतरूपे अवतरोन । दीन जनासी सांभाळिले ।।१२२।। मामा समाधीपुढे बसून । सुरू करिती कीर्तन । लोक आले मागाहून । आळस टाकूनी ।।१२३।। नित्याचा आपुला अनुभव । की साथीदार श्रोत्यांनी करावा गौरव । तेव्हा कीर्तनकारास चढे भाव । ये रंग निरूपणा ।।१२४।। विद्युत्‌दीप झळकती । मधुरवाद्ये वाजती । लोक ही माना डोलावती । तेव्हा स्फूर्ती कीर्तनकारासी ।।१२५।। येथे सर्वाआधी । हा पुण्यपुरुष कीर्तन साधी । ही साधी परमावधी । कीर्तनप्रेमाची ।।१२६।। न मानिती प्रवासाचा शीण । प्रकृतीची साथ ही नसे पूर्ण । देह व्यथा दारूण । पीडा करिती ।।१२७।। तरी सोस कीर्तनाचा सद्‌गुरूंची सेवा करण्याचा । उमाळा

भाव भक्तीचा । अलोट आत ।।१२८।। येता सद्‌गुरू सानिध्यात । वारे भरे अंगात । हे सामर्थ्यचि अद्‌भुत । वाटे आम्हा ।।१२९।। आत्मशक्ती वेगळी । ती देहशक्तीहून निराळी । हे कळले गुरूपद कमळी । येता आम्हा ।।१३०।। आत्मशक्तीचे सामर्थ्य अचाट । ते कार्ये करवी बिनबोभाट । जेथे न सापडे वाट । कळिकाळासी ।।१३१।। हेचि दाखवावया । मामा येती शरीरा या । दुर्घर रोगासी सामना द्यावा । परमार्थासाठी ।।१३२।। आश्चर्यचकित लोक होती । वैद्यही आश्चर्य करिती । धन्वंतरीचा धन्वंतरी म्हणती । मामांना ।।१३३।। नका सुई टोचू शक्तिसाठी । नको गोळी झोपेसाठी । जरी आले प्राण कंठी । तरी उभे कीर्तना ।।१३४।। नेहमीचा आपुला अनुभव पहाना । प्रवासात दमलेल्या लोकांना । तहानभूक विश्रांतीची विवंचना । सदा असते ।।१३५।। म्हणती आधी कपभर । चहा आणा हो लवकर । मग आमच्या बोलण्यास भर । पहा कसा येईल तो ।।१३६।। मामा म्हणती करू कीर्तन । जेथे सगुण जाईल निर्गुणात रंगून । मग कैची भूक आणि तहान । कीर्तन विसावा भागल्यासाठी ।।१३७।। संत आणि सामान्यजन । यांचे ऐसे वेगळेपण । दोघांचे विश्रांतीस्थान । असे वेगळे ।।१३८।। ऐशी ही कीर्तनसेवा । लोक म्हणती वाहवा । देवही म्हणती वाऽवा । धन्य केला संसार ।।१३९।। सुरवर डोलाविती माना । ऐसे कर्म करावे वाटे ज्यांना । त्यांनी संत चरित्रच्या अध्ययना । साठी रहावे तत्पर ।।१४०।। वाचोनि करावा विचार । विचारोनि करावा उच्चार । आणि त्या सरिसाच आचार । मग गोविंद रे गोविंद ।।१४१।। गुरुलिंगजंगम श्रीनारायण । मामांनी केले सुप्रसन्न । ऐसे प्रेमभरे कीर्तन । मामांचे झाले ।।१४२।। प्रेम घ्यावे प्रेम द्यावे । जेणे संतसज्जनांनी डोलावे । आणि परमानंदाचे कोठार लुटावे । जे संपता न संपे ।।१४३।। ऐसा विचार मामांचा । ऐसा सुविचार मामांचा ।



ऐसा भक्तिभाव मामांचा । दिसे सर्वांना ।।१४४।। श्रीफल आणि आहेर । अर्पिला जेथे सद्गुरूवर । तीर्थप्रसाद सुमधुर । घेतला सर्वांनी ।।१४५।। आकाशी विजा चमकती । दाखविती पावसाची भीती । म्हणोनि आता लोक सुचविती । चला परतू ।।१४६।। सर्वजण परतले विजापूरला ।। तो दुसरा मार्ग सांगलीला । मामा थेट गेले निंबाळला । श्रीगुरुदेवांचे आश्रमी ।।१४७।। श्रीगुरूदेव आणि मामा । यांचा अलौकिक प्रेमा । पुढील अध्यायी महिमा । वर्णू सावकाश ।।१४८।। श्रीगुरूदेवांच्या आश्रमी । जाता उसळल्या आनंदऊर्मी । तेथे मामा आणि मामी । वंदन करिती प्रेमभरे ।।१४९।। तेथेही भक्तिगीते म्हणून । मनोभावे सेवा करून । श्रीगुरूदेववपदी नमून । मामा मामी परतले ।।१५०।। वर्ष नसेल लोटले । परचुरे पुन्हा बोलले । आता चिमड उमदीला गेले । पाहिजे आपण ।।१५१।। धन्य परचुरे यांच्या उत्साहाची ।हौस जबाबदारी पेलण्याची । आवडी सत्संगाची । अंतरी म्हणोनी ।।१५२।। पर्वा न करिती पैशाची । वाट पाहती संधीची । मामांच्या रुकाराची । तो मिळताचि आनंदले ।।१५३।। ही निघाली छोटी यात्रा । आली चिमड क्षेत्रा । तापनाशी तीर्था पवित्रा । भेट देण्या ।।१५४।। सद्‌गुरू श्रीनारायण । मामा करिती चरणवंदन । गुरूशिष्यांच्या आनंदाचे वर्णन । शब्दाने न करवे ।।१५५।। शिष्य पावे कृतार्थता । ते गुरूसी ही धन्यता । समाधान उभयतांच्या चित्ता । सार्थकता जीवाची ।।१५६।। वेळ होता नित्याची । कीर्तन सेवा करण्याची । मामांच्या तत्परतेची । साक्ष येथेही आली ।।१५७।। करताल धरून । सुरू केले कीर्तन । मंडळी जमली नाद ऐकून । हरिकीर्तनाचा ।।१५८।। श्रीसाधुमहाराजांच्या चरणापाशी । सेवा अर्पून भक्तिभावेसी । मामा निघाले हिंचगिरीसी । श्रीभाऊसाहेबांचे

दर्शना ।।१५९।।सहज मामांना आठवले । पूर्वी प्रवासात एकवेळे । श्रीभाऊसाहेब महाराजांचे दर्शन झाले । अपूर्व योयायोगे ।।१६०।। श्रीभाऊसाहेबांच्या समाधीचे । विश्वस्त विश्वासाचे । थोर साधक निष्ठेचे । श्रीबाबुराव गोखले ।।१६१।। ऊराऊरी भेटले मामांना । आनंदून पुनः पुन्हा । त्या भेटीच्या वर्णना । काव्य शक्ति कमी पडे ।।१६२।। भक्तिप्रेमाचे सागर । उसळती अपरंपार । प्रेम लोटे प्रेमात अनिवार । शांत अथांग दिसती पुन्हा ।।१६३।। तेथील थाट अपूर्व । संतोषली मंडळी सर्व । वाटोनी आश्चर्य । आदरातिथ्याचे ।।१६४।। एका मागोन एक । प्रवासाचे पिकले पीक । आण्णा देवधर भाविक । म्हणती मामांना ।।१६५।। चला जाऊ श्रीकाडसिद्धाला । कोल्हापूरच्या वाटेला । सांप्रदाय प्रभूवराला । भेट देऊ ।।१६६।। चढण डोंगरावरची । कसोटी लागली जीपची । देवधरांनी कौशल्याची । चुणुक दाखविली ।।१६७।। अति अशक्त मामांची प्रकृती । परी सर्वजण मनोभावे जपती । आपुल्या जीवीताची क्षिती । न बाळगता ।।१६८।। महाराज श्रीकाडसिद्ध । जे महाराष्ट्रात अतिप्रसिद्ध । परमार्थी प्रबुद्ध । भक्तिप्रसार करिती ।।१६९।। मामांच्या भेटीची आवड । म्हणोनि काढिती सवड । प्रेम भेटीसाठी उदंड । व्यवस्था करिती ।।१७।। हार घालती मामांना । तो त्यांना आवडेना । करोनि हरप्रयत्ना । गळा हार घालिती ।।१७१।। हार घेऊनी हातात । मामा साष्टांग घालिती दंडवत । महाराज सद्‌गदीत । होत मनी ।।१७२।। ईश्वर असे सर्व ठिकाणी । नाना रूपे घेऊनी । हे प्रत्यया ये आलिंगनी । संत सज्जनांच्या ।।१७३।। ना मराठा ना ब्राह्मण । ना लिंगायत ना मुसलमान । जेथे भक्तिभावाचे राज्य संपूर्ण । तेथे एक ईश्वर ।।१७४।। तेथे दिसे बंधुभाव । प्रेमाचा होई वर्षाव । रामराज्याचा प्रभाव । तेथेचि दिसे ।।१७५।। संत तेथे



रामराज्य । रामराज्य तेथे स्वराज्य । स्वराज्य तेथे सुख अविभाज्य । हा क्रम अव्याहत दिसे ।।१७६।। आता परचुरे म्हणती मामांना । चला भेटू श्रीरेवणसिद्धांना । श्रीगोंदवलेकर महाराजांच्या निवासस्थानांना । पूर्ण करू यात्रागमन ।।१७७।। मामा पुन्हा तयार । कधी प्रकृतीची तक्रार । सत्कार्यी अर्पिण्यास शरीर । सदा सज्ज असती ।।१७८।। श्रीरेवणसिद्धासमोर । उजळोन तेरा रुपयांचा कापूर । मामा उभे राहिले ईश्वरासमोर । प्रकाशात कर्पूरगौराच्या ।।१७९।। धवल शिवलिंग सुंदर । धवल मामांचा मुखचंद्र । हृदय झाले प्रेमार्द्र । नयनी नीर लोटती ।।१८०।। मामा राहिले निवांत । शब्द न फुटे मुखात । म्हणती झालो कृतकृत्य । श्रीरेवणसिद्धराया ।।१८१।। श्रीरामे केला आराम । आता जीवनाचा आला विराम । श्रीरेवणसिद्धपदी प्रणाम । असो माझा ।।१८२।। सहा तपावरी आयुष्य सरले । आपल्या कृपे सफल झाले । जे जे मनी धरिले । ते पूर्ण केले सिद्धराया ।।१८३।। आता निश्चिंत मानसी । देह अर्पिला चरणासी । जी आज्ञा कराल मजसी । ती मानेन सुखेनैव ।।१८४।। मी हा असा दीन दुबळा । दुर्धर रोगांचा फास गळा । तरीही आणिले भेटीला । ही सत्ता असो तुमची ।।१८५।। धन्य झालो संसारी । आता आस न दुसरी । स्मरण तुमचे असो अंतरी । सर्वकाळ ।।१८६।। करवून घेतली सेवा । तैशी केली सदाशिवा । आता आशीर्वाद द्यावा । जाताना ।।१८७।। कंठ दाटला अश्रूंनी । परी प्रसन्नता दिसे वदनी । समाधान श्री रेवणसिद्ध दर्शनी । म्हणोनिया ।।१८८।। झाले सांप्रदाय पुण्यधाम वर्णन । जेथ भाविकांना पूर्ण समाधान । आता संतदर्शन । असे पुढील अध्यायी ।।१८९।। ईश्वराची सुसूत्र रचना । न कळे सामान्य जना । म्हणोनि सच्चरित्राच्या अवलोकना । अपार महत्त्व असे ।।१९०।। अनंत देहाच्या यातना । शरीर जागचे हलवेना । परी

देहाच्या सारून विवंचना । देव बोलवी भेटीला ।।१९१।। माना अथवा न माना ।परी ही अघटीत घटना । निमित्त मात्र करून जना । ईश्वर सूत्र चालवितो ।।१९२।। देवाच्या इच्छेने वर्तावे । देव करील ते मानावे । हेचि मामांच्या मनी स्वभावे । म्हणोन पुण्यधाम दर्शन ।।१९३।।

इति श्रीगोविंदचरितमानस । जे स्वभावेचि अतिसुरस । जेथे अखंड उसळेल भक्तिरस । पुण्यधाम वर्णन दशमोध्याय ।।१०।।

***



**अध्याय अकरावा**

## संत दर्शन

यश कीर्ती आणि प्रताप । न इच्छिताही जोडले अपाप । पूर्ण होताची तप । मामांचे ।।१।। कीर्ती हा सुगंध सत्कृत्यांचा । यश हा वाटा धर्माचा । प्रताप हा ठेवा ईश्वराचा । मनुष्यापाशी ।।२।। जेथ हे तिनही एकवटले । ते परम भाग्यवंत ठरले । संत सज्जनांचे लागले । लक्ष त्याकडे ।।३।। सहज उद्‌गार गौरवाचे । येती ज्याच्या त्याच्या वाचे । म्हणती कलियुगी हे भाग्य आमुचे । म्हणोनी घेती संतदर्शन ।।४।। नित्य नेम तडीस गेला । साधनाभ्यास पुरा झाला । शुद्धाचरणाचा कित्ता दिसला । सामान्य जनांनाही ।।५।। महापुरुषांचे दिव्यत्व दर्शन । लोकासी घडावया कारण । ईश्वर पसरवी कीर्ती आपण । भक्ताची इच्छा नसताही ।।६।। देणे ईश्वराचे । ते न इच्छिताही भोगावयाचे । नातरी अंगी आदळायचे । हा विधिक्रम दिसे ।।७।। सागराच्या शांत लहरी । पोचती दूर किनाऱ्यावरी । हा सहज क्रम परी । चाले अव्याहत ।।८।। तैसा मामांच्या कीर्तीचा सुगंध । दशदिशा पसरला अनिर्बंध । फोडोनिया बांध । जे मामांनी सुविचारे घातले ।।९।। कीर्ती ठेवून दूर । मामांनी चालविला परमार्थ खडतर । परी देवाची इच्छा अनिवार । वेगळीच दिसे ।।१०।। पंख फुटले कीर्तीला । ती पसरली दशदिशाला । हरएक समंजस व्यक्तीला । वाटे दर्शन घ्यावे मामांचे ।।११।। तैसेचि अधिकारी संतजन । आनंद वाढविती भेटून । समसमांचा संयोग देखून । इतरही आनंदती ।।१२।। ऐसे संत कोणकोण । आजवरी मामांची सेवा पाहून ।

गेले आनंदून । त्यांचे वर्णन ऐकू ।।१३।। ते मुक्त कंठाने प्रशंसती । मामांना वाखाणती । गाठी भेटी होता आनंदती । अकृत्रिम सौख्यभरे ।।१४।। पौत्र श्रीगुरुलिंगजंगमांचे । श्रीनागाप्पाण्णा नाम त्यांचे । थोर सिद्ध परी कीर्तीचे । वावडे त्यांना ।।१५।। आले मामांच्या घरी । भेटून आनंदले अंतरी । आनंदाच्या लहरीवरी । लहरी अंतःकरणात ।।१६।। निरोप घेऊन टांग्यात । बैसले जाण्याचा करून बेत । परी घोड्याने पाय रोवले तेथ । हालेना जागचा ।।१७।। तव श्रीसद्गुरू बोलले । पहा कैसे नवल झाले । या घोड्यांच्या मनानेही घेतले । विरह दुःख अनिवार ।।१८।। ऐसे प्रेम एकएक संतांचे । वर्णन करता मन आनंदाने नाचे । भाग्य श्रोत्यांचे । आणि लेखकाचेही ।।१९।। शंकर महाराज मिरीकर । महाराज ताम्हनकर । तसेच संत श्री मळणगांवकर । एकनाथ म्हणती मामांना ।।२०।। रामानंद खटावकर । मुकुंदराजपंथी संत थोर । प्रशंसोद्गार । मामांच्या संबंधी काढीती ।।२१।। निर्लोभ निःस्वार्थी सेवक । निष्ठेचे साधक । कीर्तनभक्तीचे उपासक । संत थोर मामा ।।२२।। श्री गुरूदेव रानडे एकदा । मान देण्या मामांच्या शब्दा । आले सुखसंवादा । मामांच्या घरी ।।२३।। आले सांगलीस अवचित । श्रीमंत राजेसाहेबांचे पाहुणे नित्य । दोघांचे प्रेमसंबंध अत्यंत । असती बहुसाल ।।२४।। आवड अध्यात्माची । श्रीमंतांना मनापासूनची । म्हणोन गुरूदेवांच्या आगमनाची । वाट पाहती आतुरतेने ।।२५।। यावेळी श्रीमंतांकडे आले । क्षणएक थांबले । म्हणती जाणे आहे पहिले । बापूरावजींकडे ।।२६।। वेळ असे रात्रीची । श्रीमंत म्हणती विश्रांतीची । घाई कासयाची । उद्या चला ।।२७।। परी न मानले । श्रीगुरुदेवांना । म्हणती घोडेस्वार पाठवाना । कळविण्या बापूरावजींना । जाऊ आम्ही पाठोपाठ ।।२८।। तव इकडे उडाली घाई । काय भेटीची नवलाई । झटपट केली साफसफाई । तो मोटार वाजली दारात ।।२९।। श्रीगुरूदेवांचे



आगमन । मध्यरात्री सूर्यदर्शन । साक्षात्कारी संत विद्वान । मामा जाती लोटांगणी ।।३०।। आनंद झाला उभयता । न ये शब्दाने वर्णिता । पुसती परमार्थाच्या वार्ता । एकमेका ।।३१।। काही दिवस लोटले । श्रीगुरूदेव श्रीमंतांचेकडे आले । तेव्हा मामांना आमंत्रण आले । भेटीसाठी ।।३२।। क्षेमकुशल झाले । श्रीगुरूदेव आनंदले । मामांना विचारू लागले । अहो बापूराव ।।३३।। श्रीमंतांनी तुमचे । कीर्तन ऐकावे भक्तिचे । ऐसा योग जमण्याचे । आजवरी सुचिन्ह नव्हते ।।३४।। माझ्याही मनीची । इच्छा कधीची । पूर्ण करून घेण्याची । आता संधी यावी ।।३५।। आपण अनुमती द्याल । तरी हा योग येईल । मामा म्हणती आज्ञा कराल । तेव्हा मी आहे हजर ।।३६।। तो त्याच दिवशी भला । योग जमला सायंकाळला । आणि कीर्तनाला । आला रंग बहुत ।।३७।। तव श्रीमंत म्हणती आनंदून । घरगुती छान झाले कीर्तन । जेणे पूर्ण समाधान चित्तास होई ।।३८।। याहीवरी एकदा । श्री देशपांडे यांना हलवून गदागदा । श्रीगुरूदेव म्हणती उचला पदा । ते पहा बापूराव चालले ।।३९।। आपण त्यांना बोलावून । पाहू करितील का कीर्तन । रमेल आपुले मन । हरिकीर्तनी ।।४०।। मामा आले आणि बसले । करताल धरून सुरू केले । कीर्तन श्रीगुरुदेवांनी ऐकिले । भक्तिभावे ।।४१।। ऐसे श्रीगुरूदेवांचे पूर्ण । मामांच्याशी स्नेहबंधन । वेळोवेळी आले दिसून । अभावितपणे ।।४२।। श्रीमंतही तैसेच उदार । हरिभजनी ओढा फार । गुणी जनांचा गौरव तत्पर । राहून करिती ।।४३।। त्रितप महोत्सव झाल्यावरती । मामांची गाठ घेण्याचे ठरविती । मामांच्या प्रकृतीची क्षीण स्थिती । म्हणूनिया ।।४४।। थोर आदर परमार्थाचा । आणि संत सज्जनांचा । गौरव गुणी जनांचा । गुणी लोक करिती ।।४५।। ''मी एक सामान्य नागरिक । तरीही श्रीमंतांना हे कौतुक । ऐशी ही प्रेमाची जवळीक।'' म्हणती

मामा ॥४६॥ ऐसे किती एक प्रसंगोपात् । मामांच्या घरी आले सज्जन संत । आवडीने मामांच्या घरात । सुख समाधानासाठी ॥४७॥ आचार्य श्री दांडेकर । महाराष्ट्राचे संत थोर । जेव्हा जेव्हा भूषविती सांगली नगर । येती मामांच्या घरी ॥४८॥ मामांचे कीर्तन ऐकून । तेही होती तल्लीन । संतांचे संतचि महिमान । ओळखती खरे ॥४९॥ गोविंद महाराज वाटेगावचे । प्रेम जाणून मामांचे । सोसून दुःख वृद्धपणाचे । येती मामांच्या घरी ॥५०॥ ते प्रेमचि अनिवार । ओळखतो एकमेकांचे अंतर । अध्यात्मास बहर । येई त्यावेळी ॥५१॥ मामांनी चरण धरिले । गोविंद महाराजांचे भले । आनंदून बसले । पाय आपुले मुरडून ॥५२॥ तव ''गोविंदजी'' म्हणती । पाय करा देवाचे मज पुढती । मी जाणे त्यांची महती । म्हणोन चरण धरिती ॥५३॥ देव भेटला देवाला । हा त्याला आणि तो याला । सीमा आनंदाला । मुळीच नसे ॥५४॥ श्रीकेतकरमहाराज । पोटी प्रेम निर्व्याज । भेटीचे मनी धरून काज । येती मामांच्या घरी ॥५५॥ दासगणु थोर हरिसेवक । कीर्तीमंत अलौकिक । अधुनिक महिपती म्हणती लोक । गौरवून त्यांना ॥५६॥ तेही आले मामांच्या घरी । रंगले कीर्तन गजरी । मामांच्या गुणगौरवापरी । बोलती मुक्तकंठ ॥५७॥ तैसेच गोंदेमहाराज दूरचे । मार्ग मानून जवळचे । उराउरी भेटण्याचे । सौख्य उपभोगती ॥५८॥ गोपाळकाका कोटणीस । मामांचे वर्णन सर्वापरीस । करिती अत्यंत सुरस । मामांची योग्यता जाणोनी ॥५९॥ पैठणकरमहाराज एकनाथ वंशाचे । शोभती थोर कुलाचे । मामांच्या कीर्तन सेवेचे । कौतुक करिती प्रेमभरे ॥६०॥ सांगलीच्या आसपास आले । आणि मामांच्या घरी न येता गेले । ऐसे कधी न झाले । ऐसे प्रेम उभयतांचे ॥६१॥ धुंडा महाराज चौंडे महाराज । निजामपूरकरमहाराज, चाफळकर महाराज । बाळेकुंद्रीकर महाराज आणि इतरही संतराज । भूषविती मामांचे घर ॥६२॥



आण्णासाहेब कुलकर्णी इचलकरंजीचे । आधुनिक सावता माळी लोकांचे । शब्द बोलती आदराचे । मामांचेविषयी ॥६३॥ रामनामे बेळगावचे रहिवासी । येती मामांच्या घरासी । गौरविती सद्भक्तासी । प्रेमभरे ॥६४॥ अखिल संतजन म्हणती । धन्य बापुरावांची भक्ति । एकच पुत्र परि तोही परमार्थी । हे भाग्य परम दुर्लभ ॥६५॥ ऐकून रामाचे निरूपण । संत पावती समाधान । म्हणती धन्य धन्य धन्य । हे केळकर कुल ॥६६॥ संतांचा सहवास लाभावा । त्यांचा प्रसाद मिळावा । त्यांचा आशीर्वाद लाभावा । हे इच्छिती सुजन ॥६७॥ गुंडुबुवा बुधगावचे । जे भानावर नसायचे । परी मामांच्या कीर्तनी नाचावयाचे । समाधी मंदिरात ॥६८॥ आहोजी श्रोतेजन । मी एक प्रश्न करितो लहान । मज द्यावे अवधान । एक वेळ ॥६९॥ एक एक संतांची गाठ पडाया । पुंण्याच्या क्रोडी लागती कराया । श्रीराममंदिरी या । येती किती संत ॥७०॥ अखिल विद्यमान संत । ज्ञात आणि अज्ञात । मामांच्या गुण गौरवात । आनंद मानिती ॥७१॥ हे काय गणित असे?। याचे उत्तर काढावे कसे? । हे ज्याच्या त्याच्या मनी वसे । असंदिग्ध आणि स्पष्ट ॥७२॥ तरीही निंदक म्हणती मामा । वेळ घालविती रिकामा । मोठेपणासाठी यम नियमा । सांभाळिती ॥७३॥ सतेज जो सूर्यासारखा । त्यास म्हणती अत्यंत फिका । परी किलकिलती त्यांचेच नयन का ? । सांगा मज ॥७४॥ हे निंदक बाहेर निंदती । परी त्यांच्याही अंतरी असेल जागृती । ती न दिसे लोकांती । अहंभाव चित्ती म्हणोनिया ॥७५॥ प्रसंगी तेही करद्वय जोडून । करिती अभावितपणे वंदन । ऐसे संतांचे संतपण । दिसोन येई ॥७६॥ भक्तिभाव तरी सद्गद होती । मामांची जाणून महती । लाभावी त्यांची संगती । म्हणोनि करिती प्रयत्न ॥७७॥ माई करमरकर । दूर सोडून आपुले घर । मामांच्या वाड्यात निरंतर । वसतीस

आल्या ।।७८।। अठरा वर्षे ऐकून कीर्तन । त्या झाल्या तल्लीन । म्हणती आता देह ठेवीन । याच पवित्र आवारात ।।७९।। तो पण त्यांनी साधला । अखंड सहवासाचा लाभ घेतला । नामस्मरणी जीव रमविला । माईसाहेबांनी ।।८०।। नाना जोगळेकर । आप्त माईंचे निकटतर । त्यांनीही श्रीराममंदिर । जवळ केले ।।८१।। निष्ठा मामांच्यावरी । त्यांची बसली भारी । परतताना एकदा पुण्यपुरी । त्यांनी वस्ती केली ।।८२।। तेथे श्री सहस्त्रबुद्धे संत । होते अति विख्यात । म्हणोनि चरणवंदनाचा हेत । धरोनि गेले ।।८३।। तव ते संत बोलती । तुम्ही सांगलीहूनी आलाती । ज्या चरणांची मिळाली संगती । ती आता सोडू नका ।।८४।। तव चमकले । म्हणती हे यांना कसे कळले?। आंर्तज्ञानी संत भले । म्हणोनिया ।।८५।। ज्ञान आणि अज्ञात । हा मागील उल्लेख आणा लक्षात । मामांच्या महत्वाची संगत । आता नीट लागेल ।।८६।। ऐसा हा वृत्तांत । सांगावा तितुका अद्‌भुत । एकचि चाचपोन शित । जाणावे सुजनांनी ।।८७।। ऐसा हा सुरम्य इतिहास । घडता वर्षे पन्नास आणि वीस । त्याहीवरी दोन खास । उलटून गेली ।।८८।। कालचक्र गरगरा फिरे । माया मोहांचे वारे । अज्ञानतिमिर भरे । करी क्षीण विवेक ।।८९।। विवेक जागवावया सतत । संतांची धरावी लागे संगत । काळ म्हणे मी हातोहात । आता नेईन संतासी ।।९०।। शक उगवला अठराशे त्र्याऐंशी । आणि जमल्या दुःखराशी । आकाशी अष्टग्रहासी । मेळ आला यावेळी ।।९१।। मामा मनात विचार करिती । काही खूणगाठ बांधिती । लोकांना ती विचार संगती । कळली वेळ गेल्यावरी ।।९२।। रामनवमीस कीर्तन । मामांनी केले उत्साह भरून । देह सार्थक साधन । सांगती सुगम शब्दे ।।९३।। श्रीराम जयराम जयजयराम । घोष करिती सप्रेम । श्रीराम हाचि विराम । म्हणती जीवाचा ।।९४।। कीर्तन संपल्यावर । स्वस्थ राहती



अंथरूणावर । तो सहस्त्रबुद्धे चरणांवर । माथा ठेविती ।।९५।। जातो दूर देशाला । आशीर्वाद असावा मजला । आता भेट पुढील वर्षाला । तोवरी स्मरण असू दे ।।९६।। राहतो तुमच्या वाङ्यात । हे सौख्य मनात । वियोग होता दुःखित । मन होय ।।९७।। तव मामा त्यांना म्हणती । वर्षाची काय निश्चिती । झाली भेट हीच चित्ती । असो द्यावी ।।९८।। बुद्धी याचा अर्थ सांगे । परी मन विकल्पी तरंगे । मायेचा पडदा लागे । आपोआप ।।९९।। मामा मनी विचारती । तीन तपावरी केली कीर्तन संगती । त्याचा आढावा चित्ती । आता घेऊ ।।१००।। सार ठेवू लिहून । आता स्वमुद्रांकित करून । भाविकांना मार्गदर्शन । तेचि पुढे होईल ।।१०१।। एक वर्षाच्या कीर्तनाची टाचणे । आता सुसंबद्ध लिहिणे । तेचि होईल ठेवणे । पुढीलासी ।।१०२।। विकल शरीर सावरती । उशा पायाशी ठेविती । सावकाश बसोन लिहिती । टिपणे कीर्तनाची ।।१०३।। हात न चाले भराभरा । घाम सुटे शरीरा । तरीही सुवाच्य काढुनि अक्षरा । विचार धन साठविती ।।१०४।। कोणी येतील साक्षेपी जन । ते वेचितील हे धन । तेची त्यांचे सुफल जीवन । म्हणोनिया ।।१०५।। तासन्‌तास काम चाले । देहदुःखाची तमा न चाले । ऐसे दहा महिने चालले । काम अव्याहत ।।१०६।। हीच मामांची संपत्ती । ते आपल्या भक्तासाठी गोळा करिती । जन उद्धाराची तळमळ चित्ती । धरोनिया ।।१०७।। प्रत्येक आपुले कीर्तन । त्यांनी ठेविले स्वमुद्रांकित करून । वाचता मन ये आनंदून । क्षणोक्षणी ।।१०८।। ऐसे दहा महिने होत आले । काळाचे माप भरत आले । शरीर थकतची चालले । दिवसें दिवस ।।१०९।। लिहिण्याचे कष्ट न सोसती । तेव्हा दुसऱ्याची मदत घेती । परी कार्य न थांबविती । क्षणमात्र ।।११०।। दिन प्रतिदिन विकल काया । डॉक्टरही थकले औषध द्याया । काही न चले उपाया । म्हणती हा वृद्धापकाळ ।।१११।। उभा

राहून कीर्तन । ते न जमे तेव्हा खुर्चीवर बसून । तीही सीमा उल्लंघून । गादीवर आले ॥११२॥ बसल्या बसल्या कीर्तन । तेही होई कठीण । परी नित्य नेम समाधान । ढळू न देती ॥११३॥ करोनि मन घट्ट । देहाचा एकही न पुरविती हट्ट । हे कर्मचि अचाट । वाटे किती एकांना ॥११४॥ ध्येयासाठी जीवन । ईश्वरासाठी पंचप्राण । उपासनेसाठी देहदंडन । ऐसे तप खडतर ॥११५॥ होता होता हनुमत्षष्ठी । आली द्यावया स्वानंद पुष्टी । परी मामांची देहयष्टी । खिळली अंथरूणाला ॥११६॥ समाधी मंदिरात उत्सव । मामांचा तेथ अडकला जीव । परी त्यांना आपले अवयव । आपले नव्हते ॥११७॥ श्रीहनुमत्षष्ठीच्या दिवशी । समाधी मंदिरात कीर्तन करावे ऐशी । मामांची इच्छा मनाशी । परी उपाय काय?॥११८॥ अंतकाळीची इच्छा कळली । श्रीहनुमत सद्गुरूंची कृपा वळली । गंगाधररावजींना बुद्धि झाली । अकस्मात ॥११९॥ उत्सवात राम करितो कीर्तन । तेच आपुले मानून । त्यातच समाधान । मामांनी मानले ॥१२०॥ ते न मानले श्रीसद्गुरूंना । म्हणती ''फुलासारखे उचलून आणा । येथे आज बापूरावजींना । माझ्यापुढे ॥१२१॥ तरीच माझे मन । आज होईल सुप्रसन्न । कीर्तन करीत असता वदन । पाहीन बापुरावजींचे''॥१२२॥ दिन गेला अस्तमानी । मामांना आणिले खुर्चीत बसवुनी । लोक सांभाळती प्राणाहुनी । या भीष्माचार्यांना ॥१२३॥ देह दुःख विसरून । मामांचे हृदय गेले आनंदून । चेहऱ्यावरी खदखदून । हास्य उमटले ॥१२४॥ निरागस हास्यबालकाचे । की मुक्तहास्य शिवशंकराचे । की सहज उमलणे कमल कलिकेचे । ऐसे वाटे मना ॥१२५॥ खुर्ची ठेविली समाधी समोर । तो मामा बोलू लागले सुरावर । रघुनाथ प्रिय गुरूवर । त्यांनी पाचारिले ॥१२६॥ प्रसन्नवदन मामांचे । की अमृतहास्य तात्यांचे । भाव मिळाले एकमेकांचे । मामांच्या वदनी ॥१२७॥ कीर्तनासी



अपूर्व रंग आला । ऐसा पूर्वी कधी न देखिला । लोक म्हणती प्रभुवर देखिला । मामांनी आज ॥१२८॥ मामा गर्जून सांगती । अढळ निष्ठा सद्गुरू चरणांप्रती । ठेवा त्याची प्राप्ती मोठी । कोण मोल करील त्याचे ॥१२९॥

**हनुमंत षष्ठी । करी स्वानंदाची पुष्टी ॥१॥**

**षडैश्वर्ये देऊनी । करिती भक्तांचे रक्षण ॥२॥**

**गोविंदासी नेमी । आणिती गंगाधर स्वामी ॥३॥**

सद्गुरू भक्तांचे रक्षण । करिती षडैश्वर्ये देऊन । शमदमादि साधन संपन्न। स्वये करिती भक्तासी ॥१३०॥ भव दुःखाच्या पार । कसे व्हावे हे शिकविणार । सामर्थ्यसंपन्न करणार । आपल्या भक्तासी ॥१३१॥ नेभळ्या भक्तासी खांद्यावर । घेऊन सद्गुरू पार करणार । ऐसा नाही येथ प्रकार । सुजन हो ॥१३२॥ ज्याचे त्याने हित साधावे । आपण सामर्थ्य संपन्न व्हावे । संत होवोनि संतासी मिळावे । हे भाग्य देती सद्गुरू ॥१३३॥ ऐसे प्रभावी कीर्तन । मी ऐकले नव्हते अजून । आता मामा बोलती आवर्जून । ऐका काय ते ॥१३४॥ आजवरी कीर्तन घडले । प्रतिवर्षी पूर्ण झाले । म्हणोन आज माझे मन धाले । पूर्ण पावलो समाधान ॥१३५॥ आता माझी सेवा पूर्ण झाली । ती सद्गुरूंनी करवून घेतली । यापेक्षा अधिक न पाहिली । मी मौज कोठे ॥१३६॥ तात्यांचे भक्तजन । असती कितीतरी अधिकार संपन्न । त्यात मी पहिला परी शेवटून । असो द्या जी ॥१३७॥ शब्द मामांचे ऐसे । ऐकता मन झाले कसेसे । अपार प्रेम हृदयी वसे । म्हणोनि वाटे बोलती ॥१३८॥ हा निरोप अखेरचा । हा नसेल हेत मनीचा । हे मानोन आम्ही त्याचा । नादच सोडला ॥१३९॥ मामा आहेत अजरामर । ते नाहीत आम्हास सोडून जाणार । आम्ही मरू परंतु मामांचे कीर्तन चालणार । अखंडित ॥१४०॥ नरदेह आहे नश्वर । कितीएक संत

गेले भवपार । हा नित्याचा कीर्तनी गजर । तरी ही आम्ही विसरलो ।।१४१।। मामा घरी कीर्तन करिती । समाधिमंदिरात जाती । तेव्हा त्यांची आत्मशक्ति । काही वेगळीच दिसे ।।१४२।। जेथे प्रथितयश डॉक्टर । सोडती मनीचा धीर । तेथे मामांचे धैर्य अनिवार । दिसे सर्वांना ।।१४३।। जोवरी मामांचे कीर्तन अखंड । तोवरी आम्हास विश्वास उदंड । वाटे येथे कळिकाळाचे बंड पडेल मोडून ।।१४४।। रोग जरी असाध्य दुस्तर । तरी मामांचे आयुष्य शंभरावर । डॉक्टरांचा सुटे विचार । तेथे चमत्कार मामांचा ।।१४५।। ऐशी भोळी आशा मनीची । दृढावली साची । मामांच्या प्रकृतीची धास्ती कधी वाटेना ।।१४६।। परी जाणते बोलू लागले । की हे चिन्ह नव्हे भले । मामांचे आयुष्य उरले । बोटावर मोजण्याचे ।।१४७।। परी हे न पटे कोणासी । भोळी भावना धरिती मनाशी । मामा राहावे अशी । आशा मनात ।।१४८।। मामा कीर्तन करिती । गोजिरी दिसे त्यांची मूर्ती । बाल गोपालांचा मेळा भोवती । म्हणती श्रीराम जयराम जयजयराम ।।१४९।। शुभ्र सदरा लाल रुमाल । गौरवर्ण गोल मुखकमल । शांत भाव प्रसन्न बोल । ऐसे मामा ।।१५०।। जैसा प्रेमळ पिता । बुझावी आपुल्या सुता । कधी न रागेजता । ज्ञान सांगे ।।१५१।। तैसे हे वयोवृद्ध । विमल ज्ञानवृद्ध । कठोर तपोवृद्ध । प्रेमळ मामा ।।१५२।। विशाल परिवार त्यांचा । पडदा न जेथे जातीभेदाचा । विशुद्ध सागर प्रेमाचा । ऐसे मामा ।।१५३।। जेव्हा त्यांच्या कीर्तनास विराम । मिळेल आणि सुटेल शरीराचा आराम । तेव्हाच म्हणू राम रे राम । धाव आता ।।१५४।। काही कुशल विचारू । काही मनीच्या शंका निवारू । काही संदेश मागू । अंतकाळी ।।१५५।। करू निरवा निरवीच्या गोष्टी । नातरी विचारू स्पष्टास्पष्टी । फिरवा काळासी यासाठी । हट्ट धरू ।।१५६।। घालू देवासी साकडे । नवस करू देवापुढे । आपुले



आयुष्यही रोकडे । वेचू मामांच्यासाठी ।।१५७।। भाबड्या ऐशा लोकांना । काही न देवोन सूचना । मामा म्हणती प्रभुवरांना । काही वेगळेच ।।१५८।। मामा म्हणती रामाला । चालीव या कीर्तन परंपरेला । जरी तू अशक्त तरी हे तुला । केले पाहिजे ।।१५९।। अरे आपण श्रीरामाचे सेवक । नको येथे देहदुःखाचे कौतुक । चालीव माझा प्रिय नेम एक । नित्य कीर्तनाचा ।।१६०।। कोणा आवडो वा नावडो । कोणी कितीही विघ्ने घेऊन पडो । जन निंदेचीही झडो । रास शिरावरी ।।१६१।। एक देव आणि आपण । याची गाठ असो द्यावी करकचून । तुटे देह परी कीर्तन । चुकू नये कदापिही ।।१६२।। ऐशी आवडी धरून हे रामा । मी गाठली आयुष्याची सीमा । आता सहजेची या कामा । हाती धरावे ।।१६३।। कोण कैसी येईल वेळ । हे न कळे सदा सर्वकाळ । मन राखोनि निश्चल । सदा वर्तावे ।।१६४।। प्रेमापोटी बोलले । ऐसे रामाला वाटले । हे जातील हे न शिवले । त्याच्या मना ।।१६५।। विशुद्ध प्रेम अंतरीचे । तेथे काय काम कुकल्पनेचे । हे असेल बोलणे नित्याचे । म्हणे राम ।।१६६।। मामांचे अनेक भक्त । दचकती अंतरात । मामा सुचविती आपुला अंत । विविध प्रकारे ।।१६७।। कोणी म्हणे हा तेजाचा गोळा । चालला पहा दक्षिण दिशेला । अरे याचा अर्थ मला । सांगा कोणी ।।१६८।। मामांच्या फोटोची फ्रेम दिसे । परी देहाकृतीवरी पडदा भासे । म्हणती हे नवलसे । झाले काय? ।।१६९।। कोणी बसे साधनाला । तो मामा म्हणती चला । झडकरी सांगलीला । तरीच भेट ।।१७०।। *नारायणरावांना भेटती । तात्या आणि बोलती । आता बापुरावांची निश्चिती । मुळीच नसे ।।१७१।। चालल्या आहेत वाटाघाटी । या साधुमहाराजांच्या हातच्या गोष्टी । हे ऐकता मन

टीप :– नारायणराव जोग

हिंपुटी । होय त्यांचे ।।१७२।। सौ. इंदिराबाई वाटवे विचारिती । मामांना पुढतपुढती । दासबोध ऐकावा म्हणती । मामांच्या मुखे ।।१७३।। मामा देती प्रत्युत्तर । आता हे रामचि सांगणार । हे कार्य त्याच्या शिरावर । सहजचि आहे ।।१७४।। माघ शुद्ध सप्तमीचा । दिवस उगवला दुःखाचा । काळ म्हणे आमचा । समय पातला हळुहळू ।।१७५।। मामा म्हणती दोनच कीर्तनाची । आता टाचणे करायची । तीच आपुल्या कार्याची पूर्तता समजू ।।१७६।। सोमवारचे पुढील टाचण । रामचि सांगेल अपण । रविवारी मामा गेले बोलून । ते ऐकती धुंडिराज ।।१७७।। नातू शेठ माधवनगरचे । काय थोरपण त्यांच्या उत्साहाचे । क्ष किरणे फोटो काढवून मामांचे । मुंबईला पाठविती ।।१७८।। तेथे थोर डॉक्टर तपासती । सूक्ष्मदर्शक त्यांचे नेत्र असती । परीक्षेची झाली परिणती । त्यांचे निर्णय आले ।।१७९।। सर्वतोमुखी निराशा । परी डॉक्टर देती दिलासा । भयशोक निवारावया थोडासा । परी खिन्नता पसरे ।।१८०।। इष्ट मित्र गणगोत आले । कोणी सेवेस तिष्ठत बसले । रजेचे अर्ज पाठवले । सांगली सोडवेना ।।१८१।। धनंजय कोल्हापूराहून । आला तार पोचून । गाडीत उभा राहून । धावला मामांच्या दर्शना ।।१८२।। जो आला तो खिळून बसला । छाती धडधडे क्षणाक्षणाला । उचकी ठसका मामांना लागला । की पाहे मुखाकडे ।।१८३।। कोणी ओळखी कोणी अनोळखी । कोणी पाही कोणी नेत्र झाकी । सर्वांची तोंडे फिकी । पडली त्या दिवशी ।।१८४।। अटळ दिसे विधी घटना । निराशा घेरी अंतःकरणा । कोणी पुसे डॉक्टरांना । केविलवाण्या मुद्रेने ।।१८५।। शुक्रवार शनिवार रविवार । चिंता वाटे अनिवार । मामांनी सुरू केला गजर । श्रीराम जयराम जयजयराम ।।१८६।। होते पूर्ण भानावरी । परी मौन धरिले बाह्याभ्यंतरी । आणि रंगले अंतरी । नामस्मरणात ।।१८७।। नेत्र ठेविले झाकून । मुख



सतेज प्रसन्न । संसार चिंता सोडून । रंगले नामस्मरणात ।।१८८।। लोक म्हणती मामांना । धनंजय आला पहाना । डोलवून माना । ऐकिले हे सुचविती ।।१८९।। सूत्रचालक परमेश्वर । अखेर हित तेच करणार । आशेचे उमाळे वारंवार । तरीही येती ।।१९०।। नारायणराव वाटवे गेले । श्रीबापूरावजींना निरोपले । तेही त्वरेने आले । मामांची विचारपूस करण्या ।।१९१।। तेथून पुढे निर्याण प्रसंग । अति कठीण करूणरसरंग । अनिष्ट अटळ शोकसागर अथांग । परी वर्णन करणे असे ।।१९२।। कैशी चालेल मति । विचारांची मोडेल संगती । हृदय उचंबळेल किती । सांगता नये ।।१९३।।

इति श्रीगोविंदचरितमानस । जे स्वभावेचि अतिसुरस । जेथे अखंड उसळेल भक्तिरस । संतदर्शन नाम एकादशोध्याय ।।११।।

***

### अध्याय बारावा

## निर्याण प्रसंग

राजाधिराज श्रीराम । विशुद्धाचरण दाखविले उत्तम । म्हणोनि जन सर्वोत्तम । सदा म्हणती श्रीराम जयराम जयजयराम ।।१।। माघ शुद्ध सप्तमीचा । दिवस होता शनिवारचा । दोनच कीर्तनाची टाचणे लिहिण्याचा । आता समय म्हणती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।२।। पर्यायाने सुचविती । आली विश्रांतीची विश्रांती । परी फिटे ना भ्रांती । आशा दुर्धर रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।३।। समय दुपारी साडेचारचा । रामाच्या ज्ञानेश्वरी वाचनाचा । मामांनी प्रगट जयघोष रामनामाचा । सुरू केला की रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।४।। ऐसा काही धरोनिया नेम । जो नित्य वदे सप्रेम । तो स्वयेचि होय श्रीराम । म्हणती मामा पुनःपुन्हा रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।५।। हे काही चिन्ह निराळे । म्हणे राम यावेळे । ज्ञानेश्वरीचे वाचन पूर्ण केले । रामाने रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।६।। घोष चालला श्रीरामाचा । घोष चालला उपास्य देवतेचा । टाहो फोडती अखेरचा । देवाला रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।७।। तीन तपावरच्या कीर्तनाचा । हाचि सारांश महत्त्वाचा । अखंड घोष रामरायाचा । सुरू केला की रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।८।। दिनमणी मावळता पश्चिमेला । आकाशी नक्षत्रांचा मेळा । मुखी नामस्मरण माळा । नाम संकीर्तनाची रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।९।। म्हणती रात्री रामाला । चला सुरू करू कीर्तनाला । कीर्तन नेम मघाच झाला । म्हणे राम रे, श्रीराम जयराम



जयजयराम ।।१०।। तरी मामांनी सुरू केले । रघुनाथप्रियासि वंदिले । श्रीज्ञानदेवांचे स्मरण केले । नित्याप्रमाणे रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।११।। सदा नम्र ईश्वरचरणी । शांती सौख्य लाभले झणी । आता मागे परतोनी । कोण पाहे म्हणती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१२।। निघाले पुढारा । लावीत कळिकाळासि दारारा । रामचरणांचा मिळाला आसरा । काळ काय करील रे, श्रीराम जयराज जयजयराम ।।१३।। म्हणती आम्ही श्रीरामाचे दास । केला ब्रह्मांडाचा ग्रास । चरणी ठेविला विश्वास । म्हणोनिया रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१४।। देहभाव विरोनी गेला । जीव शिव भेद सरला । जन्म सार्थकी लागला । धन्य नरदेह रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१५।। हे शनिवारचे कीर्तन । सर्वभावे झाले परिपूर्ण । प्रसन्न झाला रघुनंदन । निजानंद पूर्ण कामरे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१६।। अंगी ताप भरला । मामा आठवती श्रीहरीला । म्हणोनि शांती सौख्य त्यांच्या जीवाला । दिसे रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१७।। माघ शुद्ध अष्टमीचा । दिवस होता रविवारचा । काळ आला सर्वांच्या चिंतेचा । म्हणोनि आठविती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१८।। शके आठराशेत्र्याऐंशी । मनाची होय कासाविशी । दुर्धर संकट आदळे उराशी । म्हणोनि जपती श्रीराम जयराम जयजयराम ।।१९।। अनेक रोग शरीरात । घर करून राहिले निवांत । मामांना ताप चढला अतोनात । आता आसरा, श्रीराम जयराम जयजयराम ।।२०।। आधीच वैद्यांनी हात टेकले । त्यातच हे नवे विघ्न आले । लोक म्हणती हे काय झाले । धाव रे धाव, श्रीराम जयराम जयजयराम ।।२१।। रामही तापाने फणफणला । म्हणती हा फ्लूचा घाला आला । संकटावरी संकटांचा पडला । ढीग की रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।२२।। लोक येती आणि जाती । म्हणती संत

असावे या जगती । परी मनी होती । सचिंत की रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।२३।। हा हा म्हणता ही वार्ता । पसरली क्षण न लागता । लोकांची गर्दी उसळे आता । सर्वही म्हणती, श्रीराम जयराम जयजयराम ।।२४।। रवि चालला अस्ताला । मामा उठू लागले कीर्तनाला । अंगी ताप भरलेला । तरी ही निष्ठा की रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।२५।। म्हणती बापुराव गोडबोले । आता निजूनच कीर्तन पाहिजे केले । परोपरीने विनविले । मामा रूकार देती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।२६।। हात जोडून कीर्तन । सुरू केले आनंदून । टाकीचे घावे देवपण । मिळे म्हणती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।२७।। आघात सहन केल्याविण । कैसे येईल देवपण । तापाचा आघात दारूण । तरी कीर्तन चाले रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।२८।। देही ताप सणाणे । आणि मामांचे हे बोलणे । जे केले तेचि सांगणे । हे मामांचे ब्रीद रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।२९।। बोलती सतीच्या गोष्टी । आणि ताप जाळी शरीरयष्टी । परी मुखावरी शांती पुष्टी तुष्टी । हे काय अघटित रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।३०।। सतीच्या गोष्टी सांगून । हाती घेतले सतीचे वाण । भडकती ज्वाळामध्ये सगुण । मामा दिसती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।३१।। सोशी थोर आघात । त्यासीच म्हणावे संत । हे दाखविती तंतोतंत । या कीर्तनी मामा रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।३२।। रम्य गोष्टी युद्धाच्या । त्या सर्वांनी ऐकावयाच्या । वेळ येता सरतील त्यांच्या । सर्व उड्या रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।३३।। मामा निधड्या छातीचे वीर । गोळ्या झेलती छातीवर । त्यांचा गौरव थोर । म्हणोनि वाटे रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।३४।। हा रविवारच्या कीर्तनाचा सारांश । मामांचे शेवटचे शब्द अधिकांश । चित्ती घ्यावे सावकाश । तरीच श्रोते ही पदवी रे, श्रीराम



जयराम जयजयराम ।।३५।। रंगले कीर्तन शेवटास गेले । बोल बोलता अबोल झाले । आकाशी घुमत राहिले । शब्द रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।३६।। आज अडतीस वर्षांवरी । जो शब्द घुमला अंबरी । त्याची आता पुरी । शांती झाली रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।३७।। झांज बसली जाग्याला । तो उचकीचा घाला आला । एकच गलबला झाला । म्हणती बोलवा धन्वंतरी रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।३८।। डॉक्टर मुखात औषध घालिती । दंडात सुया टोचिती । *डॉक्टरांनी उपाय तरी किती । केले म्हणून सांगू रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।३९।। जागोजागी लोक राहिले । लक्ष मामांच्याकडे वेधले । म्हणती काही मागितले । तर लगेच देऊ रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।४०।। परी मामा काही न बोलती । फिटली प्रत्येकाची भ्रांती । त्यांनी धरिली एकदाचि शांती । आणि मौन रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।४१।। अंतरी जागे होते पूर्ण । ते नव्हते त्यांचे बेशुद्धपण । याची स्पष्ट खूण । दिसली प्रत्येकाला रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।४२।। मामा विचारिती नानांना । सखारामपंत जोगळेकरांना । आता वेळ कोणती सांगाना । घड्याळात रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।४३।। नाना म्हणती बारा वाजले । वार कोणता मामांनी विचारले । तो नानांनी सांगितले रविवार म्हणोनि रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।४४।। उद्या म्हणती सोमवार का । मामांनी निश्चय केला पक्का । महाराज काय म्हणती ठाऊक आहे का । म्हणती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।४५।। गर्भवास नको पुढती । ऐसेच ना विनविती । सांगा 'नाना' निश्चिती । मत म्हणती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।४६।। आनंदू रे । आजि पूर्णानंदू रे । हे पद

---

टीप :– डॉ. उदगांवकर व डॉ. फडणीस

मामांचे आवडते रे । गाती आज मामा । श्रीराम जयराम जयजयराम ।।४७।। पुन्हा मौन धरिले । घड्याळाची टक् टक् चाले । मनोमन आता सर्वांना कळले । काय होणार रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।४८।। लागता धक्का अचानक । हुंकार मिळे क्षण एक । तोडिला संबंध म्हणती लोक । नेत्र पैलतीरी रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।४९।। काळजी हा रोग लागला । आता प्रत्येकाच्या मनाला । चिंतेने चेहरा ओढला । प्रत्येकाचा रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।५०।। जोवरी संत असती । तोवरी त्यांची न कळे महती । परी जातो म्हणता चरचरती । काळजात सुऱ्या रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।५१।। अज्ञानाची ऐशी महती । मायेची अनिवार शक्ति । जाणत्या बुद्धिस भुरळ पडे ती । काय करू रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।५२।। कळते परी वळेना । समजते परी आळस सरेना । शेवटी हाती काही उरेना । जड जीवांच्या रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।५३।। त्यासी द्यावया धक्का । संत काळास कारे मारिती हाका । आणि जाती श्रीहरीच्या लोका । मग लोक तळमळती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।५४।। आता माझ्या कीर्तनाचे । सार शोधून अंतरीचे । ठेवा हृदयी कायमचे । हेच मामा सांगती ना रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।५५।। प्रेम ठेवा भगवंतावरी । नियमाची ब्रह्मगाठ अंतरी । गुरूवचनावरी । ठेवोनि म्हणा । म्हणती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।५६।। जणू हा उपदेश ठसाया । सद्गुरू शोधिती उपाया । कठोर अशा शेवटच्या या । का रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।५७।। हे श्रीसमर्था रामराया । आम्ही असेच जाऊ वाया । जरी सद्गुरूंची कृपाछाया । अंतरेल रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।५८।। मामा अंतःकरणाचे कोमल । बोलती सदा मधुर बोल । अपराध पोटी घालून



अमोल । उपदेश देती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।५९।। शोधिता घरी आणि द्वारी । रस्त्यावरी आणि देशांतरी । ऐशा पुण्य पुरुषाची सरी । येईल कारे कोणा, श्रीराम जयराम जयजयराम ।।६०।। नको नेऊ तू मामाना । ऐकूदे त्यांच्या अमृतवचना । आम्ही ऐकू त्यांच्या कीर्तना । आणि म्हणून श्रीराम जयराम जयजयराम ।।६१।। ऐसा विचार करता । रात्र संपली जाता जाता । परी आशादायक प्रसन्नता । मामांच्या चेहऱ्यावरी रे श्रीराम जयराम जयजयराम ।।६२।। ओठ मिटले नेत्र झांकले । श्वासोच्छ्वास मंद चाले । उचकी ठसका येत हलले । म्हणजे वाटे उठतील मामा रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।६३।। मामा जातील ही कल्पना । न शिवे कोणाच्या मना । जे नित्यनेमे चालविती कीर्तना । काल पर्यंत रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।६४।। घडेल काही चमत्कार । येतील आता भानावर । होतील उपकार । भाविकांच्यावरी रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।६५।। काळ मेघ दाटती गगनी । तरी आशेचे अंकुर फुटती मनी । भक्त पाहती लोचनी । मामांच्या मुखाकडे रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।६६।। एकनिष्ठ सेवा मामांची । करी शरयू अखेरची । सुफल होईल निदान तिची । सेवा ऐसे वाटे रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।६७।। हे रामा तुझ्या अयोध्येचे । साकार रूप शरयूचे । वेड घेऊन मामांच्या सेवेचे । येथे वाटे आले रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।६८।। सेवा करावी कैशी । तीही पहा ऐशी । हे दाखविण्या पाठविसी । मनुष्य रूपे शरयूस कारे। श्रीराम जयराम जयजयराम ।।६९।। आला सोमवारचा दिवस । माघ शुद्ध नवमीस । शके आठराशेत्र्यांशीस । हे जगज्जीवनारे, श्रीराम जयराम जयजयराम ।।७०।। डॉक्टरांच्या फेऱ्या चालल्या । धीर शिणल्या मनाला । परी त्यांच्या चेहऱ्यावरी उमटल्या । उदासीन छाया रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।७१।। एक व्याधी बंद करिती । तो दुसरीच उद्‌भवे

पुढती । आता डॉक्टर म्हणती । नका बोलावू आम्हाला रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।७२।। दुपारी दोन वाजल्यावर । येऊ भेटीसी सत्वर । तोवरी आहे उपचार । तोच असो दे म्हणती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।७३।। अर्थ याचा उघड दिसे । मन कासावीस होतसे । तरीही आशा मनी वसे । दुर्धर आशा रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।७४।। लोकांनी बैसोन सभोवार । सुरू केला रामनामाचा गरज । उपाय रामबाण या भूवर । घोष चालला रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।७५।। अखंड आळविती देवाला । म्हणती ये धाऊनी या समयाला । पीळ पडे हृदयाला । धाव रे धाव श्रीराम जयराम जयजयराम ।।७६।। ठोका दुपारच्या दोनीचा । पडला परी श्वास मामांचा । चालला हे पाहून मनाचा । ताण कमी झाला रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।७७।। मन दे टाळी आनंदाने । म्हणे कृपा केली रघुराजाने । ऐकोन करूणा वचने । भक्तांची रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।७८।। फोन केला भरभर । या डॉक्टर आता लवकर । वाचवा प्राण मामांचे सत्वर । गरूडवेगाने या म्हणती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।७९।। फडणीस डॉक्टर चकित झाले । म्हणती हे अघटित वर्तले । दुपारी दोनला आयुष्य सरले । बोले हे शास्त्र म्हणती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।८०।। शास्त्र हे निसर्गाचे । सामर्थ्य आगळे सद्‌गुरूंचे । अरे हे विचाराच्या पलीकडचे । झाले म्हणती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।८१।। अरे हा संत जीवंत । कीर्तीमंत प्रतापवंत । आमचा साष्टांग प्रणिपात । या राम भक्ता रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।८२।। संत एक कान्हेरे आले । त्यांनी मामांच्याकडे पाहिले । नीलवर्ण ज्योत पाहून चमकले । नेत्रात मामांच्या रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।८३।। अरे आहेत वाटाघाटी सुरू । न कळे सद्‌गुरूंचा विचारू । म्हणोन अघटित



प्रकारू । तुम्हास दिसे म्हणती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।८४।। गुरूतृतियेचा उत्सव । व्हावा एवढा मिळावा वाव । मामा विनविती सद्‌गुरूराव । म्हणोन हा विलंब दिसे रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।८५।। निर्णय देवाधिदेवांचा । आणि सद्‌गुरूरावांचा । म्हणती आत्ताच येण्याचा । समय पातला रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।८६।। सद्‌गुरूंच्या इच्छेला । मामांनी रुकार दिला । तो पाचाचा ठोका पडला । वेळ मामांच्या कीर्तनाची रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।८७।। ही वेळ मामांच्या नित्य कीर्तनाची । आज तपानुतपाची । आता वेळ काही घडण्याची । म्हणोनी कोणी आले रे, *श्रीराम जयराम जयजयराम ।।८८।। नेत्र मामांनी उघडले । नील तेज प्रकाशले । ते रामाने पाहिले । समजला तो अंतरी रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।८९।। त्रयोदशाक्षरी मंत्राचा । उच्चार गर्जली मामांची वाचा । म्हणती गजर करा याचा । या सुवेळी रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।९०।। वेळ मामांच्या कीर्तनाची । भक्तजनांनी ही साधली अखेरची । वदे वाचा प्रत्येकाची । सप्रेम रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।९१।। खंड न पडता अखंड चालले । किती एक या नामगंगेस मिळाले । पर्वकाळी पावन झाले । मंत्र घोषे रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।९२।। संत निघाले निजधामा । आळवा आता श्रीराम जयरामा । भक्तवत्सला पूर्णकामा । वाली तू दीनांचा रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।९३।। वेळ मामांच्या कीर्तनाची । साधली ही अखेरची । झापडे मिटली डोळ्यांची । मामांनी वाचा बंद केली रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।९४।। अडतीस वर्षांचा कीर्तनाचा । सारांश बोलती वाचा ।

टीप :– श्री. अण्णा देवधर व त्यांच्या पत्नी सौ. कमलाबाई देवधर यांना असे वाटून त्या ५ वाजता श्रीमामांच्या घरी आल्या.

तोच उपदेश नित्याचा । मामांच्या कीर्तनी रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।९५।। तोच संदेश देऊन । पुन्हा अंतर्मुख केले मन । हे जागेपण नव्हे सामान्य । पटले प्रत्येकाला रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।९६।। नभी वीज चमके क्षण एक लकलके । पुन्हा अंधारी भिंतीला थडके । डोके ऐसे झाले रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।९७।। सकाळपासून । नाड्या सुटल्या म्हणती वैद्य जन । तरीही हे अनुसंधान । हा काळावरी जय रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।९८।। सारी अघटित घटना । आश्चर्याश्चर्य वाटे मना । सभोवारच्या लोकांना । मुग्ध झाले सारे रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।९९।। लोक बसले ठाण मांडून । स्त्रिया पुरूष सगळेजण । सुरू केले त्यांनी *भजन । एक सरे रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१००।। वासुदेवराव जोशी राहिले । उभे कीर्तनास त्यावेळे । मामा नाही गेले । ना जाणार म्हणती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१०१।। दिनमणी ढळला पश्चिमेला । कभिन्न अंधःकार दशदिशाला । काळ रूपे सर्वांना भासला । भयभीत सर्व रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१०२।। औषधाचा उपाय सरला । अशुद्ध येऊ लागले तोंडाला । सर्वांचा आधार सुटला । भार आता तुझ्यावरी रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१०३।। हळू हळू रात्र सरे । तैशीच आशा क्षीण होई रे । उशापायशाशी लोक सारे । सेवेस असती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१०४।। अंकावरी मामांचे मस्तक । राम मोजी क्षण प्रत्येक । ठोके हृदयाचे एकूण एक । ऐकू येती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१०५।। आला बाराचा समय । उरली दहा मिनिटे हाय

टीप :- नाना जोगळेकर, बंडोपंत गोडबोले, दादा कुलकर्णी, येसूताई फडके, करंदीकर काकू, सौ. उदगांवकर बाई इत्यादी अनेक स्त्री पुरुषांनी या भजनात भाग घेतला होता.



हाय । ज्योत ज्योतीसी मिळून जाय । गोष्ट संपली रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१०६।। दिवस ठरला गोविंद नवमी । या आत्मनिवेदिनी सरला मी । ब्रह्म मिळाले ब्रह्मी । झाला हलकल्लोळ रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१०७।। अश्रूंचे लोट चालले । कोणी रडले कोणी ओरडले । काहींनी पदर लाविले । आपुल्या नेत्राला रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१०८।। कोणी रडून दुःख हलके करी । कोणी साठवी हृदयांतरी । जो तो चूर आपआपल्यापरी । अंतरात रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१०९।। तारा गेल्या इष्ट मित्रांना । स्नेह्या आणि सोबत्यांना । जवळच्या नातेवाईकांना । अंत्य दर्शनास रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।११०।। मृत देह राहिला सहा तास । परी अंगास न सुटला वास । अवयव सैल न ताठले यास । काय म्हणती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१११।। रामनामाचा वेढा शरीराला । कारण तेच प्रत्येकाच्या तोंडाला । अखंड नामपाठ चालला । पार्थिव देहापुढे रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।११२।। पुन्हा सूर्य आला पूर्वेला । घेऊन जाणार देहाला । चला आता कृष्णातीराला । मनी असो रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।११३।। सोमवारचे कीर्तन । मामांनी ठेविले टाचून । ते मंत्ररूपे सांगून । मामांनी देह ठेविला रे, श्रीराम जयराम जयजयराम।।११४।।

**मामांचा शेवटचा अभंग :-**

**मूळ स्वभाव गुरूनाम । श्रीराम जयराम जयजयराम ।।१।।**
**अहंकाराच्या अभावे । देव होशील स्वभावे ।।२।।**
**गोविंद म्हणे स्व स्वभाव । । जीवा सोडी रे अभाव ।।३।।**

व्हावा मूळ स्वभाव गुरूनाम । त्यास कधी न द्यावा विश्राम । सदा करील पूर्ण काम । आधार जडजीवास रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।११५।। अति नको ब्रह्मज्ञान । धरा गुरूवचन प्रमाण । साधनी बसा मांडोन ठाण ।

ऐसे मामा सांगती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।११६।। अहंकाराचा होवोन अभाव । देव हाच होईल स्वभाव । तेथे दृढ धरा भाव । गोविंद म्हणे रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।११७।। जन्म सर्व दुःखासी मूळ । मृत्यू हाही दुःख प्रबळ । त्याचे तोडोनी जंजाळ । मुक्त व्हा म्हणती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।११८।। हे शेवटचे कीर्तन आणि मामांचे स्वानंद भुवनगमन । शब्दाचे क्रियेशी अनुसंधान । केवढे अघटित रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।११९।। मामा स्वस्वरूपी मिळाले । स्वानंद रूप झाले । त्यांचे देहकष्ट आता सरले । सुखी झाले मामा रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१२०।। वेगी होवोन सावधान । जोडोन सारासार विचार धन । प्रपंचाचा लोभ सोडोन । मामा स्वरूपाकार झाले रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१२१।। अरे हा पंथ अनंताचा । रोखून मामा चालले भाग्याचा । परी आम्हा पूर अश्रूंचा । अनिवार लोटे रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१२२।। सकाळी सूर्योदयाला । मामांचा देह पुष्पांनी आच्छादिला । वरी अश्रूंचा अभिषेक चालला । प्रत्येकाच्या रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१२३।। हाती भावफुलांची माळ । घेऊन प्रत्येक उभा राहिला । मनोमने अर्पी चरणाला । या पुण्य पुरुषाच्या रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१२४।। आता पूजा षोडषोपचार । मंत्रपुष्पांचा संभार । धूप दीप नैवेद्य सत्वर । आणा मामांना रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१२५।। आधार ज्या देहाचा । लाभला मामांना वर्षानुवर्षांचा । त्याने मार्ग धरिला कृष्णातीराचा । मामा राहिले जगज्जीवनी रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१२६।। मामा झाले सुख सहित । मामा विसरले दुःख समस्त । मामांना मिळाला निर्मळ एकांत । आरती मामांना ओवाळू रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१२७।। मामांनी केले कलिमलाचे दहन । मामांचे शरीर पुण्यपावन । तेहि ज्योति सवे जाईल विरून ।



ओवाळू आरती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१२८।। मामांचे मायाविरहित माहेर । मामांना विश्रांतीसुख निर्भर । मामांनी निर्गुणपरी केले घर । ओवाळू आरती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१२९।। उचलले देहाला । तो हलकल्लोळ उडाला । आता आठवीत मामांच्या गुणाला । चला पुढती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१३०।। प्रशांत, निगर्वी, निर्व्यसनी । प्रेमळ विरक्त समाधानी । सुंसारसुख गौण मानुनी । ईश्वर आपुला केला रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१३१।। सदा रत साधनी । अथवा हरिकीर्तनी । किंवा श्रवण मननी । मामा निमग्न सदा रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१३२।। साधननिष्ठ थोर गुरुभक्त । वागणे अत्यंत नियमित । बोलणे चालणे परिमित । सदा अंतर्मुख दिसती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१३३।। शमदमादि ऐश्वर्यसंपन्न । सर्वाभूती सदा लीन । निंदकांचा गौरव करून । आत्मसुखी रहाती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१३४।। त्यागी तपस्वी पितृभक्त । प्रेमळ सदाचारी मातृभक्त । गुरूनामस्मरणी आसक्त । अनुरक्त संतपूजनी रे, श्रीराम जयराज जयजयराम ।।१३५।। देहममता शून्य । श्रीरामचरणी अनन्य । कीर्तन सेवेस प्राधान्य । लोकोपकारासाठी रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१३६।। चिंता न देहाची । न आपुल्या संसाराची । निर्भय वृत्ती सदाची । मामांची दिसे रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१३७।।ध्यास नामस्मरणाचा । तेचि अंतकाळी आले वाचा । पांग फिटला कर्णद्वयांचा । ऐकून अनेकांच्या रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१३८।। अंतकाळी नामस्मरण । उंच स्वरे उच्चारून । सुखी केले भक्तजन । तो हा त्रयोदशाक्षरी मंत्र -

**श्रीराम जयराम जयजयराम ।।१३९।।**

नेमाची गाठ प्राणासवे हे मामांनीच म्हणावे । सप्रयोग सिद्ध करावे । मामांनी रे, श्रीराम जयराज जयजयराम ।।१४०।। यात्रा चालली

कृष्णातीराला । मुखी श्रीराम जपमाला । घाव अंतःकरणावरी बसला । तरी सर्वजण म्हणती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१४१।। आले समाधी मंदिरापाशी । संत श्रीहनुमंत चरणासी । श्रीगंगधारराव आणि श्री सोनोपंत दाराशी । तिष्ठत होते रे, श्रीराम जयराज जयजयराम ।।१४२।। हार घालून पुण्य देहाला । ते ओवाळती आरतीला । पुन्हा पंचारती फिरल्या । जयदेव जय गोविंद म्हणोनि रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१४३।। गोविंद मिळाले श्रीहनुमत्पदी । एकरूप झाले स्वानंदी । अखंड कीर्तनाची गंगानदी । दिसे नेत्रांतरी प्रत्येकाच्या रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१४४।। हे पुण्यपावन श्रीराम । हे सुखनिधान श्रीराम । हे भक्तकैवारी श्रीराम । राम राम रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१४५।। आता मामा तुझ्या ठायी । तुझ्या जवळी आमची आई । गावू ''राम, राम'' हृदयी । मामांच्यासाठी रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१४६।। कधी येईल तुला करुणा । कधी दाखवशील गोविंद राणा । लोळण घेतो तुझ्या चरणा । नको निष्ठूर होऊ रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१४७।। जेथे आपुली आई असे । तेच ठिकाण बालक गवसे । तैसे माझ्या जीवा वाटतसे । तुझे दार ठोठवावे रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१४८।। अरे हा एकनाथ पैठणवाला । आला कृष्णातीराला । या संत ताम्हनकरांच्या बोला । आता आठवले रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१४९।। ताम्हनकर महाराज गलितगात्र । वार्ता कळताच मात्र । सुटले कृष्णातीरा पवित्र । लटपटे त्यांची काया तरी रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१५०।। घालिती साष्टांग नमस्कार । तीन प्रदक्षिणा सभोवार । श्राद्धांजली संतवर । अर्पिती संतासि रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१५१।। श्रीराम भेटे श्रीरामाला । ऐसा हा अपूर्व सोहळा । अश्रु झाले गोळा । नेत्री सर्वांच्या रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१५२।। काष्ठांचा ढिगारा । आत झाकिले पुण्यशरिरा ।



मंत्राग्नी आणि वारा । एकसरा सुटला रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१५३।। धडधडा ज्वाला उफाळल्या । त्या वाटती गगनास भिडल्या । नेत्री लोकांच्या प्रकाशल्या । ते आता म्हणती रे, श्रीराम जयराज जयजयराम ।।१५४।। व्यथित झाली अंतःकरणे । त्यांनी देवाच्याद्वारी धरिले धरणे । आता भक्तांना चिरशांती देणे । हे कोणाच्या हाती रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१५५।। जो तो म्हणे आपणासी । सांगली मुकली थोर संतासी । अंतरलो त्यांच्या कीर्तनासी । एकदाच रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१५६।। पुण्यपुरुष सांगलीचा । होता आमच्या भाग्याचा । पूर्णपुरूष सद्वर्तनाचा । आता गेला रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१५७।। देह अग्नित विराला । आत्मा स्वरूपी लीन झाला । आता आसरा आम्हाला । एक गोविंद स्मरण रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१५८।। गोविंद गोविंद गोविंद । अंतरी राहो स्मरण सुखद । आमुचे शिरकमल आणि तव पदारविंद । गाठ एक होऊ दे रे, श्रीराम जयराम जयजयराम ।।१५९।। ज्वाला भिडल्या आकाशाला । त्या आता निमू लागल्या । वृत्ती भारावल्या । उपस्थितांच्या ।।१६०।। कर्णोपकर्णी पसरली । वार्ता अनेकांच्या कानावर गेली । सुजनांची गर्दी झाली । कृष्णा तीराला ।।१६१।। वाट फोडावया दुःखासी । आता करू गुणवर्णनासी । म्हणोनि उठले बोलावयासी । एक एक जण ।।१६२।। दत्तोपंत बापट वकील । म्हणती 'मामा' । शेजारी निर्मळ । हरिकीर्तनात काळ । समाधानाने घालविला ।।१६३।। थोर सद्गृहस्थ उत्तम शिक्षक । तैसेच निष्ठावंत गुरूभक्त एक । आणि आजीव सेवक । सांगली शिक्षण संस्थेचे ।।१६४।। जामदार म्हणती गेला । आज सांगलीचा संत भला । ज्यांच्या अखंड भक्तीला । झाला देव संतुष्ट ।।१६५।। मोरोपंत कुलकर्णी मान्यवर । मामांचा लोभ ज्यांच्यावरी फार । भावपूर्ण अभंग सुस्वर । गाऊन संतोषविती

मामांना ।।१६६।। ते म्हणती निरंजनी घर । आता मामांनी केले निरंतर । निर्मल चारित्र्याचा प्रसाद सुंदर । आम्हासाठी ठेविला ।।१६७।। पंडितराव दांडेकर । म्हणती संत हाचि आधार । सामान्य जनासी खरोखर । मार्गदर्शकासाठी ।।१६८।। पुण्यपुरुष हीच संपत्ती । पाठीशी असता यशप्राप्ती । तेणेच राष्ट्राची उन्नती । विचारे दिसे ।।१६९।। तो आसरा आता सुटला । ज्ञानदीप दृष्टीआड झाला । हा तरी मोठा घाला । झाला सांगलीकरांवरी ।।१७०।। किती एकांचे सांत्वनपर । संदेश आले सविस्तर । कोणी सवड काढून सत्वर । आले भेटीसाठी ।।१७१।। गुरुवर्य दांडेकरांनी । संदेश पाठविला व्यथित अंतःकरणी । भावना व्यक्त विचारातुनी । करिती आपुली ।।१७२।। मामा संत महाराष्ट्राचे । हरपले हे दुर्दैव लोकांचे । माप नसे या हानीचे । ऐसे संत दुर्मिळ ।।१७३।। संत वर्णिती संतांना । तेव्हा त्याचे महत्त्व इतरांना । संसारी जनांच्या नेत्रांना । दृष्टी संतांच्यामुळे ।।१७४।। संतदास ऐनापुरे । सत्शिष्य गुरुवर्यांचे खरे । ऐकून मामांचे कीर्तन बोल बरे । बहुत संतोषले ।।१७५।। श्री दांडेकर गुरुवर्यांनी । सांगितले त्यांना आवर्जुनी । सांगलीत मामांचे कीर्तनी । मन असो द्यावे ।।१७६।। सद्गुरूंचे शब्द पडता कानी । ते त्यांनी गोड मानिले अमृताहुनी । मामांचे कीर्तन ऐकूनी । साक्ष घेतली सद्गुरू वचनाची ।।१७७।। मामा गेले हे ऐकून । व्यग्र झाले अंतःकरण । म्हणती कर्ण आणि नयन । अतृप्त राहिले ।।१७८।। योजिले एक झाले दुसरे । हे दैवगतीचे फेरे । मन अंतरी झुरे । परी सत्संगतीसाठी ।।१७९।। जिवाजीपंत दीक्षित । उत्तम चित्रकार आणि भाविक भक्त । मामा माझे शिक्षक म्हणत । बाळपणीचे ।।१८०।। मामा गेल्यावरी आले । नेत्र त्यांचे अश्रूंनी भरले । म्हणती निष्ठावंत संत गेले । दुर्भाग्य आमुचे ।।१८१।। श्रीगुरुलिंगजंगम । श्रीरामचंद्र प्रभू श्रीसाधुराज श्रेष्ठतम । श्रीज्ञानेश्वर यांची



रेखाचित्रे उत्तम । त्यांनी स्वखुषीने काढिली ।।१८२।। आता मामांचे यथार्थ व्यक्तिदर्शन । करील ऐसे तैलचित्र अनुपम पूर्ण । तेच दीक्षित काढिती भावपूर्ण । जेणे संतोष बहु, सर्वांना ।।१८३।। ज्या जागेवर मामांनी । अखंड कीर्तन रंगवुनी । अखेर देहही ठेविला त्याच स्थानी । ती पवित्र जागा ।।१८४।। तेथे सिंहासन । पादपद्मे कमळात विराजमान । चित्र चरित्र आणि चरण । एके ठायी दिसती ।।१८५।। भक्त नमवितील मस्तक । स्मृती मनात राहिल सम्यक । काळापासून हेच एक । आम्ही हिराऊन घेतले ।।१८६।। श्रीगुरूदेवांचे भाचे । प्राध्यापक दामले नाव त्यांचे । स्मरण होऊन मामांचे । आले श्रीराम मंदिरी ।।१८७।। श्रीगुरूसिद्दाप्पा धावून आले । प्रेमे रामास भेटले । उभयतांचे नयनी लोटले । अश्रूंचे पूर ।।१८८।। सांगलीत संत हनुमंत । आणि गोविंद हे दोघे विख्यात । देवचि झाले साक्षात । बोले पुरुषोत्तम* ।।१८९।। आणिक किती एकजण । आले त्यांचे करिता वर्णन । विस्तार भयास्तव आवरून । नाईलाजाने लेखणी धरीतसे ।।१९०।। जेथे जेथे सद्भाव सोज्वळ । तेथे तेथे मामांचे स्मरण सुमंगल । त्यांच्या भावफुलांची ओंजळ । पडली मामांच्या चरणावरी ।।१९१।। *हा शुद्ध प्रेमाचा आविष्कार । कोठे कैसा कोण सांगणार । कोठे प्रगट कोठे गुप्त राहणार । परी सौख्य अनुपम ।।१९२।। अंतःकरणे भारावली । कोणी व्यक्त केली कोणी न केली । अंतरीची अंतरी राहिली । तळमळ ।।१९३।। रामाच्या शिरावरील छत्र । उडाले अकस्मात । रामभाऊ गोवंडे येऊन त्वरित । धीर दिला रामासी ।।१९४।। चार वर्षांचा अनिल । त्याचीही पाहवेना घालमेल । म्हणे जरी मामा दाखवाल । तरीच शांत राहेन ।।१९५।। पोर म्हणून समजूत काढिती । परी त्याचीही सूज्ञ मति । तो म्हणे हे मज फसविती । आहे काही विपरीत ।।१९६।। चंद्रशेखरही बाल । त्याच्या पोटी उठे

कोलाहल । न सांगता स्मशानी वाटचाल । करी अनेकदा ।।१९७।। या चितेतूनही मामांना । मी पाहीन ही त्याची भावना। समाधान त्याच्या मना । क्षणभरही न मिळे ।।१९८।। मामा जातील ही कल्पना । न शिवली कोणाच्याही मना । अवचटे धक्का सर्वांना । जबर लागला ।।१९९।। दाता आणि घेता । तूचि एक अनंता । सगळीकडे तुझी सत्ता । शरण आम्ही तवपदी ।।२००।। जेव्हा जेव्हा मामांचे स्मरण । करील हे अंतःकरण । सुखद स्मृतींनी येईल भरून । दिसेल नेत्रांतरी ।।२०१।। जे जे स्मरण मामांचे । ते ते क्षण आनंदाचे । ऐसे आहे इतर कोणाचे । सांगा संताविण ।।२०२।। दुःख झेलून खांद्यावर । ज्यांनी सुखी केले सर्वांचे अंतर । त्यांचे स्मरण वारंवार । आधार आम्हाला ।।२०३।। आता कळसाध्याय पुढचा । आढावा घेऊ मामांच्या जीवनाचा । हे चरित्र न संपविण्याचा । मोह होय अनावर ।।२०४।। ज्या ज्या आकांक्षा मामांनी धरिल्या । त्या त्या तात्यांचे कृपे सफल झाल्या । अंतकाळी देह ठेविला । निष्काम होवोनी ।।२०५।। जो ध्यास जन्मवरी । तेचि स्मरण अंतकाळ करी । हे श्रीराम जयराम जयजयराम गजरी । मामांनी दाखविले ।।२०६।। अंतकाळी नव्हते शुद्धीवरी । मग कैसे स्मरण अंतरी । ऐसा विकल्प ज्यांच्या हृदयांतरी । त्यांना मामांनी जागविले ।।२०७।। राम चालवील कीर्तन । ही त्यांची खात्री पूर्ण । याची काकस्पर्शी खूण । आली सर्वांना ।।२०८।। अखंड कीर्तन चालावे । भगवद्भजन वाढवावे । संसारिकासी मिळावे । समाधान नित्याचे ।।२०९।। हीच एक आशा मनीची । होती मामांची । कावळे पिंड झडपिता सर्वांची । खात्री झाली ।।२१०।। राम करी कीर्तन । नित्यनेमे आनंदून । मामांच्या निर्याणापासून । न चुकता ।।२११।। आता ही कीर्तनपरंपरा । अखंड चालो या नगरा । संसार दुःखितासी आसरा । तोचि एक होईल ।।२१२।।



हे श्रीरामा दयाघना । आम्हा न कळे तुझी योजना । चटका लाऊन अंतःकरणा । संत नेसी आम्हापासुनी ।।२१३।। पूर्णकाम मामा झाले । सच्चिदानंदरूपी विश्रांतीस गेले । त्यांची उमटली पाऊले । सादर प्रणाम तेथे आमुचा ।।२१४।।

इति श्रीगोविंदचरितमानस । जे स्वभावेचि अतिसुरस । जेथे अखंड उसळेल भक्तिरस । निर्याण प्रसंग वर्णननाम द्वादशोध्याय ।।१२।।

***

**साष्टांग नमन भावे प्रणिपात माझा । गोविंद घ्या या शुभसुप्रभाती ।**
**तेजासवे तेज मिळोन गेले । गोविंद हे नाम आम्हा मिळाले ।।**

**-: श्रीगोविंदाष्टक :-**

ज्या प्रेमाने प्रतिदिनी तुम्ही बोधीले भाविकांना ।
ज्या धैर्याने अनुदिनी तुम्ही राखिले नित्यनेमा ।।
ज्या शौर्याने कठिण समयी गांजिले संकटांना ।
हे गोविंद स्मरण तुमचे नित्य हे गोड आम्हा ।।१।।
भाग्याने ही अमित जडली संगती सौख्यपूर्ण ।
कोठे शोधू नवल असले लोह झाले सुवर्ण ।।
संसारी या बुडत बुडता आणिले संत मार्गी ।
हे गोविंद स्मरण तुमचे राहुदे अंतरंगी ।।२।।

टीप :- १) पुरुषोत्तम दामोदर जोशी, इचलकरंजी.
२) श्री. बाबूराव करमरकर, बळवंतराव गोडबोले, वासूनाना आपटे, बाबूराव आगरकर, मणेश्वर अत्रे, शंभूराव इनामदार, अनंतराव जोशी (मुंबई), सीतारामबापू करंदीकर, कृष्णाजीपंत चिंचोरे, श्रीमंत वाडीकर, पांडुरंगमहाराज ताम्हनकर, लक्ष्मणमहाराज निजामपूरकर, गोविंदमहाराज वाटेगावकर इ.अनेक संतसज्जन भेटून गेले.

श्रीरामाचे स्मरण सदया राखुनी अंतरात ।
बाहेरीही स्वभुवनी वसवी जानकीचाचि कांत ।।
तीर्थक्षेत्रे त्यजुनि सगळी राहिला मंदिरी या ।
हे गोविंद स्मरण तुमचे चित्त हे साठवू द्या ।।३।।
कीर्ती सत्ता धन यश जगी इच्छिती लोक सारे ।
या मोहांना ढकलुनी जगी भक्तिमार्गा चला रे ।।
ऐसे लोका विनवित तुम्ही त्याच मार्गे निघाला ।
हे गोविंद स्मरण तुमचे शांतवूदे मनाला ।।४।।
निष्ठा भक्ती प्रिय गुरूपदी भाव ठेवून नित्य ।
श्रीरामाचा विमल गुण संकीर्तनी भाव सत्य ।।
आत्मारामी रमवी स्थिरवी भाववृत्ती जनांच्या ।
हे गोविंद स्मरण तुमचे येऊदे नित्यवाचा ।।५।।
काया दुःखे कधी न करिती खिन्न या सज्जनाला ।
संसाराच्या कुटिल विपदा वारिती ना जयाला ।।
राहे ज्याची अचल मति या नामसंकीर्तनात ।
हे गोविंद स्मरण तुमचे राहू दे मन्मनात ।।६।।
सौजन्याने सुमधूर वचने वेधिले सज्जनांना ।
नाना याने सुफलित करिती साधनी साधकांना ।।
काना मात्रा कधी न चुकती नित्य नेमात यांच्या ।
हे गोविंद स्मरण तुमचे तोडी पाशा भवाच्या ।।७।।
जे जे गेले तरुनि जगती तोडुनी काळपाशा ।
ते ते मागे अमर असती भक्तकाजा हमेशा ।।
ऐसे तुमचे सुवचन असे विश्वासू त्याच बोला ।
हे गोविंद स्मरण तुमचे थोर आशा मनाला ।।८।।
**।। राजाधिराज सद्गुरूनाथमहाराज की जय ।।**



**अध्याय तेरावा**

## कळसाध्याय

'म' दाखवी विराम । ग्रंथासी आला पूर्णविराम । मामा पावले विश्राम । स्वानंद भुवनी ।।१।। बिकट या संसारी । येऊन सोय दाखविली खरी । असोन नसल्यापरी । आचरण दाखविले ।।२।। बालपणापासोनि। हरिभजनी रंगले मन । देहासक्ती पूर्ण सोडून । शरीर कष्टविले ।।३।। उग्र तप आचरिले । गायत्री पुरश्चरण आरंभिले । देहाचे लाड न केले । क्षणभरही ।।४।। केवळ देहधारणापुरते । अन्न द्यावे शरीराते । आणि आचरावे सन्मार्गाते । हा नित्यक्रम ।।५।। कधी न ढळला सन्मार्गापासूनी। लोकनिंदेची पर्वा न मनी । आदर एक संतवचनी । ठेविला तुम्ही ।।६।। म्हणोनि पाठिराखे श्रीज्ञानेश्वर । दिला तुम्हास स्वयंप्रकाश । परमार्थी राहोन अहर्निश । संसार साधला ।।७।। पितृआज्ञेस्तव विवाह केला । मातेसही आनंद दिला । राम पुत्र लाभला । आशीर्वाद श्रीज्ञानेशांचा ।।८।। श्रीहनुमंत तात्यांच्या आज्ञेने । अखंड केली कीर्तने । तोषविली भक्तजनांची मने । सदोदित ।।९।। समर्थ श्रीनारायण । सद्गुरू मिळाले पुण्यनिधान । अखंड ठेवोन अनुसंधान । सद्गुरू तोषविले ।।१०।। ''थोर गुरूभक्त'' म्हणोनि । गौरविले सद्गुरूंनी । यापेक्षा भाग्य या भुवनी । काय असे ।।११।। देहयातना अपरंपार । लोकनिंदेचे घाव कठोर । संसार संकटे अनिवार । सुखे झेलिली ।।१२।। अशातही समाधानी । कैसे रहावे माणसांनी । हे दाखविले आचरूनी । आयुष्यभर मामांनी ।।१३।। मामा म्हणती रामाला । ऐक सांगतो मी तुला । जो जो या संसारी आला । तो

तो पस्तावला एकवेळ ।।१४।। तू आहेस मनाचा सरळ । परी अशांनाही बाधते संसार गरळ । म्हणोन वाटते एकवेळ । तुजसाठी काही लिहावे ।।१५।। संसाराचे कटू अनुभव । सोशिले मी सदैव । त्याची तुला जाणीव । सुखनैव असो दे ।।१६।। ठेच पुढच्यास शहाणा मागचा । हाचि योग भाग्याचा । हाचि कित्ता आचरणाचा । तू ठेवावा ।।१७।। अलिप्त राहिल्याविण । न सोसवतील संसार घण । संसार यातना दारूण । सावधान वृत्ती सोसाव्या ।।१८।। जे जे भेटतील जन । ते ते विवेके घ्यावे पारखून । सोसून त्यांचे कठोर वचन । विनम्रभावे असावे ।।१९।। डाग न लागू द्यावा अंतरी । मने सोडावी विषयदरी । आघात जरी शरीरावरी । आपण वेगळे असावे ।।२०।। हे असोन नसणेपण । हीच संसार यशाची खूण । जाणीव याची पूर्ण । मनी असो द्यावी ।।२१।। वाटे आणिक एक ग्रंथ लिहावा । जो मोजक्या शब्दांचा व्हावा । मतामतांतराचा गोवा । तेथे नसावा ।।२२।। जेवढे साधकास पाहिजे ज्ञान । तेवढे सांगावे विस्तारून । साधनावरी भर देऊन । विकल्प सगळे निवारावे ।।२३।। श्रवणे होत जावी निवृत्ती । तेवढीच श्रवणाची फलश्रुती । मग धरावे चित्ती । गुरूवाक्य प्रमाण ।।२४।। अति पांडित्य अंगी भरता । भलताच ये ताठा । एतदर्थी गोष्ट तत्त्वता । परिसावी सज्जन हो ।।२५।। मामा लहानपणापासून । करित होते कीर्तन । दिगवड्यास असता वर्तमान । घडले ते ऐका ।।२६।। पंडित बैसले कीर्तनाला । तो ज्ञानेश्वरीचा विषय निघाला । तोच पंडितांनी रस्ता धरिला । स्वगृहाचा ।।२७।। कीर्तन झाल्यावरी । पंडित आले मंदिरी । नम्रभाव ठेवोन अंतरी । मामा विचारती ।।२८।। सांगाजी कारण । आपण गेलात निघोन । तव ते पंडित निर्भत्सून । बोलले ज्ञानेश्वरी विषयी ।।२९।। प्राकृतात वेदांत बोलणे । हे अवघेची लाजिरवाणे । अशक्य अशक्य साहणे । म्हणोन आम्ही गेलो ।।३०।। तव मामा बोलती



नम्र वचन । पहावा जी ग्रंथ वाचून । मग करावे दोष निवेदन । मीही ऐकेन आदरे ।।३१।। मामा निष्ठावंत उपासक । श्रीज्ञानेशांचे सेवक । पंडित म्हणती वेळ एक । पाहू ग्रंथ वाचून ।।३२।। पालटली वृत्ती त्यांची । इच्छा झाली नियमित वाचनाची । मामांच्या कीर्तनाची । त्यांना कळली थोरवी ।।३३।। तसेच एकदा गणेशोत्सवात । एक कीर्तनकार पंडित । दिगवडे यांचे घरात । आले कीर्तनाला ।।३४।। त्यांचा गणपती उजव्या सोंडेचा । दिगवडे यांचा डाव्या सोंडेचा । हे पाहून त्यांचा विचार बदलला ।।३५।। माझा गणपती कोपऱ्यात मांडून । मी करीन उत्सवात कीर्तन । तेच तुम्ही आपले मानून । संतोषावे ।।३६।। दिगवडे म्हणती बापूराव । तुम्ही साजरा करावा उत्सव । दोन कीर्तने एक जमाव । हा थाट झाला उत्सवाचा ।।३७।। विकल्पांचा कोलाहल । त्याने निर्मिले हलाहल । विवेकाचे संपले बळ । तेणे द्वैत उरले ।।३८।। ऐसा पांडित्याचा अभिमान । तो द्यावा समूळ सोडून । नामी गुंतवोन मन । रहावे निश्चळ ।।३९।। निर्मळ चरित्र मामांचे । देईल समाधान मोलाचे । दिव्य आदर्श वागणुकीचे। धडे येथेचि मिळतील ।।४०।। लोकापवादास न देऊन कान । जीवनरेखा स्पष्ट आखून । वाट गुरूकृपे शोधून । मामांनी जीवन सफल केले ।।४१।। श्रवण केले सद्ग्रंथांचे । त्यांचेच मामा कीर्तनी साचे । श्रवणाधारे आचरणाचे। मार्ग शोधिले ।।४२।। वृत्ती रंगली अंतरी । तेणे अर्चनभक्ती झाली पुरी । सर्वाभूती नम्रता खरी । वंदनभक्ती ।।४३।। सेवा संतसज्जनांची । ही मामांना आवड मनापासूनची । दास्यभक्ती महत्त्वाची । मामांना वाटे ।।४४।। एकदा श्रीगुरूसिद्धाप्पा । पहुडले होते जेथे सोपा । नेत्र झाकले अपापा । दुपारचे वेळी ।।४५।। मामा उठोनी हळूहळू । म्हणती आता कोणी नका बोलू । आपण अति कष्टाळू । वारा घालती श्रीगुरूसिद्धाप्पांना ।।४६।। हळूच उघडून डोळे । श्रीगुरुसिद्धाप्पांनी

पाहिले । मामांना बोलले । सुहास्य वदने ।।४७।। मामा कृपा करून । तुम्ही वारा घालून । मोडू नका अनुसंधान । माझे या वेळे ।।४८।। नाईलाजे मामा थांबले । परि सेवेचे वेड त्यांना भले । संधी मिळताच लागले । सेवेसाठी ।।४९।। विनीत भाव मामांचा । होता पराकोटीचा । आपण कोण आहोत याचा । मागमूस लागू न देती ।।५०।। सर्वांभूती नम्रभाव । हा होता त्यांचा स्वभाव । लहान थोर हा भेदभाव । तेथे नव्हता ।।५१।। गुरूगृहीची मोलकरीण । तिलाही करिती सद्‌भावे वंदन । मनी अत्यादरे आठवून । चरण सद्‌गुरूंचे ।।५२।। नामस्मरणी अतिप्रीती । अखंड रमती एकांती । कीर्तनाचा विषयही घेती । नामस्मरण ।।५३।। त्यांचा एक शिष्य गोपाळ । त्यासी म्हणती अरे बाळ । ये आज होता संध्याकाळ । आमचे घरी ।।५४।। आज माझे पहिले कीर्तन । तू हो पहिला श्रोता म्हणून । करू दोन घटका भजन । ईश्वराचे ।।५५।। ऐसा खेळीमेळीचा व्यवहार । नाही कोठे सापडणार । म्हणोन वारंवार । स्मरण होते मामांचे ।।५६।। म्हणती नाना रूपे ईश्वर । आपली परीक्षा पाहणार । म्हणून सदैव खबरदार । आपण असावे नम्रभावे ।।५७।। मृदु आणि कठोर । निंदक आणि स्तुतीपाठक थोर । ऐसे देवाचेच अवतार । मनुष्यरूपे ।।५८।। कधी विंचू कधी साप । कधी संसाराची कचकच उमाप । हेहि ईश्वराचेच रूप । परीक्षेसाठी ।।५९।। नरदेह ही परीक्षेची खोली । तेथे जगदीश परिक्षक माऊली । जीवनभर परीक्षेची घालमेली । सुरू असे ।।६०।। जे असे दासबोधी । जे श्रीकृष्ण गीतेमाजी बोधी । जे बोल श्रीज्ञानेशांचे गीतेसंबंधी । तो विषय परीक्षेचा ।।६१।। तो अंगी किती बाणला । प्रयत्न कसा किती झाला ?। हे पाहून दे निकालाला । तो जगन्नायक ।।६२।। म्हणून वृत्ती होऊ न देता अनावर । समत्वे पहावे चराचर । ऐसा मामांचा विचार । थोर परीक्षार्थी मामा ।।६३।। मामांना



गुण किती मिळाले । हे वाचकांच्या अंतरी असती लिहिलेले । मामाही आत्मविश्वासे बोलले । ते ऐका त्यांच्या शब्दात ।।६४।। हा अभंग मामांचा । मला वाटे अति मोलाचा । साधनाच्या परिणतीचा । बोल विश्वासाचा त्यात असे ।।६५।।

**- अभंग -**

**ज्याच्या प्रकाशे दिनमणि हा प्रकाशे ।**
**स्वयंप्रकाशित देहीच वसे ।।**
**तो म्या पाहिलासे नयनाच्या नयने ।**
**ज्याच्या विरहित सर्वही उणे ।।**
**ज्याच्या प्रकाशाने शशिबिंब विलसे ।**
**ज्याच्या प्रकाशाने विद्युत भासे ।।**
**गोविंदाचे हे मन गुंगुनिया गेले ।**
**रामनामी ठेले, स्वयंप्रकाशी ।।**

श्रीराम आपला सखा । हा मामांचा भाव निका । म्हणती आपण सेवकामाजी । कनिष्ठ सेवक ।।६६।। जे जे प्रिय ईश्वराला । ते ते या साधुरायाला । मग आता सख्यत्वाला । काय उणे ।।६७।। देहभाव ठेवोन दुरी । आपण विचरती अंतरी । हे समजे त्यांच्या नेत्रांतरी । पाहणाऱ्यांना ।।६८।। जो भाव हृदयी वसे । तोच नेत्री प्रकाशे । येथे नेत्रात विलक्षण दिसे । पहाणारांना ।।६९।। शरीर देहदुःखे तापे । परी हा न कधी संतापे । अंतरी रामनाम जपे । समाधान वृत्ती ।।७०।। लक्ष असे अलक्षी । मग कोण बाह्योपचार लक्षी । देह ऊर्मींचा साक्षी । असे प्रारब्ध एक ।।७१।। लोक म्हणती उठा मामा । अन्न मारिते हाका तुम्हा । चला राहुदे या कामा । तव मामा उठती सस्मित वदन ।।७२।। अग्निमध्ये आहुति देणे । तैसे मामांचे जवेणे । पदार्थ उत्तम म्हणणे । हा दिसे

लौकिक ।।७३।। ऐसे हे विदेहपण । सशरीरी अशरीरपण । आत्मस्वरूपी पूर्णपण । असे झालेले ।।७४।। अंतकाळी यातना । दुर्घर रोग देती नाना । परी शरीराची हालचाल पाहाना । लवमात्र न दिसे ।।७५।। लोक येती पाय चेपिती । औषध तोंडात घालिती । कडू गोड याची क्षिती । नसे त्यांना ।।७६।। भरत यांच्या मेहुण्यांचा मुलगा । त्याला मामांचे कोणतेही काम सांगा । तो सदा जागा । मामांच्या सेवेला ।।७७।। तासन् तास पाय चेपावे । मामांनी वारंवार पुरे म्हणावे । परी त्याच्या स्वभावे । सेवा आवडीची ।।७८।। सेवा करून घ्यावी । हे कधीच नव्हते मामांच्या जीवी । त्यांच्या मनी सदा असावी । मूर्ती भगवंतांची ।।७९।। म्हणोन जाणत्यांनी ओळखले । या संतांचे महत्व भले । नित्य नेमे कीर्तन ऐकिले । उदाहरण खरे काकू ।।८०।। श्रीभाऊसाहेब उमदीकर त्यांचे सद्गुरू । परमार्थी काकूंचा अत्यादरू । म्हणेन श्रद्धा थोरू । मामांच्या वरी ।।८१।। ऐसे मामांचे आत्मसमर्पण । पहाणारासी वाटे कठीण । म्हणोन त्यांची श्रद्धा पूर्ण । वसे मामांच्या ठायी ।।८२।। सोमवार सकाळपासून । मामांनी धरिले मौन । नेत्र ठेविले झाकून । शुद्धी असूनही ।।८३।। तेथे आपला ना परका । माया मोहाचा तटका तोडावा । शेवटचा आणि सुधारावा । मार्ग आपुला ।।८४।। तरीही अंतकाळी । पुनःपरतून हृदयकमळी । देती त्रयोदशाक्षरी मंत्राची आरोळी । संदेश बहु मोलाचा ।।८५।। तो शेवटचा कीर्तनाचा । सारांश होता महत्त्वाचा । ती बाकी चुकती करण्याचा । प्रसंग साधला ।।८६।। काय ही तत्परता । मामा तुमची भक्ताकरता । काय आमची पात्रता । आणि तुमचे थोरपण ।।८७।। वेळोवेळी करावी आठवण । तो अंतःकरण येते भरून । संत दयाघन हे त्रिवार पटले ।।८८।। मामा तुम्ही दयासागर । आणि पूर्णावतार । मी काय चरित्र लिहिणार । हे माझे मी जाणे ।।८९।। एकामागून एक आठवणी ।



मनात राहिल्या घर करूनी । न जाणो जाईन विसरूनी । म्हणोन अक्षरी मांडिल्या ।।९०।। वाटले त्या जुळवाव्या । एका माळेसारख्या गुंफाव्या । आणि तुमच्या चरणांवरी ठेवाव्या । ते हे तेरा अध्याय ।।९१।। तुमचा आवडता मंत्र त्रयोदशाक्षरी । ज्याने पवित्र केली तुम्ही आपुली वैखरी । त्याच मंत्राच्या एक एक अक्षरी । हे तेरा अध्याय गुंफले ।।९२।। स्मरण करून सप्रेम । श्रीराम जयराम जयजयराम । तुमचे चरित्र पावन परम । अत्यादरे लिहिले ।।९३।। जैसी सेवा तुम्ही करविली । तैशी असे ही केली । तुम्ही मानाल ही राहिली । आशा मनामध्ये ।।९४।। रामाच्या स्वप्नात येऊन । म्हणाला चरित्र ऐकिले म्हणून । मज झाले समाधान । ते मज वर्णिता नये ।।९५।।

**-: अभंग :-**

**एकदा माझीये स्वप्नी मामा आले ।**
**बहुपरी झाले बोलणे त्यांचे ।।१।।**
**अण्णांनी चरित्र लिहिले हे कथिले ।**
**तव ते म्हणाले ऐकले की ।।२।।**
**'नरहरीचे तसे आहेच' म्हणोनि ।**
**रंगले कीर्तनी हनुमंतसेवे ।।३।।**
**बाल रामा नाही वाटले ते स्वप्न ।**
**मागुते कळोन आले त्यासी ।।४।।**

चरित्र तुमचे आवघे । वाटले एकदा लिहावे । स्वतःच्या मनास रिझवावे । आणि तुमच्या भक्तांच्याही ।।९६।। राम तुमचा प्रेमळ पुत्र । त्याने चालविले कीर्तनसत्र । न पाही दिवस रात्र । प्रकृती स्वास्थ्य नसताही ।।९७।। मी गेलो त्याच्याकडे । तो प्रेमभरे पाही माझ्याकडे । मी माझे साकडे । केले निवेदन त्यासी ।।९८।। जन्मापासून आजपर्यंत । मी आहे सानिध्यात ।

व्यावहारीक निकट संगत । येजा बहुत होती ।।९९।। होतो बिऱ्हाडाने त्यांचे वाड्यात । तो लोभ जडला अतोनात । मामा मामी हे आप्तसंबंध सतत । बालपणापासून रुजले ।।१००।। राम करी कीर्तन । बालपणापासून। मी ही होतसे तल्लीन । कधी करी साथ त्याची ।।१०१।। परान्न न घेण्याचा । मामांचा नियम बहु दिवसाचा । हे कळूनही मी त्यांच्या । एकदा घरी गेलो ।।१०२।। मामा तुम्ही माझ्या घरी । भोजनास यावे ही इच्छा अंतरी । मन माझे चलविचल करी । तुमच्या नियमाने ।।१०३।। मामा अंतःकरणाचे कोमल । त्यांनी ओळखिले माझ्या मनीचे बोल । म्हणती तू रहा खुशाल । मी येईन तुझ्या घरी ।।१०४।। तुझे आणि माझे घर । यात न मानी मी अंतर । माझ्या आनंदास पारावार । उरला नाही ।।१०५।। तेच प्रेम सर्वांचे । म्हणोन महत्त्व अकृत्रिम नात्याचे । उल्लेख मामी आणि राम यांचे । झाले एकेरी शब्दाने ।।१०६।। असंख्य मामांचे भक्तजन । त्यासी कैसे रुचेल हे एकेरीपण । म्हणोन केला बहुतप्रयत्न । परी जमेना ।।१०७।। श्रोती न करावे खिन्न मन । म्हणोन केले स्पष्टीकरण । सुजनांनी क्षमा पूर्ण । मजलागी करावी ।।१०८।। असो, कागदपत्र रामापाशी । तो माझ्यापुढे उभ्या करी राशी । मामांच्या चरित्राची अहर्निशी । आम्ही चर्चा करीत असू ।।१०९।। राम येई माझ्या घरी । मी जाई त्याच्या मंदिरी । तो कधी न कंटाळा करी । उलटा आनंदे ।।११०।। हा भ्रातृभाव जन्मांतरीचा । जैसा चंद्र आणि सागराचा । उसळे तो ठाव घेई नभीचा । ते वर्णन असंभव ।।१११।। मामा राहिले अंतरी । राम बाहेरून सहाय्य करी । गंगा यमुना आल्या घरी । आता ऐका तिसरी ।।११२।। श्रीगुरुसिद्दपांनी माझे सदन । याचवेळी केले पुण्यपावन । मी त्यांचे चरण वंदून । केली एक प्रार्थना ।।११३।। राजाधिराज महाराज । माझे अल्पसे काज । आपल्या कृपेचा चढेल साज । तरीच पूर्ण



होईल ।।११४।। तुम्ही आम्हा श्रीनारायण । श्रीगुरूलिंगजंगम पूर्ण । येथे अभेद संपूर्ण । ही माझी श्रद्धा असे ।।११५।। मामांचे चरित्र लिहावे । आणि ते यथायोग्य व्हावे । हे माझे लाड पुरवावे । सद्गुरूंनी ।।११६।। श्रीसद्गुरूंनी आशीर्वचन । दिले प्रसादपूर्ण । त्याचे मी वर्णन । करू कोणत्या शब्दे ।।११७।। त्यांचा शुभाशीर्वाद ही सरस्वती । वाहतसे गुप्त रिती । या संगमी माझी स्नानापुरती । इच्छा असे ।।११८।। जय यमुने जय भागीरथी । जय जय जय सरस्वती । बुड्या मारीन होईतो तृप्ती । जय त्रिवेणी जय त्रिवेणी ।।११९।। ऐसे हे मामांचे चरित्र । त्यास मी एक निमित्तमात्र । सद्गुरूंचे हाती सूत्र । तेचि चालक विश्वाचे ।।१२०।। मी एक संसारिक । कधी न झालो त्यांचा सेवक । तरीही त्यांनी मारोन हाक । मज जवळ केले ।।१२१।। लोभ वाटला मनी । तो वाढला त्यांच्या प्रेमळ शब्दांनी । जन्म जन्मांतरीचे कल्याण त्यांनी । साधिले माझे ।।१२२।। तो प्रेमाचा उमाळा । तो पोटीचा कळवळा । त्यांनी केला लळा । तो अलौकिक ।।१२३।। मामांची प्रतिवर्षी कीर्तने । होत होती ती अनेक ठिकाणे । धन्य होती लोक श्रवणे । आणि दर्शने मामांच्या ।।१२४।। माझ्याही मनी आले । आपुल्या घरी पाहिजेत आले । मामांचे कीर्तन झाले । पाहिज येथे ।।१२५।। परी जागा अडचणीची । कैशी सोय होईल कीर्तनाची । परी मी गोष्ट मनीची । बोललो मामांच्या जवळ ।।१२६।। म्हणती एकटाच येऊन । करीन तुझ्या घरी कीर्तन । तू करू नको खिन्न मन । किंचितही ।।१२७।। आणि तसा प्रसंग आला । आनंद झाला माझ्या मनाला । श्रीगुरूसिद्दाप्पाही त्या संधीला । होते माझ्या घरी ।।१२८।। तो अपूर्व सोहळा । मन आठवते वेळोवेळा । मामांचा कळवळा । वर्णन करता न ये ।।१२९।। तो देहाचा आसरा सुटला । आत्मा जगदांतरी राहिला । विश्वास असूनही डोळा । अश्रू येती ।।१३०।। वडील माझे

हरिसेवक । गंगेचे निष्ठावंत उपासक । कीर्तन करीत देश अनेक । फिरले भारतामध्ये ।।१३१।। काशीपासून रामेश्वरपर्यंत । कावडी वाहिल्या चालत । यदृच्छा लाभे संतोष मानित । जीवन कंठिले ।।१३२।। माता श्रीहनुमंततात्यांची अनुग्रहीत । नित्यनेमे कीर्तनास जात । मलाही अनिच्छेने जावे लागत । झोपमोड करूनी ।।१३३।। वय लहान न लागे गोडी । न उलगडे परमार्थाची घडी । तरीही डोई घडोघडी । पडे तात्यांच्या चरणावरी ।।१३४।। गेलो निंबरगीच्या यात्रेला । तो अवघड प्रवास आठवतो मला । परत येता चमत्कार झाला । मिरज स्टेशनवरी ।।१३५।। वेळ होती सकाळची । थंडी पडली कडाक्याची । तात्यांनी उन्हाशी सकाळची । बैठक केली ।।१३६।। तो येथील स्टेशन मास्तर । भाविक फार । आणिती चहा कपभर । तात्यांच्यासाठी ।।१३७।। मी उभा होतो दूर समोर । अधोमुख तात्या निरंतर । विचार करिती वाटे फार । कसला तरी ।।१३८।। माझ्या मनी एक आले । संत होणे फार चांगले । लोक कौतुक करिती भले । मानसन्मान करिती ।।१३९।। तोच तात्यांनी मज बोलाविले । जवळी बैसवून घेतले । प्रसादपेय पुढे केले । घे म्हणोनी ।।१४०।। प्रेम आणि भीती । मर्यादा आणि आदर चित्ती । ते थोर मी लहान किर्ती । हे मनी येऊन बुजलो ।।१४१।। चहा घेवोन चरणावर । मस्तक ठेवून सत्वर । परतलो तो पालटला विचार । क्षण न लागता ।।१४२।। संत होता सामान्य लोक । गौरविती अनेक । भक्त होता मारोनि हाक । संत प्रसाद देती ।।१४३।। आता यात समयोचित । काय ते आणावे मनात । संतप्रसादाचा लोभ जास्त । मज वाटला ।।१४४।। संतचि असो देत थोर । तेचि आपुले हित करणार । सुखद त्यांचा आधार । व्हावे नम्र सेवक आपण ।।१४५।। संतांचा प्रसाद मिळता । काय उणे या जगती आता । या लाभापरता । लाभ न अन्य ।।१४६।। एतदर्थी कथा । तुम्हास सांगोन



आता । तेणे नवल चित्ता । वाटेल तुमच्या ।।१४७।। मामींच्या स्वप्नात । मामा आले अकस्मात । बैसले होते लिहित । काही ते समजेना ।।१४८।। मामी म्हणे त्यांना । मज सांगाना । काय इतकी विवंचना । आपणासी आता ।।१४९।। याद करितो लोकांची । कोण कोण येती त्यांची । आणि हितसंबंधियांची । एकत्र आता ।।१५०।। मनी एक इच्छा राहिली । मी नमस्कारिली नाहीत मंडळी । काय जाण्याची गडबड झाली । राहून गेले ।।१५१।। हा खडीसाखरेचा पुडा । देवापुढे ठेवतो एवढा । द्यावा एक एक खडा । प्रत्येकाला ।।१५२।। सांगावा माझा नमस्कार । प्रेमाचा पडो न द्यावा विसर । हेचि वाटो निरंतर । ही विनंती ।।१५३।। मामा तुमचा प्रसाद अंतरी । राहिला ही गोष्ट खरी । नमस्कारू आम्ही मंडळी सारी । तो तुम्ही स्वीकारावा ।।१५४।। शरीराने दूर गेला । तरी अंतरी पाहिजे राहिला । हाचि आशीर्वाद भला । द्यावा आम्हासी ।।१५५।। तुमचे दिव्य आचरण । सदा राहो त्याचे स्मरण । त्याचेच होवो अनुकरण । यथानुशक्त्या ।।१५६।। तुमचे अभंग वाङ्मय । जेथ साधकाची खरी सोय । सुचवूनी नाना उपाय । हित केले भक्तांचे ।।१५७।। तेच तुमचे मधुर बोल । अंतरी रुजू देत खोल । भक्तिभावाची ओल । उपजो अंतरी ।।१५८।। ऐसे हे चरित्र रसाळ । ऐसे मामा प्रेमळ । थोर त्यांचे तपोबल । आणि प्रसन्न वदन ।।१५९।। दर्शन त्यांचे अंतरी घ्यावे । चरित्र त्यांचे मनी ठसवावे । नाममार्गे रहावे । निरंतर ।।१६०।। हीच पंढरीची वाट । चोखाळावी नीट । उन्मनीचा चढता घाट । दिसे पांडुरंग ।।१६१।। जे सदाचे प्रयत्नशील । त्यांची सोपी कराया वाटचाल । कटीवर कर घेऊन गोपाळ । उभा असे ।।१६२।। अंतरीचा कळवळा । कळे या गोपाळा । धरा गुरूनाममाळा । अंतरीच ।।१६३।। तेथेचि दर्शन देईल गोविंद । अंतरी होता सद्गद ।

उसळेल आनंदी आनंद । गोविंद गोपाळ एके ठायी ।।१६४।। शके अठराशे त्र्याऐंशी । फाल्गुन वद्य दशमीसी । गुरुवार या दिवशी । मामांच्या पादुका स्थापिल्या ।।१६५।। तात्या आणि मामा । एका खाली एक दिसती आम्हा । वंदू अंतरी धरून प्रेमा । या दोघांना ।।१६६।। हे चरित्र लिहून । मामीस दाखविले वाचून । रामही आनंदून । ऐकत होता ।।१६७।। मामांनी चरित स्वप्नी ऐकले । हे मागेच मी लिहिले । बहुतांनी ऐकले । हे चरित्र ।।१६८।। संतोष झाला मनाला । मन दे टाळी त्याचवेळा । यापेक्षा सुख सोहळा । दुसरा नाही ।।१६९।। केला प्रयत्न सफल झाला । श्रेय श्रीगुरूसिद्दप्पांच्या आशीर्वादाला । आनंदी आनंद झाला । तो ठेवा सुखाचा ।।१७०।। आता वंदिन श्रोतेजन । जेथ जेथ मामांचे अधिष्ठान । कारण ते पुण्यवान । मामांच्या स्मृतीने ।।१७१।। खेळीमेळीने जमावे । मामांचे गुण गावे । यासाठी हे लिहिले स्वभावे । चरित्र मामांचे ।।१७२।। उणे असेल ते माझे । अधिक ते मामांचे । कोण श्रोता कोण वक्ता याचे । स्मरण न ठेवावे ।।१७३।। जरी झाला असेल प्रमाद । तरी न मानावा खेद । सच्चरित्राचा प्रसाद । घेऊ आपण सर्वजण ।।१७४।। क्षमा गुण समर्थांचा । प्रसाद हा स्वभाव संतांचा । म्हणोन हे धारिष्ट करण्याचा । मोह झाला ।।१७५।। तुम्ही संतजन कौतुक करणार । म्हणोनि केला ग्रंथविस्तार । नातरी मी काय पामर । योग्य या कार्या ।।१७६।। सर्वांतर्यामी गोविंद । तोचि रंगविणार सुखसंवाद । वंदू त्यांचे पदारविंद । आणि म्हणून गोविंद सर्वकाळ ।।१७७।। आषाढी एकादशी । शके अठराशे चौऱ्यांशी । पुण्यवान या दिवशी । चरित्र ग्रंथ संपविला ।।१७८।।

**गोविंद चरणी ग्रंथ । ठेऊनी नमितो पदी ।**
**पुण्य स्मरण राहो ही प्रार्थना एक अंतरी ।।**



**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरूर्देवो महेश्वरः ।**
**गुरूःसाक्षात् परब्रह्म । तस्मै श्रीगुरूवेनमः ।।**

इति श्रीगोविंदचरितमानस । जे स्वभावेचि अतिसुरस । जेथे अखंड उसळेल भक्तिरस । कळासाध्याय गोड हा ।।१३।।

***

### अध्याय चौदावा

## पूर्णविराम

ॐनमोजी सीतारामा । अतर्क्य अघटित तुझा महिमा । न कळे आम्हास सीमा । तुझ्या योजनेची ।।१।। तुझ्या सत्तेवीण । न हाले झाडाचेही पान । हे आले मज दिसोन । या चरित्र कथनी ।।२।। मनुष्यास अभिमानाचा मोठा । मी पणाचा चढे ताठा । म्हणोन हाती सूत्र ठेवोन एकटा । जपतोसि जडजीवा ।।३।। कणभर अभिमान । तू न करिसी सहन । कारण ते अधःपतन । जीवमात्राचे ।।४।। तू तरी आम्हास न दिससी । परी आपुले अस्तित्व जाणविसी । विचारवंतास चकित करिसी । आपुल्या प्रभावाने ।।५।। गेली चार वर्षे मामांचे । अभ्यासिता जीवन साचे । स्वरूप कळले तुझ्या योजनेचे । काहीसे आम्हा ।।६।। क्षण भक्तांच्या भाग्याचे । आले आणि गेले कायमचे । भाग्यवान होते त्यांचे । साधले देवा ।।७।। जे उद्या करू म्हणून बसले । ते कायमचे हळहळले । आता तरी आकाश कोसळले । ऐसे वाटे ।।८।। नरदेह ही संधी सोन्याची । शाश्वती नोहे एका क्षणाची । जोवर हाती आहे तोवर भाग्याची । वाटचाल करू ।।९।। हाच तुझा संदेश । कळला हे जगदीश । बहुमोल विशेष । महत्त्वाचा ।।१०।। त्रयोदशाक्षरी मंत्राच्या अक्षरी । गुंफावी चरित्र कुसरी । ही माझी इच्छा परी । आला चौदावा अध्याय।।११।। चरित्र झाले होते छापून । दुधाचा पेला ओठा लागून । ठेविला परी तुझे वचन । आले वेगळेची ।।१२।। कळसाध्याय संपविला । विराम दिला लेखणीला । परी तुझी विचित्र लीला । ये अनुभवासी ।।१३।। तो हा



सतीचा अध्याय । हे कळसावरील सोने होय । तेज तेजासवे जाय । अतर्क्य अघटित गोष्ट ही ।।१४।। मामा स्वस्वरूपी झाले विलीन । तोच मामी प्रतिज्ञावचन । की आता मीही जाईन । वर्ष न संपेल तोवर ।।१५।। दुःखांती बोलली असेल । म्हणोन दुर्लक्षिले तिचे बोल । परि किंचित् जाता काळ । बोलासारिखी चाल दिसे ।।१६।। तिने मनाशी निश्चय केला । आणि विरहाग्नि चेतविला । आत कणकण जळू लागला । देह मामीचा ।।१७।। हास्य मुखावरील मावळले । विचारासी गांभीर्य आले । शरीर क्षीण होऊ लागले । दिवसेंदिवस ।।१८।। आपण ऐकतो सतीच्या गोष्टी । परी प्रहरांत जळे देहयष्टी । येथे वेगळेच दावी दृष्टी । ध्यास पतिचरणाचा ।।१९।। म्हणे एकमेव माझे निधान । गेले आता निघोन । सर्व जग शून्य । दिसे मला ।।२०।। गोविंद तेथे इंदिरा । हाच मार्ग आता बरा । हे रघुनाथप्रियगुरूवरा । करा सोय माझी ।।२१।। महद्भाग्ये लाभली संगती । ज्या पुण्यपुरुषाची मजप्रती । ती सोडवी ही मति । माझी नव्हे सर्वथा ।।२२।। तव राम विचारी मनात । हे दिसे काही विपरीत । तो म्हणे हे आई शांत । तू हो आता ।।२३।। आधार तूच आम्हाला । आधीच माझा जीव घायाळ झाला । दुसरा आघात सहन करण्याला । सामर्थ्य नाही माझे ।।२४।। मी अशक्त तुझा बाळ । तुझ्या आशीर्वादाचे पाहिजे बळ । आजवरी तुम्ही प्रेमळ । म्हणोन मी सुखावलो ।।२५।। ठेवू मामांची आठवण चित्ती । चालवू त्यांचे कार्य पुढती । जेथे कीर्तन तेथे मामा निश्चिती । हा माझा दृढविश्वास ।।२६।। तू धीर सोडशील । तरी माझाही आधार सुटेल । तुझ्या कृपेची छाया अंतरेल । असा विचार करू नको ।।२७।। परी मामांच्या निर्याणाचा । आघात जबरदस्त मनावरचा । तिने ध्यास घेतला मामांचा । खिळली अंथरुणाला ।।२८।। म्हणे ही

सरस्वतीची। सेवा मनापासूनची । समाधानी मनाची । जेणे झाली ।।२९।। भाची शरयूवर । मामीचे प्रेम फार । आठवण वारंवार । काढीतसें ।।३०।। राम गजबजला मनी । करी तिच्या इच्छा पूर्ण आवर्जूनी । आणिक तेरा रुपयांची मनीऑर्डर करूनी । प्रार्थी कुलदैवताला ।।३१।। जय जय श्रीरामेश्वरा । तुझाचि आम्हास आसरा । आता शुभ तेचि तुम्ही करा । मज शब्द न बोलवे ।।३२।। चालावे कार्य मामांचे । हेच एक आहे माझ्या मनीचे । त्याचसाठी या देहाचे । मज काम आहे ।।३३।। नातरी या संसारयातना । मज आता सोसवती ना । हे परमेश्वरा तुमच्या चरणा । नमन माझे अखंड असो ।।३४।। राम विचार करी मनी । म्हणे आता त्वरा करुनी । मामांच्या चरित्र श्रवणी । मन तिचे रमवू ।।३५।। तैलचित्र मामांचे दाखवू । मस्तक नमविण्या सिंहासन करवू । मामांचे कीर्तन चालवू । खंड न पडता ।।३६।। तन मन आणि धन । अपार कष्ट वेचून । करू पाहे तिचे सांत्वन । परी हाय हाय ।।३७।। मामी म्हणे रामाला । तुझे कार्य पाहोन संतोष मला । परी माझ्या विकल हृदयाला । मी आता कैसे आवरू ।।३८।। माझी नव्हे योग्यता । परी मी पुरुषोत्तमाची झाले कांता । त्यांच्याच मागोमाग आता । मन घे ओढ माझे ।।३९।। जरी मी त्यांचा ध्यास सोडेन । तरी जे मज जातील विसरून । त्यांच्याविण माझे मन । न रमे मी काय करू ।।४०।। हट्ट कधी मी नाही केला । वस्त्र भूषण सुवर्णाचा भला । आशा आकांक्षांचा चूर केला । कोणासाठी ।।४१।। चार शब्द सुखाचे बोलावे । त्यांच्या सांनिध्यात असावे । सदा त्यांचे प्रसन्नवदन पहावे । हेची माझे भाग्य होते ।।४२।। ज्यासाठी व्रतवैकल्य केले । निराहार उपवासाने शरीर कष्टविले । सावित्रीचे कठोर व्रत आचरिले । कोणासाठी ।।४३।। तरी हा दैवाचा घाला । मजवरी आला । हेही सुख



पाहवेना त्याला । झाले दैव आडवे ।।४४।। हे शरीर प्रारब्धाचे । म्हणोन क्रूर खेळ चालती त्याचे । मला न कौतुक या देहाचे । आता वाटे ।।४५।। एक एक दिवस । मागे पाडी युगास । कधी पाहीन त्यांच्या चरणास । ऐसे मज जाहले ।।४६।। संत आले या घराला । अखिल केळकर कुलाचा उद्धार झाला । आता मला माझा मार्ग मोकळा । असोदे देवा ।।४७।। संतांच्या आशीर्वादापुढे । माझे बळ काय बापुडे । येथे अखंड वाजतील चौघडे । रामनामाचे ।।४८।। माझ्या चिरसुखाचा ठेवा गेला । तिकडे माझा जीव लागला । सोडा आता माझा मार्ग मोकळा । मला तुम्ही ।।४९।। आर्त स्वर मामीचा । ठाव घेई हृदयाचा । विकल देहास भार शोकाचा । असह्य दिसे ।।५०।। खाणे पिणे सुटले । व्याधींनी शरीर घर केले । मनी एकचि चिंतन राहिले । महा प्रयाणाचे ।।५१।। श्रीतुकारामाचे अभंग बारा । मामी करी पुनःपुन्हा उच्चारा । तोच जीवास आसरा । तिला वाटे ।।५२।।

**साधतील येणे इहपरलोक । सत्य सत्य भाक माझी तुम्हा ।।**
**येणे भवव्यथा जाईल तुमची । सख्या विठ्ठलाची आण मज ।।**

अखंड पाठ अभंगाचा । तोच आधार तिच्या जीवाचा । हाचि मार्ग पैल तीराचा । तिला वाटे ।।५३।। म्हणता म्हणता जाई दमून । तरी रात्रंदिन हेचि चिंतन । श्रीतुकारामांचे सदेह स्वर्गारोहण । पाही डोळ्यापुढे ।।५४।। रामाने केली मामांची आरती । म्हणे मामी आहे सुंदर किती । पंचप्राणांची पंचारती । फिरे संतांच्यापुढे ।।५५।। कोणी म्हणे तिला । आता उत्सव जवळ आला । 'दुःख वाटते मला' । एवढेच म्हणे ।।५६।। कोण वार कोण दिवस । याची सदा विचारपूस । मनी तिच्या विश्वास । गाठीन वेळ ।।५७।। म्हणे 'सहा दिवस उरले' उत्सवाला । आणि आपुला समय आला । दिवस श्रीगणेशजन्माचा भला । पाही हाललेला झोपाळा ।।५८।।

तोचि माघ महिना आला । तोचि शुद्ध पक्ष आला । तोच सोमवार गाठला । मामीने ।।५९।। मामी म्हणे मनात । मी जाईन विरून त्यांच्या स्वरूपात । मगचि होईल धर्मकृत्य । यथासांग ।।६०।। माघ शुद्ध चतुर्थीशी । शके अठराशे चौऱ्यांशी । उरली दहा मिनिटे चार वाजण्यासी । दीप गेला विझून ।।६१।। एकच प्रहरापूर्वी वाटली । आज माझी गादी हलली । माझी शेवटची आशा पुरविली । संत श्रेष्ठांनी ।।६२।। मामा आणि मामी । झाले पूर्ण कामी । आता काय वर्णन करू मी । उरले काय ।।६३।। मामांचे चित्र तिने पाहिले । सिंहासन प्रेमे कुरवाळले । चरित्रही ऐकिले । अश्रुपूर्ण नयने ।।६४।। मामा मामी का गेले । कारण आमुचे भाग्य सरले । श्रीरामाचे श्रीरामाने नेले । श्रीराम जयराम जयजयराम ।।६५।।या कराल कलियुगी । आहे काय सांगा उपयोगी । संत समागम हेचि जगी । परम भाग्य ।।६६।। निष्ठावंत परमभक्त । आदर्श जगा पुढे सतत । हाल अपेष्टांतही अमृत । देती जना ।।६७।। त्यांची थोर तपस्या पाहून । सामान्यांचेही वळे मन । शांती सौख्याचे महिमान । कळे संतांच्यामुळे ।।६८।। आता पुन्हा भाग्याचा ठेवा । श्रीरामस्मरणे साठवावा । तरीच लागेल सुगावा । संत सानिध्याचा ।।६९।। नाव आमुची संसार डोही । परी नावाडी दिसत नाही । तारु चालले दिशा दाही । वादळात ।।७०।। जय जय श्रीकरुणाकरा । स्मरण राहील ऐसे करा । न लागो माया मोहाचा वारा । हृदयी राहो गोविंद।।७१।।

विश्वास मुद्रणालयाचे चालक मान्यवर । श्री भाऊराव पडसलगीकर। मामांचे शिष्यवर । आदरभाव मामांच्यावरी ।।७२।। म्हणोन झीज सोसून । केले चरित्रमुद्रण । प्रेमाशिवाय सर्व न्यून । हे येथेही दिसून आले ।।७३।। याचा लेखक नरहरी । आणि मुद्रकही नरहरी । आता



नरामध्ये कैसा प्रगटेल हरि । ते हे चरित्र सांगेल ।।७४।। मामा आपुल्या कीर्तनात । मज पाहोन हेच म्हणत । हरि प्रगटल्या सार्थक सत्य । नरदेहाचे ।।७५।। ऐसे थोर चरित्र मामांचे । भाग्य आहे वाचकांचे । थोर स्मृती अंतःकरणाचे । घर करी ।।७६।। आता इंदिरा गोविंद स्मरणी । नत मस्तक करून चरणी । पूर्णविरामी ही लेखणी । देत असे ।।७७।।

**भक्ति प्रेम सुखालागी । स्मरू गोविंद इंदिरा ।**
**आयुष्य वेचिले ज्यांनी । श्रीरामस्मरणी सदा ।।**

इति श्रीगोविंदचरितमानस । जे स्वभावेचि अतिसुरस । जेथे अखंड उसळेल भक्तिरस । पूर्णविरामोध्याय गोड हा ।।१४।।

***

## अभंग

गोविंदराज कीर्तन करिती । काय सांगू त्यांची महती ॥१॥
झांज वाजती दाणेकरी । साथ करिती नाना भारी ॥२॥
दामुअण्णा तबल्यावरी । घारपुरे मास्तर पेटीवरी ॥३॥
कीर्तनाचा भरला रंग । अभंग बोले पांडुरंग ॥४॥
गोविंदरायांची स्तुती । खटावकर महाराज करिती ॥५॥
प्राप्ति ब्रह्मतन्मयता । गोविंदराया करिता कथा ॥६॥
अनुमंत सद्‌गुरूराज । कीर्तनी डोलती प्रेमे सहज ॥७॥
रामसीता धावुनी आली । मारुती मूर्ती प्रगटली ॥८॥
मौज लुटा माय-बाप । घडे येथे जप तप ॥९॥
सहस्रबुद्धे स्वामी । नित्य कीर्तनासी येती ॥१०॥
राम बुक्का लावी भाळी । प्रेमानंदाचे कल्लोळी ॥११॥
अभंग बोलती अपार । होय कीर्तन गजर ॥१२॥
रामराय करिती आरती । भक्ती वाटती खिरापती ॥१३॥
गोविंदरायाचा दास भाविक । अप्पा पोवार निःशंक ॥१४॥

**– अप्पाराव अमृत पोवार,** सांगली.



## अभंग

एकनाथ पैठणवाला । सांगली आवडली त्याला ॥ध्रु॥

पंचक्रोशी ही दत्तप्रभूंची । कृष्णा वाहे अमृतजलाची ।
पावनभूमी तपोवनाची । स्थान पाहूनी धाला ॥१॥

कुलसंशोधन करिता करिता । केळकरांचे आले चित्ता ।
अनंत तनूची घेउनी सत्ता । राधाकुशी अवतरला ॥२॥

एकनाथ गोविंद जाहला । हनुमंताची दीक्षा त्याला ।
नामरसाचा पिऊनी प्याला । रंगल रंगूनी गेला ॥३॥

पैठणक्षेत्री हरिपाठ भागवत । ज्ञानेश्वरी रामायण सांगत ।
प्रवचन-कीर्तन-रंगी नाचत । डोलवी श्रोतृगणाला ॥४॥

पैठणक्षेत्री अतृप्त हेतू । सांगलीत पूर्णेच्छा होतू ।
हरिभक्तिचा कळस डोलतु । पांडुरंग मनी भरला ॥५॥

**– श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर,** सांगली.

## पद

आली गुरूतृतीया । जवळी आली गुरूतृतीया ।।ध्रु।।
प्रतिपदेचा दिन हा आला । आरंभ झाला श्रीसेवेला ।
स्तवने गाऊंया ।।१।।
तृतीयेचा दिन बहुमोलाचा । महाराजांच्या प्रगटण्याचा ।
दृष्टी कृपेची तया ।।२।।
वद्य माघीच्या मध्यरात्री । दर्शन दिधले महाराजांनी ।
भावे त्या नमूया ।।३।।
तीन दिसांचा पर्वकाल हा । पावन करितो सकल जनांना ।
सुख हे सेवाया ।।४।।
मामांचा अधिकारचि मोठा । माहित असे बालक श्रेष्ठा ।
चरणा शरण तया ।।५।।
समारंभ हा अति गोडीचा । लाभ घडो मज तो पहाण्याचा ।
बहुत वर्षांचा ।।६।।

**– श्री. सुरेश जोशी,**
ओव्हरसियर, सांगली.



## आर्या

श्री हनुमान गुरूत्तम पदतत्पर शिष्यराय गोविंद ।
श्रीसुत बापूराव प्रभुकीर्तनकार केळकर वंद्य ।।१।।
कृष्ण माघिची तृतिया शालिवाहन शके, समाजात ।
गुरूसाक्षात्कार स्मृति अठराशे पंचेचाळिस ख्यात ।।२।।
श्रीदासबोध पठणी निमग्न होता न देहभान जनी ।
स्वानंद सदावस्था वृत्ती रंगोनिया हरी भजनी ।।३।।
अवचित एकाकी गुरू हनुमंत प्रगट भासती जीवा ।
उदयद्रिवरी वळुनी विकसवि सूर्य जेवी राजीवा ।।४।।
लक्षुनि दयामय साष्टांगे करुनिया नमस्कार ।
विनवुनि आज्ञा वांछुनि साक्षात विलोकिला चमत्कार ।।५।।
सादर बसुनी शुभासनी शिष्यार्पित रम्य शालजोडीच्या ।
स्वाज्ञापिती, कथि, कथना श्री सीताराम दिव्य जोडीच्या ।।६।।
संकेत दृष्टिने श्री खुणविती संत होती अदृश्य ।
देहांतर जरी झाले तरी साक्षात्कार भास सदृश्य ।।७।।
निजत्व पावुनि रमला अक्षण, साम्राज्यधर नहंजीव ।
मायामृगजल जाणुनी रामी हनुमान नर चिरंजीव ।।८।।
तधिपासुनि गुर्वाज्ञा स्मारक तृतिया तिथीहि माघीची ।
श्रीकीर्तनगंगेच्या प्रत्यहिची वाक्सुधाही ओघीची ।।९।।
सेवावी सत्संगे जनसंभारे करोनि मज अचल ।
गणराय वदे अवसरि गवसे एकात्मता अमर अखिल ।।१०।।
- गणराय कवी

## पद

श्रीराम जयराम जयजयराम । अखंड ही सेवा ।।ध्रु।।

नाम गुरूंचे पडता श्रवणी । त्रिताप जाती लया निघोनी ।
अनुभव घ्यावा ।।१।।

नाम प्रभूचे वदता वाचे । मग भव भय त्या नुरेचि साचे ।
शेवटीचा धावा ।।२।।

श्वासोश्वासी सद्‌गुरू ध्यानी । हनुमंत माऊली हृदयस्थानी ।
श्रीराम प्रगटे नाम स्मरणी । गुणनिधी हा गावा ।।३।।

अडतीस वर्षे कीर्तन सेवा । नाम मुखातील अमृत ठेवा ।
सुखवितसे जीवा ।।४।।

मूढ होऊनी गुणरसपानी । विष्णु सुताही लागे चरणी ।
प्रसाद हा द्यावा ।।५।।

**– सौ. विष्णुसुता**



## आरती

आरती गोविंदा । नित्य कीर्तनानंदा ।
सच्चिदानंदकंदा । गुरुलिंगसाधुबोधा ।।ध्रु।।

हनुमंत सद्गुरू आज्ञे । केले अखंड कीर्तन ।
सर्वस्व वेचियेले । समर्पिले पंचप्राण ।।१।।

ब्रह्मचैतन्यादी संत । भाऊराव समर्थ ।
रामचंद्र नारायण । नाम बोधी हे कथीत ।।२।।

श्रीराम जयराम जयजयराम । तेरा अक्षरे परम ।
संदेश निर्वाणीचा । पायी लोळे दासराम ।।३।।

**– राम गोविंद केळकर,** सांगली.

## निर्याणाचा अभंग

शालीवाहन शके अठराशेत्र्याऐंशीत ।
प्लवसंवत्सरात उत्तरायण ।।१।।

माघ शुद्ध नवमी आणि सोमवार ।
रात्रौ द्वितीय प्रहर तिसरे तासी ।।२।।

गोविंदरायांनी केले हो निर्याण ।
अखंड कीर्तन सत्य केले ।।३।।

एकांती लोकांती देहांतीही नाम ।
प्रचीती उत्तम स्वये दिली ।।४।।

श्रीराम जयराम जयजयराम ।
संदेश परम निर्वाणीचा ।।५।।

हनुमंतरूपी मिळोनीया गेले ।
कीर्तीरूपे उरले दासरामी ।।६।।

**– राम गोविंद केळकर, सांगली.**



## साधकोपयोगी ग्रंथ

(खालील यादीतील ग्रंथ हे श्रीदासराम ग्रंथमाला पुष्पयादी व्यतिरिक्त

१. श्रीहनुमद्-गुरू-चरित्र-बोध-सार (श्रीमामामहाराज केळकर लिखित श्रीकोटणीसमहाराजांचे चरित्र)
२. श्रीगोविंद चरित मानस (प.पू.श्रीमामामहाराजांचे ओवीबद्ध चरित्र)
३. श्रवणी पाजुनी अमृतवाणी (प.पू.मामामहाराजांचे निवडक अभंगांचे विवरण)
४. नित्य नवा दिस जागृतीचा (श्रीदादांच्या ३६५ वचनांचे चिंतन)
५. श्रीहनुमत् गुरूचरित्र (न.दा.दिवेकर कृत श्रीकोटणीसमहाराजांचे ओवीबद्ध चरित्र)
६. श्रीदासरामगाथा (अभंग गाथा)
७. संजीवन पाठ (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह)
८. श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह
९. श्रीनित्यपाठांमृत (श्रीदादांची नित्यपाठावरील कीर्तने)
१०. साधन संध्या (श्रीरामनिकेतन येथील नित्यक्रम)
११. चिन्मय नित्यपाठ (श्रीरामनिकेतन येथील नित्यक्रम)
१२. अमृतवाणी (प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांचा अभंग गाथा)
१३. सन्मार्ग दीप (चिमड मठ प्रकाशित)
१४. श्रीनारायणीय शिष्यप्रबोध अथवा भारतीय आत्मविद्या (प.पू.श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांची कीर्तने)
१५. श्रीगुरुलिंग गीतम् (प्रा.डॉ.के.वा. आपटे लिखित)
१६. श्रीदासराम गीतम् (प्रा.डॉ.के.वा. आपटे लिखित)

## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

| क्रमांक | ग्रंथाचे नांव |
|---|---|
| १ | नासदीय सूक्तावरील ओविबद्ध टीका |
| २ | श्रीदासरामगाथा (अभंग गाथा) |
| ३ | श्रीरामदासबोध (ओवीबद्ध) |
| ४ | संजीवन पाठ (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह) |
| ५ | श्रीचांगदेव पासष्टी एक नाम कला (ओवीबद्ध टीका) |
| ६ | श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह |
| ७ | ग्रंथत्रयी (आत्मबोधप्रत्ययामृत, दासराम विंशिका व पंचविशी) |
| ८ | श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग |
| ९ | श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन |
| १० | श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह (३६५ वचने) |
| ११ | श्रीगुरुमहिमा |
| १२ | श्रीदासरामगाथा पुरवणी |
| १३ | श्रीदासराममहाराज आत्मचरित्र |
| १४ | श्रीदासराममहाराज कृत श्लोकरचना |
| १५ | श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव (श्रीदासरामकृत समओवी टीकेसह) |
| १६ | रामदासस्वामीकृत आत्माराम (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) |
| १७ | श्रीगुरुलिंगगीता (२२८ पदे) |
| १८ | श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) |
| १९ | श्रीदासराममहाराज लिखित लघु संतचरित्रे |
| २० | श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र (श्रीदासरामलिखित) |
| २१ | श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी |
| २२ | श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन |
| २३ | श्रीदासराममहाराज यांची प्रवचने (१०८) |
| २४ | समर्थ रामदासकृत करुणाष्टके (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह) |



| क्रमांक | ग्रंथाचे नांव |
|---|---|
| २५ | श्रीगुरुलिंगगीता (६६ पदे व अर्थ) |
| २६ | श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध (विवरणासह) |
| २७ | ज्ञानेश्वरी ६वा अध्याय (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) |
| २८ | श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह) |
| २९ | श्रीएकनाथकृत आनंदानुभव (श्रीदासरामकृत टीकेसह) |
| ३० | परमार्थ प्रश्नोत्तरी |
| ३१ | श्रीदासराम चिंतनिका (श्रीदासराममहाराज लिखित लेख संग्रह) |
| ३२ | श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण) |
| ३३ | अक्षरे चैतन्याची भाग-१ (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) |
| ३४ | अक्षरे चैतन्याची भाग-२ (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) |
| ३५ | ज्ञानगंगा (श्रीदासराममहाराजांची प्रवचने) |
| ३६ | अक्षरधारा (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन) |
| ३७ | श्रीरामपाठांमृत (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने) |
| ३८ | श्रीनित्यपाठांमृत (श्रीदादांची नित्यपाठावरील कीर्तने) |
| ३९ | श्रीबाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र (श्रीदासराम लिखित) |

# श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| १ | चिमड संप्रदाय | २००५ |
| २ | श्रीरामदासस्वामी चरित्र | २००६ |
| ३ | श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग | २००६ |
| ४ | श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन | २००७ |
| ५ | श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | २००७ |
| ६ | दासबोधातील तत्त्वज्ञान | २००७ |
| ७ | श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह | २००८ |
| ८ | श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | २००९ |
| ९ | साधन संध्या | २००९ |
| १० | अनंत अमृत स्मरण | २००९ |
| ११ | श्रीगुरुमहिमा | २००९ |
| १२ | श्रीज्ञानेश्वरी प्रसाद (श्रीज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या अर्थासह) | २००९ |
| १३ | श्रीदासरामगाथा पुरवणी | २००९ |
| १४ | श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | २०१० |
| १५ | श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०१० |
| १६ | श्रीदासराममहाराज श्लोकरचना | २०१० |
| १७ | श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव(श्रीदासरामकृत समओवी टीकेसह) | २०१० |
| १८ | श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्र | २०१० |
| १९ | रामदासस्वामीकृत आत्माराम(श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०१० |
| २० | श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २०१० |
| २१ | श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २०१० |
| २२ | श्रीरामनिकेतन (माहिती पुस्तिका) | २०११ |
| २३ | श्रीरामनिकेतनमधील आराधना | २०११ |



| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| २४ | ग्रंथत्रयी(आत्मबोधप्रत्ययामृत,श्रीदासरामविंशिका, श्रीदासरामपंचविशी) | २०११ |
| २५ | श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०११ |
| २६ | अभंगदरबार (आवृत्ती १) | २०११ |
| २७ | सद्बोध दशक (श्रीदादांच्या १० अभंगांवरील विवरण) | २०११ |
| २८ | श्रीदासराममहाराज नित्यपाठचरित्र | २०११ |
| २९ | श्रीगुरुराजकथित ज्ञान आणि बोध (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०११ |
| ३० | प.पू.श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०११ |
| ३१ | पाठांतर सुलभ भगवत्गीता | २०११ |
| ३२ | श्रीदासराममहाराज लिखित लघु चरित्रे | २०११ |
| ३३ | श्रीतात्यासाहेबमहाराजकृत मनोबोध (निवडक अभंग विवरणासह) | २०११ |
| ३४ | प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०११ |
| ३५ | महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का चरित्र | २०११ |
| ३६ | तो हा दासबोध (दासबोधातील सारभूत ओव्या अर्थासह) | २०११ |
| ३७ | श्रीदासराममहाराज चरितामृत | २०११ |
| ३८ | श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र | २०११ |
| ३९ | श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०११ |
| ४० | श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र (श्रीदासरामलिखित) | २०११ |
| ४१ | श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी | २०११ |
| ४२ | श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन | २०१२ |
| ४३ | श्रीदासराममहाराज यांची प्रवचने (१०८) | २०१२ |
| ४४ | प.पू.श्रीमामामहाराज केळकर चरित्र | २०१२ |
| ४५ | श्रीदासरामगीतम् (श्रीदादांचे संस्कृत चरित्र व संस्कृत रचना) | २०१२ |
| ४६ | श्रीदासराममहाराज वचनसंग्रह (३६५ वचने) | २०१२ |
| ४७ | चैतन्यब्रह्म | २०१३ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ४८ | श्रीदासराममहाराजकृत वायुलहरी (विवरणासह) | २०१३ |
| ४९ | स.रामदासकृत करुणाष्टके (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह) | २०१३ |
| ५० | श्रीगुरुलिंगगीता (६६ पदे व अर्थ) | २०१३ |
| ५१ | चिमड संप्रदायातील पंचपदी (विवरणासह) | २०१३ |
| ५२ | गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग -१ | २०१४ |
| ५३ | श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध (विवरणासह) | २०१४ |
| ५४ | श्रीदासरामायण (श्रीदासराममहाराजांचे गीतचरित्र) | २०१४ |
| ५५ | श्रीदासराममहाराज केळकर नामसाधना मंदिर वास्तुशांत | २०१४ |
| ५६ | श्रीदासराममहाराजकृत रेवणसिद्धपाठ (विवरणासह) | २०१४ |
| ५७ | गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग-२ | २०१५ |
| ५८ | अभंग दरबार (आवृत्ती २ री) | २०१५ |
| ५९ | श्रीदासरामचरित्र (ओवीबद्ध) | २०१५ |
| ६० | आत्मारामपाठ (श्रीदादांच्या २० अभंगांवरील विवरण) | २०१५ |
| ६१ | ज्ञानेश्वरी ६वा अध्याय (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) | २०१५ |
| ६२ | श्रीमद्दासबोधातील प्रपंचयोग | २०१५ |
| ६३ | अभंग दरबार भाग - २ | २०१५ |
| ६४ | श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह) | २०१६ |
| ६५ | श्रीएकनाथकृत आनंदानुभव (श्रीदासरामकृत टीकेसह) | २०१६ |
| ६६ | नासदीयसूक्त विवरण | २०१६ |
| ६७ | श्रीज्ञानदेवतेहेत्तिशी भावार्थ विवरण | २०१७ |
| ६८ | पाठांतर सुलभ भगवद्गीता आवृत्ती दुसरी | २०१९ |
| ६९ | दासबोधातील परमार्थ योग | २०१९ |
| ७० | चांगदेवपासष्टी एक नामकळा (विवरणासह) | २०१९ |
| ७१ | परमार्थ प्रश्नोत्तरी (पुनर्मुद्रण) | २०१९ |



| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ७२ | चिन्मयबोध (गुरुपरंपरेतील सिद्धपुरुषांची पदे अर्थासह) | २०१९ |
| ७३ | श्रीदासराम चिंतनिका (लेख संग्रह) | २०१९ |
| ७४ | श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण) | २०१९ |
| ७५ | अक्षरे चैतन्याची भाग-१(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) | २०२० |
| ७६ | अक्षरे चैतन्याची भाग-२(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) | २०२० |
| ७७ | ज्ञानगंगा (श्रीदासराममहाराजांची प्रवचने) | २०२० |
| ७८ | अक्षरधारा (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन) | २०२० |
| ७९ | श्रीनिंबरगी संप्रदाय दर्शन (सचित्र मार्गदर्शन पुस्तिका) | २०२० |
| ८० | श्रीरामपाठांमृत (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने) | २०२० |
| ८१ | नित्यकीर्तनानंदा | २०२० |
| ८२ | चैतन्याचा महामेरू (श्रीदादांचा जन्मशताब्दी गौरवग्रंथ) | २०२० |
| ८३ | सांप्रदायबोध (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०२० |
| ८४ | अभंग सुधा (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०२० |
| ८५ | श्रीदासरामचरित्र (ओवीबद्ध) (द्वितीय आवृत्ती) | २०२० |
| ८६ | आरती संग्रह (द्वितीय आवृत्ती) | २०२० |
| ८७ | संजीवनपाठ (द्वितीय आवृत्ती) | २०२० |
| ८८ | अमृतवाणी (द्वितीय आवृत्ती) | २०२१ |
| ८९ | श्रीदासरामायण (द्वितीय आवृत्ती) | २०२१ |
| ९० | शांतीब्रह्म मामा (श्री.गणपतराव कानिटकर लिखित) | २०२१ |

## - श्रीदासराममहाराजांची आरती -

आरती रामराया । करी कृपेची छाया ।
दावोनी दीनी दया । धन्य धन्य महाराया ।।ध्रु।।
सद्‌गुरू हनुमंत । पिता गोविंद संत ।
बोधी गुरुलिंग सिद्ध । धरुनि रूप सिद्धानंद ।।१।।
सिद्धसाधनाने । स्वये ब्रह्मचि झाले ।
भावादरे **केशवाने** । चरणी मस्तक ठेविले ।।२।।
प्रा.डॉ.के.वा.आपटे

## - श्रीअण्णामहाराजांची आरती -

आरती रामसूता । जय कैवल्यपीठा ।।
सद्गुरू दासराम । काय वानू महाबोधा ।।१।।
सहज बोलणे ते । जगा केला उपदेश ।।
नवनीत काढुनिया । जना केलेसे तृप्त ।।२।।
अनाथांचे नाथ तुम्ही । जगी प्रेमे कुरवाळिले ।।
चंद्रदास शरण येता । निजपदी रत केले ।।३।।

- श्री दीपक केळकर